युजीसीच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या सीबीसीएस पॅटर्नच्या नव्या अभ्यासक्रमानुसार, बी. ए. भाग १ (सेमिस्टर प्रथम) अर्थशास्त्र तसेच इतर विद्यापीठांच्या अभ्यासक्रमावर आधारित उपयुक्त अद्ययावत ई–पुस्तक.

# सूक्ष्म आर्थिक सिद्धांत

## (Theory of Micro Economics)


**लेखक**

**डॉ. एम. के. नन्नावरे**

एम. ए. (अर्थशास्त्र), सेट, एम. फिल, पीएच. डी.
सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
पदवी व पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग,
श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आकोट जि. अकोला.



Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors www.vidyawarta.com

# सूक्ष्म आर्थिक सिद्धांत (Theory of Micro Economics)

© डॉ. एम. के. नन्नावरे

❖ **Publisher :**
**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
Limbaganesh, Dist. Beed (Maharashtra)
Pin-431126, vidyawarta@gmail.com

❖ **Printed by :**
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
Limbaganesh, Dist. Beed, Pin-431126
**www.vidyawarta.com**

❖ **Page design & Cover :**
HP Office (Source by google)

❖ **Edition: Sept. 2023**

**ISBN** 978-93-92584-31-2

❖ **Price : 300/ -**

All Rights Reserved, No part of this publication may be reproduced, or transmitted, in any form or by any means, electronic mechanical, recording, scanning or otherwise, without the prior written permission of the copyright owner. Responsibility for the facts stated, opinions expressed. Conclusions reached and plagiarism, If any, in this volume is entirely that of the Author. The Publisher bears no responsibility for them. What so ever.Disputes, If any shall be decided by the court at **Beed** (Maharashtra, India)

# मनोगत

'सूक्ष्म आर्थिक सिद्धांत' हे ई-पुस्तक अत्यंत महत्त्वपूर्ण व उपयुक्त आहे. प्रस्तुत पुस्तकाची पाच प्रकरणांमध्ये विभाजित केले आहे. प्रथम प्रकरणांमध्ये अर्थशास्त्राचा परिचय, व्याख्या, आर्थिक नियम व सूक्ष्म अर्थशास्त्र; द्वितीय प्रकरणांमध्ये उपभोक्त्यांची वर्तणुक मागणी व उपयोगिता तर उत्पादकाची वर्तणूक पुरवठा विश्लेषणांतर्गत व मागणीची लवचिकता; तृतीय प्रकरणांमध्ये उत्पादकांच्या दृष्टिकोणातून खर्च-प्राप्तीचे विश्लेषण व उत्पादनातील मितव्ययता आणि अमितव्ययता; चतुर्थ प्रकरणांमध्ये बाजारपेठ संरचनांतर्गत बाजारातील परिस्थिती ठरविणाऱ्या घटकांनुसार कशी बदलते त्यानुसार पूर्ण स्पर्धा, एकाधिकार स्पर्धा, एकाधिकारयुक्त स्पर्धा, अल्पाधिकार स्पर्धा आणि द्वयाधिकार स्पर्धा तर पाचव्या प्रकरणांमध्ये उत्पादनाच्या घटकांची वैशिष्ट्ये, रिकार्डोचा खंड विषयक सिद्धांत व मजुरी, व्याज आणि नफ्याच्या संकल्पना यांचे विश्लेषण करण्यात आले आहे. याबरोबरच कौशल्य संवर्धन मॉड्युल अंतर्गत कृषी बाजार प्रणालीमध्ये बाजार व्यवस्थेची यंत्रणा, APMC चे कामकाज व e-NAM विषयी महत्वपूर्ण व उपयुक्त माहिती देण्यात आली आहे.

प्रस्तुत ई-पुस्तकाची लेखन मांडणी करताना सोपी भाषा, उपयोजित उदाहरणांचा समावेश करण्यात आला आहे. ज्यामुळे पुस्तकातील मजकूर अधिक मौल्यवान आणि विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरेल. विद्यार्थी व शिक्षकांना विशिष्ट अभ्यासक्रम सामग्री शोधणे, घटक अभ्यासासाठी सूचित करण्यास सोयीचे ठरते. विविध स्पर्धा, नेट-सेट परीक्षार्थी, अर्थशास्त्र विषयाचे विद्यार्थी, शिक्षक याकरिता निश्चितच उपयुक्त ठरेल. अशी आशा व्यक्त करतो. मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांतील निवडक पुस्तके, ग्रंथ व इंटरनेटवरील माहिती संदर्भ म्हणून संकलन करण्यात आले आहे. ग्रंथाच्या लेखकांचे मी मनस्वी आभार मानतो.

गुरुवर्य मा. प्राचार्य डॉ. व्ही. एन. ठावरी, मा. डॉ. श्रीराम कावळे प्र-कुलगुरु, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, मा. प्राचार्य डॉ. एस. एच. पांडे, डॉ. आर. बी. भांडवलकर अध्यक्ष, अर्थशास्त्र अभ्यास मंडळ, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, मा. डॉ. संतोष कुटे सिनेट सदस्य, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, प्रा. डॉ. भास्कर धारणे, प्रा. डॉ. आर. आर. गव्हाळे, प्रा. डॉ. अनिल बनसोड, प्रा. डॉ. संतोष धामणे या सर्वांचे विशेष सहकार्य तसेच सन्मित्र प्रा. डॉ. अशोक इंगळे यांनी मौलिक मार्गदर्शन केल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो.

प्रेरणादायी व निर्मळ प्रेम देणारे माझे आई-बाबा, माझी सुविद्य पत्नी रक्षा, कन्या अक्षरा, पुत्ररत्न विराज व कुटुंबातील आप्तजनांचे सतत सहकार्य, दर्शविलेला संयम कौतुक करण्यायोग्य आहे.

प्रस्तुत लेखन ई-पुस्तक रुपात प्रकाशित करण्यासाठी **हर्षवर्धन पब्लिकेशन्स**, **विद्यावार्ता** रिसर्च जर्नल चे संचालक श्री. **डॉ.बापू गणपतराव घोलप** यांनी मुखपृष्ठ व छपाईचे काम चोख व कमी वेळेत अधिक कौशल्यपूर्ण रितीने हे ई-पुस्तक सिद्ध केले त्याबद्दल त्यांचे आभार. तद्वतच सर्वांचे आभार व्यक्त करतो.

सदर ई-पुस्तकांमध्ये काही संगणकीय चुका अनावधानाने झाल्या असतील त्या निदर्शनास आणून दिल्यास त्या दूर करण्याचा प्रयत्न केला जाईल.

**डॉ. एम. के. नन्नावरे**

# अनुक्रमणिका


प्रकरण १ अर्थशास्त्राचा परिचय (**Introduction of Economics**) ०६

१.१ अर्थशास्त्राचा परिचय : प्रस्तावना, अर्थशास्त्रासंबंधी प्राचीन व आधुनिक विचार.

१.२ अर्थशास्त्राच्या व्याख्या : ॲडम स्मिथ : व्याख्या, वैशिष्ट्ये, टीका; डॉ. आल्फ्रेड मार्शल : व्याख्या, वैशिष्ट्ये, टीका; प्रा. रॉबिन्स : व्याख्या, वैशिष्ट्ये, गुण, टीका; मार्शल आणि रॉबिन्सच्या व्याख्यांमधील साम्य व तुलना.

१.३ आर्थिक नियम : व्याख्या, प्रकार, वैशिष्ट्ये, आर्थिक नियम व भौतिक शास्त्र नियमातील फरक, नैसर्गिक शास्त्र आणि सामाजिक शास्त्र यातील फरक, मर्यादा, उपयोगिता.

१.४ सूक्ष्म अर्थशास्त्र : ऐतिहासिक पार्श्वभूमी, अर्थ व व्याख्या, महत्त्व, गुण, दोष, सूक्ष्म व स्थूल अर्थशास्त्रातील फरक.

प्रश्नसंग्रह.

प्रकरण २ मागणी व पुरवठा (Demand and Supply) २४

२.१ मागणी व नियम : मागणी व इच्छा- व्याख्या, फरक, निर्धारक घटक, मागणीचे प्रकार, मागणीचा नियम- सिद्धांताचे विधान, सूत्र, गृहिते, कोष्टक व आकृतीद्वारे स्पष्टीकरण, मागणी वक्र डावीकडून उजवीकडे खाली का येतो?, अपवाद.

२.२ पुरवठा व नियम : साठा व पुरवठा- व्याख्या, फरक, पुरवठा नियम-सिद्धांताचे विधान, सूत्र, गृहितके, कोष्टक व आकृतीद्वारे स्पष्टीकरण, टिका, निर्धारक घटक.

२.३ मागणीची लवचिकता : व्याख्या, प्रकार- किंमत लवचिकता- व्याख्या, प्रकार; उत्पन्न लवचिकता, तिरकस लवचिकता, प्रतिस्थापन लवचिकता; मागणीच्या लवचीकतेचे निर्धारक घटक, महत्व.

२.४ उपयोगिता : एकूण व सीमांत उपयोगिता यातील संबंध, उपयोगितेचे प्रकार; घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धांत-सिद्धांताचे विधान, गृहिते, कोष्टक व आकृतीद्वारे स्पष्टीकरण, अपवाद, मर्यादा, महत्त्व, सीमांत उपयोगिता व किंमत यातील संबंध.

प्रश्नसंग्रह.

प्रकरण ३ खर्च व प्राप्तीचे विश्लेषण (Cost and Receipt Analysis) ५१

३.१ उत्पादन खर्च - उत्पादनाचा अर्थ, उत्पादन खर्च संकल्पना- आर्थिक व्यय- प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष मौद्रिक खर्च, सर्वसाधारण नफा; वैकल्पिक व्यय; वास्तव खर्च; एकूण व्यय- एकूण स्थिर व्यय, एकूण बदलता व्यय; सरासरी खर्च-सरासरी स्थिर व्यय, सरासरी बदलता व्यय; सीमांत खर्च, सरासरी खर्च व सीमांत खर्च या दोन्हीतील संबंध.

३.२ प्राप्तीची संकल्पना - प्राप्तीच्या संकल्पनांचे महत्व, प्रकार- एकूण, सरासरी व सीमांत प्राप्ती; एकूण, सरासरी आणि सीमांत प्राप्ती यांचा परस्पर संबंध.

३.३ उत्पादनातील मितव्ययता आणि अमितव्ययता- उत्पादनातील मितव्ययता-आंतरिक व बाह्य मितव्ययता; उत्पादनातील अमितव्ययता-आंतरिक व बाह्य अमितव्ययता.

प्रश्नसंग्रह.

प्रकरण ४ बाजार संरचना (Market Structure) ६७

४.१ बाजाराचा अर्थ व व्याख्या : बाजारपेठेचे वर्गीकरण-क्षेत्राच्या आधारावर, वस्तूच्या आधारावर, वेळेनुसार, स्पर्धेनुसार.

४.२ पूर्ण स्पर्धा बाजार-अर्थ, वैशिष्ट्ये.

४.३ एकाधिकार स्पर्धा- व्याख्या, वैशिष्ट्ये, प्रकार, मूल्यभेद व प्रकार, पूर्ण स्पर्धा व एकाधिकार बाजार यातील फरक.

४.४ एकाधिकारयुक्त स्पर्धा बाजार- अर्थ, वैशिष्टये, पूर्ण स्पर्धा व एकाधिकारयुक्त बाजार यातील फरक.
४.५ अल्पजनाधिकार बाजार-व्याख्या, प्रकार, वैशिष्ट्ये
४.६ द्विविक्रेताधिकार- व्याख्या, लक्षणे किंवा वैशिष्ट्ये.
प्रश्नसंग्रह.
प्रकरण ५ उत्पादनाचे घटक (Production Factors) ८२
५.१ उत्पादन घटकांची व्याख्या व वैशिष्ट्ये : भूमी- अर्थ व व्याख्या, वैशिष्ट्ये; श्रम- अर्थ व व्याख्या, प्रकार, वैशिष्ट्ये; भांडवल-अर्थ व व्याख्या, वैशिष्ट्ये, प्रकार, महत्व; संयोजक- अर्थ व व्याख्या, वैशिष्ट्ये, कार्ये.
५.२ खंड- व्याख्या, प्रकार; रिकार्डोचा खंड सिद्धांत- नियम, गृहीते, सिद्धांताचे स्पष्टीकरण-विस्तृत व सखोल लागवडीत खंडाची निर्मिती, रिकार्डोच्या खंड सिद्धांताची मुलभूत वैशिष्ट्ये, भूमीला खंड का मिळतो?, सिध्दांवरील टीका.
५.३ मजुरी, व्याज आणि नफ्याची संकल्पना : मजुरी-व्याख्या, प्रकार, निर्धारक घटक; व्याज- व्याख्या, प्रकार; नफा-व्याख्या, प्रकार.
प्रश्नसंग्रह.
कौशल्य संवर्धन मॉड्युल १०३
लेखक परिचय १०८

# प्रकरण १
# अर्थशास्त्राचा परिचय
# (Introduction of Economics)

---

## १.१ अर्थशास्त्राचा परिचय (Introduction of Economics)

**प्रस्तावना**

सर्वसामान्य लोकांच्या दृष्टीकोनातून अर्थ म्हणजे धन, संपत्ती किंवा पैसा होय. तसेच अर्थशास्त्र याचा अर्थ धन-संपत्तीची किंवा पैशाची प्राप्ती आणि खर्च यांचा अभ्यास करणारे शास्त्र असा घेतला जातो. 'अर्थशास्त्र' (Economics) ही संज्ञा ओइकोनॉमीया (Oikonomia) या ग्रीक शब्दापासून बनली आहे. याचे दोन भाग Oikos म्हणजे Household (घर) आणि Nomos म्हणजे Management (व्यवस्थापन). म्हणजेच 'घर किंवा कुटुंबाचे व्यवस्थापन करणारे शास्त्र'. थोडक्यात, कुटुंब किंवा राष्ट्राचे कल्याण करण्यासाठी जास्तीत जास्त उत्पादन करणे याचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे अर्थशास्त्र होय. यातूनच अर्थशास्त्राचा जन्म झाला. कुटुंबाचे जसे आर्थिक व्यवस्थापन असते, तसेच गावांचे, शहरांचे, राज्यांचे, देशाचे व जगाचे देखील आर्थिक व्यवस्थापन असते.

**अर्थशास्त्रासंबंधी प्राचीन विचार**

प्राचीन काळात अर्थशास्त्रास 'अर्थशास्त्र' या स्वरुपात ओळखले जात नव्हते, त्याऐवजी ते राजनीती, मानसशास्त्र, गृहप्रबंधनशास्त्र, तत्वज्ञान, नीतीशास्त्र इत्यादी शास्त्रांचा भाग मानले जात असे. १८ व्या शतकाच्या उत्तरार्धापर्यत अर्थशास्त्राला स्वतंत्र शास्त्र म्हणून मान्यता नव्हती. त्यापुर्वी अर्थशास्त्र हा राज्यशास्त्राचाच एक भाग मानला जात होता. त्याला 'राजकीय अर्थव्यवस्था' (Political Economy) म्हणून संबोधले जात होते. प्राचीन भारतातील थोर राजकीय विचारवंत राजनीतिज्ञ, तत्त्वज्ञानी, सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ चाणक्य उपाख्य कौटिल्य यांनी इ. स. पूर्व ३३१ ते ३०० या कालावधीत अर्थव्यवस्थेवर, राज्यव्यवस्थापणावर आधारीत 'अर्थशास्त्र' हा राजकीय ग्रंथ लिहून जगाला नवीन शास्त्र उपलब्ध करुन दिले. कौटिल्याने आपल्या ग्रंथात प्रामुख्याने अर्थशास्त्राचा उल्लेख राजकीय अर्थशास्त्र म्हणूनच केला असून त्यात राज्यकारभार चालविण्यासाठी धनाची प्राप्ती कशी करायची आणि जन कल्याणात भर कशी घालायची याचे वर्णन केले आहे. कौटिल्य यांच्या मते, 'जनतेची वा प्रजेची उपजीविका व्हावी म्हणून राजाने नवीन प्रदेश कसा जिंकावा व आपल्या ताब्यात कसा ठेवावा हे ज्यात सांगितले जाते ते शास्त्र म्हणजे अर्थशास्त्र होय.'

**अर्थशास्त्रासंबंधी आधुनिक विचार**

१९ व्या शतकाच्या मध्यापर्यत अर्थशास्त्राचा उल्लेख राजकीय अर्थशास्त्र म्हणूनच केला जात होता. याच काळात अनेक विचारवंतानी अर्थशास्त्राला वेगवेगळी नावे देण्याचा प्रयत्न केला. जसे व्हेटले यांनी याला 'Catallactics' किंवा "The Science of Exchange" (विनिमयाचे शास्त्र) म्हटले आहे. हेर्न यांनी 'Plutology' किंवा "The Science of Wealth" (धनाचे शास्त्र) म्हटले आहे. इन्राम यांनी 'Chrematistics' किंवा "The science of Money Making" (पैसा निर्मितीचे शास्त्र) म्हणून संबोधले. १९ व्या शतकाच्या मध्यानंतर साधन सामग्रीचा मितव्ययतेचे वापर करणारे (Economy) शास्त्र म्हणून 'Economics' हा शब्द प्रचलित झाला.

## १.२ अर्थशास्त्राच्या व्याख्या (Definations of Economics)

| अर्थशास्त्राच्या व्याख्या |
|---|
| अ) संपत्तीवर आधारित व्याख्या |
| ब) मानवी कल्याणावर आधारित व्याख्या |
| क) दुर्मिळतेवर आधारित व्याख्या |

१७७६ पासून ते आजपर्यत अर्थशास्त्र या अभ्यास विषयाचा प्रचंड विकास आणि विस्तार झाला आहे. अर्थशास्त्र ह्या अभ्यास विषयाच्या अनेक अर्थशास्त्रज्ञांनी आपापल्या काळातील परिस्थितीनुरुप व्याख्या केलेल्या आहेत. विषयाचा जसजसा विकास होत गेला तसतसा व्याख्यांमध्येही बदल होत गेला आहे. पॉल सॅम्युल्सन यांनी अर्थशास्त्राचे वर्णन 'सामाजिक शास्त्रांची राणी' असे केले आहे. अर्थशास्त्राच्या व्याख्यांचे प्रामुख्याने संपत्ती, आर्थिक

कल्याण, दुर्मिळता (अभाव), विकासाभिमुख व अनावश्यकता या पाच भागात वर्गीकरण केले जाते. परंतु अभ्यासाच्या दृष्टिकोनातून अर्थशास्त्राच्या काही प्रसिद्ध व्याख्यांचा अभ्यास पुढीलप्रमाणे केला आहे.

अ) संपत्तीवर आधारित व्याख्या (Definition based on Wealth)

**ब)** मानवी कल्याणावर आधारित व्याख्या (Definition based on Welfare)

क) दुर्मिळतेवर आधारित व्याख्या (Definition based on Scarcity)

अ) संपत्तीवर आधारित व्याख्या (Definition based on Wealth)

व्यापारवादी अर्थशास्त्रद्यानी, सरकारला शक्तीमान असणे आवश्यक आहे आणि शक्तिमान होण्यासाठी सरकार श्रीमंत असले पाहीजे, म्हणून संपत्तीच्या प्राप्तीस महत्व देणे आवश्यक आहे. १८ व्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत अर्थशास्त्राला स्वतंत्र शास्त्र म्हणून मान्यता नव्हती. याच शतकात राजनीतिक अर्थशास्त्र (Political Economy) या स्वरुपात विकास होऊ लागला या विकासाचे प्रथम श्रेय ॲडम स्थिम यांना द्यावे लागेल. कारण सर्वप्रथम अर्थशास्त्राचा विकास व अर्थशास्त्राला स्वतंत्र शास्त्र म्हणून मान्यता मिळवून देण्याचे कार्य केल्यामुळेच ॲडम स्थिम यांना 'अर्थशास्त्राचे जनक' *(Father of Economics)* असे मानतात.

सनातन संप्रदायाचे प्रणेते ब्रिटीश अर्थशास्त्रज्ञ ॲडम स्मिथ आणि त्यांचे अनुयायी जे. बी. से, डेव्हिड रिकार्डो, जे. एस. मिल, वॉकर आणि केअरन्स इत्यादींनी अर्थशास्त्राची संपत्तीवर आधारित व्याख्या केलेल्या आहेत. ॲडम स्मिथ यांना सनातनवादी तसेच अर्थशास्त्राचे जनक असे मानले जाते. सनातनवादी संप्रदायात ॲडम स्मिथ, जे. बी. से, विलीयम सिनियर, वॉकर, जे. एस. मिल यांचा प्रमुख समावेश होतो. १७७६ मध्ये प्रकाशित झालेल्या *"An Enquiry in to the Nature and Causes of Wealth of Nations"* (राष्ट्राच्या संपत्तीच्या स्वरुपाची आणि कारणाची चौकशी) हा प्रसिद्ध ग्रंथ प्रकाशित झाला आणि तेव्हापासून अर्थशास्त्राला स्वतंत्र शास्त्र म्हणून मान्यता मिळाली.



**ॲडम स्मिथ** यांनी आपल्या १७७६ मध्ये प्रकाशित केलेल्या *'राष्ट्राची संपत्ती'* या प्रसिद्ध ग्रंथामध्ये अर्थशास्त्राची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. *''अर्थशास्त्र हे राष्ट्रीय संपत्तीचे स्वरुप व निर्मितीच्या कारणांची मीमांसा (चौकशी) करणारे शास्त्र आहे.''* Economics explains how Wealth is produced and consumed; thus Economics was regarded as a study of Wealth-Adam Smith अशी व्याख्या केली आहे. संपत्तीला प्राधान्य देऊन मानवी जिवनाचे साध्य व उद्दिष्ट मानून स्मिथ म्हणतो, *'संपत्तीचे उत्पादन, वाटणी आणि विनिमय यांचे विवेचन करणारे शास्त्र म्हणजे अर्थशास्त्र होय.* (Economics is the social science that analysis the production, distribution and consumption of goods and services).

जे. बी. से. (फ्रेंच अर्थशास्त्रज्ञ) : ''अर्थशास्त्र हे एक असे विज्ञान आहे की, जे संपत्तीच्या संबंधी असलेल्या नियमांचे पालन करते.''

एफ. ए. वॉकर (अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ) : ''अर्थशास्त्र ही ज्ञानाची अशी शाखा वा अंग आहे की जिचा संबंध संपत्तीशी आहे.''

जे. एस. मिल (ब्रिटिश राजकीय अर्थशास्त्रज्ञ) : ''संपत्तीचे उत्पादन आणि विभाजन यांचे प्रात्यक्षिक करणारे शास्त्र म्हणजे अर्थशास्त्र होय.''

जे. ई. केअरन्स यांनी आपल्या 'The character and Logical Method of Political Economy' पुस्तकात म्हटले आहे की, ''नैसर्गिक संपत्तीच्या वाटाघाटीचे अध्ययन करणारे शास्त्र म्हणजे अर्थशास्त्र होय.''

वरील सर्व अर्थशास्त्रज्ञांबरोबरच डेव्हिड रिकार्डो यांनीही अर्थशास्त्राला 'संपत्तीचे शास्त्र' मानले आहे. संपत्तीचे उत्पादन, तिची वृद्धी आणि विभाजन यांच्याशी संबंधित व्यवहारांची चिकित्सा करणारे हे शास्त्र आहे असे सनातनवादी अर्थशास्त्रज्ञ मानतात. संपत्तीशी संबंधीत वरील सर्व व्याख्यांमध्ये ॲडम स्मिथ यांची व्याख्या महत्वपूर्ण मानली जाते. कारण ॲडम स्मिथ यांच्या विचारसरणीच्या अगोदर अस्तित्वात प्रमुख असलेल्या व्यापारवादी (Mercantilism) विचारसरणीत सोने, चांदी या मौल्यवान धातूच्या साठ्याला संपत्ती मानले होते. परंतु ॲडम स्मिथ यांनी संपत्ती संकल्पना विस्तृत अर्थाने वापरली आहे. भौतिक वस्तुंच्या निर्मितीसाठी ज्या दुर्मिळ साधन सामग्रीचा वापर केला जातो तिला ते संपत्ती मानतात. यात पैशाला मर्यादित अर्थाने संपत्ती मानून

त्याच्या प्राप्तीतून राष्ट्राच्या संपत्तीची म्हणजे भौतिक वस्तूंची निर्मिती होते. स्मिथ यांच्या व्याख्येतील संपत्तीत निर्मिती, वृद्धी आणि तिचे विभाजन यांच्याशी संबंधीत व्यवहारांचे अध्ययन करते. म्हणून ॲडम स्मिथ यांनी अर्थशास्त्राला संपत्तीचे शास्त्र असे संबोधले आहे. विवेचन करतांना त्यांनी खाजगी व्यक्ती आणि राष्ट्रांना संपत्ती कशी मिळवायची, तिच्यामध्ये वाढ कशी करावयाची याबाबत माहिती करुन देते.

ॲडम स्मिथच्या व्याख्येची वैशिष्ट्ये

| ॲडम स्मिथच्या व्याख्येची वैशिष्ट्ये |
| --- |
| १) राष्ट्रीय संपत्ती हा केंद्रबिंदू |
| २) भौतिक व अभौतिक संपत्ती |
| ३) उत्पादन, विनिमय व वाटणीचा अभ्यास |
| ४) मानवी सुख |
| ५) वैयक्तिक व राष्ट्रीय वृद्धी |
| ६) निर्हस्तक्षेपनीतीचे तत्व |

**१) राष्ट्रीय संपत्ती हा केंद्रबिंदू :** अर्थशास्त्राच्या अध्ययनाचा केंद्रबिंदू संपत्ती आहे. ॲडम स्मिथ यांनी अर्थशास्त्राचा मुख्य विषय राष्ट्रीय संपत्ती आहे हेच गृहीत धरुन अभ्यास केलेला आहे.

**२) भौतिक व अभौतिक संपत्ती :** ॲडम स्मिथ यांनी दृश्य अशा भौतिक संपत्तीचाच विचार केलेला आहे. ज्या वस्तूमध्ये उपयोगिता, दुर्मिळता, मनुष्यबाह्यता आणि विनिमयता हे चार गुण दिसून येतात त्याला भौतिक धन (संपत्ती) असे म्हणतात. उदा. अन्नधान्य, कपडा, विविध वस्तू इ. ज्या वस्तू डोळ्यांनी दिसत नाहीत किंवा ज्यांना स्पर्श करता येत नाही त्याला अभौतिक धन (संपत्ती) असे म्हणतात. उदा. गायक, कलाकार, डॉक्टर, शिक्षक इत्यादींची सेवा अशा अभौतिक संपत्तीला अर्थशास्त्राच्या अभ्यासातून स्मिथने वगळलेले आहे.

**३) उत्पादन, विनिमय व वाटणीचा अभ्यास :** ॲडम स्मिथने अर्थशास्त्राचे तीन विभाग विचारात घेतलेले आहेत. संपत्तीचा अभ्यास करताना उत्पादन, विनिमय व वाटणी यावर भर दिलेला आहे.

**४) मानवी सुख :** मानवी जीवनात संपत्तीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. तिचे स्थान मानवाच्या तुलनेत वरचे आहे. समाधानाचा आधार संपत्ती म्हणजे पैसा आहे.

**५) वैयक्तिक व राष्ट्रीय वृद्धी :** एक सामान्य व्यक्ती आर्थिक मानवासारखा स्वहिताने प्रेरित होऊन आर्थिक क्रिया करीत असतो. वैयक्तिक संपत्ती वृद्धीतून राष्ट्राच्या संपत्तीत वृद्धी होते. व्यक्तिगत आणि सामाजिक किंवा राष्ट्रीय हितामध्ये कोणताही विरोधाभास नसतो. संपत्ती व्यक्ती आणि राष्ट्राला प्रतिष्ठा मिळवून देते.

**६) निर्हस्तक्षेपनीतीचे तत्व :** स्मिथचा असा विश्वास होता की, संपत्ती ही श्रमातून निर्माण होते आणि स्वार्थ लोकांना पैसे कमवण्यासाठी त्यांच्या संसाधनांचा वापर करण्यास प्रवृत्त करते. स्पर्धा, भांडवलशाही आणि मुक्त बाजारपेठेने अर्थव्यवस्थांची भरभराट होत असते. सरकारने अर्थव्यवस्थेला एकटे सोडावे आणि मुक्त बाजार आणि मुक्त व्यापाराच्या नैसर्गिक मार्गात हस्तक्षेप करु नये असा हा विचार आहे. स्मिथने ही संकल्पना मांडली की मुक्त व्यापारामुळे व्यक्ती आणि संपूर्ण समाजाचा फायदा होईल.

व्याख्येवरील टीका

सर्व सनातन अर्थशास्त्रज्ञांचा केंद्रबिंदू एकच असल्याने रस्किन, कार्लाईल, चार्ल्स डीकन्स व वर्क इत्यादी विचारवंतांनी या व्याख्येवर कठोर टीका केलेल्या आढळतात.

| टीका |
| --- |
| १) संपत्तीला अवास्तव महत्त्व |
| २) उपभोगाकडे दुर्लक्ष |
| ३) मानवी कल्याणाकडे दुर्लक्ष |
| ४) स्वार्थी व आर्थिक कल्पनेला महत्त्व |
| ५) संकुचित व्याप्ती |

**१) संपत्तीला अवास्तव महत्त्व :** धार्मिक व आध्यात्मिक शक्तीचा मनुष्याच्या मनावर निश्चित परिणाम होत असतो परंतुस्मिथने आपल्या व्याख्येमध्ये याकडे पूर्णतः दुर्लक्ष करुन कोणत्याही मार्गाचा अवलंब करुन जास्तीत जास्त पैसा मिळविणे म्हणजेच ध्येयसिद्धी होय असे गृहीत धरुन संपत्तीला अवास्तव महत्त्व दिलेले आहे.

**२) उपभोगाकडे दुर्लक्ष :** उपभोगाच्या प्रक्रियेतूनच उत्पादनाची व पुढील प्रक्रिया सुरु होत असते. परंतु स्मिथने ह्या उपभोगाच्या मुख्य प्रक्रियेकडे दुर्लक्ष केलेले आहे.

**३) मानवी कल्याणाकडे दुर्लक्ष :** ॲडम स्मिथने संपत्ती किंवा धन प्राप्त करणे हेच अंतिम ध्येय आहे असे मानले परंतु वास्तवात संपत्ती किंवा धनापासून मानवी कल्याण कसे होते हे विचारात घेणे आवश्यक असते, त्याकडे दुर्लक्ष केलेले आहे. संपत्ती हे साध्य नसून साधन आहे असे टीकाकार म्हणतात.

**४) स्वार्थी व आर्थिक कल्पनेला महत्त्व :** स्मिथने सामान्य माणसाला जास्तीत जास्त स्वार्थी व मतलबी बनविले आहे. त्यामुळे प्रेम, धर्म, श्रद्धा, बंधुत्व, राष्ट्रप्रेम, विश्वप्रेम, दया, विश्वास, मदत, सेवा इत्यादी भावनांना कमी महत्त्व दिलेले आहे त्यामुळे अर्थशास्त्र ह्या शब्दाचा विपरित परिणाम होऊ लागला आहे. ॲडम स्मिथ यांच्या कल्पनेतील आर्थिक मानव (Economic Man) वास्तव नाही.

**५) संकुचित व्याप्ती :** ॲडम स्मिथने मानवाच्या फक्त आर्थिक क्रियेचा अभ्यास अर्थशास्त्रात केलेला आहे. आर्थिकेतर क्रियांचा यात समावेश केलेला नाही त्यामुळे अभ्यासाची व्याप्ती फार संकुचित झालेली आहे.

अशाप्रकारे संपत्तीला महत्व देणारी ॲडम स्मिथ यांची ही व्याख्या १९ व्या शतकाच्या शेवटी कालबाह्य आणि त्याज्य ठरविण्यात आली. परंतु राजकीय अर्थशास्त्र ही संकल्पना संपुष्टात आणून अर्थशास्त्राला शास्त्राचा स्वतंत्र दर्जा मिळवून देण्याचे महान कार्य ॲडम स्मिथ यांनी केले आहे हे मात्र मान्य करावेच लागेल.

ब) मानवी कल्याणावर आधारित व्याख्या (Definition based on Welfare)



डॉ. आल्फ्रेड मार्शल आणि त्यांचे समर्थन करणारे अर्थशास्त्रज्ञ प्रा. पीगू, प्रा. कॅनन, प्रा. बेवरीज, एली यांनी सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांनी केलेल्या अर्थशास्त्रावरील व्याख्येतील दोष दूर करुन अर्थशास्त्राची मानवी कल्याणावर असलेली व्याख्या केली. केंब्रिज विद्यापीठातील नव-सनातनवादी अर्थशास्त्रज्ञ प्रा. डॉ. ऑल्फ्रेड मार्शल यांनी कल्याणावर आधारित असणारी अर्थशास्त्राची व्याख्या १८९० मध्ये आपल्या 'अर्थशास्त्राची मुलतत्त्वे' (Principles of Economics) या पुस्तकात पुढीलप्रमाणे केली आहे.

*''अर्थशास्त्र मानवी जीवनाच्या सामान्य व्यवहाराचा समाजाचा अभ्यास आहे. यात व्यक्ती आणि समाजाच्या प्रयत्नांच्या त्या भागाची चिकित्सा केली जाते की, ज्यांचा कल्याणासाठी आवश्यक भौतिक साधनांची प्राप्ती आणि उपयोग यांच्याशी जवळचा संबंध आहे.''* दुसऱ्या शब्दात 'अर्थशास्त्र हे मानवी कल्याणाचा अभ्यास करणारे शास्त्र आहे, या शास्त्रात प्राप्ती व आवश्यकतेनुसार उपलब्ध साधनांचा पर्याप्त वापर यासंबंधीत वैयक्तिक व सामाजिक वर्तणुकीचा अभ्यास केला जातो.'

प्रा. पिगू : ''अर्थशास्त्रात आर्थिक कल्याणाचे अध्ययन केले जाते आणि आर्थिक कल्याण हा सामाजिक कल्याणाचा असा भाग आहे की ज्याचे पैशाच्या रुपात मोजमाप करता येते.''

प्रा. कॅनन : ''अर्थशास्त्राचे ध्येय म्हणजे ज्यावर मानवाचे भौतिक कल्याण अवलंबुन आहे त्या सामान्य कारणांचे स्पष्टीकरण करणे होय.''

प्रा. बॅवरिज व प्रा. पॅन्सन : 'अर्थशास्त्र हे एक मानवी कल्याणाचे अध्ययन करणारे शास्त्र आहे.'

वरील सर्व व्याख्यांमधुन स्पष्ट होते की, अर्थशास्त्रात मानवाच्या भौतिक कल्याणाचा अभ्यास केला जातो. भौतिक कल्याण साध्य करण्यासाठी साधनांची प्राप्ती कशी केली जाते आणि त्या साधनांचा वापर वा खर्च कसा केला जातो याची चिकित्सा अर्थशास्त्रात केली जाते. मानवी कल्याणाशी संबंधीत वरील सर्व व्याख्यांमध्ये डॉ. मार्शल यांची व्याख्या महत्वपूर्ण मानली जाते.

मार्शलच्या व्याख्येची वैशिष्ट्ये

डॉ. मार्शल यांच्या मानवी कल्याण व्याख्येचे अधिक स्पष्टीकरण करता त्याची पुढीलप्रमाणे वैशिष्ट्ये आढळतात.

| मार्शलच्या व्याख्येची वैशिष्ट्ये |
| --- |
| १) सर्वसामान्य मानवाचा अभ्यास |
| २) आर्थिक व्यवहारांचा अभ्यास |
| ३) कल्याणकारी अर्थशास्त्राची पायाभरणी |
| ४) अर्थशास्त्र सामाजिक शास्त्र |
| ५) आर्थिक क्रियांचा अभ्यास |
| ६) आर्थिक व्यवहारांचे मुद्रेत मोजमाप |

**१) सर्वसामान्य मानवाचा अभ्यास :** ॲडम स्मिथ यांनी आपल्या व्याख्येत संपत्तीला प्रथम स्थान आणि मानवाला गौण स्थान दिले. डॉ. मार्शल यांनी याउलट मानवाला प्रथम आणि संपत्तीला गौण स्थान दिले आहे. त्यांनी आर्थिक मानवाऐवजी सर्वसामान्य मानवाची कल्पना केली आहे. सर्वसामान्य मानवाचे अंतिम साध्य मानवी कल्याण आहे आणि संपत्ती ते साध्य करण्याचे एक साधन आहे. मानवाचा अभ्यास करीत असल्यामुळे दैनंदिन कुटुंबात गुंतलेला, नोकरी, शेती, धंदेवाईक, खरेदी-विक्री करणारा, गरजांची तृप्ती करणारा मानव होय असे म्हटले आहे.

२) आर्थिक व्यवहारांचा अभ्यास : मानवी समाजात उत्पादन, विभाजन, विनिमय आणि उपभोग ह्या आर्थिक क्रिया चालतात. या क्रियांमधुनच मानवाच्या भौतिक कल्याणात वाढ होते. आर्थिक क्रियाच मानवाला सक्रीय करण्याचे काम करतात. डॉ. मार्शल यांच्या मतानुसार, ज्या आर्थिक क्रियांमधुन संपत्ती प्राप्त होते, आणि ज्यातून मानवाच्या कल्याणात वाढ होते त्यांचा अर्थशास्त्रात अभ्यास केला जातो. मानवाच्या आध्यात्मिक, नैतिक, मानसिक, भावनिक व राजकीय इत्यादींशी अर्थशास्त्राचा संबंध नाही.

३) कल्याणकारी अर्थशास्त्राची पायाभरणी : डॉ. मार्शल यांच्या मतानुसार अर्थशास्त्राचे अंतिम ध्येय मानवी कल्याणात वृद्धी करणे हे आहे आणि यासाठी भौतिक साधनांची प्राप्ती व त्यांचा उपभोग घेतला जातो. मानवी कल्याणात सातत्याने वृद्धी घडवून आणणाऱ्या आर्थिक क्रियांचा अर्थशास्त्रात अभ्यास केला जातो. मानवी कल्याणाचा विचार करुन त्यांनी अर्थशास्त्राला आदर्श शास्त्राचे रुप दिले. त्यांच्या मते अर्थशास्त्रज्ञांचे काम फक्त शोध घेणे आणि त्याचे स्पष्टीकरण करणे एवढे मर्यादित नसून मानवी कल्याणात निर्माण होणाऱ्या समस्यांची सोडवणूक करणे हेही आहे. यातूनच त्यांनी कल्याणाचे अर्थशास्त्र ह्या अर्थशास्त्राच्या नवीन शाखेची पायाभरणी केली.

४) अर्थशास्त्र सामाजिक शास्त्र : डॉ. मार्शल पूर्वी राजनैतिक अर्थव्यवस्था हा शब्द वापरत असे; परंतु मार्शल यांनी अर्थशास्त्रात वैयक्तिक प्रयत्नांबरोबरच सामाजिक प्रयत्नांचा अभ्यास केला जातो असे प्रतिपादन करुन अर्थशास्त्राला सामाजिक शास्त्राचा दर्जा प्राप्त करुन दिला. साधू-संतांसारखे लोक समाजात राहतात म्हणून त्यांच्या क्रियांचा अर्थशास्त्रात अभ्यास केला जात नाही. चोरी, दरोडे, जुगार, व्यसनी व्यवहारांना समाजाची मान्यता नसते म्हणून त्यांचा अर्थशास्त्रात अभ्यास केला जात नाही. थोडक्यात, अर्थशास्त्रात समाजात राहणाऱ्या सामान्य मानवाच्या व्यवहारांचा अभ्यास केला जातो.

५) आर्थिक क्रियांचा अभ्यास : मार्शलच्या मते, मानवी क्रियांमधून धन वा संपत्तीची निर्मिती होते किंवा ज्यातून धन वा संपत्तीची प्राप्ती होते त्यांचाच अर्थशास्त्रात अभ्यास केला जातो. ज्या क्रियांमधून संपत्ती उत्पादन वा प्राप्ती होत नाही त्यांचा अर्थशास्त्रात अभ्यास केला जात नाही.

६) आर्थिक व्यवहारांचे मुद्रेत मोजमाप : मुद्रेत मोजता येणाऱ्या संपूर्ण आर्थिक व्यवहारांचा अर्थशास्त्रात मार्शलने समावेश केला आहे.

डॉ. मार्शल यांच्या व्याख्येवरील टीका

डॉ. मार्शल यांनी संपत्तीऐवजी मानवी कल्याणाला सर्वोच्च प्राथमिकता देऊन अर्थशास्त्राला प्रतिष्ठा प्राप्त करुन दिली. असे असले तरी डॉ. मार्शल यांच्या व्याख्येत काही उणिवा आहेत. त्या पुढीलप्रमाणे.

| टीका |
|---|
| १) संदिग्ध व अनिश्चित व्याख्या |
| २) वर्णनात्मक व वर्गीकरणात्मक व्याख्या |
| ३) एकांगी व्याख्या |
| ४) कल्याणाची कल्पना संदिग्ध व बदलती आहे |
| ५) अशास्त्रीय विचार |
| ६) मानवाच्या फक्त आर्थिक व्यवहारांचा अभ्यास |

१) संदिग्ध व अनिश्चित व्याख्या : सामान्य व्यवहारातील सामान्य माणूस हे सांगताना सामान्य व्यवहार म्हणजे निश्चित कोणता व्यवहार याचा बोध होत नाही. गरजांची पूर्ती हा सामान्य व्यवहार होऊ शकतो. त्याचप्रमाणे दिनचर्या हे सुद्धा सामान्य व्यवहार म्हणून सांगितले जाऊ शकते.

२) वर्णनात्मक व वर्गीकरणात्मक व्याख्या : व्याख्या ही मोजक्या शब्दात, निश्चित अभ्यास विषय सांगणारी असावयास हवी परंतु मार्शलची व्याख्या वर्णन केल्याप्रमाणे व पुन्हा-पुन्हा तोच मुद्दा सांगण्याच्या हेतूने ह्या व्याख्येची रचना केली आहे. तसेच आर्थिक क्रिया-आर्थिकेत्तर क्रिया, भौतिक वस्तू-अभौतिक वस्तू, मानवी जिवनाचे सर्वसामान्य-असामान्य व्यवहार असे मानवी क्रियांचे त्यांनी अनावश्यक वर्गीकरण केले आहे.

३) एकांगी व्याख्या : डॉ. मार्शलच्या व्याख्येत फक्त भौतिक साधनांचा उल्लेख केला जातो. परंतु आर्थिक क्षेत्रास भौतिक साधनांइतकेच अभौतिक स्थान आहे. अभौतिक स्थानाचा उल्लेख केलेला नाही. भौतिक साधनांबरोबरच अभौतिक साधने म्हणजेच सेवांच्या अध्ययनाशिवाय अर्थशास्त्राचे अध्ययन अपूर्ण ठरते.

४) कल्याणाची कल्पना संदिग्ध व बदलती आहे : टीका करतांना प्रो. रॉबिन्स म्हणतात की, कल्याणाची कल्पना ही व्यक्तीनुसार व देशानुसार बदलत जाते. अशा बदलत्या कल्पनेला केंद्रबिंदू समजून निर्माण केलेले शास्त्र फार काळपर्यंत टिकून राहणार नाही. कल्याणाची कल्पना बदलताच ते रद्द ठरेल म्हणून कल्याणाची

कल्पना आधार होऊ शकत नाही. उदा. दारु पिणे हे थंड प्रदेशात कल्याणकारक आहे तर उष्ण प्रदेशात हानिकारक आहे.

**५)** अशास्त्रीय विचार : मार्शलने मांडलेले विचार अशास्त्रीय आहेत कारण शास्त्रांचा दृष्टिकोन 'काय आहे' (What is) हे सांगणारा असावा. 'काय असावा' (What ought to be) हे सांगणारा असू नये असे टीकाकारांचे म्हणणे आहे.

**६)** मानवाच्या फक्त आर्थिक व्यवहारांचा अभ्यास : मार्शलने मानवाच्या फक्त आर्थिक व्यवहारांचाच अभ्यास यामध्ये केला आहे; परंतु टीका करतांना रॉबिन्स म्हणतो की, सर्व व्यवहारांतील आर्थिक पैलूंचा अभ्यास अर्थशास्त्रात असावा.

**क) दुर्मिळतेवर आधारित व्याख्या** (Definition based on Scarcity)

डॉ. मार्शल यांनी भौतिक कल्याण या कल्पनेवर आधारित अर्थशास्त्राची व्याख्या करुन जणू काही व्याख्येची समस्या कायमस्वरुपी सोडवली असे मानले जात होते. परंतु रॉबिन्स यांनी या व्याख्येवर विविधागांनी टीका करुन नवीन वाद निर्माण केला. त्यांनी मानवी कल्याणाऐवजी साधनसामग्रीच्या दुर्मिळतेचा विचार करुन अर्थशास्त्राची अतिशय प्रसिद्ध व्याख्या केली आहे.



सुप्रसिद्ध ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ लॉर्ड **लिओनेल रॉबिन्स** यांनी १९३२ मध्ये *'अर्थशास्त्राचे स्वरुप व महत्त्व'* (*The Nature and Significance of Economic Science*) हे पुस्तक प्रकाशित केले. या पुस्तकात त्यांनी अर्थशास्त्राची दुर्मिळतेवर (अभाव) आधारित व्याख्या पुढीलप्रमाणे सांगितली आहे.

*''अर्थशास्त्र हे साध्ये आणि विकल्पाने विविध उपयोगात आणणारी दुर्मिळ साधने यांचा मेळ घालण्याच्या दृष्टीने केलेल्या मानवी वर्तणुकीचा, व्यवहाराचा अभ्यास करणारे शास्त्र होय.''* (Economics is the Science which studies human behavior as a relationship between ends and scarce means which have alternative uses.) रॉबिन्स यांनी 'अमर्यादित गरजा (साध्ये) आणि पर्यायी उपयोगाची परंतु मर्यादित दुर्मिळ असलेल्या संसाधनांशी मेळ घालण्याच्या दृष्टीने संबंधित असल्याचे वर्णन केले आहे.' रॉबिन्स यांच्या मते, 'अमर्यादित गरजा आणि मर्यादित संसाधने याद्वारा पूर्ततेसाठी निवड प्रक्रियेशी संबंधित अभ्यास परिभाषित केले.

थोडक्यात, 'अर्थशास्त्र' म्हणजे टंचाई आणि संसाधनांचा वापर, वस्तू आणि सेवांचे उत्पादन, उत्पादन वाढ आणि कल्याण आणि समाजासाठी महत्त्वाच्या चिंतेच्या इतर अनेक जटिल समस्यांचा अभ्यास होय.' म्हणजेच, अर्थशास्त्र म्हणजे टंचाई आणि गरजांचा अभ्यास.

**रॉबिन्सच्या व्याख्येची वैशिष्ट्ये**

समाज आणि व्यक्तीच्या जीवनात अनेक आर्थिक प्रश्न निर्माण होतात. आर्थिक व्यवहाराच्या सर्व आर्थिक प्रश्नांची सोडवणूक व्हावी त्यासाठी मनुष्य प्रयत्न करीत असतो. आर्थिक प्रश्नाची सोडवणूक आणि आर्थिक प्रश्न कशा पद्धतीने सोडविला जातो त्याचे सविस्तरपणे विश्लेषण रॉबिन्सच्या व्याख्येत दिसून येते.

| **रॉबिन्सच्या व्याख्येची वैशिष्ट्ये** |
|---|
| **१) अमर्याद गरजा (साध्ये)** |
| **२) मर्यादित साधने** |
| **३) साधनांचे पर्यायी उपयोग** |
| **४) गरजांची कमी-अधिक तीव्रता** |
| **५) स्पर्धक साध्याची निवड** |
| **६) मानवी वर्तणुकीचा अभ्यास** |

**१) अमर्याद गरजा (साध्ये)** (Unlimited Ends) : मानवाच्या गरजा अनंत असतात. एक गरज पूर्ण केली की दुसरी गरज निर्माण होते. दुसरी गरज पूर्ण केली की तिसरी गरज पुढे येते. गरजांची साखळी कधीच पूर्ण होत नाही. मानवी प्रगती बरोबर गरजांची संख्या व प्रकार यात वाढ होत जाते. एवढेच नव्हे तर एखादी गरज तात्पुरती भागवली गेली तर ती पुन्हा काही कालावधीनंतर उद्भवते. उदा. सकाळी अन्नाची गरज भागवली तरी संध्याकाळी पुन्हा अन्नाची गरज भासते. म्हणजेच गरजा ह्या पुनर्भवी असतात. एखादी गरज कायमची पूर्णपणे भागविता येत नाही. मानवाच्या गरजा अमर्याद असतात.

**२) मर्यादित साधने** (Limited Means) : गरजाच्या मानाने साधने दुर्मिळ म्हणजेच मर्यादित असतात. वेळ, पैसा, शक्ती व इतर साधने गरजांच्या मानाने खूपच अपुऱ्या असतात. त्यामुळे आपल्या सर्व गरजा भागवू शकत

नाही. गरजा पूर्ण करणारी साधने अमर्यादित असतील तर आर्थिक प्रश्न निर्माण झाला नसता. आपली अनंत साध्ये प्राप्त करण्याची साधने म्हणजे निसर्ग संपत्ती, मानवनिर्मित संपत्ती, मानवी शक्ती, बुद्धी, आयुष्यमान ही सर्व साधने मर्यादित आहे म्हणून त्याचा वापर काटेकोर व काटकसरीने करावा लागतो.

**३) साधनांचे पर्यायी उपयोग** (Alternative use of means fencity means) : मानवाजवळ मर्यादित असणारी साधने जर विशिष्ट उपयोगी असतील तर आर्थिक प्रश्न म्हणजे निवडीचा प्रश्न निर्माण झाला नसता. परंतु अगोदरच ही साधने दुर्मिळ असून ती अनेक पर्यायी उपयोगाची आहे. जवळच्या पैशाचा उपयोग करुन अनेक वस्तू विकत घेणे शक्य असते. पण त्या पैशाने एक वस्तू विकत घेतली की दुसरी वस्तू विकत घेता येत नाही. उदा. समजा आपल्याजवळ सायंकाळी ६ ते ९ हा वेळ उपलब्ध आहे. ३ तास वेळ आपण चित्रपट पाहण्यासाठी खर्च केल्यास सायंकाळी फिरायला जाता येत नाही. अभ्यास करता येत नाही. पैसा, जमीन, वीज, इंधन इत्यादी साधनांचे सुद्धा असेच असते. साधने पर्यायी उपयोगाचे असल्यामुळे आर्थिक प्रश्न निर्माण होतात.

**४) गरजांची कमी–अधिक तीव्रता** (Different intensity of needs) : गरजा अनंत असतात. गरजा भागविणारी साधने मात्र दुर्मिळ व पर्यायी उपयोगाची असतात. त्यामुळे आर्थिक प्रश्नांची निर्मिती होते. गरजांचे एक वैशिष्ट्य म्हणजे सर्व गरजा सारख्याच तीव्रतेच्या महत्त्वाच्या नसतात. सर्वच गरजा सारख्याच तीव्र नसतात. तीव्रतेनुसार महत्त्व व मापन करुन त्यांची क्रमवारी लावता येते. तीव्रतेप्रमाणे गरजांचे वर्गीकरण करता येते. समजा एखाद्या व्यक्तीस भूक लागलेली असेल, चित्रपट बघायचा असेल किंवा एखादी चांगली कादंबरी विकत घ्यायची असेल पण त्या सर्व गरजा सारख्याच महत्त्वाच्या नसतात. प्रथम अन्नाची गरज सर्वात महत्त्वाची असते, नंतर कादंबरी विकत घेण्याच्या गरजेचा क्रम लावतो. दुसऱ्या एखाद्या मनुष्याला चित्रपट पाहण्याची गरज महत्त्वाची वाटेल. प्रत्येकजण गरजांच्या महत्त्व मापनानुसार क्रमवारी लावतो. अमर्याद गरजा व मर्यादित पण पर्यायी उपयोगाची साधने यांचा मेळ घालण्याचा प्रयत्न म्हणजे आर्थिक प्रश्नांची सोडवणूक करण्याचा प्रयत्न होय.

**५) स्पर्धक साध्याची निवड** (Choice of competing ends) : एका बाजूला अमर्याद साध्ये व दुसऱ्या बाजूला दुर्मिळ आणि पर्यायी उपयोगाची असणारी साधने यांचा मेळ कसा घालायचा तो प्रश्न निर्माण होतो. उपलब्ध सर्वच साध्ये दिलेल्या साधनांवर आपआपला हक्क प्रस्थापित करतात. म्हणजेच प्रत्येक साध्ये परस्परांशी स्पर्धा करतात. गरजा व्यक्तीनिष्ठ असतात म्हणून क्रमवारी सुद्धा व्यक्तिनिष्ठ असते.

**६) मानवी वर्तणुकीचा अभ्यास** (Study of human behavior) : अर्थशास्त्रात मानवी वर्तणुकीचा अभ्यास केला जातो. अमर्याद गरजांची महत्व मापनानुसार क्रमवारी लावून प्रत्येक मनुष्य आपले मर्यादित उत्पन्न विविध वस्तूंवर अशा रीतीने खर्च करीत असतो की त्यापासून त्याला महत्तम समाधान मिळते. अशावेळी माणसांची जी वर्तणूक होते त्याचा अभ्यास अर्थशास्त्रात केला जातो.

**रॉबिन्सच्या व्याख्येचे गुण**

१) रॉबिन्सची व्याख्या शास्त्रशुद्ध आणि विज्ञानवादी आहे. तसेच ती व्यक्ती, स्थल, काल, निरपेक्ष आहे.

२) रॉबिन्सची व्याख्या मोजक्याच शब्दात सांगितली आहे.

३) या व्याख्येत भौतिक तसेच अभौतिक वस्तूंचा विचार करण्यात आलेला आहे. त्यामुळे अर्थशास्त्राची व्याप्ती वाढली.

४) रॉबिन्सच्या व्याख्येत मानवी कल्याणाचा विचार करण्यात आलेला नाही.

५) अर्थशास्त्र व नितीमूल्य याचा मुळीच संबंध नाही. चांगले-वाईट, योग्य-अयोग्य, नैतिक-अनैतिक याचा विचार अर्थशास्त्रात होता कामा नये, अर्थशास्त्र हे वस्तुनिष्ठ शास्त्र असले पाहिजे.

६) रॉबिन्सची व्याख्या विश्लेषणात्मक आहे. त्यांच्या मते मानवी व्यवहाराला अनेक बाजू आणि अंगांनी प्राप्त झाले आहे.

७) रॉबिन्सच्या मते, गरजा असंख्य आहेत. साधने दुर्मिळ आहेत. या साधनांना पर्यायी उपयोग आहे. त्यामुळे मानवी गरजांचे तुलनात्मक मूल्यमापन करुन साधनसंपत्तीची निवड व विभागणी करावी लागते अशा प्रकारचा अभ्यास अर्थशास्त्रात केला जातो.

**रॉबिन्सच्या व्याख्येतील दोष/टीका**

रॉबिन्सने केलेल्या व्याख्येकडे संपूर्ण जगाचे लक्ष आकर्षित झाले होते. सुरुवातीला सहजपणे ह्या व्याख्येचा उदो-उदो करण्यात आला; परंतु लवकरच ही व्याख्या टीकेचा विषय ठरला. ह्या व्याख्येवर पुढीलप्रमाणे टीका करण्यात आल्या.

| दोष/टीका |
| --- |
| १) तांत्रिक व्याख्या |
| २) शुद्ध विज्ञानवादी |
| ३) सामाजिक बाजूंकडे दुर्लक्ष |
| ४) दुर्मिळतेला प्राधान्य |
| ५) नैतिक मूल्यांची उपेक्षा |
| ६) साध्याकडे दुर्लक्ष |
| ७) मानवी कल्याणाचा विचार केला नाही |

**१) तांत्रिक व्याख्या** : रॉबिन्सची व्याख्या तांत्रिक, क्लिष्ट व बोजड आहे. या व्याख्येवरुन सर्वसामान्य मनुष्यास अर्थशास्त्राचे स्वरुप समजत नाही. विषयाची ओळख करुन देण्यासाठी व्याख्या दिली जाते पण रॉबिन्सच्या व्याख्येतील साध्ये व साधन म्हणजे काय हे समजल्याशिवाय ही व्याख्या कळत नाही हा ह्या व्याख्येतील महत्त्वाचा दोष आहे.

**२) शुद्ध विज्ञानवादी** : अर्थशास्त्र फक्त विज्ञानवादी शास्त्र आहे असे रॉबिन्सच्या व्याख्येवरुन ठरते. परंतु अर्थशास्त्र हे फलदायी आणि ज्ञानदायी शास्त्र असावे असे प्रा. पिगुचे मत आहे.

**३) सामाजिक बाजूंकडे दुर्लक्ष** : रॉबिन्सने मानवी कल्याण अमान्य केले आहे. तसेच एका व्यक्तीच्या निवडीला सुद्धा महत्त्व दिलेले नाही; त्यामुळे सामाजिक स्वरुप स्पष्ट होत नाही. अशी टीका त्यांच्या व्याख्येवर करण्यात येते. तसेच टीकाकार म्हणतात की, अर्थशास्त्राला सामाजिक शास्त्राऐवजी मानवी शास्त्र करुन टाकले. कारण अर्थशास्त्रात निवडीशी संबंधित सर्व प्रश्नांचा अभ्यास केला जातो. अर्थशास्त्राने समाजात राहणाऱ्या लोकांच्याच प्रश्नांचा अभ्यास करावा.

**४) दुर्मिळतेला प्राधान्य** : रॉबिन्सच्या व्याख्येने केवळ दुर्मिळ किंवा तुटवडा असणाऱ्या संपत्तीचाच विचार केला आहे इतर संपत्तीचा विचार केला नाही. या शास्त्रात साधनांची दुर्मिळता व पर्यायी उपयोग यावर विचार करुन चालणार नाही तर मानवी कल्याण कसे साधेल याचाही विचार करणे आवश्यक ठरते. प्रा. रॉबर्टसन यांच्या मते, रॉबिन्सची व्याख्या अतिशय संकुचित आणि अतिशय व्यापक आढळते.

**५) नैतिक मूल्यांची उपेक्षा** : रॉबिन्सने अर्थशास्त्रात नैतिक दृष्टिकोन लक्षात घेतलेला नाही पण अर्थशास्त्राचा संबंध नैतिक मूल्यांशी असावा असे टीकाकार म्हणतात.

**६) साध्याकडे दुर्लक्ष** : रॉबिन्सने साध्याकडे पूर्णतः दुर्लक्ष करुन साधनांना अवास्तविक महत्त्व दिले आहे. रॉबिन्स म्हणतो की, 'अर्थशास्त्राचा संबंध साधनांशी आहे साध्यांचा अभ्यास त्याच्या कक्षेबाहेरचा आहे'. यावर बूटन, डर्बीन, हॉट्रे इत्यादींनी कडाडून टीका केली आहे. ते म्हणतात की, मानवी गरजांना अधिक प्राधान्य द्यावयास पाहिजे.

**७) मानवी कल्याणाचा विचार केला नाही** : रॉबिन्सने मानवी कल्याणाची कल्पना बाजूला टाकलेली आहे. अर्थशास्त्रात मानवाच्या जीवनासंबंधीचा अभ्यास होत असताना रॉबिन्सने मानवी कल्याणाचा विचार केला नाही. महत्तम कल्याण साधणे ते प्रत्येकाचे धैर्य असते. म्हणून मानवी हिताकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही.

वरील विवेचनावरुन रॉबिन्सच्या व्याख्येवर अनेक शास्त्रज्ञांनी टीका केलेल्या आहे. परंतु मानवाच्या सामाजिक व्यवहारातील उद्भवणाऱ्या आर्थिक प्रश्नाच्या समस्या आणि त्या कशा प्रकारे सोडवाव्या आणि पर्यायी उपयोगात कशा पद्धतीने मेळ घालता येईल यांचे विस्तृत विवेचन केलेले आहे. तसेच अर्थशास्त्राला शास्त्रीय स्वरुप मिळवून दिले. त्यामुळे रॉबिन्सच्या व्याख्येकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही.

विकासाभिमुख (Development Oriented) दृष्टीकोणातून अर्थशास्त्र 'विकास' शी संबंधित पॉल ए. सॅम्युएलसन यांनी आर्थिक घटकांच्या गतिमान-विश्लेषणाच्या बाजूवर भर दिला आहे. अनावश्यकता (Redundancy) च्या दृष्टीकोणातून प्रो. जे. के. मेहता यांनी 'अर्थशास्त्र' असे वर्णन केले की, एखाद्या व्यक्तीला 'इच्छा नसण्याची स्थिती' प्राप्त करण्यास मदत करणे हा अभ्यास आहे. प्रा. मेहता यांच्या विचारांवर महात्मा गांधींच्या विचारांचा प्रभाव आहे.

आजपर्यंत अनेक अर्थशास्त्रज्ञांनी अर्थशास्त्राच्या व्याख्या केलेल्या आहेत. परंतु या व्याख्यांमध्ये सुसूत्रता व एकवाक्यता दिसून येत नाही. अर्थशास्त्रज्ञांमध्ये या व्याख्येबाबत तीव्र स्वरुपाचे मतभेद दिसून येतात. यामुळे लॉर्ड जॉन मेनार्ड केन्स म्हणतात, 'अर्थशास्त्राच्या अनेक व्याख्यांमुळे अर्थशास्त्राची स्थिती गळा दाबल्याप्रमाणे झालेली आहे.' (Political economy is said to have strangled itself with definition) अर्थशास्त्र हे प्रगत

होत जाणारे शास्त्र असल्यामुळे आणि आर्थिक प्रश्नाकडे पाहण्याचा दृष्टिकोन भिन्न असल्यामुळे या व्याख्यांमध्ये काही उणिवा आहेत. श्रीमती बार्बर वूटनने स्पष्टच म्हटले आहे की, ज्या ठिकाणी सहा अर्थशास्त्रज्ञ एकत्र येतील त्या ठिकाणी त्यांची सात मते होतील.

**मार्शल आणि रॉबिन्सच्या व्याख्यांमधील साम्य व तुलना**

**साम्य**

मार्शल आणि रॉबिन्सच्या व्याख्यांमधील समानता अशी आहे की, दोन्ही व्याख्या–

१) अर्थशास्त्राला शास्त्र किंवा विज्ञान म्हणून दर्जा

२) अर्थशास्त्राचा अभ्यासविषय–मानवाचे आर्थिक प्रयत्न

३) धनाचा, संपत्तीचा विचार

४) नव्या आर्थिक विचारसरणीला चालना

५) मनुष्याच्या महत्त्वावर आधारित

**तुलना/भेद**

| अ. क्र. | मुद्दे | डॉ. आल्फ्रेड मार्शल | प्रा. रॉबीन्स |
|---|---|---|---|
| १ | वर्गीकरणात्मक व विश्लेषणात्मक | वर्गीकरणात्मक | विश्लेषणात्मक |
| २ | भौतिक व अभौतिक साधनांचा विचार | भौतिक | भौतिक व अभौतिक |
| ३ | सामाजिक व मानवी शास्त्र | सामाजिक शास्त्र | मानवी शास्त्र |
| ४ | अर्थशास्त्राची निर्मिती | कल्याणकारी अर्थशास्त्र | दुर्मीळतेचे अर्थशास्त्र |
| ५ | आदर्शवादी आणि विज्ञानवादी व्याख्या | आदर्शवादी आणि विज्ञानवादी | विज्ञानवादी |
| ६ | मनोनिष्ठ व वस्तुनिष्ठ स्वरुप | मनोनिष्ठ | वस्तुनिष्ठ |
| ७ | संकुचित व व्यापक व्याख्या | संकुचित | व्यापक |

**१.३ आर्थिक/अर्थशास्त्रीय नियम/कायदा** (Economic Laws)

अर्थशास्त्र हे सामाजिक शास्त्र आहे. कोणतेही शास्त्र नियम आणि सिद्धांताशिवाय अस्तित्वात येऊ शकत नाही. अर्थशास्त्र हे देखील शास्त्र असल्यामुळे त्यात अनेक नियम आणि सिद्धांत आहेत. अर्थशास्त्रातील नियमांना अर्थशास्त्रीय नियम किंवा आर्थिक नियम असे म्हणतात. आर्थिक नियम हे कार्यकारणभाव स्पष्ट करतात. म्हणजेच आर्थिक व्यवहारात मानवाची वर्तणुक कशी राहू शकेल याचे स्पष्टीकरण आर्थिक नियम करतात. उदा. उपभोक्त्यांची वर्तणुक, मागणी नियम तर उत्पादकांची वर्तणुक, पुरवठा व उत्पादक खर्चाच्या सिद्धांताद्वारे स्पष्ट होते.

दोन घटकांतील किंवा दोन घटनांमधील कार्यकारणभाव संबंध स्पष्ट करणाऱ्या विधानाला शास्त्रीय नियम असे म्हणतात. सर्वसामान्य मनुष्य आपले आर्थिक व्यवहार कसे पार पाडतात याचा अभ्यास अर्थशास्त्रात केला जातो. आर्थिक व्यवहारासंबंधी त्यांची वागणूक कशी असते? मनुष्य गरजांची निवड कशी करतो? मर्यादित उत्पन्नाचे विविध वस्तूंवर कशाप्रकारे खर्च करतो? इत्यादीचा अभ्यास केला जातो.

**व्याख्या**

१) **डॉ. मार्शल** : ''ज्याच्या प्रेरक हेतूची तीव्रता पैशात मोजता येते अशा आर्थिक व्यवहाराच्या बाबतीत मानवी समाजाची सर्वसामान्य प्रवृत्ती दर्शविणारे जे सामाजिक नियम असतात त्याला अर्थशास्त्रीय नियम म्हणतात.''

२) **प्रा. रॉबिन्स** : ''अमर्यादित साध्ये (गरजा) आणि विविध उपयोगाची दुर्मिळ साधने यांचा मेळ घालण्यासाठी केल्या जाणाऱ्या मानवी प्रयत्नांबाबत/व्यवहाराबाबत मनुष्याची सर्वसाधारण प्रवृत्ती ज्यात दर्शविली जाते अशा विधानांना अर्थशास्त्रीय नियम असे म्हणतात.''

**आर्थिक नियमांचे प्रकार**

| आर्थिक नियमांचे प्रकार |
|---|
| १) स्वयंसिद्ध नियम |
| २) नैसर्गिक नियम |

**१) स्वयंसिद्ध नियम** : एखाद्या विशिष्ट आर्थिक व्यवहारात मानव कशा प्रकारे व्यवहार करील याबाबत सामान्य प्रवृत्ती दर्शविणाऱ्या नियमांना स्वयंसिद्ध नियम असे म्हणतात. या नियमांसाठी प्रयोगाची आवश्यकता नसते. उदा. महत्तम नफा

मिळविणे हे प्रत्येक उत्पादकांचे तर कमी खर्चात महत्तम समाधान प्राप्त करणे हे प्रत्येक ग्राहकांचे उद्दिष्ट असते.

**३) मानवी व्यवहारांचे नियम**
**४) संभाव्यतादर्शक नियम**

**२) नैसर्गिक नियम** : नैसर्गिक परिस्थितीवर अवलंबून असणाऱ्या नियमांना नैसर्गिक नियम असे म्हणतात. उदा. तहान लागल्यावर पाण्याच्या पहिल्या पेल्यामुळे मिळणारे समाधान त्यानंतरच्या प्रत्येक पेल्याबरोबर कमी कमी होत जाते. हा आऱ्हासी सीमांत उपभोगाचा नियम नैसर्गिक आहे.

**३) मानवी व्यवहारांचे नियम** : आर्थिक व्यवहारांमधील कार्यकारण संबंधानुसार सामान्य प्रवृती दर्शविणाऱ्या आर्थिक नियमांना मानवी व्यवहारांचे नियम असे म्हणतात. उदा. वस्तूची किंमत कमी झाल्यास मागणी वाढते मात्र तिचा पुरवठा कमी होतो. या मागणी–पुरवठ्याच्या नियमातील किंमत बदल हे 'कारण' असून वस्तूच्या मागणी–पुरवठ्यात होणारा बदल हा 'परिणाम' आहे.

**४) संभाव्यतादर्शक नियम** : जे आर्थिक नियम भविष्यकालीन अंदाजाविषयी निर्देश व्यक्त करतात अशा नियमांना संभाव्यतादर्शक आर्थिक नियम असे म्हणतात. उदा. मागणी–पुरवठ्याचा नियम.

**आर्थिक नियमांची वैशिष्ट्ये**

**आर्थिक नियमांची वैशिष्ट्ये**
**१) सर्वसामान्य प्रवृत्तीदर्शक**
**२) परिस्थिती सापेक्ष**
**३) कार्यकारणभाव दर्शक**
**४) प्रयोगशाळेत पडताळून पाहता येत नाही**
**५) तुलनात्मकदृष्ट्या निश्चित स्वरुपाचे**
**६) नैसर्गिक नियमाच्या स्वरुपाच**
**७) विशिष्ट परिस्थितीत पुढे काय घडेल ते सांगतात**
**८) आर्थिक नियम पाळण्याची गरज नाही**
**९) काल्पनिक स्वरुप**

**१) सर्वसामान्य प्रवृत्तीदर्शक** : अर्थशास्त्रीय नियम म्हणजे समाजात राहणाऱ्या मानवाच्या आर्थिक वागणुकीसंबंधी केलेले विधान होय. त्यांच्या वागणुकीवर मानवी भावना, रुढी, परंपरा, सवयी, सामाजिक बंधने, कायद्याची बंधने इत्यादीचा प्रभाव पडतो.

**२) परिस्थिती सापेक्ष** : आर्थिक नियम हे मान्यता प्रधान असून ते विशिष्ट परिस्थितीतच लागु होतात. कारण आर्थिक नियमात 'इतर परिस्थिती कायम असतांना' किंवा 'विशिष्ट परिस्थितीतच' अशी सुरुवातीलाच वाक्यरचना केलेली दिसून येते.

**३) कार्यकारणभाव दर्शक** : अर्थशास्त्रीय नियम हे दोन घटकांमधील कार्यकारणभाव दर्शविणारे असतात. घडलेल्या आर्थिक घटनांमध्ये असलेला कार्यकारणभाव या नियमांद्वारे स्पष्ट केला जातो. उदा. मागणी नियम.

**४) प्रयोगशाळेत पडताळून पाहता येत नाही** : भौतिकशास्त्राप्रमाणे आर्थिक नियम प्रयोगशाळेत पडताळून पाहता येत नाही. उदा. लोकांचे उत्पन्न वाढले की, उपभोग खर्चही वाढतो हे प्रयोगशाळेत पडताळून पाहता येत नाही.

**५) तुलनात्मकदृष्ट्या निश्चित स्वरुपाचे** : इतिहास, राज्यशास्त्र, नीतीशास्त्र, शिक्षणशास्त्र, समाजशास्त्र इत्यादी शास्त्राच्या तुलनेने आर्थिक नियमात निश्चितता आढळते. कारण मानवाच्या वर्तणुकीतील मूल्यमापन करण्यासाठी पैसा हे प्रभावी साधन अर्थशास्त्राजवळ आहे. इतर सामाजिक शास्त्रांना अशी साधने उपलब्ध नाहीत.

**६) नैसर्गिक नियमाच्या स्वरुपाचे** : अर्थशास्त्रातील काही नियम आर्थिक व्यवहारातील नैसर्गिक प्रवृत्ती दर्शवितात. उदा. शेतीतील घटत्या फलाचा सिद्धांत, माल्थसचा लोकसंख्याविषयक सिद्धांत.

**७) विशिष्ट परिस्थितीत पुढे काय घडेल ते सांगतात** : असे असले तरी त्याचे १००% खात्री देता येत नाही. उदा. चैनीच्या वस्तूवर आर्थिक कर बसविला तर किंमत वाढून त्याची मागणी कमी होईल आणि ते उत्पन्न व्यक्ती त्या आवश्यक वस्तूंवर खर्च करतील अशी अपेक्षा असते. म्हणजे त्यात मागणी नियमाचे तत्त्व दडलेले असते.

**८) आर्थिक नियम पाळण्याची गरज नाही** : आर्थिक नियम आज्ञा स्वरुपाचे नाहीत. जसे– चोरी करणे हा गुन्हा आहे व त्याला कायद्यानुसार शिक्षा मिळते. म्हणजे यामध्ये नियमाचे उल्लंघन झाले आहे. परंतु आर्थिक नियमात नियमांचा भंग केल्यास त्यासाठी शिक्षेची तरतूद नाही. उदा. मागणी नियमात वस्तूची किंमत कमी झाल्यास लोकांची क्रयशक्ती वाढते असे हा नियम सूचित करतो. परंतु त्या वस्तू खरेदी करावयाच असा तो आदेश नाही. म्हणजेच आर्थिक नियम हे आज्ञा स्वरुप नसून ते दर्शक स्वरुप असतात.

**९) काल्पनिक स्वरुप :** आर्थिक नियम विशिष्ट कल्पनांवर किंवा गृहितकावर आधारलेले असतात. या कल्पना विशिष्ट परिस्थितीसंबंधी किंवा मानवी वागणुकीसंबंधी असतात. गृहीत परिस्थिती असली तर आर्थिक नियम लागु होतात अन्यथा नाही त्यामुळे या आर्थिक नियमांना काल्पनिक नियम असे म्हणतात.

**आर्थिक नियम व भौतिक शास्त्र नियमातील फरक**

भौतिकशास्त्र किंवा रसायनशास्त्र यासारख्या नैसर्गिक-विज्ञान विषयांच्या नियमांमध्ये आणि तत्त्वांमध्ये पूर्ण शुद्धता आहे. प्रयोगशाळेत नैसर्गिक विज्ञानाचे विषय पाहिल्यावर त्या नियमांची व तत्त्वांची वास्तवता तपासता येते. अर्थशास्त्र हा सामाजिक शास्त्राचा एक प्रकार असल्यामुळे त्याचे नियम व तत्त्वे कोणत्याही प्रयोगशाळेत पाहता येत नाहीत. समाज ही अर्थशास्त्र आणि सामाजिक विज्ञानाची प्रयोगशाळा आहे. अशाप्रकारे अर्थशास्त्राचे नियम आणि तत्त्वे भौतिकशास्त्र किंवा रसायनशास्त्रातील नियम आणि तत्त्वांइतके खरे नाहीत. अर्थशास्त्रातील नियम आणि तत्त्वांमध्ये पूर्ण अचूकता नसल्यामुळे विश्वासार्हता कमी दिसून येते. अजूनही 'इतिहास'चा विकास 'वर्णनात्मक अवस्थेत' आहे. राज्यशास्त्र, सार्वजनिक प्रशासन आणि सामाजिक मानववंशशास्त्र हे 'विश्लेषण टप्प्यात' एक पाऊल पुढे आहेत. या सगळ्यांच्या पुढे अर्थशास्त्रात अंदाजाच्या टप्प्यापर्यंत अर्थशास्त्राचे नियम आणि तत्त्वे विकसित झाली आहेत. या कारणास्तव आज अर्थशास्त्र हा एक महत्त्वाचा विषय आहे. अर्थशास्त्राच्या नियमांचे आणि तत्त्वांचे अचूक ज्ञान काही गृहितकांवर अवलंबून असते. यातील फरक पुढील मुद्द्यांद्वारे सांगता येईल.

**आर्थिक नियम आणि भौतिक शास्त्रातील नियम यातील फरक**

| अ. क्र. | फरकाचा आधार | आर्थिक नियम | भौतिक शास्त्रातील नियम |
|---|---|---|---|
| १ | **व्याख्या** | अनेक साध्ये आणि दुर्मिळ व पर्यायी साधने यांचा मेळ घालण्यासाठी जे प्रयत्न मानव करतो त्याबाबतीत मानवाची सामान्य प्रवृत्ती दाखवणारे विधान म्हणजेच आर्थिक नियम होय. | सृष्टीच्या विविध शक्ती व वस्तू याच्या गुणधर्माबाबत असलेली सर्वसाधारण प्रवृत्ती दाखवणारे विधान म्हणजे भौतिकशास्त्राचे नियम होय. |
| २ | **निरपेक्षता** | अर्थशास्त्राचे नियम परिस्थिती सापेक्ष असल्यामुळे स्थलानुसार आणि काळानुसार त्यांच्या प्रभावात फरक पडत असतो. | भौतिकशास्त्राचे नियम निश्चित आणि अचूक असून स्थल व काल निरपेक्ष असतात. |
| ३ | **स्वतंत्रकार्य** | अर्थशास्त्राचे नियम स्वतंत्रपणे कार्य करीत नाही म्हणून त्यांना प्रयोग पद्धतीने पडताळून पाहता येत नाही. | भौतिक शास्त्राचे नियम स्वतंत्रपणे कार्य करीत असल्यामुळे त्याचा प्रभाव प्रयोग पद्धतीने पडताळून पाहता येतो. |
| ४ | **प्रभाव मापन** | या नियमाचा प्रभाव मापन करण्यासाठी योग्य साधने उपलब्ध नाही. | अचूक शास्त्रीय उत्पन्नामुळे त्या नियमाचा प्रभाव काटेकोरपणे मापन करता येत नाही. |

**नैसर्गिक शास्त्र आणि सामाजिक शास्त्र यातील फरक**

| अ. क्र. | फरकाचा आधार | नैसर्गिक शास्त्र | सामाजिक शास्त्र |
|---|---|---|---|
| १ | **अर्थ** | जड वस्तूचा म्हणजे निसर्गातील विविध गोष्टींचा अभ्यास करणारी शास्त्रे नैसर्गिक किंवा भौतिकशास्त्र होय. | एक समाजशील प्राणी या दृष्टीने मानवी व्यवहाराचा किंवा वागणुकीचा अभ्यास करणारी शास्त्र म्हणजे सामाजिक शास्त्र होय. |
| २ | **अचूकता** | भौतिक शास्त्रातील नियम बिनचूक सार्वकालिक असतात. नियमाला अपवाद नसतात. उदा. गुरुत्वाकर्षणाचा नियम. | माणूस हा विचार करणारा प्राणी आहे. साहजिकच माणसाच्या वर्तणुकीविषयी शंभर टक्के लागू पडतील असे नियम करता येत नाही. नियमांना अपवाद असतात. |
| ३ | **पडताळणी** | नैसर्गिक शास्त्राचे नियम तंतोतंत खरे असतात. प्रयोगशाळेत विविध प्रयोग करुन त्या नियमाची सत्यता पडताळून | सामाजिक शास्त्राचे नियम तंतोतंत खरे नसतात. ती केवळ प्रवृत्ती निर्देशक असतात. नियमाची सत्यता प्रयोगशाळेत पडताळून |

| | | | |
|---|---|---|---|
| | | पाहता येते. | पाहणे शक्य नसते. |
| ४ | उदा. | रसायनशास्त्र, खगोलशास्त्र, आणि पदार्थविज्ञान शास्त्र ही काही महत्वपूर्ण नैसर्गिक शास्त्र आहे. | अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास ही काही महत्वपूर्ण सामाजिक शास्त्रे आहेत. |

**आर्थिक नियमांच्या मर्यादा**

आर्थिक नियम हे परिस्थितीसापेक्ष असल्यामुळे ते सर्व परिस्थितीत खरे ठरु शकत नाही. त्यामुळे आर्थिक नियमांवर काही मर्यादा पडतात.

१) प्रयोगशाळेत सिद्ध करता येत नाही
२) अनिश्चित स्वरुप
३) स्थल व काल सापेक्ष
४) परिस्थितीसापेक्ष
५) परस्परसंबंध व गुंतागुंतीचे

**आर्थिक नियमाचे महत्त्व/उपयोगिता**

१) वैधानिक पद्धती
२) महत्तम समाधानाचे ज्ञान
३) मोबदला निश्चित करण्यास उपयुक्त
४) आर्थिक धोरण ठरविण्यास उपयुक्त
५) उपभोक्ता, उत्पादक, व्यापारी व कारखानदारास उपयुक्त
६) सरकारी धोरण ठरविण्यास उपयुक्त
७) आर्थिक समस्या सोडविण्यास उपयुक्त

**१.४ सूक्ष्म अर्थशास्त्र** (Micro Economics)

ओस्लो विद्यापीठातील नॉर्वेजियन अर्थशास्त्रज्ञ सर रॅग्नर फ्रिश यांनी १९३३ मध्ये आधुनिक अर्थशास्त्राची दोन शाखांमध्ये विभागणी केली. त्या शाखा म्हणजे सूक्ष्म अर्थशास्त्र व स्थूल अर्थशास्त्र होय. हे ग्रीक शब्द 'मायक्रोस' (Mikros) व 'मॅक्रोस' (Makros) यापासून आले आहेत.

**ऐतिहासिक पार्श्वभूमी**

अर्थशास्त्रीय विश्लेषण पद्धतीमध्ये सूक्ष्म व स्थूल या दोन्ही पद्धतीचा अभ्यास केला जातो. अभिजात संप्रदायातील अर्थशास्त्राचे जनक ॲडम स्मिथ यांनी सूक्ष्म अर्थशास्त्राच्या अभ्यासास सुरुवात केली. त्यानंतर रिकार्डो, जे. बी. से., प्रो. मिल मॉरिस डॉब, बोल्डिंग, डॉ. मार्शल पिगू, हिक्स, प्रो. सॅम्युअलसन, श्रीमती रॉबिन्सन इत्यादींनी सूक्ष्म अर्थशास्त्राच्या विकासात भर घातली. तर माल्थस व कार्ल मार्क्स या अर्थशास्त्रज्ञानी त्यांच्याच जोडीला समष्टी अर्थशास्त्र विश्लेषण पद्धतीचा वापर केलेला दिसून येतो. त्यानंतर २० व्या शतकात लॉर्ड केन्स पूर्वी स्विडीस अर्थशास्त्रज्ञ नट विकसेल व ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ हॉट्रे, रॉबर्टसन यांनीही सूक्ष्म अर्थशास्त्र बरोबरच स्थूल अर्थशास्त्राचा वापर केला.

**अर्थ व व्याख्या**

सूक्ष्म अर्थशास्त्राला इंग्रजीमध्ये Micro Economics असे म्हणतात. 'सूक्ष्म' म्हणजे लहान. इंग्रजीतील Micro या शब्दाची उत्पत्ती मूळ ग्रीक शब्द Mikros या शब्दापासून झाली आहे. Mikros या शब्दाचा मराठी अर्थ अत्यंत लहान किंवा एक-दशलक्षांश भाग असा होतो. म्हणजेच सूक्ष्म अर्थशास्त्र हे अर्थव्यवस्थेतील अत्यंत सूक्ष्म घटकांचा अभ्यास करते. सूक्ष्म अर्थशास्त्रास व्यष्टी अर्थशास्त्र किंवा अंशलक्षी अर्थशास्त्र किंवा सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्र असेही म्हणतात. व्यष्टी अर्थशास्त्राला किंमत सिद्धांत असेही म्हणतात. सूक्ष्म अर्थशास्त्रात वैयक्तिक घटकांच्या आर्थिक वर्तनाचा अभ्यास केला जातो. उदा. कुटुंब, कामगार, फर्म, उद्योग इत्यादी. तर स्थूल म्हणजे मोठे किंवा एकूण. स्थूल अर्थशास्त्रामध्ये एकूण घटकांचा म्हणजेच एकूण रोजगार, राष्ट्रीय उत्पादन, एकूण गुंतवणूक, एकूण बचत, एकूण उपभोग, एकूण पुरवठा व एकूण मागणी, सामान्य किंमत पातळी इत्यादींचा अभ्यास केला जातो.

१) **केनेथ बोल्डिंग** : ''विशिष्ट उत्पादन संस्था, विशिष्ट कुटुंब, वैयक्तिक किंमती, वेतन, उत्पन्न, वैयक्तिक उद्योग आणि विशिष्ट वस्तूंचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे सूक्ष्म अर्थशास्त्र होय''.

२) **मॉरिस डॉब** : ''अर्थव्यवस्थेचे सूक्ष्मदर्शी अध्ययन म्हणजे सूक्ष्म अर्थशास्त्र होय.''

३) **ए. पी. लर्नर** : ''सूक्ष्म अर्थशास्त्राद्वारे अर्थव्यवस्थेकडे जणू काही सूक्ष्मदर्शकाद्वारे पाहिले जाते. अर्थव्यवस्थारुपी शरीरातील लाखो पेशी म्हणजे व्यक्ती आणि कुटुंबे उपभोक्त्याच्या रुपाने आणि उत्पादनसंस्था उत्पादकाच्या रुपाने अर्थव्यवस्थेच्या संचलनात कशा प्रकारे भूमिका पार पाडतात, हे अभ्यासण्यासाठी सूक्ष्म अर्थशास्त्र या पेशींकडे जणू काही सूक्ष्मदर्शकातून पाहते.''

४) अर्थव्यवस्थेतील वैयक्तिक उपभोक्ता, वैयक्तिक उत्पादक किंवा उत्पादक संस्था/पेढी यांसारख्या सूक्ष्म घटकांचा अभ्यास करणारे अर्थशास्त्र, म्हणजे 'सूक्ष्म अर्थशास्त्र' होय.

**सूक्ष्म अर्थशास्त्राचे महत्त्व** (Importance of Micro Economics)

| सूक्ष्म अर्थशास्त्राचे महत्त्व |
|---|
| १) आर्थिक प्रश्न समजण्यास उपयुक्त |
| २) आर्थिक प्रश्न सोडविण्यास उपयुक्त |
| ३) देशाच्या आर्थिक विकासास उपयुक्त |
| ४) आर्थिक कल्याण समजण्यासाठी |
| ५) अर्थव्यवस्थेचे कार्य समजत |
| ६) उद्योगसंस्था व उद्योगधंद्यांना उपयुक्त |
| ७) खाजगी अर्थव्यवस्थेचे कार्य समजते |
| ८) किंमत निर्धारण स्पष्टीकरण |
| ९) शासनास उपयुक्त |

**१) आर्थिक प्रश्न समजण्यास उपयुक्त** : समाजातील प्रत्येक व्यक्तीला कोणत्या ना कोणत्या तरी आर्थिक प्रश्नाला तोंड द्यावे लागते. त्यामुळे व्यक्तीला आपले आर्थिक प्रश्न कोणते आहेत, ते समजणे आवश्यक आहे. आपले आर्थिक प्रश्न कोणते आहेत ते समजल्याशिवाय व्यक्तीला त्यावर उपाय शोधता येत नाहीत. सूक्ष्म अर्थशास्त्राच्या अभ्यासाने व्यक्तीगत प्रश्न समजू शकतात. कारण सूक्ष्म अर्थशास्त्रात व्यक्तीगत प्रश्नांचा सखोल अभ्यास केला जातो.

**२) आर्थिक प्रश्न सोडविण्यास उपयुक्त** : देशातील असंख्य व्यक्तींना आपले आर्थिक प्रश्न सोडवावे लागतात. आपले मर्यादित उत्पन्न विविध वस्तूंवर कसे खर्च करावे? उत्पादनसंस्था आदर्श उत्पादन पातळी कशी निर्माण करतात? उत्पादन घटकांना रोजगार व उत्पन्न कोणत्या पद्धतीने मिळते? यासारख्या असंख्य प्रश्नांची उत्तरे सूक्ष्म अर्थशास्त्राच्या विवेचनाने मिळतात. म्हणजेच व्यक्तिगत, कुटुंब, उद्योग संस्था यांना आपले आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी सूक्ष्म अर्थशास्त्राचा उपयोग होतो.

**३) देशाच्या आर्थिक विकासास उपयुक्त** : देशातील अर्थव्यवस्थेत विविध घटक कार्य करत असतात. उदा. भांडवलदार, कामगार, शेतकरी, उद्योगपती. देशाच्या अर्थव्यवस्थेतील व्यक्तिगत घटकांचा अभ्यास झाला नाही तर देशाचा आर्थिक विकास रोखला जातो. परंतु, सूक्ष्म अर्थशास्त्राच्या अभ्यासाने अर्थव्यवस्थेतील व्यक्तिगत घटकांचा अभ्यास करता येतो. त्यांचा विकास कसा होतो हे पाहता येते. त्यामुळे देशाचा आर्थिक विकास शक्य होतो. आंतरराष्ट्रीय पातळीवर देशाचा आर्थिक विकास योग्य रीतीने करता येतो.

**४) आर्थिक कल्याण समजण्यासाठी** : सूक्ष्म अर्थशास्त्रात व्यक्तिच्या वर्तनाचा उपयोग यांचा अभ्यास केला जातो. समाजातील प्रत्येक व्यक्ती जास्तीत जास्त कल्याण साध्य करण्याचा प्रयत्न करते. व्यक्तीच्या उत्पन्न पातळीवर त्याचे आर्थिक कल्याण अवलंबून असते. व्यक्तीचे उत्पन्न अधिक असेल, तिला अधिक वस्तू व सेवांचा उपभोग घेता येत असेल तर व्यक्तीचे कल्याण साधले जाते. सूक्ष्म अर्थशास्त्राच्या अभ्यासाने व्यक्तीचे आर्थिक कल्याण साध्य होते की नाही हे समजते.

**५) अर्थव्यवस्थेचे कार्य समजते** : सूक्ष्म अर्थशास्त्राच्या विश्लेषणाने अर्थव्यवस्थेचे कार्य कशाप्रकारे चालते हे समजते. अर्थव्यवस्थेमध्ये असंख्य उत्पादक विविध वस्तूंचे उत्पादनाचे कार्य करतात. उपलब्ध उत्पादन साधनांचे विविध वस्तूंच्या निर्मितीसाठी वाटप कशा प्रकारे होते, वस्तू व सेवांचे उपभोक्त्यांमध्ये कसे वाटप करावे यांचे विवेचन सूक्ष्म अर्थशास्त्राच्या अभ्यासाने होते.

**६) उद्योगसंस्था व उद्योगधंद्यांना उपयुक्त** : सूक्ष्म अर्थशास्त्राच्या अभ्यासाने देशातील विविध उद्योगसंस्था आणि उद्योगांची काम करण्याची क्षमता समजते. तसेच देशातील उद्योगसंस्था व उद्योगधंद्यांना त्यांचे आर्थिक प्रश्न कसे सोडवावेत याचे मार्गदर्शन सूक्ष्म अर्थशास्त्राच्या अभ्यासाने मिळते.

**७) खाजगी अर्थव्यवस्थेचे कार्य समजते :** खाजगी अर्थव्यवस्थेत असंख्य उत्पादक व उपभोक्ते असतात. ते उत्पादक व उपभोक्ते विविध वस्तू व सेवांचे उत्पादन करतात. केलेल्या उत्पादनाचे वाटप उपभोक्त्यांमध्ये कसे केले जाते, त्याचे मार्गदर्शन सूक्ष्म अर्थशास्त्राच्या अभ्यासाने मिळते.

**८) किंमत निर्धारण स्पष्टीकरण :** मागणी व पुरवठ्याच्या समतोलातून वस्तू व सेवा आणि उत्पादन घटकांच्या किमती कशा ठरतात, याचे स्पष्टीकरण सूक्ष्म अर्थशास्त्रात केले जाते.

**९) शासनास उपयुक्त :** आर्थिक धोरणे आखण्यासाठी शासनास सूक्ष्म विश्लेषणाचा उपयोग होतो. करविषयक धोरणे, सार्वजनिक खर्चविषयक धोरणे, किंमतविषयक धोरणे, साधनांच्या कार्यक्षम वाटपासंबंधी धोरणे इत्यादी धोरणे आखण्यासाठी सूक्ष्म विश्लेषण शासनास मार्गदर्शन करते.

अशा प्रकारे सूक्ष्म अर्थशास्त्र हे सैद्धांतिक तसेच व्यावहारिक-दृष्ट्याही अत्यंत महत्वाचे आहे.

**सूक्ष्म अर्थशास्त्राचे गुण** (Merits of Micro Economics)

> **सूक्ष्म अर्थशास्त्राचे गुण**
> **१) सरळ आणि सुलभ विवेचन**
> **२) व्यक्तिगत उपभोक्त्यांना उपयुक्त**
> **३) अचूक अंदाज मांडता येतात**
> **४) करविषयक समस्या समजण्यास उपयुक्त**
> **५) आंतरराष्ट्रीय व्यापाराला साहाय्यक**
> **६) सूक्ष्म अर्थशास्त्र स्थूल अर्थशास्त्राला साहाय्यक**

**१) सरळ आणि सुलभ विवेचन :** सूक्ष्म अर्थशास्त्रामध्ये प्रत्येक घटकाचे वेगवेगळे विवेचन केले जात असल्यामुळे, अध्ययनातील गुंतागुंत टाळल्या जात असल्यामुळे विवेचन अधिक सरळ आणि सुलभ बनते.

**२) व्यक्तिगत उपभोक्त्यांना उपयुक्त :** सूक्ष्म अर्थशास्त्राद्वारे वैयक्तिक आर्थिक समस्यांचे अध्ययन, परीक्षण आणि विश्लेषण करुन त्या समस्यांचे समाधानाचे यथोचित उत्तर किंवा योग्य निर्देश प्राप्त होतात. त्याचप्रमाणे मर्यादित उत्पन्नात कोणत्या वस्तू व सेवांचा उपभोग घ्यावा, किती प्रमाणात घ्यावा आणि महत्तम समाधान कसे प्राप्त करायचे याविषयी निर्णय घेण्याकरिता उपभोक्त्यांना मार्गदर्शन करण्याचे कार्य सूक्ष्म अर्थशास्त्र करते.

**३) अचूक अंदाज मांडता येतात :** सूक्ष्म अर्थशास्त्रामध्ये एका घटकाचे सविस्तर अध्ययन केले जाते. त्यावरुन निष्कर्ष काढले जातात व हे निष्कर्ष इतर घटकांना लावले जातात. अंदाज बांधणे म्हणजे भविष्य वर्तविणे नसून काही अटीवर भविष्य वर्तविणे होय. उदा. शितावरुन भाताची परीक्षा करणे.

**४) करविषयक समस्या समजण्यास उपयुक्त :** सरकारने आकारलेल्या विभिन्न करामुळे समाजाच्या कल्याणावर नेमका किती व कसा परिणाम होतो हे सूक्ष्म अर्थशास्त्राच्या अध्ययनावरुन लक्षात येते. करभाराचे वितरण उपभोक्ता व उत्पादक वर्गात कसे केले जाते याविषयी माहिती सुद्धा सूक्ष्म अर्थशास्त्राच्या अध्ययनावरुन प्राप्त होते.

**५) आंतरराष्ट्रीय व्यापाराला साहाय्यक :** आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये व्यापाराच्या शर्ती व लाभ कशा प्रकारे निश्चित होतात. विनिमय दराची निश्चिती कशी होते. अशा प्रकारच्या प्रश्नांची उत्तरे सूक्ष्म अर्थशास्त्राच्या अध्ययनाने प्राप्त होतात. म्हणूनच सूक्ष्म अर्थशास्त्र आंतरराष्ट्रीय व्यापाराला साहाय्यक ठरते.

**६) सूक्ष्म अर्थशास्त्र स्थूल अर्थशास्त्राला साहाय्यक :** सूक्ष्म अर्थशास्त्राद्वारे करण्यात आलेल्या विशिष्ट घटकांच्या अध्ययनावरुन स्थूल अर्थशास्त्रातील समूहाचे अध्ययन केल्या जाते. त्यामुळे सूक्ष्म अर्थशास्त्र हे स्थूल अर्थशास्त्राला उपयुक्त ठरते.

**सूक्ष्म अर्थशास्त्राचे दोष/मर्यादा** (Demerits/Limitations of Micro Economics)

> **सूक्ष्म अर्थशास्त्राचे दोष/मर्यादा**
> **१) संपूर्ण अर्थव्यवस्थेची कल्पना येत नाही**
> **२) अवास्तव गृहीते**
> **३) महत्त्वाच्या प्रश्नांचा अभ्यास करणे अशक्य**
> **४) सूक्ष्म अर्थशास्त्राच्या अभ्यासाने अविश्वसनीय निष्कर्ष**
> **५) पूर्ण रोजगार असणाऱ्या अर्थव्यवस्थेला लागू**
> **६) अनिश्चितता**

**१) संपूर्ण अर्थव्यवस्थेची कल्पना येत नाही :** सूक्ष्म अर्थशास्त्र हे अर्थव्यवस्थेतील व्यक्तिगत घटकांचा अभ्यास करते. वैयक्तिक घटकांच्या अभ्यासावरुन देशाच्या संपूर्ण अर्थव्यवस्थेची माहिती होणे अशक्य असते. व्यक्तिगत घटकांपेक्षा देशाच्या अर्थव्यवस्थेची माहिती होणे अत्यंत महत्त्वाचे असते. परंतु सूक्ष्म अर्थशास्त्राच्या अभ्यासाने संपूर्ण अर्थव्यवस्थेची कल्पना येत नाही.

**२) अवास्तव गृहीते :** सूक्ष्म अर्थशास्त्रात विविध आर्थिक घटकांचे विश्लेषण करताना कांही गृहीतांचा आधार घेतला जातो. परंतु ज्या गोष्टी गृहीत धरल्या आहेत त्या वास्तव परिस्थितीत कधीच नसतात. त्यामुळे गृहीत धरलेल्या गोष्टी चुकीच्या व अयोग्य वाटतात. उदा. सूक्ष्म अर्थशास्त्र असे गृहीत धरते की, बाजारात पूर्णस्पर्धा असते, देशात पूर्ण रोजगाराची परिस्थिती असते इत्यादी. वास्तवात बाजारात कधीही पूर्ण स्पर्धा नसते व पूर्ण रोजगार नसतो. त्यामुळे सूक्ष्म अर्थशास्त्राचे विश्लेषण अवास्तव किंवा चुकीच्या गृहीतावर आधारलेले आहे.

**७) व्यक्तिगत निष्कर्ष समुहाला लागू पडणारे नसतात**

**८) समाजात स्वावलंबी घटक नसतात**

**३) महत्त्वाच्या प्रश्नांचा अभ्यास करणे अशक्य :** देशात अनेक प्रश्न असतात. या प्रश्नांचा अभ्यास करणे अत्यंत महत्त्वाचे असते. उदा. एकूण बचत, गुंतवणूक, राष्ट्रीय उत्पन्नाचे समान वाटप, भांडवल, चलनविषयक धोरण, देशाचा आर्थिक विकास इत्यादी महत्त्वाच्या घटकांचा अभ्यास सूक्ष्म अर्थशास्त्रात केला जात नाही.

**४) सूक्ष्म अर्थशास्त्राच्या अभ्यासाने अविश्वसनीय निष्कर्ष :** सूक्ष्म अर्थशास्त्राचा अभ्यास करीत असताना विविध आकडेवारीचा वापर केला जातो. परंतु गोळा केलेली माहिती अविश्वसनीय असते. अशा माहितीवरुन काढलेले निष्कर्ष चुकीचे ठरतात. उदा. राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना घेतलेली व्यक्तिगत उत्पन्नाची माहिती योग्य असेलच असे नाही.

**५) पूर्ण रोजगार असणाऱ्या अर्थव्यवस्थेला लागू :** ज्या अर्थव्यवस्थेध्ये पूर्ण रोजगाराची परिस्थिती असेल अशा अर्थव्यवस्थेला सूक्ष्म अर्थशास्त्र लागू पडते. परंतु प्रत्यक्षात जगातील कोणत्याही अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगाराची परिस्थिती आढळत नाही. त्यामुळे सूक्ष्म अर्थशास्त्राचे कार्यक्षेत्र खूपच मर्यादित आहे.

**६) अनिश्चितता :** सूक्ष्म अर्थशास्त्र हे व्यक्तिगत घटकांचा विचार करते. उदा. व्यक्तिगत उत्पन्न, बचत, उपभोग. परंतु देशाचे उत्पन्न, उत्पादन किती, एकूण बचत किती, उपभोग किती यांचा विचार सूक्ष्म अर्थशास्त्रात केला जात नाही. वरील बाबींचे विश्लेषण सूक्ष्म अर्थशास्त्राच्या आधारे केल्यास त्यात मोठ्या प्रमाणात अनिश्चितता निर्माण होईल.

**७) व्यक्तिगत निष्कर्ष समुहाला लागू पडणारे नसतात :** सूक्ष्म अर्थशास्त्र हे व्यक्तिगत घटकांचे अभ्यास करणारे शास्त्र आहे. परंतु व्यक्तिगत घटकावरुन काढलेले निष्कर्ष समुहाला लागू पडत नाहीत. एखाद्या व्यक्तीने बचत केली असता ती फलदायी ठरेल. परंतु संपूर्ण समाजाने बचत केल्यास मागणी घटून मंदी व बेकारी निर्माण होईल. त्यामुळे व्यक्तिगत घटकासाठी काढलेले निष्कर्ष सर्व समुहाला लागू पडणारे नसतात.

**८) समाजात स्वावलंबी घटक नसतात :** प्रत्यक्षात ज्या ठिकाणी प्रत्येक घटक हा स्वावलंबी असतो त्या ठिकाणी सूक्ष्म अर्थशास्त्राचा अभ्यास उपयुक्त ठरतो. पण प्रत्यक्ष जीवनात स्वावलंबी घटक आढळत नाहीत. म्हणून सूक्ष्म अर्थशास्त्राच्या अभ्यासावर एक प्रकारची मर्यादा पडते. अशाप्रकारे सूक्ष्म अर्थशास्त्राच्या अभ्यासाला काही मर्यादा पडत असल्या तरी सूक्ष्म अर्थशास्त्राच्या अभ्यासाचा स्थूल अर्थशास्त्रातील प्रश्नांवर प्रभाव पडतो ही गोष्ट नाकारता येत नाही.

**सूक्ष्म व स्थूल अर्थशास्त्रातील फरक**

| अ. क्र. | फरकाचा आधार | सूक्ष्म अर्थशास्त्र | स्थूल अर्थशास्त्र |
|---|---|---|---|
| १ | **विषय अभ्यासाचे एकक** | वैयक्तिक एकक | देशाच्या संपूर्ण अर्थव्यवस्थेचे |
| २ | **ओळख** | परिपूर्ण स्पर्धा आणि रोजगार, सरकारी हस्तक्षेप नाही, स्वतंत्र किंमत यंत्रणा | उत्पादनाच्या साधनांचे सध्याचे वितरण आधीच निश्चित केले आहे |
| ३ | **अभ्यासाचे उद्दिष्ट** | संसाधनांच्या इष्टतम वितरणाशी संबंधित तत्त्वांसाठी | उत्पादकता विस्तार आणि पूर्ण रोजगार प्राप्तीशी संबंधित तत्त्वांसाठी |
| ४ | **विश्लेषणाची साधने** | किंमत संयंत्र | राष्ट्रीय उत्पन्नाच्या पातळीचे निर्धारण |
| ५ | **अभ्यासाचा विषय** | वैयक्तिक एककाचा समतोल स्थितीतील अभ्यास | संपूर्ण अर्थव्यवस्था असंतुलनाच्या स्थितीतील अभ्यास |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | **समतोलाचा प्रकार** | आंशिक समतोल | सामान्य समतोल |
| ७ | **बदल** | व्यक्तीमधील बदल लोकसंख्येच्या स्थिरतेमध्ये देखील होऊ शकतात | व्यक्तीच्या रचनेतील बदलामुळे लोकसंख्येच्या स्थिरतेवर परिणाम होत नाही |
| ८ | **विरोधाभास** | वैयक्तिक बचत करणे फायदेशीर आहे | स्थूल अर्थशास्त्रासाठी फायदेशीर नाही |

## प्रश्नसंग्रह

**वस्तुनिष्ठ प्रश्न**

१) संपूर्ण अर्थव्यवस्थेचा अभ्यास ..... अर्थशास्त्रात केला जातो.
**अ) स्थूल** ब) सूक्ष्म क) विकासाचे ड) व्यावसायिक

२) सूक्ष्म अर्थशास्त्राचा पाया ...... यांनी घातला.
अ) रिकार्डो ब) माल्थस **क) ॲडमस्मिथ** ड) केन्स

३) सूक्ष्म अर्थशास्त्रात ..... अभ्यास केला जातो.
अ) संपूर्ण अर्थव्यवस्थेचा ब) आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेचा क) राष्ट्रीय उत्पादनाचा **ड) वैयक्तिक घटकाचा**

४) सूक्ष्म अर्थशास्त्र व स्थूल अर्थशास्त्र या शब्दाचा सर्वप्रथम वापर ..... यांनी केला.
अ) ॲड स्मिथ ब) रॉबिन्स क) मार्शल **ड) रॅग्नर फ्रिश**

५) अर्थव्यवस्थेतील लहानात लहान घटकांचा किंवा एका छोट्या भागाचा स्वतंत्रपणे अभ्यास करणाऱ्या विश्लेषण पद्धतीला ..... अर्थशास्त्र म्हणतात.
**अ) सूक्ष्म** ब) स्थूल क) आंतरराष्ट्रीय ड) व्यावहारिक

६) सूक्ष्म अर्थशास्त्राच्या अभ्यासाने ..... प्रश्न समजतात.
**अ) व्यक्तिगत** ब) राष्ट्रीय क) सामाजिक ड) धार्मिक

७) व्यक्तिगत आर्थिक प्रश्न सोडविण्यास ...... अर्थशास्त्र उपयुक्त पडते.
**अ) सूक्ष्म** ब) आंतरराष्ट्रीय क) स्थूल ड) व्यावहारिक

८) ...... अर्थशास्त्राच्या अभ्यासावरुन संपूर्ण अर्थव्यवस्थेची कल्पना येत नाही.
**अ) सूक्ष्म** ब) स्थूल क) व्यावहारिक ड) विकासाच्या

९) सूक्ष्म अर्थशास्त्राच्या अभ्यासाची सुरुवात ..... पासून झाली.
**अ) ॲड स्मिथ** ब) मार्शल क) केन्स ड) पिगू

१०) स्थूल अर्थशास्त्राच्या अभ्यासाची सुरुवात ..... पासून झाली.
अ) रिकार्डो **ब) माल्थस** क) प्रा. नाईट ड) हॉले

११) सूक्ष्म अर्थशास्त्र हे ............. असते.
अ) राष्ट्रनिष्ठ **ब) व्यक्तिनिष्ठ** क) समाजनिष्ठ ड) तत्वनिष्ठ

१२) अर्थशास्त्राची शाखा, जी संसाधन वाटपाशी संबंधित आहे.
**अ) सूक्ष्म अर्थशास्त्र** ब) स्थूल अर्थशास्त्र क) अर्थमिती ड) व्यावहारिक

१३) सूक्ष्म अर्थशास्त्रातील संकल्पना ..... आहे.
अ) राष्ट्रीय उत्पन्न ब) सामान्य किंमत पातळी **क) घटक किंमत** ड) एकूण रोजगार

१४) अर्थशास्त्राचा मुख्य अभ्यास विषय म्हणजे ...... कशी ठरते हा आहे
अ) वस्तूची मागणी **ब) वस्तूची किमत** क) वस्तूचा पुरवठा ड) वस्तूची उपयोगिता

१५) स्थूल अर्थशास्त्रात संकल्पनेचा अभ्यास केला जातो.
अ) अर्थव्यवस्था **ब) आर्थिक विकास** क) घटक किंमत ड) उत्पादन किंमत

१६) अर्थशास्त्राचा जनक कोण.
**अ) ॲडमस्मिथ** ब) मार्शल क) रॉबिन्स ड) रिकार्डो

१७) ॲडमस्मिथच्या मते अर्थशास्त्र हे ...... शास्त्र आहे.
अ) मानवी वर्तणुकीचे ब) कल्याणाचे **क) संपत्तीचे** ड) अनावश्यकता

१८) 'The Wealth of Nations' या ग्रंथाचे लेखक आहेत.
अ) रिकार्डो ब) मार्शल क) रॉबिन्स **ड) ॲडमस्मिथ**

१९) 'The Principal of Economics' या ग्रंथाचे लेखक आहेत.
अ) रिकार्डो **ब) मार्शल** क) रॉबिन्स ड) ॲडमस्मिथ

२०) 'The Nature & Significance of Economics' हा ग्रंथ यांनी लिहिला.
अ) रिकार्डो ब) मार्शल **क) रॉबिन्स** ड) केन्स

२१) अर्थशास्त्राची संपत्तीवर आधारीत व्याख्या यांनी केली.
अ) पिगू ब) रॉबिन्स **क) ॲडमस्मिथ** ड) रिकार्डो

२२) अर्थशास्त्राची कल्याणावर आधारीत व्याख्या यांनी केली.
**अ) मार्शल** ब) रॉबिन्स क) ॲडमस्मिथ ड) केन्स

२३) अर्थशास्त्राची दुर्मिळतेवर आधारीत व्याख्या यांनी केली.
अ) केन्स **ब) रॉबिन्स** क) ॲडमस्मिथ ड) मार्शल

२४) अर्थशास्त्राचा सूक्ष्मदर्शी अभ्यास म्हणजे .....
अ) स्थूल अर्थशास्त्र **ब) सूक्ष्म अर्थशास्त्र** क) स्थिर अर्थशास्त्र ड) यापैकी नाही

२५) समुच्चयात्मक संकल्पनाचे शास्त्र म्हणजे ...... अर्थशास्त्र होय.
अ) व्यष्टी ब) गतिमान **क) समष्टी** ड) स्थिर

२६) मानवी गरजा असतात.
अ) मर्यादित **ब) अमर्यादित** क) घटत जाणाऱ्या ड) स्थिर

२७) गरजा भागविणारी साधने ...... असतात.
**अ) मर्यादित** ब) अमर्यादित क) स्थिर ड) घटत जाणाऱ्या

२८) आर्थिक नियम ...... असतात.
अ) सत्य ब) वास्तव **क) प्रवृत्तीदर्शक** ड) स्थिर

२९) आर्थिक नियमांची तुलना या नियमांशी केली जाते.
अ) भारती- ओहोटी **ब) गुरुत्वाकर्षण** क) प्रवृत्ती ड) सत्य

३०) अर्थशास्त्र गरजाबद्दल अचल असते असे कोणी म्हटले.
अ) केन्स ब) रॉबिन्स क) ॲडमस्मिथ **ड) मार्शल**

३१) ...... यांच्या मते, गरजांबाबत अर्थशास्त्र तटस्थ असते.
अ) केन्स **ब) रॉबिन्स** क) ॲडमस्मिथ ड) मार्शल

३२) मार्शलच्या मते, अर्थशास्त्र हे ...... शास्त्र आहे.
अ) राजकीय ब) नैसर्गिक **क) सामाजिक** ड) भौतिक

३३) अर्थशास्त्रात मुख्यत्वे यांचा अभ्यास होतो.
अ) राजकारण **ब) संपत्ती** क) आरोग्य ड) भौतिक

३४) 'मानव एक सामाजिक प्राणी आहे' हे विधान यांनी केले.
अ) रिकार्डो **ब) रॉबिन्स** क) ॲडमस्मिथ ड) मार्शल

३५) 'राष्ट्राच्या संपत्तीचे स्वरुप आणि कारणमीमांसा' हा ग्रंथ यांनी लिहिला.
अ) मार्शल ब) रॉबिन्स **क) ॲडमस्मिथ** ड) रिकार्डो

३६) 'मनुष्य हा एक गरजांचा पुंजका (Bunch) आहे' हे विधान यांनी केले.
अ) रिकार्डो ब) ॲडमस्मिथ **क) रॉबिन्स** ड) मार्शल

३७) 'अर्थशास्त्राचे स्वरुप आणि महत्व' हा ग्रंथ यांनी लिहिला.
अ) मार्शल **ब) रॉबिन्स** क) केन्स ड) रिकार्डो

३८) 'अर्थशास्त्र साध्ये आणि गरजांच्या बाबतीत तटस्थ असते'.

अ) मार्शल ब) रॉबिन्स **क) केन्स** ड) ॲडमस्मिथ

३९) 'सूक्ष्म अर्थशास्त्र म्हणजे अर्थव्यवस्थेचे सूक्ष्म अध्ययन करणारे शास्त्र होय'.

अ) हिक्स **ब) बोल्डिंग** क) केन्स ड) रिकार्डो

४०) 'अर्थशास्त्राची मुलतत्वे' या ग्रंथाचे लेखक आहेत.

**अ) मार्शल** ब) रॉबिन्स क) केन्स ड) ॲडमस्मिथ

४१) स्थूल अर्थशास्त्राचा जनक खालीलप्रमाणे.

अ) रिकार्डो ब) पिगू क) रॉबीन्स **ड) डॉ. मार्शल**

४२) १९३३ मध्ये सूक्ष्म व स्थूल (Micro & Macro) या सज्ञांचा उपयोग सर्वप्रथम यांनी केला.

अ) रिकार्डो ब) पिगू क) रॉबीन्स **ड) रॅगनर फ्रिश**

४३) सूक्ष्म अर्थशास्त्राचा जनक खालीलप्रमाणे.

अ) रिकार्डो ब) पिगू क) रॉबीन्स **ड) ॲडमस्मिथ**

४४) स्थूल अर्थशास्त्राचा अभ्यास यांनी केला

अ) रिकार्डो **ब) लॉर्ड केन्स** क) रॉबीन्स ड) ॲडमस्मिथ

**लघुत्तरी प्रश्न**

१) सूक्ष्म व स्थूल अर्थशास्त्रातील फरक स्पष्ट करा.
२) आर्थिक नियम व भौतिक शास्त्र नियमातील फरक स्पष्ट करा.
३) आर्थिक नियमांच्या मर्यादा सांगा.
४) आर्थिक नियमाची उपयोगिता सांगा.
५) सूक्ष्म अर्थशास्त्राचे महत्त्व सांगा.
६) ॲडम स्मिथच्या व्याख्येची वैशिष्ट्ये सांगा.
७) मार्शलच्या व्याख्येची वैशिष्ट्ये सांगा.
८) रॉबिन्सच्या व्याख्येची वैशिष्ट्ये सांगा.
९) मार्शल आणि रॉबिन्सच्या व्याख्यांमधील फरक स्पष्ट करा.
१०) ॲडम स्थिम यांना 'अर्थशास्त्राचे जनक' का म्हणतात?
१२) नैसर्गिक शास्त्र आणि सामाजिक शास्त्र यातील फरक स्पष्ट करा.
१३) आर्थिक नियमांचे प्रकार स्पष्ट करा.
१४) आर्थिक नियमांचे वैशिष्ट्ये सांगा.

**दिर्घोत्तरी प्रश्न**

१) सूक्ष्म अर्थशास्त्राचे महत्त्व व मर्यादा विशद करा.
२) ॲडम स्मिथच्या व्याख्येचे टिकात्मक परीक्षण करा.
३) मार्शलच्या व्याख्येचे टिकात्मक परीक्षण करा.
४) रॉबिन्सच्या व्याख्येचे टिकात्मक परीक्षण करा.
५) सूक्ष्म अर्थशास्त्राचे गुण-दोष स्पष्ट करा.
६) आर्थिक नियमाची व्याख्या सांगून वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

# प्रकरण २
# मागणी व पुरवठा
## (Demand and Supply)

---

## २.१ मागणी

अर्थशास्त्रात मागणी ही संकल्पना आर्थिक वस्तू अथवा सेवांच्या मागणीच्या संदर्भात वापरली जाते. उपयोगिता ही मागणीचा आधार आहे. वस्तूमध्ये उपयोगीता असल्याने वस्तूला मागणी केली जाते परंतु उपयोगिता स्वतःहून वस्तूला मागणी निर्माण करत नाही. म्हणजे उपयोगिता आहे या कारणामुळे मागणी निर्माण होईलच असे नाही. कोणत्याही वस्तूची मागणी व्यक्त करताना त्यात वस्तूची किंमत मागणीचे परिमाण आणि मागणीचा कालावधी या तीन गोष्टींचा अंतर्भाव असणे आवश्यक असते. कारण वस्तूची किंमत आणि मागणीचे परिमाण यात अगदी विरुद्ध (व्यस्त) संबंध असते. मागणीच्या काही महत्त्वाच्या व्याख्या पुढीलप्रमाणे.

**व्याख्या**

१) बेनहॅम : ''विशिष्ट वेळी, विशिष्ट किमतीला, विशिष्ट वस्तूची खरेदी केलेली नगसंख्या म्हणजे त्या वस्तूची मागणी होय.''

२) 'विशिष्ट वेळी विशिष्ट किमतीला विशिष्ट वस्तूचे परिमाण खरेदी करण्याची तयारी दर्शविणे म्हणजे मागणी होय.'

मागणीच्या व्याख्येवरुन खालील वैशिष्ट्ये स्पष्ट होतात.

१) मागणीमध्ये वस्तूच्या विशिष्ट परिमाणाचा उल्लेख असावा लागतो.

२) मागणी नेहमी किमतीच्या संदर्भात व्यक्त केली जाते. मागणी व्यक्त करताना त्या किमतीचा उल्लेख असावा लागतो.

३) मागणी विशिष्ट कालावधी संबंधित असते. मागणी ही दैनिक, आठवडी, मासिक, वार्षिक असू शकते. म्हणून मागणीच्या विधानात कालावधीचा उल्लेख असावा लागतो. उदा. एक आठवड्यात ४० रुपये किमतीला एका कुटुंबाची साखरेची मागणी ५ किलो आहे.

**इच्छा व मागणी**

सर्वसाधारणपणे आपण इच्छेला मागणी म्हणतो. परंतु अर्थशास्त्रात इच्छा म्हणजे मागणी नव्हे यासाठी इच्छा आणि मागणीचा फरक खालीलप्रमाणे समजून घेता येईल.

| मुद्दे | इच्छा | मागणी |
|---|---|---|
| **अर्थ** | काहीतरी हवेसे वाटणे किंवा एखादी वस्तू आपल्या जवळ असावी अशी उत्कंठा निर्माण होणे म्हणजे इच्छा होय. | खरेदीशक्तीचा पाठबळ आणि ते खर्च करण्याची मानसिक तयारी असलेली इच्छा म्हणजे मागणी होय. |
| **किंमत संदर्भ** | इच्छा व्यक्त करताना किमतीचा संदर्भ घ्यावा लागत नाही. | मागणी व्यक्त करताना किमतीचा संदर्भ देणे आवश्यक असते. |
| **वेळ,काळ** | इच्छेच्या वेळी वेळ, काळ विचारात घ्यावा लागत नाही. | मागणी करताना वेळ, काळ विचारात घ्यावा लागतो. |
| **संबंध** | इच्छा ही मागणीची सुरुवात असते. | मागणी ही इच्छेचा शेवट असतो. |
| **उदाहरण** | एखादा ड्रेस आवडल्यास तो घ्यावसा वाटणे. | एखादा ड्रेस आवडल्यास तो पैसे देऊन खरेदी करणे. |

**मागणी निर्माण करणारे निर्धारक घटक**

(१) इच्छा (२) पैसा (३) खरेदी शक्ती (४) उत्पन्न (५) वेळ/कालावधी (६) किंमत

**मागणीचे प्रकार**

| मागणीचे प्रकार |
|---|
| **१) प्रत्यक्ष/अपरोक्ष मागणी** |
| **२) अप्रत्यक्ष/परोक्ष मागणी** |

**१) प्रत्यक्ष/अपरोक्ष मागणी :** प्रत्यक्ष गरजा पूर्ण करण्यासाठी ज्या वस्तूंची मागणी केली जाते, त्याला प्रत्यक्ष मागणी असे म्हणतात. उपभोग्य वस्तूंची मागणी प्रत्यक्ष मागणी असते. उदा. ग्राहकांची कापडाची मागणी, अन्न, कपडे इ.

**२) अप्रत्यक्ष/परोक्ष मागणी :** जेव्हा वस्तूची मागणी एखाद्या वस्तूच्या निर्मितीसाठी, उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनासाठी केली जाते, तेव्हा अशा वस्तूंच्या मागणीला अप्रत्यक्ष मागणी असे म्हणतात. अप्रत्यक्ष मागणीला परोक्ष मागणी असेही म्हणतात. उदा. ग्राहकांची कापडाची मागणी पण कापड तयार करण्यासाठी कापूस, कापड तयार करण्याची यंत्रे, शिलाई मशीन इत्यादीची मागणी अप्रत्यक्ष किंवा परोक्ष मागणी होय. म्हणून मूळ मागणीतून निर्माण झालेली मागणी ही अप्रत्यक्ष मागणी होय. तसेच उत्पादन घटकांची मागणी.

**३) पूरक मागणी**
**४) संयुक्त मागणी**
**५) संमिश्र मागणी**
**६) स्पर्धात्मक मागणी**

**३) पूरक मागणी :** जेव्हा एखाद्या वस्तूची मागणी इतर कोणत्याही वस्तू बरोबर केली जाते, त्यास पूरक मागणी असे म्हणतात. पूरक वस्तूंची मागणी ही संयुक्त मागणी असते. उदा. शाई-पेन आणि शाईची मागणी, कार आणि इंधनाची मागणी.

**४) संयुक्त मागणी :** एखादी विशिष्ट गरज भागविण्यासाठी जेव्हा एकापेक्षा अधिक वस्तूंची मागणी एकत्रितपणे करावी लागते तेव्हा अशा मागणीला संयुक्त मागणी असे म्हणतात. उदा. लिहिण्याची गरज भागवण्यासाठी पेन व शाही यांची मागणी एकाच वेळी केली जाते. त्यापैकी एका वस्तूचा उपयोग करुन गरज भागवता येत नाही.

**५) संमिश्र मागणी :** एखाद्या वस्तूचा वापर जेव्हा अनेक गरजा पूर्ण करण्यासाठी केला जातो, तेव्हा अशा वस्तूंच्या मागणीला संमिश्र मागणी असे म्हणतात. उदा. विजेची मागणी- प्रकाश, टीव्ही, लाईट, फ्रिज इत्यादी.

**६) स्पर्धात्मक मागणी :** वस्तूच्या मागणीला स्पर्धात्मक मागणी असे म्हणतात. उदा. चहा व कॉफीची मागणी.

**मागणीचा नियम/सिद्धांत**

डॉ. ऑल्फ्रेड मार्शल यांनी १८९० मध्ये ''अर्थशास्त्राची मूलतत्वे'' (Principles of Economics) या ग्रंथात हा सिद्धांत मांडला. मानवी गरज पूर्ण करण्यासाठी वस्तूची मागणी केली जाते. विशिष्ट वेळेला विशिष्ट किमतीला वस्तूचे जेवढे नग खरेदी केले जातात. ती नगसंख्या म्हणजेच वस्तूची मागणी होय. वस्तूची मागणी वस्तूच्या किंमतवर अवलंबून असते. वस्तूची किंमत आणि वस्तूची मागणी यातील संबंध ज्या ठिकाणी व्यक्त केला जाते. त्याला मागणीचा सिद्धांत असे म्हणतात. तो पुढीलप्रमाणे.

**सिद्धांताचे विधान**

*''इतर परिस्थिती कायम असताना वस्तूची किंमत कमी झाल्यास वस्तूची मागणी वाढते, याउलट वस्तूची किंमत वाढल्यास मागणी कमी होते''.* या सिद्धांतावरुन असे स्पष्ट होते की, वस्तूची किंमत कमी झाल्यास मागणी वाढते. याउलट वस्तूची किंमत वाढल्यास मागणी कमी होते. म्हणजेच किंमत आणि मागणी यात व्यस्त संबंध आहे.

थोडक्यात,

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **Demand Law** → | **P** | ↓ | **D** | ↑ |
| **Demand Law** → | **P** | ↑ | **D** | ↓ |

सूत्रानुसार मागणीचा नियम पुढीलप्रमाणे मांडता येतो. **Dx = f (Px)**

या ठिकाणी Dx म्हणजे क्ष वस्तूची मागणी होय. f म्हणजे फलन होय, आणि Px म्हणजे क्ष वस्तूची किंमत होय.

**मागणी नियमाची गृहिते**

मागणीचा नियम खरा ठरण्यासाठी इतर परिस्थितीत पुढील गोष्टींचा समावेश होतो.

**१) पुरवठा स्थिर असावा :** मागणीच्या सिद्धांतात किंमत आणि मागणी यांचाच विचार केलेला आहे. म्हणून वस्तूचा पुरवठा कायम राहिला पाहिजे. वस्तूचा पुरवठा बदलला तर किंमत बदलेल. वस्तूच्या पुरवठ्यात बदल होत नाही असे या सिद्धांतात गृहीत धरले आहे.

**२) आवडी-निवडी, सवयी स्थिर :** लोकांच्या आवडीनिवडी व सवयी कायम राहिल्या तर हा सिद्धांत खरा ठरेल. सुती शर्ट ऐवजी लोकांची टेरीकॉट शर्ट वापरण्याची आवड जर वाढत गेली तर सुती शर्टची

| **मागणी नियमाची गृहिते** |
|---|
| **१) पुरवठा स्थिर असावा** |
| **२) आवडी-निवडी, सवयी स्थिर** |
| **३) पर्यायी वस्तूंच्या किमती स्थिर** |
| **४) पूरक वस्तूंच्या किमती स्थिर** |
| **५) उपभोक्त्यांचे उत्पन्न स्थिर असावे** |
| **६) लोकसंख्या स्थिर असावी** |
| **७) जाहिरातीच्या प्रमाणात वाढ होऊ नय** |

किंमत कमी होऊनही त्याची मागणी वाढणार नाही.

**३) पर्यायी वस्तूंच्या किमती स्थिर** : पर्यायी वस्तूंच्या किमतीत बदल होत नाही असा हा सिद्धांत गृहीत धरतो कारण पर्यायी वस्तूंच्या किमतीत बदल झाला तर त्याचा परिणाम वस्तूंच्या मागणीवर होतो. ग्रामोफोनसाठी रेडिओचा नवा पर्याय शोधल्यानंतर ग्रामोफोनची किंमत कमी होऊनही मागणी वाढली नाही. म्हणून नव्या पर्यायी वस्तू निर्माण होत नाही असे या सिद्धांतात गृहीत घेतले आहे.

**८) वस्तूच्या उपयोगितेत बदल न होण**
**९) हवामान व भोवतालची परिस्थिती स्थिर असावी**
**१०) भविष्यकालीन किंमत विषयक अंदाज स्थिर**
**११) चलन पुरवठा स्थिर असावा**
**१२) सामाजिक चालीरीतीत बदल नको**
**१३) करविषयक धोरणात बदल नाही**

**४) पूरक वस्तूंच्या किमती स्थिर** : जर दोन वस्तू एकमेकांच्या परस्पर पूरक असतील तर एका वस्तूची मागणी वाढल्यामुळे दुसऱ्या वस्तूची किंमत वाढूनही मागणी जास्त होते. मोटारीची किंमत घटल्यामुळे मोटारीची मागणी वाढल्यास पेट्रोलची किंमत वाढूनही पेट्रोलची मागणी वाढेल. पूरक वस्तूंच्या किमतीत बदल झाला तर त्याचा परिणाम वस्तूंच्या मागणीवर होतो.

**५) उपभोक्त्यांचे उत्पन्न स्थिर असावे** : मागणीचा नियम जर अनुभवाचा असेल तर उपभोक्त्याचे उत्पन्न स्थिर असावे. जर त्याचे उत्पन्न वाढले असेल तर वस्तूची किंमत वाढून सुद्धा तो वस्तू अधिक प्रमाणात खरेदी करेल आणि जर त्याचे उत्पन्न कमी झाले तर वस्तूची किंमत कमी होऊनही तो त्या वस्तू कमी प्रमाणात खरेदी करेल.

**६) लोकसंख्या स्थिर असावी** : लोकसंख्या कायम राहिली पाहिजे असे या सिद्धांतात गृहीत धरले आहे. देशाच्या फाळणीनंतर निर्वासितांची संख्या ज्या प्रदेशात, गावात वाढली त्या गावात किमती वाढूनही काही काळ मागणी वाढली. याउलट लोकसंख्या कमी झाल्यास किंमत कमी होऊनही मागणी कमी होईल.

**७) जाहिरातीच्या प्रमाणात वाढ होऊ नये** : वस्तूची मोठ्या प्रमाणावर जाहिरात केल्यामुळे किंवा विक्री वाढविण्यासाठी इतर उपाय योजल्यामुळे वस्तूची किंमत वाढली तरीही मागणी वाढू शकेल. विक्री वाढविण्याचे असे उपाय योजले नाही असे या सिद्धांतात गृहीत धरले आहे.

**८) वस्तूच्या उपयोगितेत बदल न होणे** : एखाद्या वस्तूचे नवीन गुण आढळले आणि त्यामुळे जर त्या वस्तूचे उपभोग वाढले तर त्या वस्तूची किंमत वाढूनही तिची मागणी वाढेल. म्हणून वस्तूची उपयोगिता या सिद्धांतात गृहीत धरलेली आहे.

**९) हवामान व भोवतालची परिस्थिती स्थिर असावी** : हिवाळ्यात ऊलनचे कपडे, पावसाळ्यात छत्र्या व रेनकोट यांच्या मागणी किमतीचा काहीही परिणाम होत नाही. कारण त्यावेळी त्या आवश्यक असतात. किंमत वाढली तरीही ते घेतल्याशिवाय दुसरा पर्याय नसतो आणि किंमत कमी झाली तरीही अधिक खरेदी करण्याची गरज नसते.

**१०) भविष्यकालीन किंमत विषयक अंदाज स्थिर** : भविष्यात टंचाई निर्माण होणार आहे किंवा ती वस्तू मिळणार नाही असा समज झाल्यास, किंमत वाढूनही मागणी कमी होणार नाही किंवा पुढे ती वस्तू सहज मिळणार आहे. अशी धारणा झाल्यास आताच ती वस्तू घेऊन ठेवणे ऐवजी नंतर घेवू या वृत्तीने कमी किंमत होवूनही मागणी वाढत नाही.

**११) चलन पुरवठा स्थिर असावा** : चलन पुरवठा वाढला तर लोकांजवळील पैसा वाढेल आणि लोकांजवळील पैसा वाढला तर वस्तूची किंमत स्थिर असताना देखील मागणी वाढेल. याउलट चलन पुरवठा कमी झाल्यास लोकांजवळील पैसा कमी होऊन मागणी कमी होईल.

**१२) सामाजिक चालीरीतीत बदल नको** : पूर्वी स्त्रियांनी बांगड्या घालणे, कुंकू लावणे, पुरुषाने टोपी घालणे ही सामाजिक प्रथा होती. ही प्रथा बरीच कमी झाल्यामुळे स्त्रिया बांगड्या, कुंकू या वस्तूची मागणी कमी बरीच कमी झाली.

**१३) करविषयक धोरणात बदल नाही** : सरकारच्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष करांचा विविध वस्तूंच्या किमतीवर आणि त्यातून मागणीवर परिणाम होत असतो. त्यामुळे सरकारची धोरणे देखील बदलत नाहीत असे हा सिद्धांत गृहीत धरतो.

**मागणी वक्राचे कोष्टक व आकृतीद्वारे स्पष्टीकरण**

वस्तूच्या वेगवेगळ्या किंमतीना वस्तूची केली जाणारी मागणी किंवा किंमतीत होणाऱ्या बदलाप्रमाणे मागणीत होणारे बदल ज्या तक्त्यात दाखवले असता त्यालाच मागणी पत्रक असे म्हणतात. ते पुढीलप्रमाणे :

मागणी पत्रक

| वस्तूची किंमत (रु.) | वस्तूची मागणी (नग) |
|---|---|
| १ | ५००० |
| २ | ४००० |
| ३ | ३००० |
| ४ | २००० |
| ५ | १००० |




वरील आकृतीत ‘अक्ष’ अक्षावर वस्तूची मागणी व ‘अय’ अक्षावर वस्तूची किंमत दर्शविली आहे. सुरुवातीला वस्तूची किंमत १ रुपया असतांना ५००० नगाची मागणी केली जात होती. वस्तूची किंमत १ रुपया वरुन अनुक्रमे २, ३, ४, ५ रुपयांपर्यंत वाढली असता वस्तूची मागणी ५००० नगावरुन अनुक्रमे ४०००, ३०००, २०००, १००० नगापर्यंत कमी झाली आहे. किमतीत होणाऱ्या बदलाप्रमाणे मागणीत होणारा बदल दर्शवणाऱ्या बिंदूला अ, ब, क, ड, इ यांना एकत्र जोडले असता मागणी वक्र तयार होतो. ‘मम’ मागणी वक्र डावीकडून उजवीकडे खाली उतरताना दिसतो. कारण वस्तूची किंमत कमी झाल्यास वस्तूची मागणी वाढते. याउलट वस्तूची किंमत वाढल्यास मागणी कमी होते. या मागणीचा नियमवरुन स्पष्ट झाले.

**मागणी वक्र डावीकडून उजवीकडे खाली का येतो?**

**१) घटत्या सीमांत उपयोगितेचा नियम** : एखाद्या वस्तूच्या साठ्यात वाढ झाली असता सीमांत उपयोगिता क्रमशः घटत जाणारी असते. म्हणून एखाद्या वस्तूची किंमत कमी झाली तर उपभोक्ता जास्त नगसंख्येची मागणी करतो.

**२) उत्पन्न परिणाम (वास्तव उत्पन्न)** : जेव्हा किंमत घटते तेव्हा उपभोक्ता यांची खरेदीशक्ती, वास्तव उत्पन्न वाढते. त्यामुळे ते सर्वसाधारण वस्तूंची जास्त प्रमाणात मागणी करु शकतात, त्याला उत्पन्न परिणाम असे म्हणतात.

**मागणी वक्र डावीकडून उजवीकडे खाली का येतो?**

**१) घटत्या सीमांत उपयोगितेचा नियम**
**२) उत्पन्न परिणाम (वास्तव उत्पन्न)**
**३) पर्यायता परिणाम**
**४) नवीन उपभोक्ते**
**५) विविध उपयोगी वस्तू**

**३) पर्यायता परिणाम** : पर्यायी वस्तूंबाबत असे दिसून येते की, एखाद्या वस्तूची किंमत वाढली तर उपभोक्ता पर्यायी वस्तूंची जास्त मागणी करतो आणि जेव्हा या वस्तूंच्या किमती वाढतात तेव्हा त्याची मागणी कमी करतो. यावरुन असे दिसून येते की, किंमत व मागणी यामध्ये व्यस्त संबंध असतो.

**४) नवीन उपभोक्ते** : जेव्हा वस्तूंच्या किमती कमी होतात तेव्हा नवीन ग्राहकवर्ग निर्माण होतो. ज्यांना या वस्तू खरेदी करणे परवडते अशा वस्तूची किंमत कमी झाल्याने वस्तूच्या मागणीत वाढ होते.

**५) विविध उपयोगी वस्तू** : जेव्हा एखादी वस्तू अनेक गरजा भागवण्यासाठी वापरली जाते तेव्हा अशा वस्तूची किंमत कमी झाली असता मागणी वाढते.

**टिका/अपवाद**

मागणीचा सिद्धांत सर्वच बाबतीत अनुभवास येत नाही. त्यास काही अपवाद आहे.

| टिका/अपवाद |
| --- |
| १) गिफेनचा विरोधाभास |
| २) जीवनावश्यक वस्तू |
| ३) नाशवंत वस्तू |
| ४) सवयीच्या वस्तू |
| ५) सामाजिक पातळीच्या वस्तू |
| ६) हंगामी वस्त |
| ७) रुढी परंपरागत वस्तू |
| ८) अज्ञानता |

**१) गिफेनचा विरोधाभास (गिफेन वस्तू, कनिष्ठ वस्तू)** : गिफेन वस्तू हलक्या दर्जाच्या किंवा कनिष्ठ वस्तूंना गिफेन वस्तू म्हणतात. इंग्लंडचे सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ सर रॉबर्ट गिफेन यांनी १९ व्या शतकात इंग्लंडच्या बाजारात कनिष्ठ वस्तूंच्या बाबतीत मागणी नियम दिसून आला नाही. अशा कनिष्ठ वस्तूंना मागणी नियमाला अपवाद आहेत यालाच गिफेनचा विरोधाभास असे म्हणतात. उदा. ज्वारी, जाडेभरडे कापड, मीठ, बाजरी, मका, वनस्पती तूप इत्यादी. कनिष्ठ वस्तूंच्या किमतीत वाढ झाली असता त्या वस्तूच्या मागणी परिमाणात वाढ होते व किमतीत घट झाली असता त्या वस्तूच्या मागणी परिमाणात घट होते. असा निष्कर्ष सर रॉबर्ट गिफेन यांनी इंग्लंड मध्ये पाव, ब्रेड आणि मांस यांच्या मागणीचा अभ्यास करुन काढला. जेव्हा अशा वस्तूंची किंमत कमी होते तेव्हा पूर्वी पेक्षा अशा वस्तूंची मागणी ही कमी केली जाते. त्यामुळे अशा वस्तू मागणीच्या नियमाला अपवाद समजल्या जातात. तो त्यांनी पुढीलप्रमाणे सांगितला आहे.

इंग्लंडमधील कामगार लोकांचे मुख्य अन्न ब्रेड आहे. त्यांचा उत्पन्नाचा बराच मोठा भाग ब्रेडवर खर्च होतो. ब्रेडच्या किमतीत वाढ झाली असता तेथील लोक ब्रेडची अधिक खरेदी करतात कारण ब्रेडच्या किमती वाढल्यामुळे त्यांचा खर्च वाढतो म्हणजेच त्यांचे वास्तविक उत्पन्न कमी होते. त्यामुळे तेथील चांगल्या दर्जाच्या महाग वस्तू उदा. मांस, मासे, अंडी, लोणी या त्यांना विकत घेणे शक्य होत नाही. याउलट ब्रेडच्या किमतीत घट झाली तर त्यांचा खर्च कमी होऊन वास्तविक उत्पन्नात वाढ होते. वाढलेल्या वास्तविक उत्पन्नातून ते ब्रेडची खरेदी न करता मास, मासे, अंडी, लोणी इत्यादी चांगल्या दर्जाच्या महाग वस्तू खरेदी करतात. त्यामुळे गिफेनच्या मते, कनिष्ठ वस्तू मागणी नियमाला अपवाद आहेत. अशा वस्तूंना गिफेन वस्तू असे म्हणतात. देशपरत्वे कनिष्ठ वस्तू बदलत जातात. भारतात ज्वारी, बाजरी, जाडे-भरडी, हलक्या दर्जाचे कापड इत्यादी वस्तू कनिष्ठ वस्तू समजल्या जातात. खालील आकृतीद्वारे दाखविता येईल.




कनिष्ठ वस्तूचे मागणी परिमाण

वरील आकृतीत 'अक्ष' अक्षावर कनिष्ठ वस्तूचे मागणी परिमाण व अय अक्षावर वस्तूची किंमत दर्शविण्यात आलेली आहे. म म हा मागणी वक्र आहे. अक या किमतीला कनिष्ठ वस्तूंचे अब मागणी परिमाण मागितले जाते. किंमत कमी होऊन अक$_{१}$ झाल्यास कनिष्ठ वस्तूकरिता मागणी कमी होऊन अब$_{१}$ इतकी होते.

म्हणजेच मागणी घटते. आकृतीत मख हा भाग नियमाला अपवाद दर्शवितो. कनिष्ठ वस्तूसाठी मागणी वक्र धनात्मक स्वरुपाचा असतो.

**२) जीवनावश्यक वस्तू :** जीवन जगण्यासाठी ज्या वस्तू आवश्यक आहे. उदा. अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण इ. बाबतीत किंमत वाढली तरी मागणी कमी होत नाही. म्हणजेच मागणीचा सिद्धांत अनुभवास येत नाही.

**३) नाशवंत वस्तू :** ज्या वस्तू दिर्घकाळ टिकत नाही त्या वस्तूंना नाशवंत वस्तू असे म्हणतात. उदा. भाजीपाला, दूध इ. बाबतीत किंमत कमी झाल्यास तरीही मागणी वाढत नाही म्हणजेच सिद्धांत खरा ठरत नाही.

**४) सवयीच्या वस्तू :** प्रत्येक माणसाला चांगले आणि वाईट सवयी जोडलेल्या असतात उदा. चहा, कॉफी इ. बाबत किंमत वाढल्यास तरी मागणी कमी होत नाही.

**५) सामाजिक पातळीच्या वस्तू :** समाजामध्ये काही वस्तू खरेदी करणे, वापरणे उदा. सोन्या-चांदीचे दागिने, फॅशनेबल कपडे इ. बाबतीत किंमत वाढत नाही मागणी वाढते. म्हणजे सिद्धांत खरा ठरत नाही.

**६) हंगामी वस्तू :** ऋतुमानातील बदलाप्रमाणे पावसाळा, हिवाळा, उन्हाळा या विशिष्ट ऋतुमानात उदा. हिवाळ्यात गरम कपडे, उन्हाळ्यात सुती कपडे, पावसाळ्यात छत्री-रेनकोट इत्यादी. किंमत वाढताना मागणी वाढते. म्हणजेच सिद्धांत खरा ठरत नाही.

**७) रुढी परंपरागत वस्तू :** रुढी परंपरेप्रमाणे काही सण उत्सव साजरे केले जातात. उदा. हिंदू धर्मात रक्षाबंधन, दिपावली, बैलपोळा हे सण उत्सव मोठ्या उत्साहाने साजरे केले जातात. याप्रसंगी लागणाऱ्या वस्तूची किंमत वाढली असताना मागणी वाढते.

**८) अज्ञानता :** उपभोक्त्याच्या अज्ञानाचा फायदा विक्रेते घेतात. किंमत वाढूनही अधिक माल खपविणे त्यांना शक्य होते. जाहिरातीमध्ये अज्ञानाचा फायदा घेणे हाच प्रयत्न असतो. किंमत वाढूनही आपल्या आवडत्या सौंदर्य प्रसाधनाचा अधिक मोहक जाहिरातीतून मिळतो तेव्हा खरेदी वाढवितो.

**२.२ पुरवठा व पुरवठ्याचा नियम** (Supply & Law of Supply)

सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्रात वस्तूची किंमत, मागणी व पुरवठ्याच्या संतुलनावरुन ठरत असते. म्हणूनच मागणी विश्लेषणा प्रमाणेच पुरवठा विश्लेषणाला सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्रात अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्रामध्ये मागणी नियमाप्रमाणे पुरवठ्याचा नियम सुद्धा अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. कारण वस्तूच्या किंमत बदलाचा वस्तूच्या पुरवठ्यावर काय परिणाम होतो हे पुरवठ्याच्या नियमाद्वारे स्पष्ट करता येते. मागणीच्या नियमाप्रमाणे डॉ. मार्शल यांनी १८९० मध्ये प्रकाशित केलेल्या **'अर्थशास्त्राची मूलतत्वे'** या पुस्तकात पुरवठ्याचा नियम मांडलेला आहे.

**साठा व पुरवठा**

सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्रात मागणी प्रमाणेच पुरवठा हा शब्द विशिष्ट अर्थाने वापरला जातो. वस्तूला अस्तित्वात असलेला साठा म्हणजेच पुरवठा होय. हा अर्थ व्यवहारात वापरला जातो. परंतु अर्थव्यवस्थेमध्ये साठा आणि पुरवठा हे पूरक आहे. साठा आणि पुरवठा यातील फरक थोडक्यात पुढीलप्रमाणे.




| अ. क्र. | साठा | पुरवठा |
|---|---|---|
| १ | विशिष्ट कालावधीत विक्रेत्याकडे विक्रीसाठी उपलब्ध असलेली एकूण नगसंख्या म्हणजे | दिलेल्या विशिष्ट काळामध्ये विशिष्ट किंमत असताना उत्पादकाकडून विक्रीसाठी पुरवलेली |

| | | |
|---|---|---|
| | साठा होय. | नगसंख्या म्हणजे पुरवठा होय. |
| २ | साठा हा उत्पादनाचा परिणाम असतो. | पुरवठा हा साठ्यातून मिळतो. |
| ३ | उत्पादन वाढले, तर साठा वाढतो. | साठा वाढला, तर पुरवठा वाढतो. |
| ४ | साधारणत: साठा पुरवठ्यापेक्षा जास्त असतो. | पुरवठा साठ्याएवढा किंवा त्यापेक्षा कमी असतो; मात्र तो साठ्यापेक्षा जास्त असू शकत नाही. |
| ५ | साठा ही स्थिर संकल्पना असून ती किंमत व वेळ यांच्या संदर्भात स्पष्ट केली जात नाही. | पुरवठा ही प्रवाही संकल्पना असून ती नेहमी किंमत व वेळ यांच्या संदर्भात स्पष्ट केली जाते. |

**व्याख्या**

१) 'एका विशिष्ट कालावधीत विशिष्ट किमतीला वस्तूची जी नगसंख्या विक्रेता विकण्यास तयार असतो त्या नगसंख्येला वस्तूचा पुरवठा असे म्हणतात.'

२) 'विशिष्ट वेळेला विशिष्ट किमतीला विक्रेता वस्तूचे जेवढे नग विकण्यासाठी तयार असतो. ती नगसंख्या म्हणजेच वस्तूचा पुरवठा होय.'

**पुरवठ्याचा नियम**

ज्याप्रमाणे मागणी ही किमतीवर अवलंबून असते. त्याचप्रमाणे पुरवठाही किमतीवर अवलंबून असतो म्हणून मागणी आणि पुरवठा यांना एकत्र आणण्याचे कार्य किंमत करीत असते.

**सिद्धांताचे विधान**

*''इतर परिस्थिती कायम असताना वस्तूची किंमत वाढल्यास त्या वस्तूचा पुरवठा वाढतो, याउलट वस्तूची किंमत कमी झाल्यास त्या वस्तूचा पुरवठा कमी होतो''.* म्हणजेच वस्तूची किंमत वाढत असल्यास वस्तूचा पुरवठा वाढत जाईल व किंमत कमी झाल्यास पुरवठा कमी होईल. यावरुन असे स्पष्ट होते. की, वस्तूची किंमत आणि पुरवठा यांचा समसंबंध असतो.

वस्तूची किंमत सोडून वस्तूच्या पुरवठ्यावर परिणाम करणारे सर्व घटक स्थिर मानले आहेत. फक्त वस्तूची किंमत बदलल्यावर पुरवठ्यावर होणारा परिणाम या सिद्धांतातून स्पष्ट होतो. कोणत्याही उत्पादकाला जास्तीत जास्त नफा मिळावा अशी अपेक्षा असते. तेव्हा त्याच्या वस्तूला मिळणारी किंमत त्याला येणाऱ्या वस्तू उत्पादन खर्चापेक्षा अधिक मिळत असेल तर तो जास्त नागांचा पुरवठा करतो. याउलट तोटा होत असल्यास कमी पुरवठा केला जाईल.

**सूत्र**

सूत्रानुसार पुरवठ्याचा नियम पुढीलप्रमाणे मांडता येतो.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **Supply Law** | **P** | ↓ | **S** | ↓ |
| | **P** | ↑ | **S** | ↑ |

**Sx = f (Px)**

या ठिकाणी Sx म्हणजे क्ष वस्तूचा पुरवठा होय. f म्हणजे फलन होय आणि Px म्हणजे क्ष वस्तूची किंमत होय.

**पुरवठा नियमाचे स्पष्टीकरण**

पुरवठा नियमाचे स्पष्टीकरण करण्यासाठी डॉ. मार्शल यांनी अनुसूची व आलेख या आर्थिक विश्लेषणाच्या साधनांचा वापर करुन नियमाचे स्पष्टीकरण केलेले आहे.

**पुरवठा वक्राचे कोष्टकाद्वारे स्पष्टीकरण**

वस्तूंच्या विविध किमतीवर होणारा वस्तूचा पुरवठा यातील परस्पर संबंध ज्या पत्रकात दर्शविलेला असतो त्या पत्रकाला पुरवठा पत्रक असे म्हणतात.

| वस्तूची किंमत (रु.) | वस्तूचा पुरवठा (नग) |
|---|---|

| | |
|---|---|
| १ | ५ |
| २ | १० |
| ३ | १५ |
| ४ | २० |
| ५ | २५ |

वरील कोष्टकामध्ये वस्तूची किंमत आणि वस्तूचा पुरवठा दर्शविलेला आहे. वस्तूची किंमत प्रतिनग १ रुपये इतकी असताना वस्तूचा पुरवठा ५ नग एवढा आहे. जसजशी किंमत वाढत गेली तसतसा पुरवठा ही वाढत गेला आहे. हेच पत्रक उलट वाचत गेल्यास म्हणजेच वस्तूची किंमत ५ रुपये प्रतिनग असताना वस्तूचा पुरवठा २५ नग एवढा आहे. वस्तूची किंमत कमी-कमी होत गेल्यास पुरवठाही कमी-कमी होत गेल्याचे दिसते.

**पुरवठा वक्राचे आकृतीद्वारे स्पष्टीकरण**




वरील आकृतीत दर्शविल्याप्रमाणे अक्ष-अक्षावर वस्तूचा पुरवठा व अय-अक्षावर वस्तूची किंमत दर्शविली आहे. पुरवठा पत्रकाच्या आधारे 'पप' हा पुरवठा वक्र दाखविण्यात आलेला आहे. वस्तूची किंमत जसजशी वाढत जाईल तसतसा पुरवठा वाढत गेलेला दिसतो. तर किंमत कमी असताना पुरवठाही कमी होत गेलेला दिसून येतो. म्हणून पुरवठा वक्र डावीकडून उजवीकडे वर चढत जातो.

**सिद्धांताची गृहिते**

पुरवठ्याचा नियम हा खालील गृहीतकांवर आधारित आहे.

**१) पर्यायी वस्तूच्या किमती स्थिर असतात** : पुरवठा नियमानुसार इतर वस्तूंच्या किमती स्थिर असतात असे गृहीत घेतले आहे. याचा अर्थ फक्त मुख्य वस्तूंच्या किमतीमध्येच बदल होतात असे गृहीत धरले आहे.

**२) वस्तूच्या उत्पादन तंत्रात कोणताही बदल होत नाही** : पुरवठ्याच्या नियमानुसार उत्पादन तंत्रामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल होत नाही असे गृहीत लक्षात घेतले आहे.

जर उत्पादन तंत्रात बदल झाल्यास वस्तूचा उत्पादन खर्च कमी होईल व वस्तूच्या किमती कमी होऊनही त्या वस्तूचा पुरवठा अधिक राहील.

**सिद्धांताची गृहिते**

**१) पर्यायी वस्तूच्या किमती स्थिर असतात**
**२) वस्तूच्या उत्पादन तंत्रात कोणताही बदल होत नाही**
**३) नैसर्गिक परिस्थितीत बदल होत नाही**
**४) उपभोक्त्याचे उत्पन्न व आवडीनिवडी स्थिर आहे**
**५) उत्पादन घटकांचा पुरवठा स्थिर आहे**
**६) सरकारी धोरण स्थिर आहे**

**३) नैसर्गिक परिस्थितीत बदल होत नाही** : या नियमानुसार नैसर्गिक संसाधने, गॅस, कोळसा, तेल, खनिजे इत्यादी स्थिर आहेत. नैसर्गिक परिस्थितीत कोणत्याही प्रकारचा बदल होत नाही असे या नियमाने गृहीत धरले आहे.

**७) उत्पादन संस्थेचा आकार स्थिर असावा**

**४) उपभोक्त्याचे उत्पन्न व आवडीनिवडी स्थिर आहे** : उपभोक्त्याच्या उत्पन्नात कोणत्याही प्रकारचा बदल होत नाही त्याचबरोबर ग्राहक व विक्रेत्यांच्या आवडीनिवडी, सवयी स्थिर आहेत असे या नियमाने गृहीत धरले आहे. जर त्यामध्ये बदल झाला तर हा नियम लागू होणार नाही.

**५) उत्पादन घटकांचा पुरवठा स्थिर आहे** : वस्तूचे उत्पादन करण्यासाठी आवश्यक असलेले उत्पादनाच्या भूमी, श्रम, भांडवल व उद्योजक या घटकांचा पुरवठा स्थिर असतो. असे या नियमाने गृहीत धरले आहे.

**६) सरकारी धोरण स्थिर आहे** : उत्पादनावर आकारलेले शुल्क किंवा उत्पादनाशी संबंधित असलेल्या इतर करांमध्ये सरकारने वाढ केलेली नाही. म्हणजेच या सिद्धांताने सरकारी धोरणामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल होत नसून ते स्थिर आहे असे गृहीत घेतले आहे.

**७) उत्पादन संस्थेचा आकार स्थिर असावा** : उत्पादन घेत असताना उत्पादन संस्थेचा आकार बदललेला नाही. तसेच उद्योगधंद्यातील एकूण उत्पादन संस्थेच्या संख्येतही बदल झाला नाही. असे या सिद्धांताने गृहीत धरले आहे.

**टिका/अपवाद**

**१) इतर परिस्थिती कायम असते हे ग्रहित चुकीचे** : डॉ. मार्शल यांनी पुरवठ्याचा नियम स्पष्ट करताना इतर परिस्थिती कायम स्थिर असते असे गृहीत धरले आहे. परंतु टीकाकारांच्या मते, इतर परिस्थितीत नेहमी बदल होत असते.

**२) रोख पैशाची गरज** : दैनंदिन जीवन जगत असताना उपभोक्त्याला रोख पैशाची गरज नेहमीच भासत असते. अशा वेळी ग्रामीण भागात राहणारे शेतकरी वर्ग हंगामामध्ये वस्तूची किंमत कमी असताना देखील रोख रकमेच्या गरजेपोटी उत्पादित केलेले उत्पन्न बाजारपेठेत विक्रीला आणतो. त्यामुळे वस्तूचा पुरवठा वाढतो.

**टिका/अपवाद**

**१) इतर परिस्थिती कायम असते हे ग्रहित चुकीचे**
**२) रोख पैशाची गरज**
**३) भविष्यकालीन अपेक्षा**
**४) नाशवंत वस्त**
**५) रोख रकमेची तीव्र गरज**
**६) दुर्मिळ वस्तू**

**३) भविष्यकालीन अपेक्षा** : वस्तूची किंमत भविष्यात आणखी कमी होईल की काय या भीतीने किंमत कमी असूनही बऱ्याच वेळा बाजारपेठेत वस्तूच्या पुरवठ्यात वाढ होते.

**४) नाशवंत वस्तू** : नाशवंत वस्तूच्या बाबतीत नुकसान टाळण्यासाठी विक्रेते कमी किमतीला जास्त पुरवठा करु शकतात. उदा. भाजीपाला, अंडी इत्यादी.

**५) रोख रकमेची तीव्र गरज** : जर विक्रेत्याला रोखतेची तीव्र गरज असेल तर विक्रेता आपला माल बाजार किमतीपेक्षाही कमी किमतीला विकेल किंवा पुरवठा वाढवेल. किंमती वाढत नसतानाही विक्री करेल व त्यामुळे पुरवठ्यात वाढ होईल.

**६) दुर्मिळ वस्तू** : ज्या वस्तू सहजासहजी उपलब्ध होऊ शकत नाहीत अशा वस्तूंच्या बाबतीत सुद्धा पुरवठा नियम सिद्ध होत नाही. उदा. दुर्मिळ चित्रे, नाणी, मौल्यवान वस्तू इत्यादी. या वस्तूची निर्मिती पुन्हा करता येत नाही. म्हणून अशा वस्तूंच्या किमती वाढल्या तरी पुरवठा वाढविता येत नाही.

**पुरवठा निर्धारक घटक** (Supply Determining Factor)

विशिष्ट वेळेला विशिष्ट किमतीला विक्रेता वस्तूचे जेवढे नग विकण्यासाठी तयार असतो ती नगसंख्या म्हणजेच वस्तूचा पुरवठा होय. वस्तूच्या पुरवठ्यावर पुढील घटकांचा परिणाम होतो.

**१) वस्तूची किंमत** : किंमत हा वस्तूच्या पुरवठ्यावर परिणाम करणारा महत्त्वाचा घटक आहे. कारण वस्तूची किंमत वाढली की नफा व पुरवठा वाढतो. याउलट वस्तूची किंमत कमी झाली की नफा कमी होतो व पुरवठा पण कमी होतो. अशाप्रकारे किंमत व पुरवठा यांचा सम संबंध आहे.

**२) तांत्रिक स्थिती** : आधुनिक तंत्राच्या सहाय्याने उत्पादन केले जात असेल तर

**पुरवठा निर्धारक घटक**

**१) वस्तूची किंमत**
**२) तांत्रिक स्थिती**
**३) उत्पादन घटकाच्या किमती**
**४) सरकारचे धोरण**

कमीत कमी खर्चात व कमीत कमी वेळात उत्पादन करणे शक्य होऊन पुरवठ्यात वाढ होते. उदा. जेव्हा हातमागाऐवजी यंत्राच्या साह्याने कापड उत्पादन केले जाते. तेव्हा कमी वेळात अधिक कापड उत्पादन होऊन कापडाचा अधिक पुरवठा करणे शक्य होते.

**५) नैसर्गिक परिस्थिती**
**६) भविष्यकालीन किमतीचा अंदाज**
**७) पायाभूत सुविधा**

**३) उत्पादन घटकाच्या किमती** : वस्तूच्या किंमती प्रमाणे उत्पादन घटकांच्या किमती देखील वस्तूच्या पुरवठा निर्धारित करतात. उत्पादन घटकाच्या किमती वाढल्यामुळे उत्पादकांचा खर्च वाढतो. परिणामी वस्तूच्या पुरवठा कमी होतो. याउलट उत्पादक घटकांची किंमती कमी होतात. तेव्हा नफा वाढतो त्यामुळे वस्तूच्या पुरवठ्यात वाढ होते.

**४) सरकारचे धोरण** : वस्तूच्या पुरवठ्यावर सरकारच्या धोरणाचाही परिणाम होतो. सरकारने एखाद्या वस्तूला अनुदान जाहीर केले तर त्या वस्तूचा पुरवठा वाढेल. याउलट एखाद्या वस्तूच्या उत्पादनावर कर बसवल्यास त्या वस्तूचा पुरवठा कमी होईल. त्यामुळे सरकारच्या धोरणावर पुरवठा अवलंबून आहे.

**५) नैसर्गिक परिस्थिती** : कृषी उत्पादनांचा पुरवठा नैसर्गिक परिस्थितीवर अवलंबून असतो. उदा. चांगला पाऊस आणि योग्य हवामान असल्यास चांगले उत्पादन होते. त्यामुळे कृषी उत्पादन वाढून पुरवठा वाढतो. याउलट प्रतिकूल हवामानामुळे पुरवठा कमी होतो.

**६) भविष्यकालीन किमतीचा अंदाज** : आपल्या वस्तूला भविष्यात अधिक किंमत मिळेल असे उत्पादकाला वाटत असेल तर वस्तूचा साठा करुन ठेवला जाईल व परिणामी पुरवठा कमी होईल. याउलट भविष्यात किंमत घसरण्याची अपेक्षा असेल तर अधिक पुरवठा केला जाईल.

**७) पायाभूत सुविधा** : वीज, वाहतूक, दळणवळण इत्यादी पायाभूत सुविधांचा परिणाम उत्पादन प्रक्रिया व पुरवठ्यावर होतो. या सुविधांच्या अभावामुळे पुरवठा कमी होतो आणि सुविधांची अधिक उपलब्ध असल्यास पुरवठा जास्त केला जातो.

**२.३ मागणीची लवचिकता** (Elasticity of Demand)

वस्तूंच्या किमतीत होणाऱ्या बदलामुळे वस्तूच्या मागणीत बदल होत असतो. हे मागणीच्या नियमावरुन स्पष्ट होते. म्हणजेच गुणात्मक बदल लक्षात येतो. परंतु किमतीत किती टक्के बदल झाला असता त्याचा परिणाम मागणीत किती टक्के बदल होतो हे दर्शविण्यासाठी डॉ. मार्शल यांनी मागणीची लवचिकता ही संकल्पना वापरली आहे. हे मात्रात्मक मोजमाप मागणीच्या लवचिकतेवरुन कळते. लवचिक (Elastic) या शब्दाचा अर्थ परिस्थितीनुरुप असा घेतला जातो. उदा. रबर. रबराला लवचिक मानतो. कारण त्याला ओढल्यास विस्तार पावतो आणि ताण सोडल्यास पूर्वस्थितीत म्हणजे संकोच पावतो. रबराचा आकार पाहिजे तसा करता येतो. परंतु काही वस्तू अशा असतात की, त्यांच्यात परिस्थितीनुसार बदल होत नाही. जसे– दगड हा टणक आहे. तो आकुंचन व प्रसरण पावत नाही. टणक वस्तूला ताठर असेही म्हणतात. वरील दोन वस्तूंच्या दरम्यान काही वस्तू अशा असतात की, त्यांच्यात थोडे फार बदल होतात. जसे– लोखंडाची सळई जितकी बारीक आकाराची असेल तितकी ती लवचिक असते आणि जितकी जास्त जाड असेल तितकी लवचिकता कमी असते. एका चलातील बदलाचा दुसऱ्या चलावर होणारा परिणाम लवचिकतेची संकल्पना स्पष्ट करते. मागणीची लवचिकता ही संकल्पना किंमत आणि इतर घटकातील बदलांचा मागणीतील बदलावर होणारा परिणाम दर्शविते.

**व्याख्या**

**१) डॉ. मार्शल** : ''मागणीतील प्रमाणशीर बदल आणि किंमतीतील प्रमाणशीर बदल यांचे गुणोत्तर म्हणजे मागणीची लवचिकता होय.''

**२) प्रो. रुद्र** : ''वस्तूच्या किमतीमधील न्यूनतम परिवर्तनामुळे मागणीमध्ये परिवर्तन होण्याच्या क्षमतेला मागणीची लवचिकता असे म्हणतात.''

३) ''वस्तूच्या किंमतीत होणाऱ्या शेकडा बदलामुळे वस्तूच्या मागणीत होणाऱ्या शेकडा बदलाचे प्रमाण म्हणजेच मागणीची लवचिकता होय.''

वरील व्याख्येवरुन वस्तूच्या मागणीवर विविध घटकांचा परिणाम होतो. त्यापैकी वस्तूची किंमत, उपभोक्त्याचे उत्पन्न आणि पर्यायी वस्तूच्या किमती हे तीन घटक महत्त्वाचे मानले असता त्यावरुन मागणीच्या लवचिकतेचे प्रामुख्याने चार प्रकार पडतात ते पुढीलप्रमाणे.

**मागणीच्या लवचिकतेचे प्रकार** (Types of Elasticity of Demand)

| मागणीच्या लवचिकतेचे प्रकार |
|---|
| **१) मागणीची किंमत लवचिकता** |
| **२) मागणीची उत्पन्न लवचिकता** |
| **३) मागणीची छेदक लवचिकता** |
| **४) मागणीची प्रतिस्थापन लवचिकता** |

**१) मागणीची किंमत लवचिकता** (Price Elasticity of Demand)

वस्तूच्या मागणीवर परिणाम करणाऱ्या घटकांमध्ये किंमत हा सर्वात महत्त्वाचा परिणाम करणारा घटक आहे. किंमतीत होणाऱ्या बदलामुळे वस्तूच्या मागणीत होणारा बदल शोधून काढण्यासाठी डॉ. मार्शल यांनी मागणीची किंमत लवचिकता या संकल्पनेचा वापर केला आहे.

**१) डॉ. मार्शल** : ''वस्तूंच्या किमतीत होणाऱ्या शेकडा बदलामुळे वस्तूच्या मागणीत होणाऱ्या शेकडा बदलाचे प्रमाण म्हणजेच मागणीची किंमत लवचिकता होय.''

**२) प्रो. मेयर्स** : ''मागणीची लवचिकता ही उपभोक्त्याद्वारे खरेदी केल्या जाणाऱ्या वस्तूच्या किमतीत होणाऱ्या बदलामुळे दिलेल्या मागणी वक्रावर खरेदी मात्रेत होणारा संबंधित बदल मोजण्याचे एक माप आहे.''

$$\textbf{मागणीची किंमत लवचिकता} = \frac{\textbf{मागणीतील शेकडा बदल}}{\textbf{किंमतीतील शेकडा बदल}}$$

OR

$$e_p = \frac{\Delta q}{q} \div \frac{\Delta p}{p}$$

या वरील व्याख्या व सूत्रावरुन असे स्पष्ट होते की, वस्तूच्या किंमतीत होणाऱ्या शेकडा बदलामुळे वस्तूच्या मागणीवर काय परिणाम होतो. त्यावरुन त्यावरुन मागणीतील शेकडा बदल विचारात घेऊन मागणीची किंमत लवचिकता शोधता येते.

**मागणीच्या किंमत लवचिकतेचे प्रकार** (Types of Demand Price Elasticity)

| मागणीच्या किंमत लवचिकतेचे प्रकार |
|---|
| i) **संपूर्ण लवचिक मागणी** |
| ii) **पुर्णपणे अलवचिक मागणी** |
| iii) **एका पेक्षा जास्त लवचिकता** |
| iv) **एका पेक्षा कमी लवचिकता** |
| v) **एकक लवचिक मागणी** |

i) **संपूर्ण/पुर्णपणे लवचिक मागणी** (Perfectly Elastic Demand) : वस्तूंच्या किमतीत अल्पसा/अतिसूक्ष्म किंवा किंमत स्थिर राहूनही मागणी जेव्हा अनंत (अगणित) पटीने बदलते तेव्हा त्याला अनंत लवचिक मागणी असे म्हणतात. उदा. वस्तूची किंमत स्थिर असताना मागणीत शेकडा २५ मे वाढ झाली असता मागणीची लवचिकता अनंत असते.

$$\textbf{मागणीची किंमत लवचिकता} = \frac{\textbf{मागणीतील शेकडा बदल}}{\textbf{किमतीतील शेकडा बदल}} = \frac{२५}{०} = \infty$$




बाजूच्या आकृतीत 'अक्ष' अक्षावर वस्तूची मागणी 'अय' अक्षावर वस्तूची किंमत दर्शविली आहे. वस्तूच्या किमतीत थोडासा बदल झाला असता. वस्तूच्या मागणीत अनंत बदल होतो. म्हणून मागणीची लवचिकता अनंत लवचिक असते. अनंत लवचिक मागणी वक्र (मम) 'अक्ष' अक्षाला समांतर असतो.

ii) **पुर्णपणे अलवचिक मागणी** (Perfectly Inelastic Demand) : वस्तूच्या किमतीत कितीही वा मोठ्या प्रमाणात बदल होऊनही याचा अर्थ किंमत कमी झाली किंवा वाढली तरीही मागणीत काहीच बदल होत नाही. तेव्हा त्यास अनंत अलवचिक मागणी म्हणतात. उदा. वस्तूच्या किमतीत शेकडा ५ ने घट होऊनही मागणीत कोणतेही बदल झाले नाहीत. अशावेळी मागणीची लवचिकता सूत्रानुसार ० राहील.




बाजूच्या आकृतीत 'अक्ष' अक्षावर वस्तूची मागणी व 'अय' अक्षावर वस्तूची किंमत दर्शविली आहे. 'अक' किंमतीला 'अम' वस्तूची मागणी असते वस्तूची किंमत क पासून क१ कमी झाली असता किंवा क पासून क२ पर्यत वाढली असता वस्तूची मागणीत काहीच बदल झालेला नाही. मागणीची लवचिकता ० असेल तर मागणी वक्र अय अक्षाला समांतर असतो. उदा. मीठ, आगपेटी इत्यादी बाबतीत हा प्रकार अनुभवास येतो.

iii) **एका पेक्षा जास्त लवचिकता** (Elasticity More than Unit) : किमतीत होणाऱ्या बदलाच्या मानाने मागणीत होणारा बदल जास्त असेल तर मागणीची लवचिकता एकापेक्षा जास्त असते तेव्हा त्यास लवचिक मागणी असे म्हणतात. मागणीची लवचिकता (>1) एका पेक्षा जास्त असते. उदा. वस्तूच्या किमतीत शेकडा ५ ने घट झाल्यावर मागणीत शेकडा १० ने वाढ झाली. अशावेळी मागणीची लवचिकता सूत्रानुसार २ राहील.




बाजूच्या आकृतीत 'अक्ष' अक्षावर वस्तूची मागणी व 'अय' अक्षावर वस्तूची किंमत दर्शविली आहे. 'अक' किमतीला 'अम' वस्तूची मागणी होती. वस्तूची किंमत थोडीशी वाढली क पासून क१ पर्यत वाढ झाली तेव्हा मात्र वस्तूची मागणी म पासून म१ पर्यत मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे. तसेच वस्तूची किंमत क पासून क२ पर्यत कमी झाली असता वस्तूची मागणी म पासून म२ पर्यत मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

लवचिक मागणी वक्र डावीकडून उजवीकडे वरच्या बाजूने खाली आलेला आहे. या स्थितीत मागणीची लवचिकता (>1) एकापेक्षा जास्त आहे. उदा. टिकाऊ वस्तू बाबत, सुखद वस्तू बाबत मागणीची लवचिकता ही लवचिक असते.

iv) **एका पेक्षा कमी लवचिकता** (Elasticity Less than Unit) : किमतीत होणाऱ्या बदलाच्या मानाने मागणीत होणारा बदल कमी असेल तर मागणीची लवचिकता एकापेक्षा कमी असते तेव्हा त्यास अलवचिक मागणी असे म्हणतात. मागणीची लवचिकता (< 1) एका पेक्षा कमी असते. उदा. वस्तूच्या किमतीत शेकडा ५ ने घट झाल्यावर मागणीत शेकडा ३ ने वाढ झाली. अशावेळी मागणीची लवचिकता सूत्रानुसार ०.६ राहील.




बाजूच्या आकृतीत 'अक्ष' अक्षावर वस्तूची मागणी व 'अय' अक्षावर वस्तूची किंमत दर्शविली आहे. वस्तूची किंमत 'अक' असतांना वस्तूची मागणी 'अम' एवढी होते वस्तूची किंमत क पासून क१ पर्यत कमी झाली असता वस्तूची मागणी म पासून म१ पर्यत वाढते तसेच वस्तूची किंमत क पासून क२ पर्यत वाढली असता म्हणजेच मोठ्या प्रमाणात बदल झाला असता, वस्तूची मागणी म पासून म२ पर्यत अल्पशा प्रमाणात बदल होते. तेव्हा मागणीची लवचिकता अलवचिक एकापेक्षा कमी असते. उदा. जीवनावश्यक वस्तू, औषधे, नाशवंत वस्तू, सवयीच्या वस्तू इत्यादी बाबत मागणीची लवचिकता अलवचिक असते.

v) **एकक लवचिक मागणी** (Unit Elasticity) : वस्तूच्या किंमतीत होणारा बदल आणि वस्तूच्या मागणी होणारा बदल समान असतो. तेव्हा मागणीची लवचिकता एकक लवचिक मागणी असते. उदा. वस्तूच्या किमतीत शेकडा ५ ने वाढ किंवा घट झाल्यावर मागणीत शेकडा ५ ने घट किंवा वाढ झाली. अशावेळी मागणीची लवचिकता सूत्रानुसार १ राहील.




बाजूच्या आकृतीत 'अक्ष' अक्षावर वस्तूची मागणी व 'अय' अक्षावर वस्तूची किंमत दर्शविली आहे. 'अक' किमतीला 'अम' वस्तूची मागणी होती. वस्तूच्या किंमती क पासून क१ पर्यंत वाढली असता. वस्तूची मागणी म पासून म१ पर्यंत कमी होते. तसेच वस्तूची किंमत क पासून क२ पर्यंत कमी झाली असता. वस्तूची मागणी म पासून म२ पर्यंत वाढते. या स्थितीत किमतीतील बदल सारखा आहे. म्हणजेच मागणीची लवचिकता एकक स्वरुपाची आहे.

सर्वच वस्तूच्या बाबतीत मागणीत होणारा बदल सारखाच नसतो. म्हणून मागणीच्या किंमत लवचिकतेचे विविध प्रकार अनुभवास येतात ते पुढील प्रमाणे–

| किंमत लवचिकतेचे प्रकार | बदल | मागणी वक्र |
|---|---|---|
| i) **पुर्णपणे लवचिक मागणी** | **मागणीची लवचिकता = ∞ (अंनत)** | **क्षैतिज** (Horizontal) |
| ii) **पुर्णपणे अलवचिक मागणी** | **मागणीची लवचिकता =** 0 | **उदग्र** (Vertical) |
| iii) **एका पेक्षा जास्त लवचिकता** | **मागणीची लवचिकता** > 1 | **अर्धक्षतिज** (Backword) |
| iv) **एका पेक्षा कमी लवचिकता** | **मागणीची लवचिकता** < 1 | **अर्धउदग्र** (Semi-excerpt) |
| iv) **एकक मागणी** | **मागणीची लवचिकता** = 1 | **ऋणात्मक** (Negative) |

**२) मागणीची उत्पन्न लवचिकता** (Income Elasticity of Demand)

वस्तूच्या मागणीवर परिणाम करणाऱ्या घटकांपैकी उत्पन्न हा घटक महत्त्वाचा आहे. सर्वसाधारणपणे असे म्हटले जाते की उत्पन्नात वाढ झाली तर खरेदीशक्ती आणि वस्तूची मागणी वाढते. याउलट किंमत कमी झाली की खरेदीशक्ती व वस्तूची मागणी ही कमी होते. परंतु उत्पन्नात किती टक्के बदल झाला असता मागणीत किती टक्के बदल होतो. हे शोधण्यासाठी मागणीची उत्पन्ना लवचिकता या संकल्पनेचा वापर केला जातो. उपभोक्त्याच्या उत्पन्नात झालेल्या बदलामुळे मागणीत बदल होण्याच्या गुणधर्मास मागणीची उत्पन्नजन्य लवचिकता असे म्हणतात. ''उत्पन्नात होणारे शेकडा बदलामुळे मागणी होणाऱ्या शेकडा बदलाचे प्रमाण म्हणजेच मागणीची उत्पन्न लवचिकता होय.''

**सूत्र**

$$\textbf{मागणीची उत्पन्न लवचिकता} = \frac{\textbf{मागणीत होणारा शेकडा बदल}}{\textbf{उत्पन्नात होणारा शेकडा बदल}}$$

उदा. समजा अनिलचे मासिक उत्पन्न ३,००० रु. असतांना तो ५ किलो तेलाची मागणी करतो त्याच्या उत्पन्नात वाढ होऊन ते ६,००० रु. झाल्याबरोबर तो १० किलो तेलाची मागणी करीत असल्यास त्याची उत्पन्नजन्य लवचिकता एकक राहील ते खालीलप्रमाणे.

$$ei = \frac{\dfrac{5 - 10}{5 + 10}}{\dfrac{3000 - 6000}{3000 + 6000}}$$

~~-5~~ 1

$$ei = \frac{\frac{\text{------}}{\cancel{15}\ 3}}{\frac{-\cancel{3000}\ 1}{\cancel{9000}\ 3}}$$

$$ei = \frac{\frac{-1}{3}}{\frac{-1}{3}}$$

$$ei = \frac{-1}{3} \times \frac{3}{-1}$$

$$ei = \frac{3}{3}$$

$$ei = 1$$

उत्पन्नजन्य लवचिकता सामान्यपणे श्रेष्ठ वस्तूच्या मागणीसाठी धनात्मक असते तर हलक्या/कनिष्ठ वस्तूच्या बाबतीत उत्पन्नजन्य लवचिकता ऋणात्मक असते.

**३) मागणीची छेदक/तिरकस लवचिकता** (Cross Elasticity of Demand)

मागणीची किंमत व उत्पन्न लवचिकते प्रमाणेच छेदक लवचिकतेला सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्रात अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. कारण वस्तूची मागणी फक्त किमतीवर किंवा उत्पन्नावर अवलंबून असते असे नाही. तर ती पर्यायी वस्तू किंवा परस्पर पूरक वस्तूवरही अवलंबून असते. थोडक्यात, परस्पर पूरक किंवा पर्यायी वस्तूंच्या बाबतीत एका वस्तूच्या किमतीतील बदलाचा दुसऱ्या वस्तूच्या मागणीवर किती परिणाम होतो. तो परिणाम छेदक लवचिकतेच्या आधारे मोजला जातो.

**व्याख्या**

''एका वस्तूच्या किमतीत बदल झाल्यास त्याच्या दुसऱ्या वस्तूच्या मागणीवर किती परिणाम होतो त्यालाच छेदक लवचिकता असे म्हणतात.''

एका वस्तूचा इतर वस्तूशी पूरक किंवा पर्यायी असा संबंध असतो. त्यामुळे एका वस्तूची किंमत स्थिर असून देखील इतर वस्तूच्या किमतीत बदल झाल्यामुळे त्या वस्तूच्या मागणीच्या परिमाणात बदल होण्याच्या प्रमाणाला किंवा गतीला तिरकस लवचिकता असे म्हणतात. उदा. चहा व कॉफी, गूळ व साखर. 'क्ष' वस्तूच्या किमतीत बदल झाला असता (वाढ/घट) 'य' वस्तूच्या मागणीत ज्या प्रमाणात बदल होतो त्याला मागणीची छेदक लवचिकता असे म्हणतात.

**सूत्र**

**मागणीची तिरकस लवचिकता = 'य' वस्तूच्या मागणीत बदल / 'क्ष' वस्तूच्या किमतीत बदल**

$$ec = \frac{\frac{\Delta Qy}{Qy}}{\frac{\Delta Px}{Px}}$$

Qy = य वस्तूच्या मागणीतील शेकडा बदल
Qy = य वस्तूची मूळ मागणी
Px = क्ष वस्तूच्या किमतीतील शेकडा बदल
Px = य वस्तूची मूळ मागणी

उदा. समजा एखाद्या स्थितीत गुळाची किंमत ३ रु. किलो आहे आणि साखरेची किंमत ५ रु. किलो आहे व गुळाची मागणी ५०० क्विंटल आहे. समजा साखरेची किंमत ७ रु. प्रती किलो झाली व गुळाची किंमत कायम असतांना गुळाची मागणी ९०० क्विंटल झाल्यास पुढील सूत्राने साखरेसाठी असलेली तिरकस लवचिकता काढता येते.

$$ec = \frac{\frac{\Delta Qy}{Qy}}{\frac{\Delta Px}{Px}}$$

$$ec = \frac{500-900}{500} \div \frac{5-7}{5}$$

$$ec = \frac{\cancel{-400}\ -4}{\cancel{500}\ 5} \div \frac{-2}{5}$$

$$ec = \frac{-4}{5} \div \frac{-2}{5}$$

$$ec = \frac{\cancel{-4}\ 2}{\cancel{5}\ 1} \times \frac{\cancel{5}\ 1}{\cancel{-2}\ 1}$$

$$ec = \frac{2}{1}$$

$$ec = 2$$

गुळाच्या किंमतीत बदल न होता सुद्धा गुळाच्या मागणीत बदल घडून येतो. हा बदल साखरेच्या किमतीतील बदलामुळे घडून येतो. पर्यायी वस्तूच्या (गूळ आणि साखर) बाबतीत मागणीची तिरकस लवचिकता सकारात्मक किंवा धनात्मक असते. तर पूरक वस्तूच्या बाबतीत (पेन आणि शाही, पाव व लोणी) बाबतीत मागणीची तिरकस लवचिकता नकारात्मक किंवा ऋणात्मक असते.

**४) मागणीची प्रतिस्थापन/पर्यायता लवचिकता** (Substitution Elasticity of Demand)

एका वस्तूच्या किंमतीत बदल झाल्यामुळे त्या वस्तूच्या पर्यायी वस्तूच्या मागणीत देखील बदल घडून येत असतो. कारण वस्तूची किंमत जास्त झाल्यामुळे त्या वस्तूची पर्यायी वस्तू वापरली जाते यालाच 'प्रतिस्थापन' म्हणतात. म्हणून एखाद्या वस्तूच्या किमतीत बदल झाल्यामुळे प्रतिस्थापनेद्वारे त्या वस्तूच्या मागणीतील बदलाच्या प्रमाणाला प्रतिस्थापन किंवा पर्यायता लवचिकता असे म्हणतात.

$$\textbf{मागणीची प्रतिस्थापन लवचिकता} \text{ (es)} = \frac{\textbf{दोन वस्तूंच्या गुणोत्तरातील शेकडा बदल}}{\textbf{दोन वस्तूंच्या सीमांत प्रतिस्थापन दरातील शेकडा बदल}}$$

क्ष आणि य वस्तूच्या उदाहरणाद्वारे सूत्राची सविस्तर मांडणी.

$$\frac{\textbf{'क्ष' वस्तूचे मूळ मागणी परिमाण}}{\textbf{'य' वस्तूचे मूळ मागणी परिमाण}} - \frac{\textbf{'क्ष' वस्तूचे नवीन मागणी परिमाण}}{\textbf{'य' वस्तूचे नवीन मागणी परिमाण}} \div \frac{\textbf{'क्ष' वस्तूचे मूळ मागणी परिमाण}}{\textbf{'य' वस्तूचे मूळ मागणी परिमाण}}$$

$$\text{प्रतिस्थापन लवचिकता (es)} = \frac{\text{क्ष वस्तूचा य वस्तूशी मूळ सीमांत प्रतिस्थापन दर} - \text{क्ष वस्तूचा य वस्तूशी असलेला नवीन सीमांत प्रतिस्थापन दर}}{\text{क्ष वस्तूचा य वस्तूशी असलेला मूळ सीमांत प्रतिस्थापन दर}}$$

**प्रतिस्थापन लवचिकतेचे गणिती उहाहरणाद्वारे स्पष्टीकरण**

समजा क्ष आणि य वस्तूचे निरनिराळे दोन संयोग व त्याच्या ठिकाणी एका विशिष्ट तटस्थता वक्रावरील सीमांत प्रतिस्थापन दर पुढील तक्त्याद्वारे आहेत.

| संयोग क्र. | क्ष वस्तूचे परिमाण | य वस्तूचे परिमाण | सीमांत प्रतिस्थापन दर |
|---|---|---|---|
| १ | २ नग | ३ नग | ५:४ (५/४) |
| २ | ३ नग | २ नग | ४:५ (४/५) |

$$es = \frac{\left(\frac{\text{‘क्ष’ वस्तूचे मूळ मागणी परिमाण}}{\text{‘य’ वस्तूचे मूळ मागणी परिमाण}} - \frac{\text{‘क्ष’ वस्तूचे नवीन मागणी परिमाण}}{\text{‘य’ वस्तूचे नवीन मागणी परिमाण}}\right) \div \frac{\text{‘क्ष’ वस्तूचे मूळ मागणी परिमाण}}{\text{‘य’ वस्तूचे मूळ मागणी परिमाण}}}{\frac{\text{क्ष वस्तूचा य वस्तूशी मूळ सीमांत प्रतिस्थापन दर} - \text{क्ष वस्तूचा य वस्तूशी असलेला नवीन सीमांत प्रतिस्थापन दर}}{\text{क्ष वस्तूचा य वस्तूशी असलेला मूळ सीमांत प्रतिस्थापन दर}}}$$

$$es = \frac{\frac{2}{3} - \frac{3}{2} \div \frac{2}{3}}{\frac{5}{4} - \frac{4}{5} \div \frac{5}{4}}$$

$$es = \frac{\frac{4-9}{6} \div \frac{2}{3}}{\frac{25-16}{20} \div \frac{5}{4}}$$

$$es = \frac{\frac{-5}{\cancel{6}\,2} \times \frac{\cancel{3}\,1}{2}}{\frac{9}{\cancel{20}\,5} \times \frac{\cancel{4}\,1}{5}}$$

$$es = \frac{\frac{-5}{4}}{\frac{9}{25}}$$

$$es = \frac{-1.25}{0.36}$$

$$es = -3.47$$

प्रतिस्थापन लवचिकता ही नेहमी ऋणात्मक असते.

**मागणीची लवचीकता ठरविणारे घटक/निर्धारक घटक/परिणाम करणारे घटक/कोणत्या घटकांवर अवलंबून असते?**

मागणीची लवचिकता परिस्थितीनुसार बदलते. निरनिराळ्या वस्तूच्या मागणीची लवचिकता भिन्न-भिन्न असते. एवढेच नव्हे तर वस्तूबाबतची निरनिराळ्या व्यक्तीची मागणीची लवचिकता भिन्न आढळून येते. तेव्हा लवचिकतेचे निर्धारक घटक कोणते असा प्रश्न पडतो. वस्तूचा प्रकार, त्याची उपयोगीता, सवय, आवडी-निवडी, उत्पन्न, पर्यायी, पुरक वस्तू इत्यादी घटकावर लवचिकता अवलंबून असते.

| मागणीच्या लवचीकतेचे निर्धारक घटक |
|---|
| १) जीवनावश्यक व गरजेच्या वस्तू |
| २) चैनीच्या व सुखद वस्तू |
| ३) पर्यायी वस्तू |
| ४) पुरक वस्तू |
| ५) सवयीच्या वस्तू |
| ६) टिकावू वस्तू |
| ७) विविध उपयोगी वस्तू |
| ८) किंमत पातळी |
| ९) उपभोक्त्यांचे उत्पन्न |
| १०) एकूण खर्चाचे प्रमाण |

**१) जीवनावश्यक व गरजेच्या वस्तू** : जीवनावश्यक वस्तूची मागणी अलवचीक किवा कमी लवचिक असते. उदा. गहू, तांदूळ, औषध, तेल व मीठ इ. मिठाच्या किंमतीत परिवर्तन झाले तरी मिठाची मागणी कायमच असते. ज्या वस्तू कमी आवश्यक त्या वस्तूची मागणी कमी लवचिक असते.

**२) चैनीच्या व सुखद वस्तू** : दागदागिने, अलंकार, उच्च प्रतीचे कापड इ. चैनीच्या गरजा होत. अशा वस्तूची मागणी जास्त लवचीक असते. किंमतीत अल्प स्वरुपात बदल झाल्यास मागणी मोठ्या प्रमाणावर बदलते. उदा. दही, दूध, फळे, मांस, अंडी इ. सुखद वस्तू होत. अशा वस्तूची मागणी आवश्यक गरजांपेक्षा जास्त लवचिक परंतु चैनीच्या गरजांपेक्षा कमी लवचिक असते.

**३) पर्यायी वस्तू** : पर्यायी वस्तूची मागणी लवचिक असते. उदा. सिनेमा-नाटक, चहा- कॉफी, गूळ-साखर या पर्यायी वस्तू होत. पर्यायी वस्तूचे स्वरुप, उपलब्धता, पर्यायी वस्तूचा प्रकार इत्यादी बाबींवर लवचिकता अवलंबून असते. एक वस्तू दुसऱ्या वस्तूऐवजी कितीही प्रमाणात वापरता येत असेल आणि ती पूर्णपणे पर्यायी असेल तर लवचिकता जास्त असते.

**४) पुरक वस्तू** : पुरक वस्तूची मागणी अलवचिक असते. मोटारसाठी पेट्रोल ही पुरक वस्तू होय. पेट्रोलची किंमत कमी झाल्याने पेट्रोलची मागणी फारशी वाढणार नाही, कारण मोटार ही प्रधान वस्तू तर पेट्रोल ही पुरक वस्तू होय. कारण मोटार अभावी पेट्रोलचा वापर होत नाही. मोटारची मागणी वाढल्याशिवाय पेट्रोलची मागणी फारशी वाढणार नाही. म्हणून पूरक वस्तूची मागणी अलवचीक किवा कमी लवचीक असते.

**५) सवयीच्या वस्तू** : चहा, कॉफी, दारु अफू, गांजा, चरस, सिगारेट, पान, तंबाखू अशा सवयीच्या वस्तू बाबतची मागणी अवलंबून असते. अशा वस्तूच्या किंमतीत बदल होऊन देखील मागणीवर फारसा परिणाम होत नाही अशा वस्तूची मागणी ताटर असते.

**६) टिकावू वस्तू** : टिकावू वस्तूची मागणी साधारणतः लवचिक असते. उदा. T.V. सेटची मागणी दीर्घकाळात लवचिक व अल्पावधीत अलवचिक असते. टिकावू वस्तूच्या बाबतीत दीर्घकाळ व अल्पकाळ यांना महत्व आहे.

**७) विविध उपयोगी वस्तू** : ज्या वस्तूला अनेक उपयोग आहेत अशा वस्तूची मागणी लवचीक असते. उदा. वीज, कोळसा, लोखंड अशा वस्तूंच्या किंमती अल्पस्वरुपात कमी झाल्यास त्याची मागणी मोठ्या प्रमाणात वाढते.

**८) किंमत पातळी** : किंमत पातळीचा परिणाम मागणीच्या लवचिकतेवर होत असतो. वस्तूची किंमत पातळी अतिउच्च किंवा तळाची असेल तर मागणीची लवचिकता कमी असते.

**९) उपभोक्त्यांचे उत्पन्न** : उपभोक्त्यांच्या उत्पन्न पातळीचा परिणाम लवचिकतेवर होत असतो. उपभोक्ता सीमांत असेल तर किंमत वाढीचा परिणाम त्याच्या मागणीवर फारसा होणार नाही; परंतु गरीब मनुष्य लगेच आपली मागणी कमी करेल अशा वेळी श्रीमंताची मागणी अलवचिक व गरिबाची मागणी लवचिक असते.

**१०) एकूण खर्चाचे प्रमाण** : विशिष्ट वस्तूवर उत्पन्नाचा कोणता हिस्सा खर्च होतो यावर मागणीची लवचिकता अवलंबून असते. उत्पन्नाचा मोठा हिस्सा वस्तूवर खर्च होत असेल तर लवचिकता अधिक, याउलट उत्पन्नाचा लहानसा हिस्सा वस्तूवर खर्च होत असेल तर लवचिकता कमी असते. उत्पन्नाचा मोठा हिस्सा कापडावर खर्च होत असेल तर लहान हिस्सा मासिके, वर्तमानपत्रे यावर खर्च होतो. कापडाची मागणी लवचिक तर मासिके, वर्तमानपत्रे यांची मागणी अलवचिक असते.

**मागणीच्या लवचिकतेचे सैद्धांतिक आणि व्यावहारीक महत्व किवा मागणीच्या लवचिकतेची उपयोगीता / उपयुक्तता**

मागणीची लवचिकता या संकल्पनेला सैद्धांतिक व व्यावहारीक महत्व आहे. समाजातील निरनिराळ्या घटकांना लवचिकतेचा वापर करुन आपले धोरण ठरवावे लागते. उपभोग, उत्पादन, विनिमय, करारोपण, आंतरराष्ट्रीय, व्यापार इत्यादी क्षेत्रांमध्ये मागणीच्या लवचिकतेचा अभ्यास होतो. मुक्त अर्थव्यवस्थेत उपभोक्ता सार्वभौम असतो अशा परिस्थितीत उत्पादनाची दिशा, रचना व आकार, उपभोग यांचा मागणीवर व मागणीच्या लवचिकतेवर अवलंबून असतो. लवचिकता संकल्पनेचे महत्व खालीलप्रमाणे.

**मागणीच्या लवचीकतेचे महत्व**

**१) मक्तेदारास उपयुक्त**
**२) अर्थमंत्र्यास उपयुक्त**
**३) उत्पादक साधनांचा मोबदला ठरविताना**
**४) सामाजिक सेवा**
**५) आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी**
**६) विनिमय दर ठरविताना**
**७) विपुलतेत दारिद्र्य**
**८) सरकारी धोरण ठरविताना**
**९) पेढी व धंद्यासाठी उपयुक्त**
**१०) श्रमिक संघाच्या दृष्टीने उपयुक्त**

**१) मक्तेदारास उपयुक्त** : उत्पादकाला मागणीच्या लवचिकतेचा विचार अवश्य करावा लागतो वस्तूची मागणी अति लवचीक असल्यास त्या वस्तूची किंमत कमी ठेवूनच विक्रीत वाढ घडवून आणणे शक्य असते. नाहीतर वस्तूची किंमत जास्त झाल्यास त्या वस्तूसाठी असलेले मागणीचे परिमाण कमी होऊन एकाधिकाऱ्याच्या नफ्याचे प्रमाण कमी होऊ शकते. महत्तम नफा कमाविणे हे मक्तेदारीचे उद्दिष्ट असते. त्यामुळे विविध बाजारपेठेत त्या वस्तूसाठी असणारी मागणीची लवचिकता लक्षात घेऊनच एकाधिकारी किंमत भेदनाचे धोरण निश्चित करीत असतो.

**२) अर्थमंत्र्यास उपयुक्त/कर निर्धारणासाठी उपयुक्त** : सरकार निरनिराळ्या वस्तूतर कर आकारते त्यामुळे किंमती वाढतात आणि मागणी कमी होते असा अनुभव येतो. करारोपण करीत असतांना मागणीच्या लवचिकतेचा विचार करुनच कर आकारणी करावी लागते. तसेच करापासून मिळणारे उत्पन्न पर्याप्त किवा पुरेसे असले पाहिजे. ज्या वस्तूची मागणी अलवचीक किंवा कमी लवचीक आहे. अशा वस्तूवर कर आकारल्यास मागणी परिमाण फारसे कमी होत नाही. याउलट जास्त लवचिक मागणी असलेल्या वस्तूवर कर आकारल्यास वस्तूच्या किंमती वाढतात व समाजाची मागणी मोठ्या प्रमाणावर होते.

**३) उत्पादक साधनांचा मोबदला ठरविताना** : भूमी, श्रम, भांडवल या उत्पादक घटकांची मागणी संयोजक (साहस) करीत असतो आणि त्यांना मोबदला देतो. कुशल कामगारांसाठी मागणी कमी लवचिक तर अकुशल कामगारासाठी ती जास्त लवचिक असते. त्यामुळे कुशल कामगारांनी वेतनवाढ मागितल्यास त्यांना त्वरित देण्यात येते; याउलट अकुशल कामगारांना वेतनवाढ नाकारण्यात येते.

**४) सामाजिक सेवा** : रेल्वे, पोस्ट, तारायंत्र, वाहतूक, विद्युतनिर्मिती इत्यादी सामाजिक सेवा होत. अशा व्यवसायामधून मिळणाऱ्या सेवांची मागणी अलवचिक किंवा कमी लवचिक असते. याचा अर्थ बस भाडे, रेल्वे भाडे वाढले तरी आपण प्रवास करतोच. अशा प्रकारचे व्यवसाय सरकारी क्षेत्रातच चालवावे या सेवा लोकांना योग्य दरात उपलब्ध झाल्या पाहिजेत. या सेवा खाजगी क्षेत्रात दिल्या तर लोकांचे शोषण होईल.

**५) आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी** : आंतरराष्ट्रीय व्यापार सुरु होण्यापूर्वी व्यापाराच्या अटी ठरवाव्या लागतात. वस्तूची देवाणघेवाण या विनिमय दराने होते त्याला व्यापाराच्या अटी म्हणतात. उदा. भारताच्या एक किलो साखरेबरोबर कमी किंमतीचे दोन किलो गव्हू व्यापाराच्या अटी मागणीच्या लवचिकतेवर अवलंबून असतात.

समजा, भारताच्या साखरेसाठी अमेरिकेची मागणी अलवचिक आहे आणि अमेरिकन गव्हासाठी लवचिक आहे. अशावेळी व्यापाराच्या अटी भारतात अनुकूल ठरतात.

**६) विनिमय दर ठरविताना** : विदेशी विनिमय दर ठरवितांना लवचिकता तत्त्वाचा विचार होतो. देशी चलनाला विदेशात मागणी किती तसेच विदेशी चलनाला आपल्या देशात मागणी किती यावरच विदेशी विनिमयाचा दर किंवा हुंडावळीचा दर अवलंबून असतो.

**७) विपुलतेत दारिद्र्य** : भारतासारख्या कृषीप्रधान देशात कित्येकदा विपुलतेत दारिद्र्य दिसून येते आणि त्याचे प्रमुख कारण म्हणजे लवचिकता होय. कृषी हंगाम चांगला असतो तेव्हा उत्पादन वाढते व वस्तूंच्या किमती उतरतात. परंतु कृषी मालाची मागणी कमी लवचिक किंवा अलवचिक असते. त्यामुळे मागणी फारशी वाढत नाही त्यामुळे अधिक माल विपुल होऊन शेतकऱ्याचे उत्पन्न कमीच राहते. म्हणजेच विपुलतेत दारिद्र्य असा विरोधाभास दिसून येतो.

**८) सरकारी धोरण ठरविताना** : देशामध्ये तेजी-मंदीचे चक्र सुरु असते. किंमत पातळीमध्ये चढ-उतार होत असताना किमतीमधील चढ-उतार कमी करण्यासाठी सरकारी धोरण राबविण्यात येतात. अशावेळी समाजाच्या निरनिराळ्या वस्तूबाबतच्या मागणी लवचिकतेचा अभ्यास करावा लागतो. तेव्हा सरकारला लवचिकता तत्त्वाचा वेळोवेळी विचार करुनच निर्णय घ्यावे लागतात.

**९) पेढी व धंद्यासाठी उपयुक्त** : उत्पादक पेढीच्या संकल्पनांचा अभ्यास करीत असताना सीमांत प्राप्ती व सीमांत व्यय याचा विचार करावा लागतो. सीमांत प्राप्ती ही मागणीच्या लवचिकतेवर अवलंबून असते. तेव्हा पेढीच्या संयोजकास मागणीच्या लवचिकतेचा विचार करुन धोरण ठरवावे लागते तसेच कोणत्याही विशिष्ट धंद्याचे संतुलन वस्तूच्या मागणी पुरवठ्याने होत असते अशावेळी वस्तूच्या एकंदर मागणीचा अभ्यास करीत असताना लवचिकता तत्त्वाचा विचार करावा लागतो.

**१०) श्रमिक संघाच्या दृष्टीने उपयुक्त** : श्रमिक संघाला वेतन वाढीची मागणी करताना श्रमिकांकरिता असलेली मागणी लवचिक आहे किंवा अलवचिक आहे याचा विचार करावा लागतो. श्रमिकाकरिता असलेली मागणी अलवचिक असेल तर श्रमिक संघ वेतन वाढवून घेण्यास यशस्वी होईल, याउलट श्रमिकाकरिता असलेली मागणी लवचिक असेल तर श्रमिक संघ वेतनवाढ करुन घेण्यास अयशस्वी ठरेल.

**२.४ उपयोगिता** (Utilities)

उपयोगिता म्हणजे वस्तूच्या अंगी असणारी मानवी गरज भागविण्याची क्षमता होय. उदा. वही, पेन. उपयोगितेच्या विश्लेषणात उपभोक्त्याच्या महत्तम समाधान मिळवण्याच्या वर्तनाचे स्पष्टीकरण केले जाते. तर उपयुक्तता म्हणजे वस्तूचे उपयोगिता मूल्य होय. उपभोग्य वस्तूंचा 'वस्तूनिष्ठ' भाग व त्यांचा 'व्यक्तीनिष्ठ' भाग यांच्या परस्पर संबंधाविषयीच्या वादामुळेच अर्थशास्त्रीय स्वरुपाला नवीन वळण मिळाले. ॲडम स्मिथ (१७२३-१७९०), डेव्हीड रिकार्डो (१७७२-१८२३), थॉमस माल्थस (१७६६-१८३४) इ. सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांनी वस्तूच्या उपयोगितेविषयी विचार मांडताना वस्तूच्या वस्तूनिष्ठ भागावर अधिक भर दिलेला दिसून येतो. नंतर साधारणपणे १८७० पासून उपयोगितेचा वापर करताना वस्तूच्या व्यक्तीनिष्ठ भागावर अधिक जोर देण्यात आला व अर्थशास्त्राच्या प्रगतीला नवीन चालना मिळाली. विल्यम स्टॅन्ली जेव्हान्स (१८३७-१८८२), कार्ल मेंगर (१८४०-१९२१), लिओन वालरा (१८३४-१९१०) हे सुप्रसिद्ध ऑस्ट्रियन अर्थशास्त्रज्ञ सीमांत उपयोगिता संप्रदायाचे अध्वर्यू होत. नंतरच्या अर्थशास्त्रज्ञांनी म्हणजे ऑल्फ्रेड मार्शल (१८४२-१९२४), व्हेझर (१८५१-१९२६), बंबाव्हेर्क (१८५१-१९१४), व्हिलफ्रेदो पारेअतो (१८४८-१९२३) यांनी सीमांत उपयोगितेच्या सिद्धांताला अर्थशास्त्रात समाविष्ट करुन घेतले.

**एकूण उपयोगिता व सीमांत उपयोगिता यातील संबंध**

**एकूण उपयोगिता**

वस्तूच्या सर्व नगांच्या सेवनापासून व्यक्तीला प्राप्त होणाऱ्या उपयोगितेची बेरीज म्हणजे एकूण उपयोगिता होय. एकूण उपयोगिता सलगपणे उपभोग घेतलेल्या वस्तूच्या सर्व नगांपासून मिळालेली असते.

**सूत्र**

$$\mathbf{T_U = \Sigma M_U}$$

**OR**

**$T_UX = f(QX)$**

**$T_U$** = एकूण उपयोगिता, **$\Sigma M_U$** = सीमांत उपयोगितेची एकूण बेरीज, **$T_UX$** = X वस्तूची एकूण उपयोगिता, **f** = कार्यात्मक संबंध, **QX** = X वस्तूचे नग

**सीमांत उपयोगिता**

वस्तूच्या प्रत्येक नगाच्या सेवनापासून व्यक्तीला प्राप्त होणारी अतिरिक्त उपयोगिता म्हणजे सीमांत उपयोगिता होय. सीमांत उपयोगिता ही वाढीव नगापासून एकूण उपयोगितेत पडणारी भर असते.

**सूत्र**

$$M_U = \frac{\Delta TU}{\Delta X}$$

$M_U$ = Marginal Utility
ΔTU = The change in total utility
ΔX = One unit change in consumption

**OR**

**MUn = TUn - TUn - 1**

**MUn** = **n** संबंधित वस्तूच्या नगसंख्येची सीमांत उपयोगिता
**TUn** = उपभोक्त्याने उपभोगलेल्या वस्तूच्या एकूण नगापासून मिळणारी एकूण उपयोगिता
**TUn-1** = **n-1** नगापासून मिळणारी एकूण उपयोगिता

| वस्तूचे नग | सीमांत उपयोगिता | एकूण उपयोगिता |
|---|---|---|
| १ | ८ | ८ |
| २ | ६ | १४ |
| ३ | ४ | १८ |
| ४ | २ | २० |
| ५ | ० | २० |
| ६ | -२ | १८ |

**स्पष्टीकरण**

१) पहिल्या नगापासून मिळणारी एकूण उपयोगिता व सीमांत उपयोगिता सारखीच असते (ए.उ.= सी.उ.)
२) एकूण उपयोगिता घटत्या दराने वाढत जाते. सीमांत उपयोगिता घटत जाते. (ए.उ. वाढते = सी.उ. घटते, २०=२)
३) जेव्हा सीमांत उपयोगिता शून्य होते, तेव्हा एकूण उपयोगिता महत्तम असते. (सर्वाधिक समाधान) (ए.उ. सर्वात जास्त = सी.उ. शून्य, २०=०)
४) जेव्हा सीमांत उपयोगिता ऋण होते, तेव्हा एकूण उपयोगिताही घटते. (असमाधान) (ए.उ. घटते = सी.उ. ऋण, १८=-२)
५) एकूण उपयोगिता नेहमी धन असते. तर सीमांत उपयोगिता धन, ऋण व शून्य असू शकते.
६) सर्वाधिक समाधानानंतर सर्वसाधारण उपभोक्ता वस्तूचा उपभोग घेण्याचे थांबवतो. करुन
७) सर्वाधिक समाधानानंतर वस्तूचा उपभोग चालू ठेवला असता, समाधानाचे असमाधानात रुपांतर होते.

**उपयोगितेचे प्रकार** (Types of Utilities)




**१) रुप उपयोगिता** : 'वस्तूचे स्वरुप बदलल्यामुळे वाढलेली उपयोगिता म्हणजे रुप उपयोगिता होय.' वस्तूचा रंग, रुप, आकार, बाह्य स्वरुप इत्यादींमध्ये बदल करुन रुप उपयोगिता निर्माण केली जाते. उदा. माती पासून भांडी बनवणे, लाकडापासून फर्निचर बनवणे इत्यादी.

**२) स्थल उपयोगिता** : 'वस्तूचे स्थलांतर करुन वाढवलेली उपयोगिता म्हणजे स्थल

उपयोगिता होय.' वस्तूचे उत्पादनाच्या ठिकाणाहून उपभोगाच्या ठिकाणी स्थलांतर केल्यामुळे स्थल उपयोगिता निर्माण होते. उदा समुद्रकाठची वाळू बांधकामाच्या ठिकाणी आणून त्या वाळूत उपयोगिता निर्माण करणे.

**३) सेवा उपयोगिता** : 'समाजातील विविध घटकांनी पुरविलेल्या सेवांमधून मिळणारी उपयोगिता म्हणजे सेवा उपयोगिता होय.' उदा. डॉक्टर, वकील, शिक्षक इत्यादीच्या सेवांमधून मिळणारी उपयोगिता.

**४) ज्ञान उपयोगिता** : 'विशिष्ट वस्तूचे ज्ञान प्राप्त करुन त्यापासून मिळणारी उपयोगिता म्हणजे ज्ञान उपयोगिता होय.' उदा. संगणकाच्या विविध कार्यप्रणालीचा अभ्यास केल्यामुळे संगणकाद्वारे मिळणारी उपयोगिता.

**५) स्वामित्व उपयोगिता** : 'वस्तूच्या मालकी हक्कामुळे निर्माण होणारी उपयोगिता म्हणजे स्वामित्व उपयोगिता होय.' उदा. दुकानातील धान्याची खरेदी केल्यानंतर त्यापासून मिळणारी उपयोगिता.

**६) काल उपयोगिता** : 'वस्तूच्या वापराचा काळ बदलून वाढवलेली उपयोगिता म्हणजे काल उपयोगिता होय.' उदा. वस्तू मुबलक प्रमाणात उपलब्ध असतांना तिचा साठा करुन दुर्मीळतेच्या काळात तिचा वापर करणे किंवा पावसाळ्याच्या काळात छत्र्या विक्रीस काढून त्यामध्ये उपयोगिता निर्माण करणे.

**घटत्या/ऱ्हासमान सीमांत उपयोगितेचा सिद्धांत** (The Law of Diminishing Marginal Utility)

हा सिद्धांत सर्वप्रथम प्रा. गॉसेन (Gossen's first Law) या अर्थतज्ज्ञांनी मांडला. म्हणून त्यास गॉसेनचा पहिला नियम म्हटले जाते. त्यानंतर हा सिद्धांत विकसित करण्याचे काम डॉ. मार्शल यांनी केल्यामुळे हा सिद्धांत त्यांच्या नावाने ओळखला जातो. डॉ. ऑल्फ्रेड मार्शल यांनी १८९० मध्ये आपल्या 'अर्थशास्त्राची मूलतत्वे' 'Principles of Economics' या ग्रंथात हा सिद्धांत विस्तृत स्वरुपात मांडला.

**सिद्धांताचे विधान/व्याख्या**

आल्फ्रेड मार्शल यांच्या मते, *"इतर परिस्थिती कायम असतांना व्यक्ती जवळ असलेल्या एखाद्या वस्तूच्या साठयात जसजसी वाढ होत जाते, तसतसे त्या वस्तूच्या साठ्यातील वाढीपासून मिळणारे समाधान, त्या वस्तूच्या साठ्यात होणाऱ्या वाढीबरोबर क्रमश: घटत जाते."*

**सिद्धांताची गृहिते**

घटत्या सीमांत उपयोगितेच्या सिद्धांताची गृहीतके पुढीलप्रमाणे आहेत.

| सिद्धांताची गृहिते |
|---|
| १) विवेकशीलता |
| २) संख्यात्मक मापन |
| ३) एकजिनसीपणा |
| ४) सातत्य |
| ५) वाजवी आकार |
| ६) स्थिरता |
| ७) विभाज्यता |
| ८) एकच गरज |

**१) विवेकशीलता** (Rationality) : उपभोक्त्याची वर्तणूक सर्वसामान्य आहे व महत्तम समाधान प्राप्त करणे हा त्याचा उद्देश आहे, असे सिद्धांत गृहीत धरतो.

**२) संख्यात्मक मापन** (Cardinal measurement) : उपयोगिता अंकामध्ये मोजता येते असे सिद्धांत गृहीत धरतो. म्हणजेच उपयोगिता अंकामध्ये मोजता येते व उपयोगितेची तुलना करता येते, असे गृहीत धरले जाते. उदा. १,२,३,४ इ. अंकात मोजता येते.

**३) एकजिनसीपणा** (Homogenity) : उपभोक्ता सेवन करीत असलेल्या वस्तूंचे सर्व नग एकजिनसी आहेत, असे सिद्धांत गृहीत धरतो. उदा. वस्तूचे सर्व नग रंग, रुप, आकार, चव, गुणवत्ता इत्यादी बाबतींत तंतोतंत एकसारखे आहेत.

**४) सातत्य** (Continuity) : वस्तूच्या विविध नगांच्या सेवनात निरंतरता (सातत्य) आहे असे सिद्धांत गृहीत धरतो. उदा. भाकरीचे नग एकापाठोपाठ (एक संपल्यानंतर) खाल्ले तर नंतरच्या प्रत्येक भाकरीची सीमांत उपयोगिता पहिल्यापेक्षा कमी होत जाईल. याउलट, सकाळी एक भाकरी आणि संध्याकाळी एक भाकरी खाल्ली तर सकाळच्या भाकरीपेक्षा संध्याकाळच्या भाकरीची उपयोगिता जास्त जाणवेल.

**५) वाजवी आकार** (Reasonable size) : उपभोग्य वस्तूचा आकार फार मोठा किंवा लहान नसून मध्यम (सर्वसाधारण) आहे असे सिद्धांत गृहीत धरतो. उदा. भाकरी खाताना प्रथम अत्यंत लहान तुकडा व नंतर मोठा तुकडा असे विसंगत उपभोगाचे स्वरुप असू नये.

**६) स्थिरता** (Stability) : उपभोगाच्या कालावधीत उपभोक्त्याची उत्पन्नपातळी, आवड, पसंती व वस्तूची किंमत इत्यादी घटक स्थिर असल्याचे हा सिद्धांत गृहीत धरतो. तसेच पैशाच्या प्रत्येक एककाची उपयोगिता स्थिर असल्याचे गृहीत धरले जाते.

**७) विभाज्यता** (Divisibility) : उपभोक्त्याने उपभोगात आणलेली वस्तू विभाज्य आहे.

**८) एकच गरज** (One Ends) : वस्तूचा दुसऱ्या कोणत्याही गरजा भागविण्यासाठी वापर न करता केवळ उपभोगासाठी वापर केला जातो असे सिद्धांत गृहीत धरतो.

**९) पैशातील उत्पन्नाची सीमांत उपयोगिता स्थिर** (Marginal Utility of Money Income is Constant) : उपभोक्त्याच्या शिल्लक राहिलेल्या पैशांतील उत्पन्नाची सीमांत उपयोगिता स्थिर आहे.

**सिद्धांताचे कोष्टक व आलेखाद्वारे स्पष्टीकरण**

या सिद्धांताचे स्पष्टीकरण करण्यासाठी डॉ. मार्शल यांनी आर्थिक विश्लेषणातील अनुसूची आणि आलेख या दोन साधनांचा वापर करुन सिद्धांत स्पष्ट केलेला आहे.

| वस्तूचे नग | सीमांत उपयोगिता | एकूण उपयोगिता |
|---|---|---|
| १ | ८ | ८ |
| २ | ६ | १४ |
| ३ | ४ | १८ |
| ४ | २ | २० |
| ५ | ० | २० |
| ६ | -२ | १८ |

वरील कोष्टकात वस्तूची नगसंख्या, एकूण उपयोगिता व सिमांत उपयोगिता दर्शविली आहे. त्यानुसार उपभोक्त्याने एक-एक वस्तूच्या नगसंख्येचा उपभोग घेतला असता एकूण उपयोगिता वाढत जाते. परंतू त्या वस्तूची सिमांत उपयोगिता घटत जाते.




वरील आकृतीत 'अक्ष' अक्षावर नगसंख्या आणि 'अय' अक्षावर सिमांत उपयोगिता दर्शविली आहे. आकृतीत ऊ-ऊ हा वक्र घटत्या सिमांत उपयोगितेचा वक्र दर्शविला आहे. या वक्रावरुन असे स्पष्ट होते की, वस्तूचा उपभोग घेतलेल्या नगसंख्येत वाढ करीत गेल्यास त्यापासून मिळणारी सिमांत उपयोगिता घटत जाते. आलेखातील वक्र सिमांत उपयोगिता घटत असल्याचे दर्शवितो.

**सिद्धांताचे अपवाद**

घटत्या सीमांत उपयोगिता सिद्धांताचे अपवाद पुढीलप्रमाणे आहेत.

| सिद्धांताचे अपवाद |
|---|
| १) दुर्मिळ वस्तूंचा संग्रह |
| २) व्यसनी आणि कंजूष |
| ३) अंमली पदार्थांचे व्यसन |

**१) दुर्मिळ वस्तूंचा संग्रह** (Rare Collection) : पोष्टाची तिकिटे, नाणी, दुर्मिळ चित्रे इ. या सिद्धांताला अपवाद आहेत, असे मानले जाते. दुर्मीळ तिकिटे, नाणी, चित्रे इत्यादींचा संग्रह करणाऱ्या व्यक्तींना त्यांच्याजवळील दुर्मीळ वस्तूंच्या साठ्यात वाढ झाल्यास; त्याचप्रमाणे संगीत शौकीन व्यक्तींना अधिकाधिक

| |
|---|
| **४) सत्ता** |
| **५) पैसा** |
| **६) संगीत आणि वाचन** |

संगीत ऐकल्याने किंवा वाचनप्रिय व्यक्तींना अधिकाधिक वाचन केल्यामुळे अधिकाधिक उपयोगिता मिळते असे म्हटले जाते. परंतु सिद्धांताच्या एकजिनसीपणाच्या गृहीतकानुसार अशा व्यक्तींना एकाच प्रकारच्या तिकिटांचा किंवा नाण्यांचा संग्रह करण्यास सांगितले असता किंवा एकच संगीत ऐकण्यास किंवा एकच पुस्तक वाचण्यास दिले असता सीमांत उपयोगिता घटते. म्हणजेच छंद खऱ्या अर्थाने सिद्धांतास अपवाद ठरत नाही.

**२) व्यसनी आणि कंजूष** (Drunkards & Misers) : कंजूष व्यक्तीला अधिकाधिक पैशापासून अधिकाधिक उपयोगिता मिळते असे म्हटले जाते. परंतु कंजूष व्यक्तीचे वर्तन हे विवेकी नसते. कंजूष व्यक्तीला जसजशी जास्त पैसा गोळा करीत जाईल तसतशी पैशापासून मिळणारी सीमांत उपयोगिता वाढत जाते. तसेच दारु पिणाऱ्या व्यक्तीच्या बाबतीत दारुचे सेवन जितके जास्त होईल तितकी सीमांत उपयोगिता वाढते. म्हणून या बाबी या सिद्धांताला अपवाद ठरतात. परंतु हा अपवाद मानणे बरोबर नाही. कारण अशा व्यक्तीचे वर्तन सर्वसामान्य माणसासारखे नसते. तसेच त्याची वर्तणूक विवेकपणाची नसते.

**३) अंमली पदार्थांचे व्यसन** : मद्यपी व्यक्तीला मद्याच्या अधिकाधिक सेवनातून अधिकाधिक उपयोगिता मिळते असे म्हटले जाते. परंतु सिद्धांताच्या गृहीतकाप्रमाणे मद्यपी व्यक्तीचे वर्तन हे विवेकी असत नाही. म्हणून मद्यपी व्यक्ती खऱ्या अर्थाने सिद्धांतास अपवाद ठरत नाही.

**४) सत्ता** (Power) : अधिकाधिक सत्ता मिळवण्याची इच्छा असणाऱ्या व्यक्तीस अधिकाधिक सत्तेपासून अधिकाधिक उपयोगिता मिळते, असे म्हटले जाते. परंतु सिद्धांताच्या गृहीतकाप्रमाणे सत्तेची लालसा असणाऱ्या व्यक्तीचे वर्तन हे विवेकी असत नाही. म्हणून सत्ता खऱ्या अर्थाने सिद्धांतास अपवाद ठरत नाही.

**५) पैसा** (Money) : अधिकाधिक पैशापासून अधिकाधिक उपयोगिता मिळत जाते असे म्हटले जाते. परंतु प्रत्यक्षात पैशाचा साठा वाढला असता पैशाची सीमांत उपयोगिताही कमी होत जाते. उदा. गरीब व्यक्तीस १०० रुपयांमध्ये जास्त उपयोगिता सापडते, परंतु कोट्याधीश व्यक्तीला १०० रुपयांमध्ये कमी उपयोगिता सापडते. म्हणजेच पैसाही या सिद्धांतास खऱ्या अर्थाने अपवाद ठरत नाही.

**६) संगीत आणि वाचन** : चांगले संगीत एक किंवा दोन आणि तीनपेक्षाही जास्त वेळा ऐकल्यास समाधान वाढत जाते. अधिकाधिक पुस्तक वाचल्यामुळे आनंदात भर पडत जाते. त्यामुळे याला हा सिद्धांत लागू पडत नाही असे म्हटले जाते. परंतु प्रत्यक्षात एकच संगीत खूप वेळा ऐकल्यास आणि एकच पुस्तक पुन्हा: पुन्हा: वाचत राहिल्यास कंटाळा येतो. एका काही मर्यादेपर्यंत अपवाद ठरेल. परंतु प्रत्यक्षात हा सिद्धांत याला लागू पडतो असे अनुभवास येते.

**सिद्धांतावरील टिका/मर्यादा**

१) हा सिद्धांत मांडतांना इतर परिस्थिती कायम असावी असे गृहीत धरलेले आहे. परंतु बऱ्याच वेळा बाजारपेठेत किंवा अर्थव्यवस्थेत राजकीय, आर्थिक, सामाजिक परिस्थिती सारखीच राहील असे नाही, अशी टीका या सिद्धांतावर केलेली आहे.

२) वस्तूचे सर्व नग एकजिनसी असतात. या गृहितावर टीकाकारांनी टिका केली असून त्यांच्यामते, बाजारपेठेत एकजिनसी वस्तू आढळून येत नाही.

३) उपभोक्त्याच्या अभिरुचीत बदल होत नाही असे गृहित हा सिद्धांत मांडतांना धरलेले आहे. परंतु अभिरुची, आवड-निवड ही व्यक्तीची मानसिक स्थिती असल्याकारणाने ती केव्हाही बदलू शकते. अशी टिका केलेली आहे.

४) हा सिद्धांत मांडतांना उपभोक्त्याचे उत्पन्न स्थिर असावे असे गृहीत धरले आहे. टीकाकारांच्या मते, उपभोक्त्याचे उत्पन्न कधीच स्थिर राहू शकत नाही. उत्पन्न वाढणारे किंवा कमी होणारे असते.

५) उपभोक्ता विवेकी किंवा ज्ञानी असतो असे गृहित हा सिद्धांत मांडतांना मार्शल यांनी विचारात घेतले आहे. परंतु टीकाकारांच्या मते, उपभोक्ता कितीही ज्ञानी असला तरीही त्यांच्याकडून कळत न कळत अनेक चुका होत असतात.

**सिद्धांताचे महत्त्व**

अशा प्रकारे या सिद्धांतावर विविध प्रकारच्या टीका करण्यात आलेल्या आहेत असे असले तरीही हा सिद्धांत अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा आहे. कारण या सिद्धांतामुळे अर्थशास्त्रात विविध सिद्धांत मांडण्यासाठी उपयुक्त मार्गदर्शन मिळत असते. तसेच दोन वस्तूमध्ये असणारी उपयोगिता जाणून घेण्यासाठी हा सिद्धांत नेहमी उपयुक्त ठरतो. गरीब वर्गावर कमी दराने तर श्रीमंत वर्गावर जास्त दराने कर आकारणी केली जाते. हे कर आकारणीचे तत्त्व ठरविण्यासाठी घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धांत उपयुक्त ठरतो. साधनसामग्रीचे आणि संपत्तीचे पर्याप्त वाटप करुन आर्थिक कल्याण साध्य करण्यासाठी हा सिद्धांत खूप उपयोगी आहे.

**सीमांत उपयोगिता व किंमत संबंध**

मागणीचा सिद्धांत घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धांतावर आधारीत आहे. ते समजून घेण्यासाठी सीमांत उपयोगिता व किंमत संबंध अभ्यासणे आवश्यक आहे. बाजार किंमतीशी तुलना करण्यासाठी सीमांत उपयोगितेचे रुपांतर पैशात केले जाते. यासाठी असे गृहीत धरले जाते की, वस्तूच्या एका नगाची बाजार किंमत ५० रुपये आहे आणि एका नगाची सीमांत उपयोगिता १० रुपये बरोबर आहे. जोपर्यंत सीमांत उपयोगिता जास्त तोपर्यंत मागणी केली जाते. याउलट बाजार किंमत जास्त व सीमांत उपयोगिता कमी होते तेव्हा मागणी थांबवली जाते. अशा प्रकारे एका नगाची सीमांत उपयोगिता व बाजार किंमत यांची तुलना पुढीलप्रमाणे केली आहे.

| वस्तूचे नग | 'क्ष ' या वस्तूच्या नगापासून मिळणारी सीमांत उपयोगिता | सीमांत उपयोगिता (रु.मध्ये) १ नग =१० रु. सी. उ. × १० रु. | बाजार किंमत/घटक नग किंमत (५० रु.) | सीमांत उपयोगिता आणि किमतीची तुलना |
|---|---|---|---|---|
| १ | १० | १०० | ५० | १०० > ५० |
| २ | ८ | ८० | ५० | ८० > ५० |
| ३ | ७ | ७० | ५० | ७० > ५० |
| ४ | ५ | ५० | ५० | ५० = ५० |
| ५ | ३ | ३० | ५० | ३० < ५० |
| ६ | १ | १० | ५० | १० < ५० |

१) कोष्टकाचे विश्लेषण केले असता, उपभोक्ता इच्छेप्रमाणे उपभोग घेतो तेव्हा सीमांत उपयोगिता बाजार किमतीपेक्षा जास्त असते. सी. उ. > किंमत. यालाच सीमांतपूर्व नग असे म्हणतात.

२) ज्या नगाच्या वेळेस सीमांत उपयोगिता व किंमत समान होतात त्या नगाला सीमांत नग म्हणतात. सी. उ. = किंमत. यालाच सीमांत नग असे म्हणतात.

३) विवेकी उपभोक्ता जे नग विकत घेऊ शकत नाही त्या नगांना सीमान्तोत्तर नग म्हणतात. सी. उ. < किंमत. अशाप्रकारे विवेकी उपभोक्ता याचा समतोल साधला जातो.

**प्रश्नसंग्रह**

**वस्तुनिष्ठ प्रश्न**

१) वस्तूच्या किमती ...... च्या संतुलनाने ठरतात.
**अ) मागणी व पुरवठा** ब) उपयोगिता व उत्पादकता क) गरजा व साधने ड) उपयोगिता व गरजा

२) वस्तूंची किंमत व वस्तूंचा पुरवठा यांचा संबंध असतो.
**अ) सम** ब) व्यस्त क) नकारात्मक ड) समतोल

३) किंमत व मागणी यांचा संबंध असतो.
अ) सम **ब) व्यस्त** क) धनात्मक ड) असमतोल

४) मानवी गरजा पूर्ण करण्याचा वस्तूमधील असणारा गुणधर्म म्हणजे ...... होय.
**अ) उपयोगिता** ब) उत्पादकता क) मागणी ड) पुरवठा

५) ग्राहकांचे हे मुख्य उद्दिष्ट्य असते.
**अ) महत्तम समाधान** ब) महत्तम नफा क) महत्तम उत्पादकता ड) महत्तम व्याज

६) कनिष्ट वस्तूच्या बाबतीत मागणी नियमाला अपवाद यांनी मांडला.
**अ) गिफेन** ब) मार्शल क) रिकार्डो ड) रॉबिन्स
७) व्यापारी वस्तूची किंमत व व्यापारी वस्तूचा पुरवठा यांचा संबंध असतो.
**अ) सम** ब) व्यस्त क) ऋणात्मक ड) यापैकी नाही
८) ... यांनी वस्तूची किमत ही त्या वस्तूच्या मागणी आणि पुरवठ्याच्या संतुलनाने ठरते.
अ) रिकार्डो **ब) आल्फ्रेड मार्शल** क) रॉबीन्स ड) रॅगनर फ्रिश
९) ...... यांच्यात मुक्त संबंध निर्माण होतात अशा यंत्रणेला किमत यंत्रणा म्हणतात.
अ) उपभोक्ते ब) उत्पादक क) मागणी व पुरवठा **ड) उपभोक्ते व उत्पादक**
१०) अर्थशास्त्राला सामान्य अर्थशास्त्र असा शब्द प्रयोग यांनी केला.
अ) रिकार्डो **ब) लॉर्ड केन्स** क) रॉबीन्स ड) प्रा.बोल्डिंग
११) गिफेन वस्तूचा अर्थ कोणता.
**अ) कनिष्ट वस्तू** ब) श्रेष्ट वस्तू क) आकर्षक वस्तू ड) निरुपयोगी वस्तू
१२) घटत्या सीमांत उपयोगितेच्या सिद्धांतात आल्फ्रेड मार्शल यांनी गृहीत धरलेली पैशाची उपयोगिता....
अ) वाढते **ब) स्थिर राहते** क) घटते ड) वाढते आणि नंतर घटते
१३) घटत्या सीमांत उपयोगितेच्या सिद्धांतात सीमांत उपयोगितेची संकल्पना.....
अ) क्रमवाचक संकल्पना **ब) संख्यात्मक संकल्पना**
क) क्रमवाचक संकल्पना आणि संख्यात्मक संकल्पना ड) आकर्षक
१४) जेव्हा सीमांत उपयोगिता ऋण होते, तेव्हा एकूण उपयोगिता.....
अ) वाढते ब) स्थिर असते **क) घटते** ड) शून्य असते
१५) घटत्या सीमांत उपयोगितेच्या सिद्धांतात सर्वाधिक समाधानाचा (तृप्ती) बिंदू म्हणजे .....
अ) एकूण उपयोगिता वाढते आणि सीमांत उपयोगिता घटते.
ब) एकूण उपयोगिता घटते आणि सीमांत उपयोगिता ऋण होते.
**क) एकूण उपयोगिता महत्तम होते आणि सीमांत उपयोगिता शून्य होते.**
ड) सीमांत उपयोगिता घटते आणि एकूण उपयोगिता वाढते.
१६) घटत्या सीमांत उपयोगितेच्या सिद्धांतात जेव्हा सीमांत उपयोगिता शून्यापेक्षाही खाली घटते तेव्हा एकूण उपयोगिता.....
अ) वाढते **ब) घटते** क) बदलत नाही ड) महत्तम होते
१७) वस्तूच्या किंमतीत होणारा बदल आणि वस्तूच्या मागणी होणारा बदल समान असतो तेव्हा मागणीची लवचिकता ...... असते.
अ) ed > 1 ब) ed < 1 **क) ed = 1** ड) ed = 0
१८) जेव्हा वस्तूचा उपभोग, तेव्हा सीमांत उपयोगिता घटते.
**अ) वाढतो** ब) घटतो क) स्थिर राहतो ड) शून्य होतो
१९) वस्तूच्या शेवटच्या घटकापासून मिळालेली उपयोगिता म्हणजे .... उपयोगिता होय.
अ) सरासरी ब) एकूण **क) सीमांत** ड) शून्य
२०) जेव्हा सीमांत उपयोगिता .... होते तेव्हा एकूण उपयोगिता सर्वाधिक असते.
अ) धन ब) ऋण **क) शून्य** ड) जास्त
२१) रक्तदानात उपयोगिता .... असते.
अ) स्थल **ब) काल** क) ज्ञान ड) रुप
२२) वस्तूच्या अंगी गरज भागविण्याची जी क्षमता असते त्यास ...... म्हणतात.
अ) मागणी ब) उपभोग **क) उपयोगिता** ड) पुरवठा
२३) उपयोगिता ही ..... संकल्पना आहे.
**अ) व्यक्तिनिष्ठ** ब) वस्तूनिष्ठ क) गणनात्मक ड) क्रमवाचक

२४) प्रिन्सिपल्स ऑफ इॅकॉनॉमिक्स हा ग्रंथ ..... यांनी लिहला.
अ) ॲडमस्मिथ ब) रिकार्डो क) रॉबिन्सन **ड) मार्शल**

२५) वस्तूच्या सर्व नगापासून मिळालेल्या उपयोगितेची बेरीज म्हणजे ...... उपयोगिता होय.
**अ) एकूण** ब) सीमांत क) सरासरी ड) उपयोगिता

२६) घटत्या सीमांत उपयोगितेच्या सिद्धांताला .... चा पहिला नियम म्हणतात.
**अ) गॉसन** ब) उपयोगिते क) मागणी ड) पुरवठ्या

२७) पैशाची सीमांत उपयोगिता .... असते असे गृहीत मानले जाते.
अ) घटत **ब) स्थिर** क) बदलत ड) वाढत

२८) सीमांत उपयोगितेचा वक्र डावीकडून उजवीकडे ..... जातो.
**अ) घसरत** ब) वाढत क) स्थिर ड) सरासरी

२९) घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धांत .... यांनी मांडला.
अ) मार्क्स ब) केन्स **क) मार्शल** ड) रिकार्डो

३०) परस्पर पूरक किंवा पर्यायी वस्तूंच्या बाबतीत एका वस्तूच्या किमतीतील बदलाचा दुसऱ्या वस्तूच्या मागणीवर किती परिणाम होतो हा परिणाम मोजणाऱ्या लवचिकतेला .... म्हणतात.
अ) किंमत लवचिकता ब) उत्पन्न लवचिकता क) प्रतिस्थापन लवचिकता **ड) छेदक लवचिकता**

३१) उत्पन्नात किती टक्के बदल झाला असता मागणीत किती टक्के बदल होतो हे शोधण्यासाठी .... या संकल्पनेचा वापर केला जातो.
अ) किंमत लवचिकता **ब) उत्पन्न लवचिकता** क) प्रतिस्थापन लवचिकता ड) छेदक लवचिकता

३२) वस्तूंच्या किमतीत होणाऱ्या शेकडा बदलामुळे वस्तूच्या मागणीत होणाऱ्या शेकडा बदलाचे प्रमाण म्हणजेच मागणीची ...... लवचिकता होय.
अ) प्रतिस्थापन **ब) किंमत** क) उत्पन्न ड) छेदक

३३) वस्तूची किंमत जास्त झाल्यामुळे त्या वस्तूची पर्यायी वस्तू वापरली जाते यालाच .... म्हणतात.
अ) किंमत **ब) प्रतिस्थापन** क) उत्पन्न ड) छेदक

३४) प्रतिस्थापन लवचिकता ही नेहमी .... असते.
**अ) ऋणात्मक** ब) धनात्मक क) सम ड) एकरुप

३५) गूळ आणि साखर या वस्तूच्या बाबतीत मागणीची तिरकस लवचिकता .... असते.
अ) ऋणात्मक **ब) सकारात्मक** क) नकारात्मक ड) एकरुप

३६) पेन आणि शाही या वस्तूच्या बाबतीत मागणीची तिरकस लवचिकता .... असते.
**अ) नकारात्मक** ब) धनात्मक क) सम ड) एकरुप

३७) वस्तूंच्या किमतीत अल्पशा बदल झाला असता मागणी जेव्हा अनंत (अगणित) पटीने बदलते तेव्हा मागणी वक्र .... असतो.
**अ) क्षैतिज** ब) उदग्र क) ऋणात्मक ड) धनात्मक

३८) किंमत कमी झाली किंवा वाढली तरीही मागणीत काहीच बदल होत नाही तेव्हा तेव्हा मागणी वक्र ... असतो.
अ) क्षैतिज **ब) उदग्र** क) ऋणात्मक ड) धनात्मक

३९) वस्तूच्या किमतीत थोडासा बदल झाला असता वस्तूच्या मागणीत उल्लेखनीय बदल होतो तेव्हा मागणीची लवचिकता ...... असते.
**अ) $ed > 1$** ब) $ed < 1$ क) $ed = 1$ ड) $ed = 0$

४०) वस्तूंच्या किमतीत उल्लेखनीय बदल झाला असता वस्तूच्या मागणीत अल्पसा बदल होतो तेव्हा मागणीची लवचिकता ...... असते.
अ) $ed > 1$ **ब) $ed < 1$** क) $ed = 1$ ड) $ed = 0$

**लघुत्तरी प्रश्न**

१) एकूण उपयोगिता आणि सीमांत उपयोगिता यांतील संबंध स्पष्ट करा.
२) गिफेनचा विरोधाभास आकृतीसह स्पष्ट करा.
३) उपयोगितेचे प्रकार सांगा.
४) घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धांताच्या मर्यादा स्पष्ट करा.
५) सूक्ष्म अर्थशास्त्र आणि स्थूल अर्थशास्त्र यातील फरक स्पष्ट करा.
६) सूक्ष्म अर्थशास्त्राची वैशिष्ट्ये सांगा.
७) सूक्ष्म अर्थशास्त्राचे महत्व स्पष्ट करा.
८) मागणीच्या लवचिकतेची संकल्पना स्पष्ट करा.
९) घटत्या सीमांत उपयोगिता सिद्धांताचे महत्त्व सांगा.
१०) घटत्या सीमांत उपयोगिता सिद्धांताची गृहीते सांगा.
१२) मागणी वक्र डावीकडून उजवीकडे खाली का येतो?
१३) मागणीवर परिणाम करणारे घटक सांगा.
१४) पुरवठ्याचे निर्धारक घटक सांगा.
१५) पुरवठा नियमाचे अपवाद सांगा.
१६) मागणीची प्रतिस्थापन लवचिकता संकल्पना स्पष्ट करा.
१७) मागणीची उत्पन्न लवचिकता संकल्पना स्पष्ट करा.
१८) मागणीची छेदक लवचिकता संकल्पना स्पष्ट करा.
१९) मागणीची किंमत लवचिकता संकल्पना स्पष्ट करा.
२०) सीमांत उपयोगिता व किंमत यातील संबंध स्पष्ट करा.

**दिर्घोत्तरी प्रश्न**

१) घटत्या सीमांत उपयोगितेचा सिद्धांत उदाहरण व आकृतीसह स्पष्ट करा.
२) मागणीची लवचिकता म्हणजे काय? मागणीच्या लवचिकतेचे प्रकार स्पष्ट करा.
३) मागणीच्या किंमत लवचिकतेचे प्रकार स्पष्ट करा.
४) मागणीचा सिद्धांत उदाहरण व आकृतीसह स्पष्ट करा.
५) मागणीवर परिणाम करणारे घटक सविस्तरपणे सांगा.
६) पुरवठ्याचा सिद्धांत स्पष्ट करा.
७) मागणीची लवचीकता कोणत्या घटकांवर अवलंबून असते?
८) मागणीच्या लवचिकतेचे सैद्धांतिक आणि व्यावहारीक महत्व सांगा.

# प्रकरण ३
# खर्च व प्राप्तीचे विश्लेषण
(Cost and Receipt Analysis)

---

## ३.१ उत्पादन खर्च (Cost of Production)

**उत्पादनाचा अर्थ** (Meaning of Production)

अर्थशास्त्रीय परिभाषेत उत्पादन म्हणजे विनिमेय उपयोगितांची निर्मिती होय. स्थलजन्य, कालजन्य आणि स्वरुपजन्य उपयोगिता निर्माण केल्याने उत्पादन होत असते. ॲडम स्मिथ यांच्या मते, उत्पादन म्हणजे भौतिक वस्तूंची निर्मिती होय. तर मार्शल यांच्या मते, उपयोगितेची निर्मिती करणे किंवा त्यामध्ये वाढ करणे म्हणजेच उत्पादन होय. उत्पादनाचे साधारणपणे दोन घटक लक्षात घेतले जातात. एक मूलभूत घटक- भूमी व श्रम हे घटक निसर्गनिर्मित असल्याने यांना मूलभूत घटक असे म्हणतात. तर दुसरा दुय्यम घटक- भांडवल व संयोजक किंवा संघटन हे मानवनिर्मित घटक असल्याने त्यांना दुय्यम घटक असे म्हणतात. संघटन हा श्रमाचाच एक प्रकार आहे. उत्पादनाच्या प्रक्रियेत अनेक घटकांचा समावेश होत असतो. यामध्ये प्रामुख्याने कच्चामाल, यंत्रसामग्री, उत्पादन तंत्र, भूमी, श्रम, भांडवल व संयोजक इत्यादी. हेच सूत्राच्या साह्याने पुढीलप्रमाणे सांगता येईल.

$$P = f(a, b, c, d.... n)$$

P = Production (उत्पादन), f = function (फलन), a = land (भूमी), b = labour (श्रम), c = capital (भांडवल), d = organization (संघटन), n = last factor used in production (उत्पादनातील शेवटचा घटक).

पेढी किंवा उत्पादक संस्थेला खालीलप्रमाणे उत्पादनाची प्रक्रिया पार पाडावी लागते.






**उत्पादन व्यय/खर्च** (Cost of Production)

उत्पादनाच्या प्रक्रियेत व्यय (खर्च) आणि प्राप्ती या दोन संकल्पना अतिशय महत्त्वाच्या आहेत. आर्थिक विश्लेषणात उत्पादन खर्च संकल्पना महत्त्वाची आहे. उत्पादन प्रक्रियेमध्ये निरनिराळ्या प्रकारचे खर्च पेढीला करावे लागतात यालाच उत्पादन व्यय असे म्हणतात. उत्पादन व्यय फलन उत्पादकाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे; कारण उत्पादन किती होईल यापेक्षा उत्पादनापासून नफा किती मिळेल याकडे विशेष लक्ष उत्पादकास घ्यावे लागते. नफा मिळविणे ही उत्पादनाची प्रमुख भूमिका असते. उत्पादन व्ययाचा सर्वसामान्य अर्थ वस्तूच्या उत्पादनासाठी करावा लागणारा व्यय किंवा खर्च असतो. 'वस्तू किंवा सेवा उत्पादन करण्यासाठी उपयोगात आणल्या जाणाऱ्या उत्पादन घटकांना त्यांच्या कार्याबद्दल दिला जाणारा मोबदला म्हणजे उत्पादन खर्च होय.'

**उत्पादन खर्च विषयक संकल्पना** (Concepts of Cost of Production)

**१) लेखा व्यय/आर्थिक व्यय/मौद्रिक व्यय/चलनी व्यय** (Accounting/ Economic/Monetary Cost)

लेखा व्ययामध्ये उत्पादनाच्या क्रियेसाठी लागणारा एकंदर मौद्रिक खर्च विचारात घेतला जातो. मौद्रिक खर्च हा उत्पादनाच्या निरनिराळ्या घटकांवर येणारा पैशाच्या स्वरुपातील खर्च असतो. जसे- इमारतीसाठी लागणारा खर्च, कामगारांना द्यावा लागणारा पगार, कच्च्या मालाची किंमत, विमा, वाहतूक, जाहिरात इत्यादीवरील खर्चाची बेरीज ही लेखा व्ययात समाविष्ट केली जाते. लेखा व्ययात फक्त उत्पादकाच्या मालकीच्या नसलेल्या (Hired) व प्रत्यक्षपणे खरेदी केल्या जाणाऱ्या (Purchased) उत्पादनांच्या आदनांची किंमत समाविष्ट केली जाते. श्री जे. एन. हॅनसन यांच्या मते, मौद्रिक खर्च म्हणजे वस्तूचे विशिष्ट परिमाण उत्पादित करण्यासाठी उपयोगात आणलेल्या उत्पादक घटकांना दिल्या जाणाऱ्या मोबदल्याची बेरीज होय. मौद्रिक खर्च सामान्यपणे दोन प्रकारे केला जातो.

| **उत्पादन खर्च विषयक संकल्पना** |
|---|
| **१) मौद्रिक व्यय** |
| i) **प्रत्यक्ष मौद्रिक खर्च** |
| ii) **अप्रत्यक्ष मौद्रिक खर्च** |
| iii) **सर्वसाधारण नफा** |
| **२) वैकल्पिक व्यय** |
| **३) वास्तव खर्च** |
| **४) एकूण व्यय** |
| i) **एकूण स्थिर व्यय** |
| ii) **एकूण बदलता व्यय** |
| **५) सरासरी खर्च** |
| i) **सरासरी स्थिर व्यय** |
| ii) **सरासरी बदलता व्यय** |
| **६) सीमांत खर्च** |

i) **प्रत्यक्ष मौद्रिक खर्च** (Direct Monetary Cost)

वस्तू आणि सेवांच्या खरेदीसाठी पेढीला प्रत्यक्षपणे कराव्या लागणाऱ्या खर्चाला प्रत्यक्ष मौद्रिक खर्च असे म्हणतात. प्रत्यक्ष खर्च प्रामुख्याने स्वतःची मालकी नसलेल्या साधनांवर केला जातो. वेतन, मजुरी, कच्च्या मालाची खरेदी, वीज, इंधन, भाडे, जाहिरात, कर, दर, घसारा हे खर्च प्रत्यक्ष खर्च आहेत.

ii) **अप्रत्यक्ष मौद्रिक खर्च** (Indirect Monetary Cost)

पेढीच्या मालकीच्या साधनावरील आणि सेवांवरील खर्च म्हणजे अप्रत्यक्ष मौद्रिक खर्च होय. उदा. श्रमाच्या बाबतीत श्रमिकांना त्यांच्या कामाबद्दल फक्त मजुरी दिली जाते; परंतु काम करीत असताना शारीरिक स्वरुपाची काही अप्रत्यक्ष अशी झीज सोसावी लागते. त्याबद्दल त्यांना कोणत्याही प्रकारचा मोबदला दिला जात नाही. उदा. बॉयलरजवळ काम करणाऱ्या श्रमीकास फक्त बाजार दराप्रमाणे मजुरी दिली जाते; मात्र बॉयलरजवळ सतत उभे राहिल्याने त्याच्या शारीरिक प्रकृतीवर होणाऱ्या परिणामाबद्दल त्यास कोणताही मोबदला दिला जात नाही.

अर्थशास्त्रज्ञांच्या मते, लेखा व्ययात फक्त प्रत्यक्ष व्ययाचा विचार केला जातो. आर्थिक व्यय हा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष अशा दोन्ही प्रकारच्या खर्चाचा मिळून झालेला असतो. समीकरणाने तो पुढीलप्रमाणे दाखविता येईल.

**आर्थिक व्यय = लेखा व्यय (प्रत्यक्ष व्यय) + अप्रत्यक्ष व्यय**

Monetary Cost = Accounting Cost (Direct Cost) + Indirect Cost

Accounting Cost = Input Cost, Aggregate Monetary Cost, Direct Cost

iii) **सर्वसाधारण नफा** (Normal Profit)

बाजारात किंवा उद्योगात किंवा उत्पादनात टिकून राहण्यासाठी आवश्यक असलेला नफा म्हणजे सर्वसाधारण नफा होय. यापेक्षा कमी नफा मिळाला तर उद्योजक उद्योग सोडून बाहेर पडतो. सर्वसाधारण नफा हा किमान नफा (Minimum Profit) असतो. किमान नफा हा उद्योजकाचा उत्पादनात टिकून राहण्याचा एक प्रकारे खर्चच असतो. हा पैसारुपातील खर्चाचा एक भाग मानला जातो.
पैशातील खर्च सूत्ररुपाने पुढीलप्रमाणे मांडता येतो.

**पैशातील खर्च = व्यक्त खर्च + अव्यक्त खर्च + सर्वसाधारण नफा**

**२) वैकल्पिक व्यय/संधी खर्च/ विस्थापित खर्च/हस्तांतरण खर्च/बदली उत्पन्न** (Opportunity Cost)

आर्थिक विश्लेषणात वैकल्पिक खर्चाला अत्यंत महत्त्वपूर्ण स्थान आहे. उत्पादक घटकांचा मोबदला निश्चित करताना वैकल्पिक खर्चाचा उपयोग केला जातो. वैकल्पिक खर्च याचा अर्थ म्हणजे उत्पादक घटक ज्या विशिष्ट कार्यासाठी वापरले आहेत त्या कार्याव्यतिरिक्त इतर कार्यात वापरले जात असतील तर इतर कार्यापैकी सर्वात जास्त मोबदला देणाऱ्या कार्यात त्यांना मिळणारा मोबदला हा ज्या कार्यात जे उत्पादक घटक वापरले आहेत त्या कार्यासाठीचा वैकल्पिक व्यय असतो. म्हणजेच एखाद्या कार्यात उत्पादक घटक वापरल्यामुळे त्यांना करावा लागणारा इतर कार्यातील मोबदल्याचा त्याग म्हणजेच वैकल्पिक व्यय होय.

**प्रा. बेनहॅम** : ''एखाद्या वस्तूचा वैकल्पिक खर्च म्हणजे तो वस्तू तयार करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या घटकांच्या किंवा तेवढाच पैसा खर्च करुन मिळणाऱ्या त्याच्यासारख्याच घटक गटाच्या सहाय्याने त्या वस्तूला पर्याय असणारी दुसरी तितकीच चांगली वस्तू तयार करणे होय.''

**सौ. रॉबिन्सन** : ''एखादे साधन एखाद्या उद्योगात टिकून राहण्यासाठी जी किंमत आवश्यक असते तिला हस्तांतरण किंमत असे म्हणतात.''

वरील दोन्ही व्याख्यांवरुन स्पष्ट होते की, साधन पर्यायी उपयोगी असतात. पण जर त्या साधनांचा एखाद्या उद्योगात वापर केला तर ते साधन दुसऱ्या उद्योगात वापरता येत नाही. त्या साधनाने उद्योगात टिकून राहण्यासाठी जी किंमत द्यावी लागते त्याला वैकल्पिक खर्च म्हटले जाते. उदा. गुंजन हा कॉम्पुटर इंजिनियर आहे. त्याला रोजगाराची संधी विप्रो समूहात मिळाली. विप्रो समूहात त्याला दरमहा १०,००० रु. वेतन मिळत आहे. त्याला दुसरी संधी बिर्लासमूहात मिळत आहे. बिर्ला समूहानेही त्याला १०,००० रु. दरमहा वेतन देऊ केले. म्हणजेच पहिल्या संधीत जेवढे उत्पन्न मिळत आहे. तेवढेच उत्पन्न त्याला दुसऱ्या संधीत मिळणार आहे म्हणून तो विप्रो ह्या समूहातच टिकून राहील विप्रोत टिकून राहण्याचा संधी त्याग खर्च १०,००० रु. उत्पन्न आहे. पण जर का बिर्ला समूहाने त्याला दहा हजार रुपयांपेक्षा जादा वेतन देऊ केले तर गुंजन विप्रो समूह सोडून बिर्ला समूहात नोकरीला जाईल.

वैकल्पिक व्यय हा आर्थिकदृष्ट्या जास्त महत्त्वाचा असण्याचे कारण असे की, हा व्यय उत्पादक घटकाचा योग्य वापर कसा करता येईल याची कल्पना उत्पादकास देत असतो त्याचबरोबर एकंदर अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने हा व्यय जास्त महत्त्वाचा आहे. थोडक्यात, उत्पादनाच्या एका संधीत टिकून राहण्यासाठी किमान त्याचा संधी त्याग खर्च भरुन निघणे आवश्यक असते. संधी त्यागापेक्षा कमी उत्पन्न मिळत असेल तर तो त्या संधीचा त्याग करुन नवीन चांगली संधी हस्तगत करेल.

**३) वास्तव खर्च** (Real Costs)

वास्तव उत्पादन खर्चाची संकल्पना सनातनपंथीय अर्थशास्त्रज्ञ ॲडम स्मिथ, डेव्हिड रिकार्डो यांनी मांडली. नंतर नव-सनातनपंथीय अर्थशास्त्रज्ञ डॉ. मार्शल यांनी या संकल्पनेचा अधिक विस्तार केला. सनातनपंथीय अर्थशास्त्रज्ञानी उत्पादन खर्च श्रम मूल्यात मोजला. वास्तव खर्च हा एक प्रकारे सामाजिक खर्च असतो. उत्पादन

कार्यात श्रमीकाबरोबरच भांडवलदारही स्व-उपभोगाचा त्याग करुन आपला पैसा दुसऱ्याला वापरण्यासाठी देतो. त्या बदल्यात व्याज प्राप्त करण्यासाठी प्रतिक्षा करतो. जमिनीचा मालक जमीन लागवडीखाली आणण्यासाठी प्रयत्नांचा त्याग करतो. डॉ. मार्शलच्या मते, सर्व उत्पादन घटकांना उत्पादन कार्यात जे परिश्रम घ्यावे लागतात, जे कष्ट करावे लागतात, जो त्याग करावा लागतो, जो त्रास सहन करावा लागतो त्याला वास्तव खर्च असे म्हणतात. वास्तव उत्पादन खर्च हा कधीही पैशातील खर्चाइतका नसतो, तो पैशातील खर्चापेक्षा जास्तच असतो. डॉ. मार्शल यांनी मांडलेली वास्तव खर्चाची संकल्पना एक अवास्तव संकल्पना आहे. कारण उत्पादन कार्यात उत्पादन घटकांना प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष परिश्रम करावे लागतात, जो त्याग करावा लागतो, जे कष्ट करावे, जो त्रास सहन करावा लागतो त्याचे अचूक मापन शक्य नसते.

**४) एकूण व्यय** (Total Cost-TC)

उद्योजकाने (संयोजक) वस्तूचे उत्पादनासाठी आवश्यक असणाऱ्या उत्पादन घटकांवर केलेला खर्च म्हणजेच एकूण खर्च होय. 'एखादी विशिष्ट वस्तू विशिष्ट प्रमाणात उत्पादित करण्यासाठी पेढीला किंवा उत्पादक संस्थेला येणारा खर्च म्हणजे एकूण खर्च होय.' उदा. १,००० नग निर्माण करण्यासाठी १,००,००० रुपये खर्च येतो हा खर्च एकूण उत्पादन खर्च होय. एकूण व्यय हा पुढीलप्रमाणे काढला जातो.

एकूण व्ययाचे एकूण स्थिर व्यय व एकूण बदलता व्यय असे दोन प्रकार पडतात.

i) **एकूण स्थिर व्यय** (Total Fixed Cost-TFC)

एकूण स्थिर व्यय हा उत्पादनाच्या स्थिर घटकांवर येणारा एकंदर खर्च दर्शवितो. उदा. जमिन, यंत्रे, इमारत, यंत्रसामग्री व मॅनेजर सारखे कायम नोकर यांचा समावेश होतो. तसेच यामध्ये स्थिर भांडवलावरील व्याज व घसाऱ्यावरील खर्च यांचाही समावेश होतो.

ii) **एकूण बदलता व्यय** (Total Variable Cost-TVC)

उत्पादनातील बदलानुसार जो व्यय बदलत असतो त्या व्ययाला बदलता व्यय असे म्हणतात. उदा. श्रम, कच्चामाल इ. श्री बेनहॅम यांच्या मते, उत्पादनाच्या आकारानुसार बदलणाऱ्या खर्चांना पेढीचे बदलते खर्च असे म्हणतात. उत्पादन परिमाणात वाढ झाल्यास बदलते खर्च वाढतात; याउलट उत्पादन परिमाणात घट झाल्यास बदलते खर्च घटतात. उत्पादन बंद झाले तर बदलता खर्च शून्य असतो. या व्ययात श्रमिकांच्या मजुरीचा खर्च, कच्च्या मालाची किंमत, इंधनावरील खर्च, द्यावे लागणारे कर, वीज, कोळसा, किरकोळ दुरुस्ती यांचा समावेश होतो. अशा रीतीने अल्पकाळामध्ये असलेल्या एकूण व्यय यांचे विश्लेषण स्पष्ट करता येते. उदा. एखाद्या उत्पादकाला १० वस्तूंचे उत्पादन करण्यासाठी ५० रुपये एकूण स्थिर खर्च व १५० रुपये एकूण बदलता खर्च आला असेल, तर १० वस्तूंच्या उत्पादनासाठी एकूण खर्च किती?

**एकूण खर्च = एकूण बदलता खर्च + एकूण स्थिर खर्च**

Total Cost = Total Variable Cost + Total Fixed Cost

= १५० + ५०

= २००

∴ एकूण खर्च २०० रुपये




उत्पादनात बदल किंवा उत्पादन बंद झाले तरी एकूण स्थिर व्यय हा कायम असतो यामध्ये कोणताही बदल होत नाही. म्हणून स्थिर व्ययाचा वक्र अक्ष अक्षाला समांतर असतो. स्थिर खर्चात वैकल्पिक खर्च आणि

प्रसामान्य नफा देखील समाविष्ट असतो. उत्पादकाच्या विविध पातळीवर केला जाणारा एकूण स्थिर खर्च आणि एकूण बदलता खर्च याची बेरीज केल्यास एकूण खर्च मिळतो.

**५) सरासरी खर्च** (Average Cost-AC)

सरासरी व्यय म्हणजे एकंदर व्ययाला उत्पादनाच्या एकंदर राशीने भाग दिले असता येणारी राशी होय. प्रत्येक नगसंख्येचा उत्पादनासाठी येणारा खर्च म्हणजे सरासरी खर्च होय. हा व्यय सूत्र रुपात पुढीलप्रमाणे.

| | |
|---|---|
| | **एकूण उत्पादन व्यय** |
| **सरासरी व्यय** = | ----------------- |
| | **उत्पादनाचे एकूण परिमाण** |

$$AC = \frac{TC}{TQ}$$

OR

**AC = AFC + AVC**

उदा. एखाद्या उत्पादकास १० वस्तूचे उत्पादन करण्यासाठी २०० रुपये एकूण खर्च आला असेल तर सरासरी खर्च किती?

$$AC = \frac{200}{10}$$

∴ सरासरी खर्च २० रुपये.

सरासरी व्यय हा दर नगावर येणारा उत्पादन व्यय दाखविला जातो. सरासरी व्ययाचे दोन प्रकार पुढील प्रमाणे पडतात.

i) **सरासरी स्थिर व्यय** (Average Fixed Cost-AFC)

सरासरी स्थिर व्यय हा उत्पादनाच्या यंत्रसामग्री, इमारती इत्यादी स्थिर घटकांवर येणारा व्यय असतो. या व्ययास अनुपुरक व्यय (Supplementary Cost) असेही म्हणतात. हा व्यय सुरुवातीस मोजणे अशक्य असते. कारण तो फार जास्त असतो. हा व्यय उत्पादन नगाच्या वाढीबरोबर कमी होत जातो हा व्यय कितीही कमी झाला तरी शून्य होत नसतो.

| | |
|---|---|
| | **एकूण स्थिर व्यय** |
| **सरासरी स्थिर व्यय** = | ------------ |
| | **एकूण परिमाण** |

$$AFC = \frac{TFC}{TQ}$$

ii) **सरासरी बदलता व्यय** (Average Variable Cost-AVC)

सरासरी बदलता व्ययास प्रधान व्यय असेही म्हणतात. हा खर्च उत्पादनाच्या बदलत्या घटकांवर येणारा खर्च असतो. सरासरी बदलता खर्च हा सुरुवातीस जास्त असतो, नंतर हा व्यय हळूहळू कमी होत जातो. एका विशिष्ट मर्यादेपर्यंत सरासरी बदलता व्ययात घट झाल्यानंतर हा व्यय हळूहळू वाढू लागतो. म्हणजेच या व्ययाच्या वक्राचा आकार इंग्रजीतील 'U' या अक्षरासारखा असतो. सरासरी बदलता खर्च पुढीलप्रमाणे काढला जातो.

$$AVC = \frac{TVC}{TQ}$$

सरासरी बदलता व्यय आणि सरासरी स्थिर व्यय यांची बेरीज सरासरी पूर्ण व्ययाने दर्शविली जाते. सरासरी व्ययाचा वक्र हा सरासरी बदलत्या व्ययाच्या वरच्या बाजूस असतो. सरासरी बदलता व्ययाचा वक्र आणि

सरासरी व्ययाचा वक्र यांच्यातील अंतर सरासरी स्थिर व्ययाने दर्शविले जाते. त्यामुळे हे अंतर सुरुवातीस जास्त असते व नंतर कमी होत जाते.

**सरासरी व्यय = सरासरी स्थिर व्यय + सरासरी बदलता व्यय**

**६) सीमांत खर्च** (Marginal Cost-MC)

सीमांत व्यय हा उत्पादनात सर्वात महत्त्वाचा व्यय आहे. कारण हा व्यय वस्तूंच्या किंमत निर्धारणासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण समजला जातो. सीमांत व्यय जोपर्यंत सीमांत प्राप्तीपेक्षा कमी असतो, तोपर्यंत प्रत्येक नव्याने तयार होणाऱ्या वस्तूच्या एककावर नफा प्राप्त होत असतो. मात्र जेव्हा सीमांत व्यय सीमांत प्राप्तीपेक्षा (MC>MR) जास्त होऊ लागतो तेव्हा वस्तूच्या प्रत्येक नवीन नगावर नफ्याऐवजी नुकसान येऊ लागते. सीमांत उत्पादन व्यय जास्तीत जास्त नफ्याच्या दृष्टीने कोणती उत्पादन मात्रा असेल ते उत्पादकास सांगू शकतो. एका जादा नगसंख्येचे उत्पादन केल्यानंतर एकूण खर्चात झालेली निव्वळ वाढ, म्हणजे सीमांत खर्च होय. सीमांत व्ययाचे सूत्र पुढील प्रमाणे.

$$\text{सीमांत व्यय} = \frac{\text{एकूण उत्पादन व्ययातील बदल}}{\text{वस्तूच्या उत्पादन परिमाणातील बदल}}$$

$$MC = \frac{\Delta TC}{\Delta TQ}$$

उदा. समजा ४ नगसंख्येचा एकूण उत्पादन खर्च २०० रुपये असेल आणि पाचव्या नगसंख्येचे उत्पादन केल्यास एकूण उत्पादन खर्च २५० रुपये एवढा येतो, तर सीमांत खर्च किती?

$$MC = \frac{50}{1}$$

∴ सीमांत खर्च = ५० रुपये

एकूण उत्पादन व्यय, एकूण स्थिर व्यय, एकूण बदलता व्यय, सरासरी व्यय, सरासरी स्थिर व्यय, सरासरी बदलता व्यय व सीमांत व्यय या संकल्पना पुढील सारणी व आकृतीद्वारे स्पष्ट करता येईल. खालील सारणीतील सर्व मूल्ये विविध खर्चासाठी वर दिलेल्या सूत्रांचा वापर करुन काढण्यात आली आहेत.

**व्ययाचे सर्व आकडे रुपयात**

| उत्पादनाची राशी (Q) | TC | | | AC | | | MC |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | TFC | TVC | TC | AFC | AVC | AC | |
| 0 | 10 | 0 | 10 | - | - | - | - |
| 1 | 10 | 8 | 18 | 10 | 8 | 18 | 8 |
| 2 | 10 | 14 | 24 | 5 | 7 | 12 | 6 |
| 3 | 10 | 18 | 28 | 3.33 | 6 | 9.33 | 4 |
| 4 | 10 | 24 | 34 | 2.5 | 6 | 8.5 | 6 |
| 5 | 10 | 34 | 44 | 2 | 6.8 | 8.8 | 10 |
| 6 | 10 | 50 | 60 | 1.67 | 8.33 | 10 | 16 |






**सरासरी खर्च व सीमांत खर्च या दोन्हीतील संबंध**

दोन्ही खर्चाचे स्वरुप सारखेच दिसत असले तरी या दोन खर्चामध्ये मुलभूत फरक आहे.

१) जेव्हा सरासरी खर्च घटतो, तेव्हा सीमांत खर्चही घटतो, परंतू सीमांत खर्च सरासरी खर्चापेक्षा जास्त प्रमाणात घततो.

२) सरासरी खर्च वाढतो तेव्हा सीमांत खर्चही वाढतो. सरासरी खर्चातील वाढीपेक्षा सीमांत खर्चात होणारी वाढ जास्त वेगाने होते.

३) सरासरी खर्चात जेव्हा घट होते तेव्हा सीमांत खर्चात होणारी घट जास्त असते. त्यामुळे नेहमी सीमांत खर्च सरासरीच्या खालच्या बाजूस असतो. जेव्हा सरासरी खर्चात वाढ होते तेव्हा सीमांत खर्चही वाढतो पण ही वाढ जास्त असते. तेव्हा सीमांत खर्च सरासरी खर्चाच्या वरच्या पातळीस राहतो.

**३.२ प्राप्तीची संकल्पना** (Concept of Revenue)

निरनिराळ्या व्यय विश्लेषणाबरोबरच उत्पादन पेढीची प्राप्ती ही उत्पादकाच्या दृष्टीकोनातून एक महत्त्वाची संकल्पना आहे. प्राप्ती म्हणजे उत्पन्न. कारण उत्पादक वस्तूंचे उत्पादन करीत असतांना फक्त उत्पादन व्ययाकडे लक्ष देत असतो असे नाही, तर तो उत्पादनापासून मिळणाऱ्या नफ्याकडे लक्ष देत असतो. उत्पादनातून मिळणारा नफा हा उत्पादन विक्रीपासून किती मुद्रा राशी मिळते यावर अवलंबून असतो. उत्पादनापासून मिळणारी मुद्राराशी ही निरनिराळ्या प्राप्ती विश्लेषणाद्वारे स्पष्ट केली जात असते. निरनिराळे प्राप्ती वक्र हे उत्पादीत वस्तूसाठी असलेल्या मागणी वक्रावर अवलंबून असतात. मागणी ज्याप्रमाणे असेल त्याप्रमाणे प्राप्ती वक्राचे स्वरुप ठरत असते. प्राप्ती वक्राचा विचार करतांना एकूण प्राप्ती, सरासरी प्राप्ती व सीमांत प्राप्ती असा तिहेरी विचार करावा लागतो. श्रीमती जॉन रॉबिन्सन यांनी सरासरी आणि सीमांत प्राप्ती किंमत सिद्धांतानुसार वस्तूच्या किंमत निश्चितीत वापरली जाणारी महत्त्वाची दोन अवजारे (Tools) विकसीत केलीत.

**प्राप्तीच्या संकल्पनांचे महत्व**

व्यवसाय संस्थेच्या किंवा उत्पादन संस्थेच्या आर्थिक विश्लेषणात खर्चाच्या संकल्पनांइतकेच महत्व प्राप्तीच्या संकल्पनांना असते. हे महत्व पुढील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

**१) उत्पादन विषयक निर्णय घेण्यासाठी** : आर्थिक विश्लेषणात एकूण प्राप्ती, सरासरी प्राप्ती आणि सीमांत प्राप्ती. या प्रातीच्या संकल्पना उत्पादन विषयक निर्णय घेताना महत्त्वाच्या ठरतात. कारण त्यावरुन उत्पादनसंस्थेला कमाल नफा, सर्वसाधारण नफा किंवा तोटा होत आहे हे समजू शकते. त्यानुसार उत्पादन चालू ठेवायचे की, नाही हा निर्णय उत्पादक घेऊ शकतो.

**प्राप्तीच्या संकल्पनांचे महत्व**
**१) उत्पादन विषयक निर्णय घेण्यासाठी**
**२) उत्पादन क्षमतेचा वापर**
**३) समतोल निश्चिती**

**२) उत्पादन क्षमतेचा वापर** : व्यवसाय संस्थेचे उत्पादन पूर्ण क्षमतेनुसार होत आहे किंवा नाही हे प्राप्तीच्या संकल्पनांच्या आधारे समजू शकते. उदा. सरासरी खर्च वक्राच्या किमान बिंदूतून सरासरी प्राप्ती वक्र जात असेल तर उत्पादनसंस्था कार्यक्षम आहे. ती साधनसामुग्रीचा पर्याप्त वापर करीत आहे हे स्पष्ट होते.

**३) समतोल निश्चिती** : व्यवसायसंस्थेचा समतोल निश्चित करतांना प्राप्ती वक्रांचा आधार घेतला जातो. सीमांत खर्च आणि सीमांत प्राप्ती ज्या उत्पादन प्रमाणापाशी समान होतात आणि सीमांत प्राप्ती वक्र सीमांत खर्च वक्राला खालून वर छेदून जातो तेथे व्यवसायसंस्थेचा समतोल होतो.

**प्राप्तीचे प्रकार** (Types of Revenue)

**१) एकूण प्राप्ती** (Total Revenue-TR)

ग्राहकाने वस्तू खरेदी केल्यानंतर उत्पादकास दिलेली किंमत म्हणजे विक्रेत्यास होणारी प्राप्ती असते. या प्राप्तीचा निरनिराळ्या तीन प्रकारे विचार करणे आवश्यक आहे. ग्राहकाने दिलेली एकूण किंमत ही एकूण प्राप्ती दर्शवीत असते. एकूण प्राप्ती म्हणजे वस्तूंच्या विशिष्ट

**प्राप्तीचे प्रकार**
**१) एकूण प्राप्ती**
**२) सरासरी प्राप्ती**
**३) सीमांत प्राप्ती**

परिमाणासाठी ग्राहकाने दिलेली एकूण मुद्रा रक्कम होय. ही एकूण मुद्रा रक्कम ग्राहकाने वस्तूच्या पूर्ण राशीसाठी दिलेली मुद्रा राशी असते. वस्तूच्या विक्रीनंतर उद्योजकाला मिळणारी एकूण रक्कम म्हणजे एकूण प्राप्ती होईल. एकूण प्राप्ती हे उद्योगाचे एकूण उत्पन्न असते.

**सूत्र** **एकूण प्राप्ती = वस्तूंची किंमत x वस्तूंच्या नगांची संख्या**

**TR = P x Q**

एकूण प्राप्ती ही वस्तूच्या नगांची संख्या जशी वाढत जाईल त्याप्रमाणे वाढत असते व नंतर ती कमी होऊ लागते, कारण अशी एक मर्यादा येते की, ज्या मर्यादेपर्यंत वस्तूचे नग घेतले असता जास्तीत जास्त एकूण प्राप्ती मिळते; परंतु या मर्यादेनंतर एकूण प्राप्ती ही कमी होऊ लागते. उदा. समजा एखाद्या उत्पादकाने २०० रुपये प्रमाणे १५ टेबलांची विक्री केली तर एकूण प्राप्ती किती?

TR = Q x P

= १५ टेबल × २०० रु

∴ एकूण प्राप्ती = ३००० रुपये




एकूण प्राप्तीचा वक्र हा डावीकडून उजवीकडे र्शविला आहे. म्हणजेच सुरुवातीस धनात्मक उतार असतो व एका विशिष्ट मर्यादेनंतर मात्र एकूण प्राप्ती कमी होऊ लागते परिणाम: एकूण प्राप्तीच्या वक्रास शेवटी ऋणात्मक उतार प्राप्त होतो.

**२) सरासरी प्राप्ती** (Average Revenue-AR)

सरासरी प्राप्ती म्हणजे वस्तूची किंमत होय. वस्तूच्या किमतीस सरासरी प्राप्ती असे म्हणण्याचे कारण की, वस्तूची किंमत ही वस्तूच्या प्रत्येक नगासाठी द्याव्या लागणाऱ्या मुद्रेची राशी स्वतंत्रपणे दर्शविते तसेच सरासरी प्राप्ती सुद्धा वस्तूच्या प्रत्येक नगास द्याव्या लागणाऱ्या मुद्रेची राशी दर्शवीत असते. सरासरी प्राप्ती ही एकूण प्राप्तीस वस्तूच्या नगाच्या संख्येने भाग दिले असता येणाऱ्या भागाकाराबरोबर असते.

$$\text{सरासरी प्राप्ती} = \frac{\text{एकूण प्राप्ती}}{\text{वस्तूच्या नगांची संख्या}}$$

$$AR = \frac{TR}{TQ}$$

उदा. समजा उत्पादकाने १५ टेबल विकल्यानंतर एकूण प्राप्ती ३००० रुपये असेल सरासरी प्राप्ती किती?

$$\text{सरासरी प्राप्ती} = \frac{\text{एकूण प्राप्ती}}{\text{वस्तूच्या नगांची संख्या}}$$

$$AR = \frac{3000}{15}$$

∴ सरासरी प्राप्ती = २०० रुपये






सरासरी प्राप्ती हीच वस्तूची किंमत असल्यामुळे सरासरी प्राप्ती मागणी नियमानुसार बदलत असते. म्हणजेच वस्तूचा मागणी वक्र हाच सरासरी प्राप्तीचा वक्र असतो. वस्तूची मागणी ही मागणी नियमानुसार बदलत असते. म्हणजेच वस्तूची किंमत वाढल्यास वस्तूची मागणी कमी होते आणि वस्तूची किंमत कमी झाल्यास वस्तूंची मागणी वाढते. या मागणी नियमानुसार असे सांगता येईल की, विक्री परिमाणात जसजशी वाढ होत जाईल तसतशी सरासरी प्राप्तीमध्ये घट होत असते.

**३) सीमांत प्राप्ती** (Marginal Revenu-MR)

सीमांत प्राप्ती म्हणजेच वस्तूच्या विक्री परिमाणात एका नगाने वाढ केली असता एकूण प्राप्तीत होणारी वाढ होय. वस्तूंच्या एकंदर प्राप्तीत होणाऱ्या वाढीस जर वस्तूंच्या विक्रीत होणाऱ्या वाढीने भाग दिले असता त्या स्थितीत सीमांत प्राप्ती मिळते. एका जादा नगसंख्येच्या विक्रीनंतर एकूण प्राप्तीत झालेली निव्वळ वाढ म्हणजे सीमांत प्राप्ती होय.

**सूत्र**

$$\text{सीमांत प्राप्ती} = \frac{\text{एकूण प्राप्तीत होणारा बदल}}{\text{वस्तूच्या विक्री परिमाणात होणारा बदल}}$$

$$MR = \frac{\Delta TR}{\Delta TQ}$$

उदा. समजा उत्पादकाने २० टेबलाच्या विक्रीनंतर एकूण प्राप्ती ४००० रुपये असेल आणि २१ व्या टेबलाच्या विक्रीनंतर एकूण प्राप्ती ४२०० रुपये एवढी झाली असेल तर सीमांत प्राप्ती किती?

$$MR = \frac{200}{1}$$

∴ सीमांत प्राप्ती = २०० रुपये




सीमांत प्राप्ती ही वस्तूचे विक्री परिमाण जसजसे वाढत जाते त्याचबरोबर सीमांत प्राप्ती कमी होत असते. सुरुवातीस सीमांत प्राप्ती ही सरासरी प्राप्ती बरोबर असते. मात्र, सरासरी प्राप्तीमध्ये जशी घट होईल त्यापेक्षा अधिक वेगाने घट सीमांत प्राप्तीत होत असते. त्यामुळे सीमांत प्राप्तीचा वक्र हा सरासरी प्राप्ती वक्राच्या खालच्या बाजूस असतो. सीमांत प्राप्तीचा वक्र हा मागणीची लवचिकता एकापेक्षा जास्त असेल तरच धनात्मक सीमांत प्राप्ती दाखवितो. मात्र मागणीची लवचिकता एकापेक्षा कमी झाल्यास सीमांत प्राप्तीचा वक्र ऋणात्मक दर्शवितो.

**एकूण, सरासरी आणि सीमांत प्राप्ती यांचा परस्परसंबंध**

| वस्तूचे विक्री परिमाण (Q) | मागणी किंमत (P) | एकूण प्राप्ती (TR) | सरासरी प्राप्ती (AR) | सीमांत प्राप्ती (MR) |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1 | 10 | 10 | 10 | 10 |
| 2 | 9 | 18 | 9 | 8 |
| 3 | 8 | 24 | 8 | 6 |
| 4 | 7 | 28 | 7 | 4 |
| 5 | 6 | 30 | 6 | 2 |
| 6 | 5 | 30 | 5 | 0 |
| 7 | 4 | 28 | 4 | -2 |

तक्त्यात वस्तूची मागणी किंमत ही मागणी नियमाच्या आधारावर गृहीत धरली आहे. वस्तूच्या विक्री परिमाणातील वाढ केवळ ऱ्हासमान किमतीस शक्य आहे म्हणून किंमत विक्री परिमाण वाढीसोबत कमी होते या गृहीतावर हा तक्ता पूर्ण केला आहे. या तक्त्यावरुन असे लक्षात येते की, वस्तूचे परिमाण वाढत असताना एकूण प्राप्ती विशिष्ट मर्यादेपर्यंत वाढते मात्र या मर्यादेनंतर एकूण प्राप्ती कमी कमी होत जाते. सरासरी प्राप्ती ही सुरुवातीपासून शेवटपर्यंत सारखी कमी होत आहे. सीमांत प्राप्ती ही कमीच होत जाते. मात्र सीमांत प्राप्तीत होणारी घट सरासरी प्राप्तीत होणाऱ्या घटीपेक्षा जास्त असते. एकूण प्राप्तीतील महत्तम वाढीजवळ सीमांत प्राप्ती शून्य होते. एकूण प्राप्ती जेव्हा कमी होऊ लागते तेव्हा सीमांत प्राप्ती ही ऋणात्मक असते. सरासरी आणि सीमांत प्राप्ती यांचा एकूण प्राप्तीशी असलेला संबंध दोन समीकरणात दाखविता येऊ शकतो.

१) एकूण प्राप्ती = सरासरी प्राप्ती × नगांची संख्या

२) एकूण प्राप्ती = Σ सीमांत प्राप्ती (सिग्मा हा एकूण बेरीज दर्शवितो)

विक्री परिमाण ३ नग असतांना एकूण प्राप्ती=८×३ (तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे) या विक्री परिमाण आणि सरासरी प्राप्तीच्या गुणाकाराबरोबर तसेच १० + ८ + ६ या सीमांत प्राप्तीचे बेरजेबरोबर म्हणजेच २४ आहे.

**३.३ उत्पादनातील मितव्ययता आणि अमितव्ययता** (Economies & Dis-economies in Production)

उत्पादनाच्या प्रक्रियेत उत्पादकाच्या दृष्टीने उत्पादन खर्च व प्राप्तीच्या विश्लेषणाबरोबरच उत्पादनातील अंतर्गत व बहिर्गत फायदे किंवा मितव्ययता सुद्धा प्राप्त होतात. आर्थिक विकासाच्या सुरुवातीच्या अवस्थेत अत्यंत कमी प्रमाणात उत्पादन घेतले जात असे. केवळ ग्राहकांच्या गरजांची पूर्तता करणे एवढेच उत्पादन कार्याचे उद्दिष्ट होते. परंतु आर्थिक विकास जसजसा होत गेला तसतसे उत्पादनाचे प्रमाण देखील वाढत गेले. औद्योगिक क्रांतीमुळे यंत्राचा शोध लागला. १० श्रमिकांचे कार्य आता उद्योगात एक यंत्र करु लागले. त्याचप्रमाणे उत्पादनासाठी लागणारा वेळ देखील यंत्रामुळे कमी झाला त्यामुळे उत्पादनाच्या प्रमाणात प्रचंड वाढ झाली. उत्पादनाच्या प्रक्रियेत श्रम, भांडवल, भूमी या उत्पादक घटकांच्या उपयोगितेचा आणि उत्पादकतेचा संपूर्णपणे उपयोग करता यावा यासाठी उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न प्रत्येकच पेढी करु लागले. जेव्हा एखादी उत्पादन करणारी उत्पादन संस्था, उद्योग, पेढी उत्पादन घटकांच्या प्रमाणात वाढ करुन उत्पादनात वाढ करतात. तेव्हा त्या संस्थेस फायदे किंवा बचती मिळतात.

जेव्हा एखादी पेढी किंवा उत्पादक मोठ्या प्रमाणावर उत्पादन घेत असेल तर त्याला महामान उत्पादन/मितव्ययता/बचती/फायदे असे म्हणतात. पेढीला अंतर्गत व बहिर्गत असे दोन फायदे मिळतात.

**अ) उत्पादनातील मितव्ययता/फायदे/बचती** (Economics in Production)

श्री क्रेनक्रॉस यांच्या मते, 'एका उद्योगाला किंवा पेढीला मिळणाऱ्या बचती म्हणजे आंतरिक बचती होय.' उत्पादन क्रियेत परिमाण प्रत्यय नियमानुसार, जेव्हा आदानामध्ये वाढ केली जात असते तेव्हा त्या परिस्थितीत निरनिराळ्या काही आंतरिक मितव्ययता निर्माण होतात. आंतरिक मितव्ययता निर्माण होण्याचे प्रमुख कारण म्हणजे उत्पादन घटकांची अविभाज्यता. उदा. यंत्र, व्यवस्थापक, जाहिरात, विक्री खर्च इत्यादी उत्पादनाचे प्रमाण जसजसे वाढत जाते, तसतसे त्या घटकांचा पूर्णपणे उपयोग होत असतो आणि पेढीला अंतर्गत बचती मिळतात. दुसरे कारण म्हणजे विशेषीकरण. उत्पादनात वाढ झाल्यामुळे पेढीचा आकार वाढतो त्यामुळे पेढीला श्रम विभागणीच्या तंत्राचा अवलंब करता येतो. श्रम विभागणीमुळे श्रमिकांच्या कार्यक्षमतेत वाढ होते कारण त्यांच्या कार्यात कौशल्य संपादन करता येते. त्यामुळे उत्पादन खर्चात घट होऊन पेढीला अंतर्गत बचती प्राप्त होतात. आंतरिक मितव्ययता पुढील प्रमाणे.

**i) आंतरिक फायदे/बचती/मितव्ययता** (Internal Economics)

**अ) उत्पादनातील मितव्ययता**

**i) आंतरिक मितव्ययता**

**अ) उत्पादन तंत्रात सुधारणा**

उत्पादन वाढीबरोबर उत्पादन संस्थेची, पेढीची वाढ होत असतांना उत्पादन तंत्रात सुधारणा होत असतात व उत्पादन वाढीचा वेग वाढत जातो. या तांत्रिक सुधारणा पुढीलप्रमाणे.

**१) महामान उत्पादनाचा फायदा :** उत्पादन वाढीबरोबर उत्पादन वाढीचा आकार वाढत असल्यामुळे उत्पादन पेढीसाठी मोठ्या आकाराची यंत्रसामग्री वापरता येते. त्यामुळे उत्पादनाचा वेग वाढतो व मितव्ययता मिळतात. उत्पादनाची पेढी लहान असताना अशा प्रकारचे फायदे त्या पेढीला प्राप्त होत नाही.

**२) अत्याधुनिक यंत्राचा वापर :** उत्पादन पेढीचे आकारमान वाढल्यास अत्याधुनिक आणि वेगाने उत्पादन करणाऱ्या महान यंत्रसामग्रीचा वापर करणे शक्य होते. या यंत्रसामग्रीच्या वापराचा परिणाम उत्पादनाच्या वेगात वाढ होण्याकडे होत असतो. त्यामुळे मितव्ययता मिळतात.

**३) श्रम विभागणी आणि वैशिष्टीकरण :** उत्पादनात पेढीचा व्याप वाढत असतांना उत्पादन पेढीस उत्पादनाच्या निरनिराळ्या प्रक्रियामधील निरनिराळी कार्य मजुरांमध्ये वाटून देणे शक्य होते. मजुरांमध्ये कार्यवाटप केल्यामुळे प्रत्येक जण आपल्या कार्यात तरबेज होतो व अधिक वेगाने उत्पादन कार्य करु शकतो. प्रत्येकास आपल्या विशेष कार्याची माहिती प्राप्त होते. तसेच प्रत्येक प्रक्रियेसाठी विशेष तज्ञांची नेमणूक करणे उत्पादन संस्थेला शक्य होते आणि त्याचा परिणाम उत्पादनाचा वेग वाढण्याकडे होत असतो. परिणामतः उत्पादनात आंतरिक मितव्ययता प्राप्त होते.

**४) उप–उत्पादनाचा वापर/दुय्यम वस्तूंचे उत्पादन :** उत्पादन पेढीत मुख्य उत्पादनाबरोबर अनेक उप–पदार्थ तयार होतात. उदा. साबणाच्या कारखान्यात साबणाबरोबर ग्लिसरीन तयार होते हे उप–पदार्थ पेढीचा आकार अत्यंत लहान असला तर वापरता येत नाही. परंतु पेढीचा आकार वाढल्यास उप–पदार्थ वापरता येतील अशी यंत्रसामग्री पेढीस खरेदी करणे शक्य होते आणि परिणामतः पेढीच्या उत्पादनात उप–पदार्थापासून होणाऱ्या उत्पादनाची भर पडते व पेढीस उत्पादन परिमाणात फायदा होतो. साखर कारखान्यात चिपळापासून कागद तयार करता येतो. मळीपासून अल्कोहोल तयार करता येतो.

**अ) उत्पादन तंत्रात सुधारणा**
**१) महामान उत्पादनाचा फायदा**
**२) अत्याधुनिक यंत्राचा वापर**
**३) श्रम विभागणी**
**४) उप–उत्पादनाचा वापर**
**ब) विपणन कार्यात मितव्ययता**
**क) प्रत्ययाच्या उपलब्धतेत सुलभता**
**ड) व्यवस्थापकीय सुधारणा**
**इ) जोखमीतील बचत**
**फ) वित्तीय बचती**
**ii) बाह्य मितव्ययता**
**१) दळणवळणाच्या साधनात वाढ**
**२) उप–उद्योगांची स्थापना**
**३) बँकांची वाढ**
**४) प्रशिक्षण केंद्राची स्थापना**
**५) संशोधन संस्थांची स्थापना**
**ब) उत्पादनातील अमितव्ययता**
**i) आंतरिक अमितव्ययता/तोटे**
**१) कार्य विलंब वाढणे**
**२) अयोग्य अधिकाऱ्यांची नियुक्ती**
**३) कामगार कलहात वाढ**
**४) अवजड यंत्रसामग्रीचा वापर मर्यादेच्या बाहेर होऊ लागतो**
**ii) बाह्य अमितव्ययता**
**१) वाहतूक व्यवस्थेवर पडणारा ताण**
**२) मजुरांचा पुरवठा कमी पडू लागतो**
**३) जमिनीचा तुटवडा आणि किंमतवाढ होणे**
**४) अधिकोषण व्यवस्थेवर येणारा ताण**
**५) विजेचा तुटवडा**

वरील सर्व तांत्रिक लाभ मिळाल्यामुळे उत्पादन पेढी उत्पादनाचा वेग वाढवू शकते आणि उत्पादन पेढीस आंतरिक मितव्ययता प्राप्त होते.

**ब) विपणन कार्यात मितव्ययता :** उत्पादन पेढीला विपणन कार्यात दोन प्रकारचे कार्य करावे लागते. एक उत्पादक घटकांची खरेदी आणि दोन तयार मालाची विक्री. उत्पादन पेढीचा आकार वाढत असतांना मोठ्या पेढीस कच्च्या मालाची खरेदी करणे सोयीचे होते. मोठ्या प्रमाणावर कच्चामाल पेढी स्वस्तात खरेदी करु शकते किंवा स्वतःच कच्च्या मालाचे उत्पादन करु लागते. (उदा. मोठमोठ्या साखर कारखानंद्वारे उसाच्या मळ्यांची लागवड) परिणामतः कच्चामाल नियमितपणे मिळाल्याने उत्पादनाचा वेग वाढतो. त्याचप्रमाणे विपणनातील दुसरे कार्य पक्क्या मालाची विक्री करण्याची आहे. मोठ्या पेढ्यांना विक्री कार्यात सुलभता प्राप्त होते; कारण मोठी उत्पादन संस्था वाहतुकीची मोठ्या प्रमाणावर साधने वापरु शकते. याशिवाय मोठ्या प्रमाणावर जाहिरात झाल्यामुळे मागणी जास्त येते आणि मोठी उत्पादन संस्था विक्री क्रिया वेगाने करु शकते विक्री क्रिया लवकर झाल्यास नवीन उत्पादन करण्यास पेढीस आर्थिक उत्साह येतो. परिणामतः उत्पादनात वेगाने वाढ होते.

**क) प्रत्ययाच्या उपलब्धतेत सुलभता :** उत्पादन पेढीचा आकार वाढत असतांना उत्पादन पेढीची पत वाढत जाते, परिणाम: अधिकोषाद्वारे मोठ्या प्रमाणावर कर्ज पेढीला मिळू शकते. मोठ्या प्रमाणावर कर्ज मिळाल्यामुळे पेढ्या अधिक वेगाने जास्त उत्पादन काढू शकतात.

**ड) व्यवस्थापकीय सुधारणा :** उत्पादन पेढीचा आकार वाढत असतांना व्यवस्थापकीय पद्धतीत सुधारणा करु शकते. व्यवस्थापकांनी व्यवस्थापन पद्धतीत असलेल्या आधुनिक सुधारणांचा वापर करणे पेढीस शक्य असते. आधुनिक पद्धतीच्या व्यवस्थापनासाठी उत्पादन पेढी तज्ञ अशा व्यवस्थापकांची नेमणूक करु शकते. या नेमणुकीचा फायदा उत्पादनात उत्पादन वेग वाढण्यात होतो.

**इ) जोखमीतील बचत :** जास्त जोखीम स्वीकारणाऱ्या पेढ्यांना जास्त नफा मिळतो. मोठ्या पेढ्या आपल्या जोखीमीचे विभाजन करु शकतात. एका वस्तूच्या उत्पादनातील तोटा दुसऱ्या वस्तूच्या नफ्यातून ते सहज भरुन काढू शकतात. त्यामुळे त्यांची जोखीम बऱ्याचशा प्रमाणात कमी होते. त्यातून बचती घडून येतात.

**फ) वित्तीय बचती :** मोठ्या आकाराच्या पेढ्यांना मोठ्या प्रमाणावर नावलौकिक प्राप्त झालेला असतो. त्यामुळे त्यांना कमी व्याज दरावर मोठ्या प्रमाणात भांडवलाचा पुरवठा सहज होतो. अशा रीतीने आंतरिक मितव्ययता उत्पादनात वाढ होत असताना प्राप्त होऊ शकते आणि तेव्हाच वर्धी परिमाण प्रत्यय नियम कार्यान्वित होत असतो.

**ii) बाह्य मितव्ययता/बचती/ फायदे** (External Economics)

पेढीचा आकार वाढत असताना पेढीला अंतर्गत बचती बरोबर बाह्य बचती देखील मिळू शकतात. श्री क्रेनक्रॉस यांच्या मते, ''बाह्य बचती या कोणत्याही एका पेढीला मिळत नसून त्यांचा फायदा संपूर्ण उद्योगातील सर्वच पेढ्यांना होतो. हा फायदा बाह्य वातावरणातून प्राप्त होत असल्यामुळे त्यास बाह्य मितव्ययता असे म्हणतात.'' उत्पादन पेढीस मिळणाऱ्या बाह्य मितव्ययता, बचती, फायदे खालीलप्रमाणे.

**१) दळणवळणाच्या साधनात वाढ :** उत्पादन पेढीचा व्याप वाढत असतांना स्थानिक संस्था किंवा राज्य सरकार यासारख्या प्रादेशिक संस्था दळणवळणाच्या साधनांची उपलब्धता वाढवितात. दळणवळणाच्या साधनात वाढ झाल्यामुळे उत्पादन पेढीस कच्चामाल वेळेवर प्राप्त होऊ शकतो. त्याचप्रमाणे पक्का माल बाजारपेठेत विक्रीस जाऊ लागतो. त्यामुळे उत्पादन प्रक्रियेत सुलभता प्राप्त होऊन पेढीच्या उत्पादनात वेगाने वाढ होते.

**२) उप-उद्योगांची स्थापना :** उत्पादन पेढीत लाभ असताना इतर उप-उद्योगांची वाढ पेढीच्या परिसरात होऊ लागते. उदा. उत्पादन पेढी मोठ्या प्रमाणावर वीज वापरत असेल तर पेढीच्या परिसरातच पेढीला साहाय्य करण्यासाठी वीज निर्मिती केंद्राची स्थापना सरकारी किंवा खाजगी संस्थांद्वारे केली जाते. याचा फायदा उत्पादन संस्थेस लागणारी वीज सहज मिळाल्यामुळे उत्पादनाचा वेग वाढण्यात मदत होते. उत्पादन पेढीस लागणाऱ्या यंत्रसामग्रीच्या सुट्या भागांची निर्मिती करणाऱ्या कारखान्याची वाढ होते आणि सुटे भाग वेळेवर मिळाल्यामुळे दुरुस्ती कार्य सुलभ होऊन उत्पादनाचा वेग वाढत असतो.

**३) बँकांची वाढ :** उद्योगाच्या विकासाबरोबर उद्योगाचे आणि त्यावर अवलंबून असणाऱ्या उप-उद्योगांचे अर्थप्रबंधन करण्यासाठी बँकांच्या शाखा उद्योगाच्या परिसरात उघडल्या जातात. या शाखा उत्पादन संस्थेला पैसा वेळेवर उपलब्ध करुन देतात. पैसा लवकर उपलब्ध झाल्याने उत्पादन संस्था उत्पादनाचा वेग वाढवू शकतात.

**४) प्रशिक्षण केंद्राची स्थापना :** उत्पादन संस्थांचा व्याप वाढत असतांना संस्थांना लागणाऱ्या प्रशिक्षित कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षण संस्था पेढीच्या परिसरात वाढू लागतात. प्रशिक्षित कर्मचाऱ्यांचा पुरवठा मुबलक प्रमाणात झाल्यामुळे उत्पादनाचा वेग जास्त प्रमाणात वाढू लागतो.

**५) संशोधन संस्थांची स्थापना :** उत्पादन पेढीच्या परिसरात पेढीचा व्याप वाढत असतांना खाजगी किंवा सार्वजनिक सत्तेद्वारे संशोधन संस्था स्थापन केल्या जातात. या संशोधन संस्थांच्या स्थापनेद्वारे उत्पादनात असलेल्या नवीन प्रक्रियांचा शोध लावला जातो. नवीन प्रक्रियेच्या शोधामुळे उत्पादन वाढीचा फायदा मिळू लागतो या सर्व बाह्य मितव्ययता उत्पादन पेढीस तिचे आकार वाढत असतांना प्राप्त होत असतात. या बाह्य मितव्ययतेमुळे उत्पादनाचा वेग वाढवून उत्पादनात वर्धी परिमाण प्रत्यय नियम कार्यान्वित होत असतो.

**ब) उत्पादनातील अमितव्ययता/तोटे** (Diseconomics in Production)

उत्पादन पेढीचा व्याप वाढत असतांना मिळणारी निरनिराळी आंतरिक आणि बाह्य मितव्ययता विशिष्ट मर्यादेपर्यंत प्राप्त होते. मात्र ही मर्यादा ओलांडून गेल्यानंतर परिस्थिती उलट होत असते. उत्पादन पेढीच्या वाढत्या व्यापाराबरोबर अनेक नुकसानी अथवा अमितव्ययता उत्पादन पिढीस प्राप्त होऊ लागतात. या अमितव्ययता सुद्धा आंतरिक आणि बाह्य अशा दोन प्रकारच्या असतात. अमितव्ययतांचा पेढीवर होणारा परिणाम म्हणजे उत्पादनात ऱ्हासमान प्रत्यय नियम कार्यान्वित होऊ लागतो.

**i) आंतरिक अमितव्ययता/तोटे** (Internal Dis-economics) : उत्पादन पेढीचे आकारमान सतत वाढत गेल्यास पेढीच्या अंतर्गत संचालनात अनेक अडचणी निर्माण होतात. या अनेक अडचणीमुळे आंतरिक अमितव्ययता प्राप्त होतात त्या पुढीलप्रमाणे.

**१) कार्य विलंब वाढणे :** उत्पादन पेढीचा व्याप फार मोठा झाल्यास उत्पादनाच्या निरनिराळ्या विभागात होणाऱ्या कार्यात विलंब होऊ लागतो. निरनिराळ्या विभागाचे परस्परांशी सुसूत्रीकरण करणे अडचणीचे होते त्यामुळे निरनिराळे कार्य योग्य वेळी पूर्ण होत नाही मुख्य कार्यपालांचा आणि मजुरांचा संबंध दूरचा होतो त्यामुळे उत्पादन क्रियेत उत्पादन किती वेगाने होते याची नक्की कल्पना मुख्य कार्यपालकास न आल्यामुळे उत्पादन क्रियेचा वेग मंदावू लागतो.

**२) अयोग्य अधिकाऱ्यांची नियुक्ती :** उत्पादनाचा व्याप वाढत असतांना अनेकदा नवीन अधिकाऱ्यांची भरती करुन घ्यावी लागते. ही भरती होत असताना अनेकदा योग्य अनुभव नसलेल्या अधिकाऱ्यांची नियुक्ती होत असते. त्याचा परिणाम असा होतो की, त्या अधिकाऱ्याद्वारे वेगाने काम होऊ शकत नाही. हीच अडचण मजुरांच्या नियुक्ती मध्ये सुद्धा होते. कमी कुशल मजुरांची नियुक्ती झाल्यामुळे उत्पादन पेढीतील उत्पादनाचा वेग मंदावतो.

**३) कामगार कलहात वाढ :** उत्पादन पेढीचा व्याप वाढत असतांना कामगारांची संख्या वाढते कामगारांचा आणि व्यवस्थापकांचा संबंध दूर होऊ लागतो. परिणामतः कामगारांमध्ये अशांतता निर्माण होते. या अशांततेतून कामगार संघटना प्रबळ होते आणि औद्योगिक कलह वाढू लागतो. औद्योगिक कलह वाढल्यामुळे संप आणि टाळेबंदी वाढून उत्पादन प्रक्रिया खंडित होते परिणामतः एकूण उत्पादनाचा वेग कमी होऊ लागतो.

**४) अवजड यंत्रसामग्रीचा वापर मर्यादेच्या बाहेर होऊ लागतो :** अवजड यंत्रसामग्री ही एका विशिष्ट मर्यादेपर्यंत योग्य रीतीने वापरता येते. मर्यादेबाहेर यंत्रसामग्री वापरल्यास त्याचा परिणाम म्हणजे यंत्रावर ताण येऊ लागतो आणि वारंवार यंत्रे नादुरुस्त होतात. त्यामुळे उत्पादन क्रियेत वेळोवेळी खंड पडतो आणि उत्पादनात अमितव्ययता निर्माण होऊ लागते.

**ii) बाह्य अमितव्ययता/तोटे** (External Dis-economics) : उत्पादन वाढीबरोबर अनेक बाह्य अमितव्ययता प्राप्त होतात बाह्य अमितव्ययता मूळ उत्पादन संस्थेसारख्या अनेक उत्पादन संस्था, मूळ संस्थेच्या परिसरात स्थापन झाल्यामुळे होणाऱ्या गर्दीचा परिणाम होतो. या गर्दीचा परिणाम निरनिराळ्या आदानांच्या पुरवठ्यावर ताण निर्माण करतो. त्यामुळे उत्पादन संस्थेस आवश्यक आदाने व आवश्यक सेवा प्राप्त होत नाही त्यामुळे बाह्य अमितव्ययता पुढील प्रमाणे निर्माण होतात.

**१) वाहतूक व्यवस्थेवर पडणारा ताण :** उत्पादन संस्थांची संख्या वाढल्यामुळे विशिष्ट प्रदेशात असलेल्या वाहतुकीची सेवा कमी पडते. त्यामुळे वेळेवर कच्चामाल उपलब्ध होऊ शकत नाही किंवा पक्का माल पळून राहतो. परिणामतः उत्पादन वाढ पूर्वीइतक्या जास्त वेगाने करता येत नाही.

**२) मजुरांचा पुरवठा कमी पडू लागतो :** एकाच प्रकारचे उद्योग एकाच प्रदेशात केंद्रित झाल्यामुळे मजुरांचा पुरवठा कमी पडू लागतो मजूर टंचाईमुळे उत्पादन वाढीचा वेग कमी होऊ लागतो.

**३) जमिनीचा तुटवडा आणि किंमतवाढ होणे :** उत्पादन प्रक्रियेसाठी जमीन मोठ्या प्रमाणावर लागत असल्यास आणि उत्पादन संस्थांची गर्दी झाल्यास जमिनीची किंमत फार वाढू लागते. परिणामतः उत्पादन प्रक्रियेत अनेक अडचणी निर्माण होतात आणि उत्पादनाचा वेग उत्पादकास वाढविणे कठीण होऊन बसते.

**४) अधिकोषण व्यवस्थेवर येणारा ताण :** उत्पादन पेढ्याच्या संख्येत वाढ झाल्यामुळे असलेल्या बँकांवर ताण पडतो. त्यामुळे वेळेवर कर्ज उपलब्ध न झाल्यामुळे उत्पादनात अडथळा येत असतो व उत्पादनाचा वेग कमी होऊ लागतो.

**५) विजेचा तुटवडा :** वीज केंद्रामुळे कारखान्यांचा व्याप वाढल्यामुळे सर्व कारखान्यांना पुरेशी वीज दिली जाऊ शकत नाही. परिणामतः अनेकदा विजेच्या पुरवठ्यात खंड पडतो. त्यामुळे उद्योगांच्या उत्पादन क्रियेत खंड निर्माण होतो.

या सर्व बाह्य अमितव्ययता उत्पादन संस्थांची गर्दी एकाच प्रदेशात वाढल्यास निर्माण होतात आणि यांचा परिणाम ऱ्हासमान परिमाण प्रत्यय नियम कार्यान्वित होतो.

## प्रश्नसंग्रह

### वस्तुनिष्ठ प्रश्न

१) उत्पादना दरम्यान समाजाला अप्रत्यक्षपणे कोणते खर्च सहन करावे लागतात?
अ) आर्थिक खर्च ब) सरासरी खर्च क) वैकल्पिक खर्च **ड) वास्तविक खर्च**

२) कोणता वक्र U आकाराचा नाही?
अ) AC **ब) AFC** क) MC ड) AVC

३) .... खर्च जे हिशेब किंवा लेखा पुस्तकांमध्ये समाविष्ट नाहीत.
अ) आर्थिक खर्च ब) वास्तविक खर्च क) प्रत्यक्ष खर्च **ड) अप्रत्यक्ष खर्च**

४) एकूण किंमत २०० रुपये असल्यास आणि वस्तूची उत्पादन मात्रा २० मात्रा असेल तर सरासरी किंमत?
**अ) १०** ब) २० क) ३० ड) ४०

५) उत्पादनाच्या किंमतीला विकल्या गेलेल्या प्रमाणाने गुणाकार केल्यास –
अ) सरासरी प्राप्ती **ब) एकूण प्राप्ती** क) सीमान्त प्राप्ती ड) सरासरी उत्पादन

६) जर एका महिन्यात १० रु. या दराने एकूण २०० मात्रांची विक्री केल्यास सरासरी प्राप्ती होईल.
अ) ५० **ब) २०** क) २५ ड) १०

७) उपभोक्त्याने वस्तू खरेदीसाठी दिलेली किंमत म्हणजे विक्रेत्यांचे .... होय.
अ) खर्च ब) बचत **क) उत्पन्न** ड) नफा

८) ग्राहकाने दिलेली एकूण किंमत ही विक्रेत्याची एकूण ..... दर्शविते.
अ) बचत **ब) प्राप्ती** क) खर्च ड) उत्पादन

९) एकूण प्राप्तीस वस्तूच्या नगसंख्येने भागले असता ..... प्राप्ती मिळते.
**अ) सरासरी** ब) सीमांत क) एकूण ड) उत्पादन

१०) वस्तूचा मागणी वक्र हाच वस्तूचा ...... प्राप्ती वक्र असतो.
अ) सीमांत **ब) सरासरी** क) एकूण ड) बचत

११) ढोबळमानाने वस्तूच्या उत्पादनासाठी उत्पादकाला अनेक बाबींवर जो खर्च करावा लागतो त्या सर्वांची बेरीज म्हणजे उत्पादनाचा ..... होय.
अ) नफा **ब) एकूण खर्च** क) एकूण तोटा ड) नफा

१२) वास्तव खर्चालाच ...... खर्च असेही म्हणतात.
**अ) सामाजिक** ब) सरासरी क) सीमांत ड) बचत

१३) ............. हा बाह्य बचतीचा एक प्रकार आहे.
**अ) माहिती विषयक बचती** ब) तांत्रिक बचती क) भांडवल विषयक बचती ड) उत्पादन विषयक बचती

१४) अंतर्गत बचती या ...... उद्योगांनाच मिळतात.
**अ) विशिष्ट** ब) मोठ्या क) लहान ड) सूक्ष्म

१५) उत्पादकाला एखादी वस्तू उत्पादन करण्यासाठी पैशाच्या स्वरुपात जो खर्च येतो त्याला ...... असे म्हणतात.
अ) वास्तव खर्च **ब) मौद्रिक खर्च** क) संधी खर्च ड) बचत

१६) मौद्रिक खर्चात ............. खर्च असतात.
**अ) व्यक्त आणि अव्यक्त** ब) खाजगी आणि सामाजिक क) लेखाव्यय आणि आर्थिक व्यय ड) वैकल्पिक

१७)..... खर्चाला पुरक खर्च असेही म्हणतात.

अ) बदलत्या ब) एकूण **क) स्थिर** ड) वैकल्पिक

१८) उत्पादन प्रमाणाबरोबर जो खर्च बदलत नाही त्या खर्चाला ...... खर्च असे म्हणतात.

अ) एकूण **ब) स्थिर** क) बदलता ड) वैकल्पिक

१९) उत्पादनात एका नगसंख्येने वाढ झाल्यास एकूण उत्पादन खर्चातील निव्वळ वाढीला.....खर्च म्हणतात.

अ) सरासरी ब) एकूण **क) सीमांत** ड) बदलता

२०) सीमांत खर्च वक्र सरासरी खर्च वक्राला छेदून जातो त्याठिकाणी सरासरी खर्च ..... असतो.

अ) सर्वाधिक **ब) सर्वात कमी** क) शून्य ड) नाही

२१) उत्पादनातील वाढीबरोबर एका विशिष्ट मर्यादेपर्यंत सरासरी व सीमांत खर्च या दोहोत ...... होते.

अ) वाढ **ब) घट** क) स्थिर ड) सरासरी

२२) सरासरी उत्पादन खर्चात घट होत असताना ...... खर्च त्यापेक्षा अधिक वेगाने घटत जातो.

**अ) सीमांत** ब) सरासरी क) एकूण ड) स्थिर

**लघुत्तरी प्रश्न**

१) सरासरी प्राप्ती व सीमांत प्राप्ती स्पष्ट करा.

२) पैशातील खर्चाची संकल्पना स्पष्ट करा.

३) वैकल्पिक खर्चाची संकल्पना स्पष्ट करा.

४) एकूण खर्च वक्र स्पष्ट करा.

५) सरासरी व सीमांत प्राप्ती मधील सहसंबंध स्पष्ट करा.

६) बाह्य बचतीचे तोटे सांगा.

७) अंतर्गत बचती कोणत्या आहेत?

८) खर्चाचे विविध प्रकार सांगा.

९) संधी त्याग खर्चाचे महत्त्व सांगा.

१०) एकूण, सरासरी व सीमांत प्राप्तीची सूत्रात मांडणी करुन सूत्राच्या साहाय्याने खालील तक्ता पूर्ण करा.

| Q | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
|---|---|---|---|---|---|
| AR (Rs.) | 6 | ? | 4 | ? | ? |
| MR (Rs.) | ? | 4 | ? | 0 | ? |
| TR (Rs.) | 6 | ? | ? | ? | 10 |

(Ans- AR-5,3,2 MR-6,2,-2 TR-10,12,12)

११) सूत्राची मांडणी करुन खालील तक्ता पूर्ण करा.

| Q | TFC | TVC | TC | AFC | AVC | ATC | MC |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 0 | 20 | ? | 20 | - | - | - | - |
| 1 | 20 | ? | 30 | ? | ? | ? | ? |
| 2 | 20 | ? | 38 | ? | ? | ? | ? |
| 3 | 20 | ? | 44 | ? | ? | ? | ? |
| 4 | 20 | ? | 49 | ? | ? | ? | ? |
| 5 | 20 | ? | 53 | ? | ? | ? | ? |
| 6 | 20 | ? | 59 | ? | ? | ? | ? |

(Ans-TVC-0, 10, 18, 24, 29, 33, 39 AFC-20, 10, 6.67, 5, 4, 3.33 AVC-8, 7, 6, 6, 6.8, 8.33 ATC-28, 17, 12.67, 11, 10.8, 11.66 MC-10, 8, 6, 5, 4, 6)

१३) सूत्राची मांडणी करुन खालील तक्ता पूर्ण करा.

| Q | TFC | TVC | TC | AFC | AVC | ATC | MC |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 0 | 20 | ? | 20 | - | - | - | - |
| 1 | 20 | ? | 35 | ? | ? | ? | ? |
| 2 | 20 | ? | 40 | ? | ? | ? | ? |
| 3 | 20 | ? | 42.5 | ? | ? | ? | ? |
| 4 | 20 | ? | 45 | ? | ? | ? | ? |
| 5 | 20 | ? | 50 | ? | ? | ? | ? |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | 20 | ? | 59 | ? | ? | ? | ? |
| 7 | 20 | ? | 69 | ? | ? | ? | ? |

(Ans-TVC-0, 15, 20, 22.5, 25, 30, 49 AFC-20, 10, 6.67, 5, 4, 3.33 AVC-15, 10, 7.5, 6.25, 6, 8.16 ATC-35, 20, 14.17, 11.25, 10, 11.49 MC-15, 5, 2.5, 2.5, 5, 9,10)

१४) सूत्राच्या साहाय्याने खालील तक्त्यातून खर्चाच्या संकल्पना काढा.

| Q | TFC | TVC | TC | AFC | AVC | ATC | MC |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 0 | 20 | 0 | ? | - | - | - | - |
| 1 | 20 | 10 | ? | ? | ? | ? | ? |
| 2 | 20 | 20 | ? | ? | ? | ? | ? |
| 3 | 20 | 22.5 | ? | ? | ? | ? | ? |
| 4 | 20 | 30 | ? | ? | ? | ? | ? |
| 5 | 20 | 40 | ? | ? | ? | ? | ? |
| 6 | 20 | 51 | ? | ? | ? | ? | ? |

(Ans-TC-20, 30, 40, 42.5, 50, 60, 71 AFC-20, 10, 6.67, 5, 4, 3.33 AVC-10, 10, 7.5, 7.5, 8, 8.5 ATC-30, 20, 14.17, 12.5, 12, 11.83 MC-10, 10, 2.5, 7.5, 10, 11)

**दीर्घोत्तरी प्रश्न**

१) उत्पादन खर्च म्हणजे काय? पैशातील खर्च सविस्तर स्पष्ट करा.

२) वास्तव खर्च आणि वैकल्पिक खर्च सविस्तर स्पष्ट करा.

३) उत्पादन खर्च म्हणजे काय? उत्पादन खर्चाचे प्रकार स्पष्ट करा.

४) सरासरी प्राप्ती व सीमांत प्राप्ती यांच्यातील परस्पर संबंध सांगा.

५) मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाच्या अंतर्गत व बाह्य बचती स्पष्ट करा.

६) मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाच्या अंतर्गत व बाह्य अबचती स्पष्ट करा.

७) सरासरी प्राप्ती आणि सीमान्त प्राप्ती सारणीसह स्पष्ट करा.

# प्रकरण ४
# बाजार संरचना
## (Market Structure)

---

**४.१ बाजाराचा अर्थ व व्याख्या** (Meaning and Difinition of Market)

बाजार किंवा विपणी हा आपल्या दैनंदिन जीवनातला शब्द आहे. सामान्यत: बाजाराचा अर्थ त्या विशिष्ट जागेसाठी असतो, जिथे खरेदीदार आणि विक्रेते एकत्र जमतात आणि वस्तूंची देवाण-घेवाण करतात. परंतु अर्थशास्त्रात बाजाराचा अर्थ खूप व्यापक आहे. बाजार म्हणजे त्या संपूर्ण क्षेत्राचा संदर्भ आहे जेथे खरेदीदार आणि विक्रेते यांच्यात स्वतंत्र स्पर्धात्मक संबंध आहेत. त्याचबरोबर क्रेते आणि विक्रेते यांचा परस्परांशी निकटचा किंवा मध्यस्थ मार्फत संबंध असतो आणि या संबंधाचा परिणाम वस्तूंच्या किमतीवर पडत असतो. वस्तू किंवा सेवांचा खरेदीदार आणि विक्रेता जगाच्या कोणत्याही भागात फोन, मोबाईल, इंटरनेट इत्यादी माध्यमांद्वारे संपर्कात राहतो. त्यांच्याशी थेट वैयक्तिक संपर्क असणे आवश्यक नाही. काही महत्वाच्या व्याख्या पूढीलप्रमाणे.

**१) प्रा. जेव्हांस** : ''बाजारपेठ म्हणजे शहरातील अशी सार्वजनिक जागा जिथे वस्तू आणि सोयी विक्रीसाठी खुल्या केल्या जातात.''

**२) प्रा. क्रुर्नो** : ''बाजार या शब्दाचा अर्थ कोणत्याही विशिष्ट ठिकाणाहून घेतला जात नाही जेथे वस्तूंची खरेदी आणि विक्री केली जाते, परंतु बाजार हा शब्द संपूर्ण क्षेत्र समजून घेण्यासाठी वापरला जातो ज्यामध्ये खरेदीदार आणि विक्रेत्यांमध्ये वस्तूंच्या किमती सहजपणे आणि त्वरित एकत्रित होतात.''

थोडक्यात, अर्थशास्त्रात बाजार हा शब्द अतिशय व्यापक अर्थाने वापरला जातो. अर्थशास्त्रात बाजार एखाद्या विशिष्ट क्षेत्राचा संदर्भ देत नाही तर खरेदीदार आणि विक्रेते यांच्यातील स्पर्धात्मक संबंधांना सूचित करते.

**बाजारपेठेचे वर्गीकरण** (Clasification of Market)




**अ) भौगोलिक क्षेत्राच्या आधारावर**

| बाजाराचा प्रकार | बाजाराची व्याप्ती | उदा. |
|---|---|---|
| **स्थानिक** | खेडे, गाव किंवा थोड्या गावांचा समूह | गावातील माल गावातच विकला जातो. जसे, दूध, भाजीपाला, बांधकामाच्या विटा, वगैरे यांची खरेदी-विक्री |
| **क्षेत्रीय/प्रादेशिक** | एखादा जिल्हा किंवा काही जिल्ह्यांचा मिळून बनणारा प्रदेश | संपूर्ण प्रदेशात होणारी वस्तूंची खरेदी-विक्री. जसे, जनावरे, नऊवारी साड्या असे पोशाख, मारवाडची पगडी, राजस्थानची चुनरी, लेहेंगा, बूट |
| **प्रांतीय किंवा विभागीय** | प्रांत किंवा विभागापुरता मर्यादित | मर्यादित सीमेअंतर्गत वस्तूंची खरेदी-विक्री. जसे- विदर्भ, महाराष्ट्राची बाजारपेठ |
| **राष्ट्रीय** | संपूर्ण राष्ट्र | राष्ट्रात सर्वत्र होणारी खरेदी-विक्री. जसे- विविध प्रकारचे खाद्यपदार्थ, कापड, तयार कपडे, धान्य, सायकली, मोटारी, पंखे, दूरदर्शन संच, रेडिओ, वगैरे. |
| **आंतरराष्ट्रीय** | जगातील अनेक देश | दोन अथवा अधिक राष्ट्रांतील खरेदी-विक्री व्यवहार. जसे, सोने, चांदी, यंत्रे, धान्ये, औद्योगिक कच्चा माल, निर्यात होणाऱ्या सर्व वस्तू |

**ब) वस्तूच्या आधारावर**
१) सामान्य- आठवडी बाजार
२) विशिष्ट- धान्य, कपडा, शेअर बाजार
३) नमुन्याद्वारे विक्री : बुक मार्केट, वॉशिंग, सोडा, साबण
४) श्रेणी द्वारा विक्री/वर्गवारीनुसार विक्री : इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनांच्या प्रमाणीकरणासाठी ISI, खाद्यपदार्थासाठी FSSAI, मौल्यवान धातूंवर 'हॉलमार्क'
**क) वेळेनुसार**
१) अतिअल्पकालीन
२) अल्पकालीन
३) दीर्घकालीन
४) अतिदीर्घकालीन
**ड) स्पर्धेनुसार**
१) पूर्ण स्पर्धा
२) अल्पाधिकार
३) अपूर्ण स्पर्धा
i) एकाधिकारयुक्त
ii) अल्पाधिकार
iii) द्वयाधिकार

खालील तक्त्याचे अवलोकन केल्यास बाजारातील परिस्थिती कशी बनते, ती वेगवेगळी कशी असते आणि त्यातून बाजारांचे वेगवेगळे प्रकार कसे निर्माण होतात ते समजते.

| **अ. क्र.** | **बाजाराचा प्रकार** | **बाजारातील परिस्थिती ठरविणारे घटक** | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **ग्राहकांची संख्या** | **विक्रेत्यांची संख्या** | **वस्तूंचे स्वरुप** | **बाजाराचे ज्ञान** | **बाजारात प्रवेश** | **विक्रेत्याला आढळणारे बाजारातील मागणी वक्राचे स्वरुप** |
| १ | **पूर्ण स्पर्धा** (Perfect Competition) | खूप मोठी | खूप मोठी | एकजिनसी | पूर्ण | मुक्त | पूर्ण लवचीक वक्र |
| २ | **एकाधिकार/मक्तेदारी** (Monopoly) | खूप मोठी | एक | एकजिनसी | पूर्ण | प्रतिबंधित | ऋण प्रवणता वक्र |
| ३ | **एकाधिकारयुक्त स्पर्धा** (Monopolistic Competition) | खूप मोठी | थोडी | वस्तू विभेदन | अपूर्ण | मुक्त | ऋण प्रवणता वक्र |
| ४ | **द्वयाधिकार**(Duopoly) | खूप मोठी | दोन | एकजिनसी | पूर्ण | प्रतिबंधित | ऋण प्रवणता वक्र |
| ५ | **अल्पजनाधिकार** (Oligopoly) | खूप मोठी | अल्प | एकजिनसी/ वस्तूविभेदन | पूर्ण | प्रतिबंधित | ऋण प्रवणता वक्र |
| ६ | **उभयपक्षी मक्तेदारी** (Bilateral Monopoly) | एक | एक | एकजिनसी | पूर्ण | प्रतिबंधित | ऋण प्रवणता वक्र |

**४.२ पूर्ण स्पर्धा बाजार** (Perfect Competition Market)
**अर्थ**

बाजाराचे ते स्वरुप ज्यामध्ये खरेदीदार आणि विक्रेत्यांच्या मोठ्या संख्येमुळे कोणतीही पेढी/संस्था विशिष्ट वस्तूच्या किंमतीवर प्रभाव टाकू शकत नाही. पूर्णपणे स्पर्धात्मक बाजारपेठेत एखाद्या वस्तूची किंमत उद्योगाद्वारे पुरवठा आणि मागणी यांच्यातील समतोलाद्वारे निर्धारित केली जाते. एखादी पेढी एखाद्या वस्तूच्या किंमतीवर प्रभाव टाकू शकत नाही कारण एकूण उत्पादनात त्याचे योगदान फारच कमी किंवा नगण्य असते. श्रीमती जॉन

रॉबिन्सन यांच्या मते, 'प्रत्येक उत्पादकाच्या उत्पादनाची मागणी पूर्णपणे लवचिक असते तेव्हा परिपूर्ण स्पर्धा असते. याचा अर्थ प्रथम, विक्रेत्यांची संख्या मोठी आहे, जेणेकरुन कोणत्याही एका विक्रेत्याचे उत्पादन वस्तूच्या एकूण उत्पादनाचा केवळ एक छोटासा भाग असेल आणि दुसरे म्हणजे, प्रतिस्पर्धी विक्रेत्यांमध्ये निवड करण्याच्या दृष्टीने सर्व खरेदीदार समान असतात ज्यामुळे बाजार पूर्ण आहे.' शुध्द स्पर्धा व पूर्ण स्पर्धा अर्थशास्त्राच्या दृष्टीने दोन वेगवेगळ्या स्पर्धा आहेत. पूर्ण स्पर्धेची व्याप्ती ही शुध्द स्पर्धेपेक्षा व्यापक आहे. प्रा. चेंबरलीन यांच्या मते, मक्तेदारीचा अंश नसलेली स्पर्धा म्हणजे शुध्द स्पर्धा होय. पुढील अटी पूर्ण होत असतील त्यावेळी शुध्द स्पर्धा व पूर्ण स्पर्धेतच शुध्द स्पर्धेचा समावेश होतो.

**पुर्ण स्पर्धेची वैशिष्ट्ये** (Characteristics of Perfect Competition)

| **पुर्ण स्पर्धेची वैशिष्ट्ये** |
|---|
| **१) असंख्य ग्राहक व विक्रेते** |
| **२) एकजिनसी वस्तू** |
| **३) प्रवेश आणि बाहेर पडण्याचे स्वातंत्र्य** |
| **४) क्रेता आणि विक्रेता यांना बाजाराचे पूर्ण ज्ञान** |
| **५) वाहतूक खर्चाचा अभाव** |
| **६) उत्पादन घटकांची पूर्ण गतिशीलता** |
| **७) पेढी** |
| **८) घसा कापण्याची स्पर्धा** |

**१) असंख्य ग्राहक व विक्रेते** (Large Number of Buyers and Sellers) : पूर्ण स्पर्धेत ग्राहक व विक्रेत्यांची संख्या मोठ्या प्रमाणात असते. म्हणून एखादा वैयक्तिक ग्राहक किंवा विक्रेता संपूर्ण बाजारपेठेच्या मागणी व पुरवठ्यावर परिणाम करु शकत नाही. त्यामुळे किंमत ठरवू शकत नाहीत. एकूणच बाजारपेठेत खरेदीदार किंवा विक्रेत्याचे योगदान नगण्य असल्याने त्याच्या वैयक्तिक निर्णयांचा बाजारावर परिणाम होत नाही. वैयक्तिक विक्रेत्याची स्थिती समुद्रातील एका थेंबासारखी असते. वस्तूची किंमत एकूण मागणी व एकूण पुरवठा यांच्या संतुलनाने ठरत असते. पूर्ण स्पर्धेत प्रत्येक विक्रेता व ग्राहक किंमत घेणारा (Price Taker) असतो परंतु किंमत ठरविणारा (Price Maker) नसतो.

**२) एकजिनसी वस्तू** (Homogeneous Products) : पूर्ण स्पर्धेत प्रत्येक उत्पादकाकडील म्हणजेच विक्रेत्याकडील वस्तू एकसारखी असणे आवश्यक आहे. रंग, आकार, डिझाइन, पॅकिंग, ट्रेडमार्क व गुणवत्तेच्या दृष्टीने एकसारखी व प्रत्येक विक्रेत्याकडील वस्तू प्रमाणित असणे आवश्यक आहे. म्हणजेच या बाजारातील वस्तू एकमेकांना पूर्ण पर्याय असतात. या अटीमुळे कोणत्याही वैयक्तिक उत्पादकाला बाजारातील किंमतीपेक्षा जास्त किंमत आकारता येत नाही. बाजारात एकच एक किंमत प्रस्थापित होते. स्पर्धा शुध्द राहण्यासाठी प्रत्येक वैयक्तिक ग्राहकाला उत्पादकाच्या वस्तूमध्ये एकसारखेपणा दिसला पाहिजे. भेदभाव करता कामा नये. असंख्य उत्पादकामुळे वैयक्तिक उत्पादकाला किंमतीवर परिणाम करता येत नाही आणि वस्तू एकजिनसी असल्याने एकच किंमत ठरते.

**३) प्रवेश आणि बाहेर पडण्याचे स्वातंत्र्य** (Freedom of Entry & Exit) : उद्योगक्षेत्रात उद्योगसंस्थेचा मुक्त प्रवेश व मुक्त निर्गमन ही पूर्ण स्पर्धेची तिसरी अट आहे. कोणत्याही प्रकारचे अडथळे किंवा निर्बंध असता कामा नये. पूर्णपणे स्पर्धात्मक बाजारपेठेत कंपन्या दीर्घकाळात फक्त सामान्य नफा कमावतात. जर कंपन्यांनी अल्पावधीत असाधारण नफा कमावला तर नवीन कंपन्या उद्योगात प्रवेश करण्यास आकर्षित होतील. तर कंपन्यांना अल्पावधीत तोटा झाला तर अशा कंपन्या उद्योगातून बाहेर पडतील. हे स्पष्ट आहे की, कंपन्यांच्या प्रवेश आणि बाहेर पडण्याच्या स्वातंत्र्यामुळे प्रत्येक पेढीला दीर्घकाळात फक्त सामान्य नफा मिळतो.

**४) क्रेता आणि विक्रेता यांना बाजाराचे पूर्ण ज्ञान** (Perfect knowledge of buyers and Sellers) : पूर्ण स्पर्धेच्या अंतर्गत खरेदीदार आणि विक्रेत्यांना बाजारातील परिस्थितीची पूर्ण माहिती असते. खरेदीदार आणि विक्रेते यांच्यातील जवळच्या संपर्कामुळे प्रचलित किंमतीबद्दल माहिती आहे. म्हणूनच कोणताही विक्रेता जास्त किंमत घेऊ शकत नाही. जर विक्रेत्याने असे केले तर एकतर खरेदीदार त्याला सोडून इतर विक्रेत्यांकडे जातील. यामुळेच एखाद्या वस्तूची किंमत संपूर्ण बाजारात सारखीच असते.

**५) वाहतूक खर्चाचा अभाव** (Transport cost is ignored) : प्रत्यक्षात उत्पादनक्षेत्र व बाजारक्षेत्रात अंतर असल्याने येणारा वाहतूक खर्च किंमतीत समाविष्ट केला जातो. त्यामुळे किंमत भिन्नता निर्माण होते. पूर्णपणे स्पर्धात्मक बाजारपेठेत खरेदीदार आणि विक्रेते इतके जवळ आहेत की वस्तू एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेण्यासाठी कोणताही खर्च नाही. म्हणजेच वाहतूक खर्च शून्य आहे. त्यामुळे वस्तूची किंमत सारखीच राहते.

वाहतूक खर्चाच्या अनुपस्थितीमुळेच परिपूर्ण स्पर्धेची कल्पना केली जाऊ शकते. जर बाजारपेठेत वाहतूक खर्च उपस्थित असेल तर उत्पादनाची किंमत एकसमान राहणार नाही.

**६) उत्पादन घटकांची पूर्ण गतिशीलता** (Perfect Mobility of Factors of Production) : पूर्णपणे स्पर्धात्मक बाजारपेठेत उत्पादनाच्या साधनांमध्ये परिपूर्ण गतिशीलता असते. म्हणजेच घटक एका उद्योगातून दुसऱ्या उद्योगात आणि एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पूर्णपणे फिरतात. त्यामुळे उत्पादनाच्या प्रत्येक घटकाला त्याचा सर्वोत्तम वापर करुन जास्तीत जास्त मोबदला मिळतो.

**७) पेढी** (Price Taker and Quantity Adjuster) : किंमत घेणारा आणि प्रमाण समायोजित करणारा आहे. उद्योगांनी निश्चित केलेल्या किंमती स्वीकारुन कंपन्या त्यांना पाहिजे त्या प्रमाणात विक्री करु शकतात.

**८) घसा कापण्याची स्पर्धा** (Cut throat competition) : अर्थशास्त्रात 'घसा कापण्याची स्पर्धा' ही संकल्पना म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या बाजारातील विक्रेत्यांमध्ये स्पर्धा दिसून येते.

थोडक्यात, वरील अटी पूर्ण स्पर्धेसाठी आवश्यक आहेत. पूर्ण बाजाराची लक्षणे पाहिल्यानंतर बाजाराची परिस्थिशी ठरविणारे घटक दर्शविणारा तक्ता पुढीलप्रमाणे.

| बाजाराची परिस्थिती ठरविणारा घटक | पूर्ण स्पर्धेची लक्षणे |
|---|---|
| ग्राहकांची संख्या | असंख्य ग्राहक |
| विक्रेत्यांची संख्या | असंख्य विक्रेते |
| वस्तूचे स्वरुप | एकजिनसी वस्तू |
| बाजाराचे ज्ञान | संपूर्ण ज्ञान |
| बाजारातील प्रवेश | मुक्त प्रवेश |
| विक्रेत्याला आढळणारा मागणी वक्र | बाजारातील किमतीच्या पातळीशी संपूर्ण लवचिक |
| इतर | अ) वाहतूक खर्चाचा अभाव<br>आ) उत्पादन घटकांची संपूर्ण चलनशीलता |

**४.३ एकाधिकार/मक्तेदारी स्पर्धा** (Monopoly Competition)

बाजाराच्या अभ्यासाच्या दृष्टीने उपयुक्त अशी मक्तेदारीची संकल्पना म्हणजे अपूर्ण किंवा मर्यादित मक्तेदारी होय. ही संकल्पना वास्तवाच्या जवळची व सैध्दांतिकदृष्ट्या तर्कसंगत असेल तर ती संकल्पना अधिक श्रेयस्कर ठरेल. तिचा उल्लेख ''साधी मक्तेदारी'' म्हणूनही केला जातो. एकाधिकार ही पूर्ण स्पर्धेच्या विरोधी बाजाराची स्थिती आहे. ज्यावेळी बाजारात ग्राहक मोठ्या संख्येने असतात परंतु उत्पादक किंवा विक्रेता एकच असतो त्या बाजारपेठेच्या स्थितीला एकाधिकार असे म्हणतात. एकाधिकाराला इंग्रजीत Monopoly असे म्हणतात. Monopoly या शब्दाची फोड केल्यास आपणास Mono व Poly असे दोन शब्द आढळतात. Mono म्हणजे एकटा किंवा एक (Singal) व Poly म्हणजे विक्रेता/उत्पादक (Producer) असा अर्थ आहे. दोन्ही शब्द एकत्र जोडल्यास 'एकटा विकणारा' असा अर्थ निघतो. किंवा एका विक्रेत्यांचा बाजार (Market of Single Producer) होय. त्याचे वस्तूच्या पुरवठ्यावर व किंमतीवर पूर्ण नियंत्रण असते. त्यामुळे एकाधिकाऱ्याला अधिकतम नफा मिळविणे शक्य होते. अशा वेळी बाजारात एकाधिकार निर्माण होत असतो. या एकाधिकारी बाजारात वस्तूंच्या मूल्याला 'एकाधिकारी मूल्य' असे म्हणतात. थोडक्यात, एकाधिकारात स्पर्धा करणारा दुसरा कोणताही विक्रेता नसतो. त्यामुळे संपूर्ण स्पर्धेचा अभाव असलेला बाजार म्हणजे एकाधिकार होय.

**व्याख्या** (Definition)

**१) प्रो. जे. के. मेहता** : ''एकाधिकारी अशी व्यक्ती असते ज्याचे किंमतीवर पूर्ण नियंत्रण असते. जेव्हा एका वस्तूचा एकच उत्पादक असतो व त्याच्या वस्तूला निकटच्या पर्यायी वस्तू नसतात त्या उत्पादकाला एकाधिकारी म्हणतात.''

**२) रॉबर्ट ट्रीफीन** : ''बाजाराची अशी अवस्था की, ज्यात एक पेढी दुसऱ्या पेढीच्या किंमतीमुळे प्रभावित होत नाही त्याला एकाधिकार म्हणतात.''

**३) प्रा. चेंबरलीन** : ''ज्या वस्तूला अगदी जवळचे पर्याय उपलब्ध नसतात अशा वस्तूच्या पुरवठ्यावर पूर्ण नियंत्रण असणाऱ्या पेढीला एकाधिकार असे म्हणतात.''

**४) प्रो. लर्नर :** ''मक्तेदारी म्हणजे असा विक्रेता होय की, ज्याच्या उत्पादनाचा मागणी वक्र खाली येणारा असतो म्हणजेच त्याच्या पुरवठ्याची विक्री वक्र स्थिर आहे.''

**५) स्टोनियर आणि हेग :** ''मक्तेदारी एक असा उत्पादक आहे ज्याचे एखाद्या वस्तूच्या पुरवठ्यावर पूर्ण नियंत्रण असते आणि त्या वस्तूला जवळचा पर्याय नसतो.''

थोडक्यात, नजीकचे पर्याय नसलेल्या वस्तूची एकाच उत्पादनसंस्थेव्दारे जेव्हा बाजारात विक्री केली जाते तेव्हा त्या बाजारस्थितीला एकाधिकार/मक्तेदारी म्हणतात.

**मक्तेदारीची वैशिष्ट्ये** (Characteristics of Monopoly Competition)

उद्योगाचा पुरवठा एकच उद्योगसंस्था करीत असल्याने शुध्द मक्तेदारीप्रमाणेच येथेही उद्योग व उद्योगसंस्था हे दोन्ही एकच असतात. मक्तेदारीची वैशिष्ट्ये/अटी पुढीलप्रमाणे.

| **मक्तेदारीची वैशिष्ट्ये** |
|---|
| **१) एकच उत्पादक** |
| **२) नजीकचे पर्याय नसणे** |
| **३) पुरवठ्यावर नियंत्रण** |
| **४) किंमतीवरही नियंत्रण** |
| **५) महत्तम नफा** |
| **६) प्रवेशावर पूर्णपणे बंदी** |
| **७) जाहिरात खर्च नाही** |
| **८) मूल्यभेद** |

**१) एकच उत्पादक :** मक्तेदारी अस्तित्वात येण्यासाठी एकच उत्पादक किंवा विक्रेता असणे आवश्यक आहे व एक उत्पादक एक व्यक्ती असेल. भागीदारी संस्था असेल संयुक्त भांडवली संस्था असेल किंवा सरकारी महामंडळ असेल म्हणून मक्तेदारीत उद्योग व उद्योगसंस्था एकच असतात.

**२) नजीकचे पर्याय नसणे :** मक्तेदारीत मक्तेदाराच्या वस्तूला जवळचा पर्याय नसतो. म्हणजेच मक्तेदाराला प्रतिस्पर्धी असता कामा नये. उदा. एका नावाचा साबण तयार करणारी कंपनी एकच असली तरी वेगवेगळ्या नावाचे अनेक साबण उपलब्ध असल्याने जवळचे पर्याय आहेत. म्हणून साबणाचा बाजार मक्तेदारी या सदरात येणार नाही. परंतु वीजमंडळाला मात्र मक्तेदारी आहे. कारण विजेचा पर्याय आहेत परंतु ते जवळचे पर्याय नाहीत.

**३) पुरवठ्यावर नियंत्रण :** मक्तेदारीत उत्पादन करणारा एकच उत्पादक असतो. त्यामुळे त्याच्या इच्छेप्रमाणे उत्पादन वाढवून बाजारपेठेत पुरवठा वाढवू शकतो व उत्पादन कमी करुन पुरवठा देखील कमी करु शकतो. पूर्णपणे पुरवठ्यावर मक्तेदार नियंत्रण ठेवू शकतो.

**४) किंमतीवरही नियंत्रण :** मक्तेदार त्याच्या वस्तूचा एकमेव उत्पादक असल्याने व त्याच्या वस्तूला जवळचे पर्याय नसल्याने तो पुरवठ्यावर नियंत्रण ठेवू शकतो. त्यामुळे मक्तेदाराचे वस्तूच्या किंमतीवरही नियंत्रण राहते. तो आपल्या मनाप्रमाने हवी ती किंमत आकारु शकतो.

**५) महत्तम नफा :** सर्वसाधारण नफ्यापेक्षा जास्त नफा मिळविणे किंवा कमाल करणे हे मक्तेदाराचे उद्दिष्ट असते. मक्तेदार एकच उत्पादक असल्याने पुरवठ्यावर नियंत्रण ठेवून जास्त किंमती आकारुन जास्त नफा मिळविला जातो. फक्त अल्पकाळातच नाही तर दिर्घकाळातही असाधारण नफा मिळत राहतो.

**६) प्रवेशावर पूर्णपणे बंदी :** मक्तेदारीत उद्योगसंस्था व उद्योग एकच असल्याने नवीन उद्योग संस्थाच्या प्रवेशावर बंदी असते. म्हणून वस्तूचा एकच उत्पादक असतो.

**७) जाहिरात खर्च नाही :** मक्तेदारीची वस्तू जवळचे पर्याय नसलेली वस्तू असल्यामुळे ग्राहकांना बाजारात त्या वस्तूशिवाय पर्याय नसतो. कोणत्याही प्रकारची जाहिरात न करता ती वस्तू सहजपणे विकली जाते. म्हणजेच मक्तेदारीत जाहिरात खर्च शून्य असतो.

**८) मूल्यभेद :** मक्तेदार आपली वस्तू विकताना एकच उत्पादक असल्याने वेगवेगळ्या किंमती आकारात असतो यालाच मूल्यभेद म्हणतात त्यातून नफा वाढविण्याचा प्रयत्न करीत असतो.

**एकाधिकाराचे प्रकार** (Types of Monopoly)

एकाधिकार कसा निर्माण होतो? प्रामुख्याने एकाधिकाराचे कारणांनुसार नैसर्गिक, कायदेशीर व आर्थिक एकाधिकार असे वर्गीकरण केले जाते. असे असले तरीही एकाधिकार वेगवेगळ्या पद्धतीने निर्माण होतो. त्याचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे.

| **एकाधिकाराचे प्रकार** |
|---|
| **१) नैसर्गिक एकाधिकार** |
| **२) कायदेशीर एकाधिकार** |

**१) नैसर्गिक एकाधिकार** (Natural Monopoly) : जेव्हा नैसर्गिक घटकांमुळे एकाधिकार निर्माण होतो तेव्हा त्याला नैसर्गिक एकाधिकार म्हणतात. दुसऱ्या शब्दात एखादी वस्तू एखाद्या विशिष्ट प्रदेशात मुबलक प्रमाणात उपलब्ध असते तर

इतर ठिकाणी नसते. त्यामुळे त्या वस्तूच्या बाबतीत एकाधिकार निर्माण होतो. उदा. तागाच्या उत्पादनासाठीची नैसर्गिक अनुकूलता भारतात पश्चिम बंगाल आणि बांग्लादेशात लगतचा पूर्व बंगाल या प्रदेशात आहे. जगात इतरत्र कोठेही अशी अनुकूलता नाही. तसेच अरब राष्ट्राजवळ डिझेल व पेट्रोलचा एकाधिकार आहे. नैसर्गिक एकाधिकार अशा देशांना नैसर्गिक परिस्थितीनुसार प्राप्त झालेला असतो.

**३) आर्थिक एकाधिकार**
**४) संयोगात्मक किंवा ऐच्छिक एकाधिकार**
**५) खाजगी किंवा सार्वजनिक एकाधिकार**
**६) साधा किंवा विभेदात्मक एकाधिकार**
**७) भितीयुक्त किंवा भितीविरहीत एकाधिकार**
**८) तांत्रिक एकाधिकार**
**९) आशावादी किंवा निराशावादी एकाधिकार**
**१०) सामाजिक एकाधिकार**

**२) कायदेशीर एकाधिकार** (Legal Monopoly) : मानवी प्रयत्नांतून निर्माण होणाऱ्या एकाधिकाराचा एक प्रकार म्हणजे 'विधिसिद्ध एकाधिकार' होय. कायद्याचे पाठबळ देऊन वस्तू आणि सेवा पुरविण्याच्या क्षेत्रात अशा प्रकारचा एकाधिकार सरकारकडून निर्माण केला जातो. एस. टी. ची प्रवासी वाहतूक, वीज मंडळाचा वीजपुरवठा, दूरध्वनीची सोय, नगर परिषदेचा पाणीपुरवठा, कापूस एकाधिकार योजना ही सर्व या प्रकाराची उदाहरणे आहेत. जेव्हा कायद्याचा आधार घेवून एकाधिकार निर्माण होतो तेव्हा त्याला कायदेशीर एकाधिकार म्हणतात. उदा. पेटंट, कॉपीराईट इत्यादी.

**३) आर्थिक एकाधिकार** (Economic Monopoly) : या प्रकारात आर्थिक कारणांचा विचार केला जातो. एखाद्या वस्तू वा सेवेबाबत एकाच उत्पादकाने वा विक्रेत्याने केलेला पुरवठा पुरेसा असतो त्याला आर्थिक एकाधिकार असे म्हणतात. उदा. एखाद्या छोट्या गावात एखादे सिनेमागृह किंवा एखादी बँक अशा वेळी निर्माण होणारा एकाधिकार आर्थिक होय.

**४) संयोगात्मक किंवा ऐच्छिक एकाधिकार** : आपआपसातील तीव्र स्पर्धा टाळून महत्तम नफा मिळविण्याच्या उद्देशाने एकाच व्यवसायातील अनेक व्यवसाय, संस्था एकत्र येवून जो एकाधिकार निर्माण करतात, त्याला संयोगात्मक किंवा ऐच्छिक एकाधिकार असे म्हणतात. उदा. ट्रस्ट, कार्टेल.

**५) खाजगी किंवा सार्वजनिक एकाधिकार** : जेव्हा मालकी हक्क व्यक्ती वा संस्थाकडे असतो तेव्हा निर्माण होणाऱ्या एकाधिकाराला खाजगी एकाधिकार म्हणतात. याउलट सरकारी मालकी हक्क असतांना निर्माण होणाऱ्या एकाधिकाराला सार्वजनिक एकाधिकार म्हणतात.

**६) साधा किंवा विभेदात्मक एकाधिकार** : जेव्हा एकाधिकारी सर्व ग्राहकांसाठी सारखी किंमत आकारत असेल तेव्हा त्याला साधा एकाधिकार म्हणतात. याउलट एकाधिकारी वेगवेगळ्या व्यक्तींसाठी वेगवेगळी किंमत आकारत असेल तेव्हा त्याला विभेदात्मक एकाधिकार म्हणतात.

**७) भितीयुक्त किंवा भितीविरहीत एकाधिकार** : जेव्हा उद्योगात नवीन पेढ्यांच्या किंवा उद्योग संस्थांच्या प्रवेशाची सतत भिती असते तेव्हा त्याला भितीयुक्त एकाधिकार म्हणतात. याउलट जेव्हा उद्योगात नवीन पेढ्यांच्या प्रवेशाची मुळीच भिती नसते तेव्हा त्याला भितीविरहीत एकाधिकार म्हणतात.

**८) तांत्रिक एकाधिकार** : एखाद्या पेढीला तंत्रज्ञानामुळे विशाल प्रमाणावर उत्पादनाचे सर्व फायदे मिळाल्यास पेढीचा आकार मोठा होवून वस्तूचा प्रत्येकी उत्पादन खर्च फारच कमी येतो. अशा काही पेढ्या स्थापन झाल्यास त्या आपल्या हितासाठी संघटन स्थापन करुन एकाधिकार प्राप्त करतात.

**९) पूर्ण व आशावादी किंवा अपूर्ण व निराशावादी एकाधिकार** : हे दोन्ही एकाधिकाराचे प्रकार मॅक्लप या अर्थशास्त्रज्ञाने स्पष्ट केले आहेत. भविष्यकाळात स्पर्धेची, सरकारी नियंत्रणे व राष्ट्रीयीकरण यांची कोणतीही भीती नसते तेव्हा निर्माण होणाऱ्या एकाधिकाऱ्याला पूर्ण व आशावादी एकाधिकार म्हणतात. याउलट भविष्यकाळात नवीन पेढ्यांच्या स्पर्धेची, सरकारी नियंत्रणाची व राष्ट्रीयीकरणाची भीती असेल. तर त्याला अपूर्ण किंवा निराशावादी एकाधिकार म्हणतात.

**१०) सामाजिक एकाधिकार** : एखाद्या उद्योगसंस्थेने महत्तम लाभ मिळविण्यासाठी समाजातील लोकांचे शोषण सुरु केले तर त्या स्वातंत्र्याचा किंवा एकाधिकाराचा दुरुपयोग होवू शकतो. म्हणून समाजाला आवश्यक असलेल्या सर्व वस्तू व सेवांच्या उत्पादनाचा व वितरणाचा एकाधिकार सरकार स्वत:कडेच ठेवते. उदा. विज, पाणी इ. यालाच सामाजिक एकाधिकार म्हणतात.

**मूल्यभेद** (Price Discrimination)

मक्तेदार हा एकच उत्पादक असल्याने त्याचे पुरवठ्यावर नियंत्रण असते. त्याचप्रमाणे किंमतीवर देखील नियंत्रण असते. साध्या मक्तेदारीत तो एकच किंमत आकारतो हे आपण अभ्यासले परंतु येथे किंमतीवर नियंत्रण असल्याने वेगवेगळ्या किंमती आकारुन तो आपला नफा मिळवित असतो. अशाप्रकारे ''एकाच प्रकारच्या वस्तूसाठी किंवा सेवेसाठी ग्राहकांकडून वेगवेगळी किंमत घेतली जाते तेव्हा त्याला मूल्यभेद असे म्हणतात व मक्तेदारीला विभेदात्मक मक्तेदारी असे म्हणतात''.

**मूल्यभेदाचे प्रकार** (Types of Price Discrimination)

| मूल्यभेदाचे प्रकार |
| --- |
| **१) व्यक्तीनुसार मूल्यभेद** |
| **२) स्थानानुसार मूल्यभेद** |
| **३) उपयोगानुसार मूल्यभेद** |
| **४) वेळेनुसार मूल्यभेद** |

**१) व्यक्तीनुसार मूल्यभेद** : मक्तेदार ज्या ग्राहकाची वस्तू व सेवा खरेदी करण्याची क्षमता व इच्छा तीव्र असेल, त्यांच्याकडून वस्तूची जास्त किंमत घेतो आणि ज्यांची इच्छा तीव्र नसते किंवा आर्थिक कुवत फार नसते. त्यांच्याकडून किंमत कमी घेतो असा प्रकार केला तर त्याला व्यक्तीनुसार मूल्यभेद असे म्हणतात. उदा. डॉक्टरची सेवा. डॉक्टर देखील गरीब व श्रीमंत पेशंटकडून वेगवेगळ्या फी आकारतो.

**२) स्थानानुसार मूल्यभेद** : एकाच प्रकारच्या वस्तूची किंमत वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळी आकारली तर त्याला स्थानानुसार मूल्यभेद म्हणतात. उदा. नाशिकमध्ये महाबळेश्वरमध्ये स्ट्रॉबरीचे अधिक उत्पादन होते म्हणून स्ट्रॉबरीची किंमत कमी तर महाबळेश्वर पासून दूर ठिकाणी स्ट्रॉबरीची विक्री अधिक किंमतीला होते म्हणून असा स्थानभेद मक्तेदाराला करता येतो.

**३) उपयोगानुसार मूल्यभेद** : ज्यावेळी एखाद्या वस्तूचे किंवा सेवेचे उपयोगानुसार वेगवेगळे दर आकारले जातात. तेव्हा त्याला उपयोगभेद असे म्हणतात. उदा. घरगुती वापरासाठी असणारी वीज व कारखान्याच्या वापरासाठी असणारी वीज यांच्या दरात भिन्नता असते. विजेचे घरगुती वापरासाठी दर जास्त असतात तर कारखान्यात मोठ्या प्रमाणावर वापरली जात असल्याने ते दर कमी असतात. तसेच कारखान्यात असा विजेचा दर कमी पडतो त्यापेक्षाही शेतीसाठी वापरासाठी असलेला विजेचा दर कमी असतो म्हणजेच उपयोगानुसार मूल्यभेद केला जातो.

**४) वेळेनुसार मूल्यभेद** : जेव्हा एखाद्या वस्तूचे किंवा सेवेचे वेगवेगळ्या वेळी वेगवेगळे दर आकारले जातात तेव्हा त्याला वेळेनुसार मूल्यभेद असे म्हणतात. उदा. दूरदर्शनच्या एकाच जाहिरातीला वेगवेगळ्या वेळी जे वेगवेगळे दर येते त्यालाच वेळेनुसार मूल्यभेद असे म्हणतात.

**पूर्ण स्पर्धा व एकाधिकार/मक्तेदारी बाजार यातील फरक**

| अ. क्र. | मुद्दे | **पूर्ण स्पर्धा** (Perfect Competition) | **मक्तेदारी** (Monopoly) |
| --- | --- | --- | --- |
| १ | **विक्रेते** | पूर्ण स्पर्धेमध्ये असंख्य विक्रेते असतात. | मक्तेदारीमध्ये एकच विक्रेता असतो. |
| २ | **मागणी वक्र** | पूर्ण स्पर्धेतील मागणीवक्र अक्षास समांतर किंवा क्षितिज समांतर असतो. | मक्तेदारीतील मागणी वक्र हा ऋणात्मक उताराचा असतो. |
| ३ | **ग्राहक संतोषाधिक्य** | पूर्ण स्पर्धेतील किंमती या मक्तेदारीपेक्षा कमी असतात त्यामुळे ग्राहकांना संतोषाधिक्य मिळते. | मक्तेदारीतील किंमती या नफ्याच्या उद्देशाने जास्त ठेवलेल्या असल्याने ग्राहकांना संतोषाधिक्य कमी असते. |
| ४ | **पुरवठ्यावरील नियंत्रण** | पूर्ण स्पर्धेतील पेढीचे बाजारातील पुरवठ्यावर नियंत्रण नसते. | मक्तेदारीतील पेढीचे बाजारातील पुरवठ्यावर पूर्ण नियंत्रण असते. |
| ५ | **नविन पेढ्यांचा प्रवेश** | पूर्ण स्पर्धेत नविन पेढ्यांच्या आगमन आणि निर्गमन यांवर कोणत्याही प्रकारचे बंधन नसते. | मक्तेदारीत नविन पेढ्यांचा बाजारात प्रवेश नाकारला जातो. |
| ६ | **किंमत** | पूर्ण स्पर्धेतील विक्रेता हा किंमत स्विकारणारा (Price Taker) असतो. | मक्तेदारीतील विक्रेता हा किंमत कर्ता (Price Maker) असतो. |
| ७ | **मूल्यभेद** | पूर्ण स्पर्धेत एका वस्तूची किंमत सर्वत्र आणि सर्वासाठी समान असते. | मक्तेदारीत मूल्यभेदाचा अवलंब केला जातो. म्हणजेच एकच वस्तू |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | वेगवेगळ्या ग्राहकांना वेगवेगळ्या किंमतीला विकली जाते. |
| ८ | **उत्पादन** | पूर्ण स्पर्धेत उद्योगसंस्था दिर्घकाळात न्यूनतम पातळीला उत्पादन करित असतात. | मक्तेदारीतील पेढी न्यूनतम पातळीपेक्षा खालच्या पातळीवर उत्पादन करीत असतात. |
| ९ | **नफा** | पूर्ण स्पर्धेत उत्पादन संस्थेला दिर्घकाळात साधारण अथवा वाजवी नफा मिळतो. | मक्तेदारीत उद्योगपेढीला दिर्घकाळातही असाधारण अथवा अतिरिक्त नफा मिळू शकतो. |

## ४.४ एकाधिकारयुक्त स्पर्धा बाजार (Monopolistic Competition Market)

सनातनवादी विचारवंतानी बाजारव्यवस्थेत मूल्यनिश्चिती करण्यासाठी पूर्ण स्पर्धा आणि मक्तेदारी अशा दोन टोकाच्या बाजारपेठांची मांडणी केली. १९२० पर्यंत मूल्यनिश्चितीसाठी या दोन बाजारपेठांचा वापर केला जात असे. मात्र ही दोन्ही विवेचने वस्तुस्थितीशी विसंगत असल्याने तसेच व्यावहारिक जगात ती लागू पडत नसल्याने नवीन बाजारपेठ तयार करणे गरजेचे होते. १९३३ मध्ये अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ प्रा. एडवर्ड चेंबरलीन यांचे 'The Theory of Monopolistic Competition' हे व इंग्लंडमधील अर्थशास्त्रज्ञी श्रीमती जोन रॉबिन्सन यांचे 'The Economics of Imperfect Competition' हे ग्रंथ प्रकाशित झाले. यानंतर नवीन बाजारपेठेच्या विकासास चालना मिळाली. अर्थात यातूनच पूर्ण स्पर्धा आणि मक्तेदारी यांचा संयोग असणारी 'मक्तेदारीयुक्त स्पर्धा' (Monopolistic Competition) किंवा अपूर्ण स्पर्धा (Imperfect Competition) ही बाजारपेठ उदयास आली.

प्रा. चेंबरलीन यांच्या मते, 'मक्तेदारीयुक्त स्पर्धा म्हणजे असा बाजार होय की, ज्या बाजारात अगदी जवळचा पर्याय असलेल्या परंतु पूर्ण पर्याय नसलेल्या वस्तूच्या मोठ्या संख्येतील विक्रेत्यामध्ये स्पर्धा असते.' या व्याख्येवरुन असे म्हणता येईल की, मक्तेदारीयुक्त स्पर्धेत असंख्य विक्रेते असतात. त्यांच्या वस्तूला अगदी जवळचा पर्याय उपलब्ध असतो. म्हणूनच लवचिक मागणी असते. प्रा. चेंबरलीन यांचे मक्तेदारीयुक्त स्पर्धेचे विवेचन म्हणजे २० व्या शतकातील सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्रातील मोलाचे योगदान म्हणावे लागेल.

### एकाधिकारयुक्त स्पर्धेची वैशिष्टये (Characteristics of Monopolistic Competition)

मक्तेदारीयुक्त स्पर्धेची वैशिष्ट्ये/अटी पुढीलप्रमाणे.

**एकाधिकारयुक्त स्पर्धेची वैशिष्टये**

**१) असंख्य विक्रेते किंवा उद्योगसंस्था**
**२) वस्तूभेद**
**३) मुक्तप्रवेश व मुक्तनिर्गमन**
**४) जाहिरात खर्च**
**५) स्वतंत्र किंमत धोरण**
**६) लवचिक मागणी**
**७) विक्रीखर्च**
**८) समूह संकल्पना**
**९) निकटचे पर्याय**

**१) असंख्य विक्रेते किंवा उद्योगसंस्था** (Large number of sellers) : या बाजारात विक्रेते किंवा उत्पादनपेढ्यांची संख्या मोठी असते. मक्तेदारीत एकच उद्योगसंस्था असते त्यापेक्षा जास्त परंतु पूर्ण स्पर्धेपेक्षा कमी अशी उद्योगसंस्थांची संख्या मक्तेदारीयुक्त स्पर्धेत असते. मक्तेदारीयुक्त स्पर्धेत लहान आकारमानाच्या असंख्य उद्योगसंस्था असतात. त्यांचा पुरवठा एकूण पुरवठ्यापेक्षा बराच कमी असतो. संख्या मोठी असल्याने एका उद्योगसंस्थेच्या निर्णयाच इतर उद्योगसंस्थांवर परिणाम होत नाही. उत्पादन मोठ्या प्रमाणावर केले जात नसल्याने मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाचे फायदे मिळत नाहीत. तसेच भांडवलही फारसे लागत नाही. अशावेळी मक्तेदारीयुक्त स्पर्धा अस्तित्वात येते.

**२) वस्तूभेद** (Product Differntiation) : मक्तेदारीयुक्त स्पर्धेचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे वस्तूभेद हे होय. पूर्ण स्पर्धेत एकजिनसी वस्तू असते. मक्तेदारी त्याच्या वस्तूला जवळचे पर्याय नसतात. परंतु मक्तेदारीयुक्त स्पर्धेत वस्तूला जवळचे पर्याय उपलब्ध असतात. प्रत्येक उद्योगसंस्था आपली वस्तू इतर उद्योगसंस्थापेक्षा कशी वेगळी राहील. याचा प्रयत्न करीत असते. मूलतः वस्तू एकच असली तरी प्रत्येक उत्पादक आपली वस्तू इतरांपेक्षा वेगळी दाखविण्याचा प्रयत्न करीत असतो. त्यामुळे जवळच्या पर्यायी वस्तूमध्ये स्पर्धा असते. परंतु प्रत्येक वस्तुपुरती मर्यादित मक्तेदारी असते. उदा. टूथपेस्ट, फेस पावडर, हेअर ऑईल इत्यादी वस्तूचा बाजार या प्रकारचा असतो. वस्तूभेद हा गुणात्मकदृष्टया किंवा अभ्यासात्मकदृष्ट्या तसेच विक्रीबरोबर इतर सोयी सवलती

देऊनही करता येतो. वस्तूचा दर्जा, कुशलता, टिकाऊपणा यात वेगळेपणा करुन वस्तूभेद केला जातो. तसेच जाहिरात व प्रचार माध्यमाव्दारे त्या वस्तूत नसलेले गुण दाखवून किंवा अभ्यासात्मक बदल करुन वस्तूभेद केला जातो. तसेच वस्तूच्या विक्रीबरोबर ग्राहकांना सोयी सवलती दिल्या जातात. उदा. मोफत वस्तू देणे, मोफत दुरुस्तीची हमी देणे, घरपोच सेवा पुरविणे इत्यादीव्दारे विक्रेता ग्राहकाच्या मनावर वेगळेपण ठसवू शकतो. अशाप्रकारे वस्तूभेद केला जातो.

**३) मुक्तप्रवेश व मुक्तनिर्गमन** (Free Entry and Free Exit) : पूर्ण स्पर्धेप्रमाणेच मक्तेदारीयुक्त स्पर्धेत मुक्त प्रवेश व मुक्त निर्गमन हे वैशिष्ट्य आढळते. उद्योगसंस्था लहान प्रमाणावर उत्पादन करीत असल्याने भांडवल देखील कमी प्रमाणात लागते. म्हणून उद्योगसंस्था उद्योगधंद्यात प्रवेश करतात. तसेच त्यांच्या निर्गमनावर कोणत्याही प्रकारचे बंधन नसते. व्यवसायसंस्थांची संख्या जास्त असल्याने नव्या व्यवसायसंस्थेच्या प्रवेशाचा किंवा बाहेर पडण्याचा एकूण व्यवसायावर काहीच परिणाम होत नाही.

**४) जाहिरात खर्च** : आपल्या वस्तूची विक्री वाढावी म्हणून मक्तेदारीयुक्त स्पर्धेत उत्पादकाला आपल्या वस्तूची प्रचंड प्रमाणात जाहिरात करावी लागते. म्हणजेच त्याला विक्री खर्च करावा लागतो. मक्तेदारीच्या वस्तूला जवळचे पर्याय नसल्याने जाहिरात खर्च करण्याची गरज नसते. तसेच पूर्ण स्पर्धेत एकजिनसी वस्तू असल्याने जाहिरात करण्याची गरज नसते. परंतु मक्तेदारीयुक्त स्पर्धेत जवळच्या पर्यायी वस्तू असल्याने आपली वस्तू जास्त विकण्यासाठी व ग्राहक आकर्षित करण्यासाठी जाहिरात करावी लागते. म्हणून विक्री खर्च करावा लागतो.

**५) स्वतंत्र किंमत धोरण** (Independent Price Policy) : मक्तेदारीयुक्त स्पर्धेत उत्पादनपेढ्यांची संख्या अधिक असल्याने एखाद्या पेढीने किंमत कमी केल्यास त्याचा त्याच्या प्रतिस्पर्ध्यांच्या विक्रीवर नगण्य प्रभाव पडेल. तसेच प्रत्येक पेढीला बाजारात टिकून राहण्यासाठी स्वतंत्र किंमत धोरण अवलंबावे लागते.

**६) लवचिक मागणी** : मक्तेदारीयुक्त स्पर्धेतील उद्योगसंस्थेचा प्राप्तीवक्र पूर्ण स्पर्धेतील प्राप्तीवक्रासारखा अक्षाला समांतर नसतो किंवा मक्तेदारीसारखा तीव्र उताराचा नसतो. मक्तेदारीयुक्त स्पर्धेत जवळचे पर्याय उपलब्ध असल्याने व वस्तूभेद केला जात असल्याने लवचिक मागणी असते. म्हणूनच या स्पर्धेतील सरासरी प्राप्तीवक्र उथळ आकाराचा असतो. म्हणजेच लवचिक मागणी दाखवितो. त्यामुळे इतर उद्योगसंस्थेच्या किंमती स्थिर असतांना एका उद्योगसंस्थेने किंमत थोडी जरी कमी केली तरी वस्तूची मागणी बऱ्याच मोठ्या प्रमाणात वाढते.

**७) विक्रीखर्च** (Selling Cost) : मक्तेदारीयुक्त स्पर्धेत प्रत्येक उत्पादक बाजाराचा अधिकाधिक हिस्सा प्राप्त करण्याचा प्रयत्न करतो. या बाजारातील वस्तू या एकमेकांना निकटतम पर्याय असल्याने हा विक्रीखर्च अत्यावश्यक बनतो. अशा वेळी उत्पादकांना विक्री प्रतिनिधी नेमणे, प्रदर्शने भरविणे, मोफत पूरक वस्तू देणे, जाहिराती करणे, आकर्षक बक्षिसे व विक्री योजना जाहीर करणे इ. मार्गांचा अवलंब करावा लागतो.

**८) समूह संकल्पना** (Concept of Group) : मक्तेदारीयुक्त स्पर्धेत वस्तुभिन्नता असते. अर्थात प्रत्येक स्पर्धक बाजारात टिकून राहाण्याचा प्रयत्न करतो. वेगवेगळ्या उत्पादकांच्या वस्तू एकमेकांस निकटतम पर्याय असल्याने आपापसातील संभाव्य स्पर्धा टाळण्यासाठी ते एखादा समूह अथवा संघ स्थापन करु शकतात.

**९) निकटचे पर्याय** (Close substitute) : मक्तेदारीयुक्त स्पर्धेत प्रत्येक उत्पादक आपल्या वस्तूचे वेगळेपण जपत असतो. अर्थात पूर्ण स्पर्धेप्रमाणे या वस्तू एकजिनसी नसल्याने त्यात गुणभिन्नता आढळते. ग्राहक किंवा उपभोक्ता अशा दोन भिन्न वस्तूंमध्ये भेद करु शकतो. म्हणून या वस्तू एकमेकांस परिपूर्ण नव्हे तर निकटच्या पर्याय होऊ शकतात.

अशा प्रकारे मक्तेदारीयुक्त स्पर्धेत मक्तेदारी आणि पूर्ण स्पर्धा या दोन टोकाच्या बाजारयंत्रणांचे प्रतिबिंब आढळते. या बाजारात आपल्या वस्तूच्या उत्पादन व विक्रीसंदर्भात प्रत्येक उत्पादक हा मक्तेदारच असतो. म्हणूनच या स्पर्धेस मक्तेदारीयुक्त स्पर्धा म्हणतात.

**पूर्ण स्पर्धा व एकाधिकारयुक्त स्पर्धा यातील फरक**

| अ. क्र. | एकाधिकारयुक्त स्पर्धा (Monopolistic Competition) | पूर्ण स्पर्धा (Perfect Competition) |
|---|---|---|
| १ | मक्तेदारीयुक्त स्पर्धेमध्ये विभेदात्मक वस्तूसेवांचे उत्पादन | पूर्ण स्पर्धेमध्ये उत्पादीत झालेल्या वस्तूसेवा |

| | | |
|---|---|---|
| | घेतले जाते. | या एकजिनसी असतात. |
| २ | मक्तेदारीयुक्त स्पर्धेतील मागणी वक्र हा पूर्ण स्पर्धेप्रमाणे पूर्ण लवचिक नसतो तर तो मक्तेदारीपेक्षा थोडा जास्त लवचिक असतो. | पूर्ण स्पर्धेतील मागणी वक्र हा पूर्ण लवचिक OX अक्षास समांतर असा असतो. |
| ३ | मक्तेदारीयुक्त स्पर्धेमध्ये जाणीवपूर्वक उत्पादन कमी घेतले जाते मात्र किंमती जास्त ठेवल्या जातात. | पूर्ण स्पर्धेमध्ये उत्पादन मोठ्या प्रमाणावर घेतले जाते व त्यामानाने किंमती खालच्या स्तरावर असतात. |
| ४ | मक्तेदारीयुक्त स्पर्धेमध्ये सरासरी प्राप्ती ही सिमांत प्राप्तीपेक्षा जास्त असते. (AR > MR) कारण विक्री वाढविण्यासाठी उत्पादक/विक्रेते किंमती कमी ठेवतात. | पूर्ण स्पर्धेमध्ये सरासरी प्राप्ती ही सिमांत प्राप्तीच्या बरोबर असते. (AR = MR) |
| ५ | मक्तेदारीयुक्त स्पर्धेमध्ये विक्री वाढविण्यासाठी एक पेढी दुसऱ्या पेढ्यांसोबत किंमत आणि इतर काही /किंमत बाह्य घटकांच्या अनुषंगाने स्पर्धा करते. | पूर्ण स्पर्धेमध्ये विक्री वाढविण्यासाठी एक पेढी दुसऱ्या पेढ्यांसोबत केवळ किंमतीच्या अनुषंगाने स्पर्धा करते. |
| ६ | मक्तेदारीयुक्त स्पर्धेमध्ये अनेक पेढ्या 'गट /समुह' करुन एकसारख्या वस्तूंचे उत्पादन घेतात. | पूर्ण स्पर्धेमध्ये अनेक पेढ्या 'उद्योगाच्या' माध्यमातून बाजारात एकसारख्या वस्तूंचे उत्पादन घेतात. |
| ७ | मक्तेदारीयुक्त स्पर्धेमध्ये उत्पादन घेताना पेढ्या आपल्या पूर्ण क्षमतेचा वापर करीत नाही. | पूर्ण स्पर्धेमध्ये उत्पादन प्रक्रियेमध्ये पेढ्या आपली पूर्ण क्षमता वापरतात. |
| ८ | मक्तेदारीयुक्त स्पर्धेतील पेढ्यांना काही प्रमाणात किंमतीवर नियंत्रण ठेवता येते. | पूर्ण स्पर्धेतील पेढ्या या बाजारामध्ये निश्चित होणारी किंमत स्विकारतात. |
| ९ | मक्तेदारीयुक्त स्पर्धेत पेढ्यांद्वारे विक्रीवाढीसाठी विक्री खर्चाचा (Selling Cost) अवलंब केला जातो. | पूर्ण स्पर्धेमध्ये विक्री वाढीसाठी पेढ्यांना कोणत्याही प्रकारचा विक्री खर्च करावा लागत नाही अथवा जाहिरात तंत्राचा अवलंब करावा लागत नाही. |

## ४.५ अल्पाधिकार/अल्पविक्रेताधिकार/ अल्पजनाधिकार बाजार (Oligopoly Market)

अल्पजनाधिकार हा अपूर्णस्पर्धेच्या बाजारपेठेचा एक महत्त्वाचा प्रकार आहे. जेव्हा बाजारात वस्तूच्या उत्पादकांची संख्या अल्प असते तेव्हा ती बाजारपेठ अल्पाधिकार बाजारपेठ म्हणून ओळखली जाते. अल्पाधिकार ह्या मराठी शब्दाचा इंग्रजी भाषेत असलेला प्रतीशब्द Oligopoly हा आहे. 'Oligos' या शब्दाचा अर्थ 'अल्पसंख्य' असा होतो. तर 'Pollein' या शब्दाचा अर्थ 'विक्रेता' असा आहे. म्हणजेच Oligopoly या शब्दाचा अर्थ अल्पजन विक्रेते असा आहे. यावरुन अल्पाधिकार म्हणजे ''बाजारपेठेत अल्पविक्रेत्यांचा अधिकार होय.'' अल्पाधिकाराच्या सिद्धांताची सर्वप्रथम मांडणी प्रसिद्ध फ्रेंच अर्थशास्त्रज्ञ ऑगस्टीन कुर्नो यांनी केली. १८३८ मध्ये द्वयाधिकार (Duopoly) च्या रुपात हा प्रसिद्ध केला. पण १८८० पर्यत या सिद्धांताकडे जगातील अर्थशास्त्रज्ञांचे जवळजवळ दुर्लक्ष झाले. १८९७ मध्ये या सिद्धांताचे श्री. एन. टी. बेकॉन (N. T. Bacon) यांनी इंग्रजीत भाषांतर केले. तरीही अल्पाधिकारावर १९३० पर्यत विशेष संशोधन झाले नाही. १९३३ मध्ये प्रो. चेंबरलीन व श्रीमती रॉबिन्सन यांनी या विचारास चालना दिली व त्यानंतर अनेक अर्थशास्त्रज्ञांनी अल्पाधिकाराचे वेगवेगळ्या रीतीने विवेचन करण्यास सुरुवात केली.

**व्याख्या**

**१) प्रो. जॉर्ज स्टिग्लर** : ''अल्पजनाधिकार म्हणजे अशी परिस्थिती की, ज्यात एखादी उद्योगसंस्था आपली बाजारनीती प्रतिस्पर्ध्याच्या प्रत्यक्ष व्यवहारानुसार ठरवते.''

**२) प्रो. हैवमन** : ''अल्पजनाधिकार बाजारपेठेत काही थोड्या व्यक्ती किंवा संस्था उत्पादनाची विक्री करत असतात. तसेच त्यांचे उत्पादन एकजिनसी किंवा परस्परपर्यायी स्वरुपाचे असते.''

**३) प्रो. विल्यम फेलनर** : ''अल्पाधिकाराचे वर्णन करताना 'अल्पविक्रेत्यातील स्पर्धा' असे केले आहे. अल्पजनाधिकार बाजारपेठेत काही अल्प विक्रेते आपापसात स्पर्धा करीत असतात.''

ज्या बाजारपेठेत वस्तूचे उत्पादन करणाऱ्या थोड्याच उद्योगसंस्थांमध्ये स्पर्धा चालू असते त्या बाजारपेठेस अल्पजनाधिकार किंवा अल्पसंख्यांक मक्तेदारीची बाजारपेठ असे म्हणतात. इंग्लंड, अमेरिका, भारत ही देखील अल्पाधिकार बाजारपेठेची वैशिष्ट्ये आहेत. भारतातील अल्पाधिकाराची ऑटोमोबाईल उद्योग, ॲल्युमिनिअम उद्योग, स्टील उद्योग, सिमेंट उद्योग, शीतपेय उद्योग, वाहन उद्योग, भ्रमणध्वनी इत्यादी उदाहरणे आहेत. ह्या सर्व व्यवसायांमध्ये उत्पादकांची संख्या दहा ते बाराच्या दरम्यान असते. त्यामुळे त्या निर्णयाच्या बाबतीत एकमेकांवर अवलंबून असतात.

**अल्पाधिकाराचे प्रकार** (Types of Oligopoly)

अल्पाधिकाराचे वर्गीकरण वेगवेगळ्या आधारे केले जाते. अल्पाधिकाराचे वर्गीकरण करण्याचा मुख्य उद्देश म्हणजे वस्तूच्या किंमती आणि उत्पादन ठरविण्यासाठी असा वर्गीकरणाचा उपयोग होतो. अल्पाधिकाराचे विविध प्रकार पुढीलप्रमाणे आहेत.

| अल्पाधिकाराचे प्रकार |
|---|
| १) पूर्ण व अपूर्ण अल्पाधिकार |
| २) खुला व बंदिस्त अल्पाधिकार |
| ३) आंशिक व पूर्ण अल्पाधिकार |
| ४) संगनमत व असंगनमत अल्पाधिकार |
| ५) संयुक्त व संघटीत अल्पाधिकार |

**१) पूर्ण व अपूर्ण अल्पाधिकार** (Perfect or pure Oligopoly and Imperfect or Differentiated Oligopoly) : पूर्ण अल्पाधिकारात विक्रेत्यांच्या वस्तू पूर्ण स्पर्धेप्रमाणे एकजिनसी असतात. याउलट अपूर्ण अल्पाधिकार बाजारपेठेत विक्रेत्यांच्या वस्तू एकजिनसी नसतात त्यात वस्तूभेद केला जातो.

**२) खुला व बंदिस्त अल्पाधिकार** (Open Oligopoly and close Oligopoly) : खुल्या अल्पाधिकारात नवीन विक्रेत्यांना मुक्तपणे प्रवेश करता येतो याउलट नवीन उद्योगसंस्थांच्या प्रवेशाला बंधन असेल तर त्याला बंदिस्त अल्पाधिकार म्हणतात.

**३) आंशिक व पूर्ण अल्पाधिकार** : आंशिक अल्पाधिकारात एक उत्पादनसंस्था किंमत निश्चिती करते व इतर उत्पादनसंस्था त्या किंमतीचे अनुकरण करतात. म्हणजेच किंमत नेतृत्व असते. तर पूर्ण अल्पाधिकारात प्रत्येक उद्योगसंस्था किंमत व उत्पादन निर्णय स्वतंत्रपणे घेते. म्हणजेच पूर्ण अल्पाधिकारात किंमत नेतृत्व नसते.

**४) संगनमत व असंगनमत अल्पाधिकार** (Collusive and Non-Collusive Oligopoly) : संगनमत अल्पाधिकारात सर्व उत्पादक एकत्र येऊन संगनमताने किंमत व उत्पादन प्रमाण निश्चित करतात. याउलट असंगनमत अल्पाधिकारात संगनमत नसते. प्रत्येक विक्रेता स्वतःच्या इच्छेनुसार किंमत आकारतो.

**५) संयुक्त व संघटीत अल्पाधिकार** (Syndicated Oligopoly and Orgainsed Oligopoly) : संयुक्त अल्पाधिकारात एकाच मध्यवर्ती संस्थेमार्फत सर्व उत्पादकांच्या उत्पादनांची विक्री केली जाते. त्यामुळे काही अल्पविक्रेत्यांचेच किंमतीवर नियंत्रण राहते. तर संघटीत अल्पाधिकारात अल्पविक्रेत्यांमध्ये किंमत, उत्पादन, बाजारपेठ इ. विषयी करार झालेला असतो. बाजारपेठेची आपापसात वाटणी केली जाते.

**अल्पाधिकार बाजारपेठेची वैशिष्ट्ये** (Characteristics of Oligopoly)

अल्पाधिकार बाजारपेठेचे स्पष्टीकरण वेगवेगळ्या अर्थतज्ञांनी वेगवेगळ्या दृष्टीकोनातून केले आहे. त्यामुळे अल्पाधिकार बाजारपेठेचे एकच प्रतिमान सांगता येत नाही. मूल्यनिश्चितीच्या दृष्टीने अल्पाधिकाराची सर्वच वैशिष्ट्ये महत्त्वाची आहेत. पण त्यातील काही अधिक महत्त्वाची आहेत, त्यांचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे देता येईल.

| अल्पाधिकार बाजारपेठेची वैशिष्ट्ये |
|---|
| १) अल्पसंख्य विक्रेते |
| २) परस्परावलंबीत्व |
| ३) परस्पर संगनमत |
| ४) ताठर/परिदृढ किंमत |
| ५) जाहिरात आणि विक्रीखर्च |
| ६) उद्योगसंस्थांच्या प्रवेशास बंधन |
| ७) भिन्न संस्थात्मक रचना |
| ८) गैरनफा हेतू |

**१) अल्पसंख्य विक्रेते** (Few Sellers) : अल्पाधिकारात अल्पसंख्य विक्रेते असतात. हे एकजिनसी वस्तूचा किंवा विभिन्नजिनसी वस्तूचा पुरवठा करीत असतात. अल्पाधिकारात किती विक्रेते असतात हे निश्चितपणे सांगता येत नाही; परंतु पेढ्यांची संख्या अल्प असते. म्हणजेच २, ४, ६, ७ इत्यादी.

**२) परस्परावलंबीत्व** (Interdependence) : अल्पाधिकारातील विक्रेते एकमेकांवर अवलंबून असतात. अल्पाधिकारात एका पेढीच्या निर्णयाचा दुसऱ्या पेढीच्या निर्णयावर परिणाम होणे अपरिहार्य आहे कारण पेढ्यांची संख्या अल्प असते. अल्पाधिकारातील एखाद्या पेढीने

जर त्याच्या किंमत धोरणात, जाहिरातीत, उत्पादन धोरणात बदल केला तर प्रतिस्पर्धी पेढ्या त्यांची प्रतिक्रिया करतात. अल्पाधिकारातील प्रत्येक पेढीचे किंमत आणि उत्पादन धोरण हे इतर पेढ्यांद्वारे अंमलात असलेल्या किंमत धोरणावर अवलंबून असते.

**९) कोनदार मागणी वक्र**
**१०) एकसारख्या आकाराची कमतरता**
**११) अनिश्चितता**

**३) परस्पर संगनमत** : किंमत स्पर्धेमुळे किंमत कमी होऊन सर्व उत्पादकांचे नुकसान होईल. हे नुकसान टाळण्याचा मार्ग म्हणजे परस्पर संगनमत करणे. उत्पादक, उत्पादन, विक्री व किंमत यासंबंधी करार करतात आणि समान धोरण आखून एकमेकांतील स्पर्धा कमी करण्याचा प्रयत्न करतात. यालाच ''सज्जनांचा करार'' असेही संबोधतात.

**४) ताठर/परिदृढ किंमत** (Price Rigidity) : ताठर किंमत म्हणजे मागणी पुरवठ्यानुसार न बदलणारी किंमत होय. किंमत ताठर ठेवण्याचे कारण म्हणजे किंमत युद्ध सुरु होईल ही भिती प्रत्येक उत्पादकाला वाटते. त्यामुळे विशिष्ट किंमत स्थिर ठेवली जाते. फक्त ती किंमत उत्पादकाच्या फायदयाची असली पाहिजे. अतिउच्च किंमत स्थिर ठेवणे म्हणजे ग्राहकाचे नुकसान करण्यासारखे आहे.

**५) जाहिरात आणि विक्रीखर्च** (Advertising and Selling Cost) : उपभोक्त्यास आपल्या वस्तूची माहिती करुन देऊन वस्तूची मागणी करण्यास प्रवृत्त करण्यासाठी अल्पाधिकारातील सर्वच पेढ्या जाहिरात आणि विक्रीखर्च करीत असतात. अल्पाधिकारातील पेढ्या वस्तूच्या मागणीचा हिस्सा कमी होऊ नये म्हणून किंवा मागणीचा बाजारपेठेतील हिस्सा वाढावा म्हणून तीव्र प्रमाणात जाहिरात आणि विक्री खर्च करतात.

**६) उद्योगसंस्थांच्या प्रवेशास बंधन** (Barriers to Entry of Firms) : अल्पाधिकार विक्रेत्यांमध्ये फार स्पर्धा असते. त्यामुळे अल्पकाळात उद्योगधंद्यातून बाहेर जाण्यास किंवा प्रवेश करण्यास बंधने नसतात. परंतू दिर्घकाळात मात्र प्रवेशास बंधने असतात.

**७) भिन्न संस्थात्मक रचना** : अल्पाधिकार बाजारपेठेतील संस्थांमध्ये एकसारखेपणा दिसून येत नाही. काही उत्पादनसंस्था आकाराने प्रचंड मोठ्या असतात तर काही उत्पादनसंस्था आकाराने लहान असतात. काही वेळा उत्पादन एकजिनसी असते तर काही वेळा वस्तूभेद केला जातो.

**८) गैरनफा हेतू** : अल्पाधिकार बाजारपेठेतील उत्पादनसंस्थांचा हेतू नफ्याबरोबरच उत्पादनसंस्थेचा विस्तार करणे, विक्री वाढवणे, नावलौकिक संपादन करणे हा सुद्धा असतो.

**९) कोनदार/टोकदार/दंतूर मागणी वक्र** (Kinky Demand Curve) : अल्पाधिकारातील मागणी वक्राचे स्वरुप ठरविणे सोपे नाही. कोणीही उत्पादकाची वागणूक कशी असेल हे सांगू शकत नाही. त्यामुळे हा मागणी वक्र कोनदार स्वरुपाचा असतो. पूर्णस्पर्धेत मागणीवक्र हा X अक्षास समांतर (आडवा) असतो. मक्तेदारीमध्ये मागणीवक्र हा ऋण आकाराचा असतो हे निश्चित आहे. परंतु अल्पाधिकारात मात्र मागणीवक्राचा आकार सांगणे अवघड आहे. कारण प्रत्येक पेढीचे किंमत किंवा उत्पादन धोरण हे तिच्या प्रतिस्पर्ध्याच्या प्रतिक्रियेवर अवलंबून असते.

**१०) एकसारख्या आकाराची कमतरता** (Lack of Uniformity in Size) : पेढ्यांचा आकार हा एकसारखा नसणे हे अल्पाधिकार बाजारपेठेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. काही पेढ्या आकाराने फार छोट्या असतात, तर काही फार मोठ्या असतात. अल्पाधिकारात पेढ्यांच्या आकारात भिन्नता दिसून येते.

**११) अनिश्चितता** (Uncertainty) : एका पेढीच्या एखाद्या विशिष्ट निर्णयाला तिच्या प्रतिस्पर्धी पेढीकडून कोणत्या प्रकारचे उत्तर मिळेल हे अल्पाधिकारात सांगणे फारच कठीण आहे. अल्पाधिकारातील उत्तरा-प्रत्युत्तराची क्रिया ही बुद्धिबळाच्या (chess) खेळाप्रमाणे असते. अशा अनिश्चित परिस्थितीत मार्ग काढण्यासाठी अल्पाधिकारातील पेढ्या वेगवेगळ्या उपायांचा अवलंब करतात.

विविध वैशिष्ट्यांच्या आधारावर अल्पाधिकार बाजारपेठ आपले वेगळेपण, स्वतंत्र ओळख व अस्तित्त्व राखून असते. प्रचलित परिस्थितीत ही बाजारपेठ सर्वत्र प्रकर्षाने आढळते.

**४.६ द्वयाधिकार/द्विविक्रेताधिकार** (Duopoly)

द्वयाधिकाराला इंग्रजीत Duopoly असे म्हणतात. हा शब्द Duo म्हणजे दोन आणि Poly म्हणजे विक्रेता अशा दोन शब्दांपासून बनला आहे. द्वयाधिकार (Duopoly) द्वयाधिकार हे अल्पाधिकाराचे एक विशेष रुप

मानले जाते. द्वयाधिकारामध्ये बाजारपेठेत फक्त दोनच विक्रेत्यांचा अल्पाधिकार असतो. या दोन विक्रेत्यांमध्ये कधी स्पर्धा असते तर कधी संगमत (Collusion) झालेले असते. दोनच विक्रेत्यांच्या स्थितीत द्वयाधिकारी बाजारपेठ असे म्हटले जाते. द्वयाधिकारी बाजारपेठेत अल्पाधिकारी बाजारपेठेचे अत्यंत सरळ रुप मानले जाते. अल्पाधिकारी व द्वयाधिकारी बाजार यात मूलभूत असा फरक नाही. अल्पाधिकाराची जी वैशिष्ट्ये आहेत तीच द्वयाधिकाराची आहेत. या दोन्ही बाजाराचे प्रश्न सारखेच आहेत. १९३८ मध्ये प्रसिद्ध फ्रेंच अर्थशास्त्रज्ञ ऑगस्टीन कुर्नो यांनी द्वयाधिकारी संकल्पनेचे स्पष्टीकरण केले. काही व्याख्या पुढीलप्रमाणे.

**१) प्रा. कोहेन आणि सियर्ट :** ''द्विविक्रेताधिकार हा अल्प विक्रेताधिकाराचा असा विशेष बाजार आहे की ज्यात फक्त दोनच विक्रेते असतात.''

२) 'ज्या बाजारात वस्तूंचे दोन उत्पादक किंवा विक्रेते असतात त्या बाजाराला द्वयाधिकार किंवा द्विविक्रेताधिकार बाजार म्हणतात.'

या बाजारात दोनच उत्पादक किंवा विक्रेते असतात. ते एकसारख्या किंवा जवळपास सारख्या वस्तूंचे उत्पादन आणि विक्री करतात. दोन्ही उत्पादन आणि किंमत याबाबत स्वतंत्र निर्णय घेतात. पण एकमेकांच्या निर्णयांचा एकमेकांवर परिणाम होतो. बाजारात दोनच उत्पादक असल्याने ते आपापसात तीव्र स्पर्धा करण्याऐवजी बाजार वाटा व किंमत बाबत संगनमत करतात. बाजार वाट्याचे विभाजन केल्यावर दोन्हींही आपापल्या विभागात मक्तेदार असतात. किंमत मक्तेदारी प्रमाणेच ठरवितात. उदा. भारतातील टाटा ट्रक आणि अशोक लेलॅण्ड ट्रक. आर्थिक सुधारणापूर्वी ह्या दोनच कंपन्या अवजड वाहन तयार करीत होत्या. त्यांचा भारतीय बाजारपेठेत द्वयाधिकार होता.

**द्वयाधिकारी बाजारपेठेचे लक्षणे किंवा वैशिष्ट्ये**

१) उत्पादकांची संख्या फक्त दोन एवढीच मर्यादित असते.
२) वस्तू बहुधा एकरुप असतात क्वचित प्रसंगी भिन्नरुप आढळत असतात.
३) पेढ्यांचे संगनमत असते किंवा आपसात आत्यंतिक स्पर्धाही असते.
४) वस्तूची किंमत ठरवितांना पेढी दुसऱ्या पेढीच्या किमतीवर अवलंबून असते पण प्रामुख्याने किमतीत स्थिरता दिसून येत असते.
५) किंमतोत्तर स्पर्धा बहुधा केली जात नाही.

**प्रश्नसंग्रह**

**वस्तुनिष्ठ प्रश्न**

१) नाशवंत मालाची बाजारपेठ अशी आहे.
अ) राष्ट्रीय ब) आंतरराष्ट्रीय **क) स्थानिक** ड) प्रादेशिक
२) स्पर्धात्मक बाजारपेठेत उत्पादनाची किंमत कशी ठरवली जाते.
अ) विक्रेत्याद्वारे **ब) मागणी आणि पुरवठा समतोल** क) सरकारद्वारे ड) अर्थमंत्र्यांद्वारे
३) स्पर्धात्मक बाजारपेठेत दीर्घकाळात कंपन्यांना मिळते.
अ) असामान्य नफा ब) तोटा **क) सामान्य नफा** ड) शून्य नफा
४) कोणत्या बाजारात खरेदीदार आणि विक्रेत्यांची संख्या खूप जास्त आहे?
अ) अल्पाधिकार **ब) पूर्णपणे** क) मक्तेदारी ड) द्वैत
५) 'राजस्थानी चुनरी' च्या बाजारपेठेला म्हणतात.
अ) आंतरराष्ट्रीय ब) राष्ट्रीय **क) प्रादेशिक** ड) स्थानिक
६) मक्तेदारीयुक्त स्पर्धा ही ..... आहे.
अ) पूर्ण स्पर्धा **ब) अपूर्ण स्पर्धा** क) मक्तेदारी ड) अल्पाधिकार
७) मक्तेदारीयुक्त स्पर्धेची संकल्पना ...... यांनी मांडली.
अ) आल्फ्रेड मार्शल **ब) एडवर्ड चेंबरलीन** क) डेव्हिड रिकार्डो
८) मक्तेदारीयुक्त स्पर्धेतील प्रत्येक पेढी ही ............. असते.
अ) स्वतंत्र ब) स्वावलंबी **क) परस्परावलंबी** ड) य अक्षास समांतर

९) ..... या बाजारात वाहतूक खर्च नगण्य असतो.

**अ) पूर्ण स्पर्धा** ब) अपूर्ण स्पर्धा क) एकाधिकारयुक्त ड) अल्पाधिकारी

१०) समूह हे .... बाजारपेठेचे वैशिष्ट आहे.

अ) मक्तेदारी ब) अल्पाधिकार **क) मक्तेदारीयुक्त स्पर्धा** ड) पूर्ण स्पर्धा

११) अल्पाधिकाराची संकल्पना सर्वप्रथम ..... यांनी मांडली.

अ) ॲडमस्मीथ ब) जे. एम्. केन्स **क) ऑगस्टीन कुर्नो** ड) ए. टी. बेकॉन

१२) अल्पाधिकारातील मागणीवक्र असा असतो.

**अ) अनिश्चित** ब) निश्चित क) क्ष अक्षास समांतर ड) य अक्षास समांतर

१३) कुर्नोच्या प्रतिमानातील पेढ्यांची संख्या ....... एवढी असते.

**अ) दोन** ब) तीन क) पाच ड) सहा

१४) अल्पाधिकारातील किंमत ताठरतेचे प्रतिमान ..... यांनी मांडले.

अ) ए. टी. बेकॉन ब) ऑगस्टीन कुर्नो **क) पॉल स्विझी** ड) डॉ. मार्शल

१५) जेव्हा किंमत निश्चिती आणि उत्पादन याबाबत पेढ्यांमध्ये सहमती असते तेव्हा त्यास .....म्हणतात.

**अ) पूर्ण संगनमत** ब) अपूर्ण संगनमत क) किंमत नेतृत्त्व ब) तोटा

१६) ...... बाजारपेठेत एकच ग्राहक असतो.

**अ) क्रेताधिकार** ब) मक्तेदारी क) द्वयाधिकार ड) मक्तेदारी

१७) ..... बाजारपेठेत एकच ग्राहक आणि एकच विक्रेता असतो.

अ) क्रेताधिकार **ब) द्विपक्षीय मक्तेदारी** क) अल्पाधिकार ड) मक्तेदारी

१८) ..... हे वैशिष्ट पूर्ण स्पर्धेचे नाही.

अ) असंख्य विक्रेते आणि ग्राहक ब) वस्तूचे नग एकजिनसी

क) मुक्त प्रवेश व गमन **ड) वाहतूक खर्चाचा समावेश**

१९) ..... बाजारपेठेत स्पर्धेचा पूर्णपणे अभाव असतो.

अ) पूर्ण स्पर्धा ब) अपूर्ण स्पर्धा **क) एकाधिकारी** ड) अल्पाधिकारी

२०) एकाधिकारी स्पर्धेचे उद्दिष्ट ..... आहे.

अ) मजुरी मिळविणे ब) खंड मिळविणे **क) नफा मिळविणे** ड) व्याज मिळविणे

२१) एकाधिकारी स्पर्धेत पेढ्यांची संख्या असते.

**अ) एक** ब) दोन क) दहा ड) असंख्य

२२) एकाच वस्तूची निरनिराळ्या ग्राहकाकडून निरनिराळी किंमत वसूल करणे म्हणजे ..... होय.

**अ) मूल्यविभेद** ब) राशीपातन क) विक्रीव्यय ड) किंमत परिदृढता

२३) मुल्यभेदन ..... मध्ये शक्य होते.

अ) पूर्ण स्पर्धा ब) द्वयाधिकार **क) एकाधिकार** ड) अल्पाधिकार

२४) 'Oligopoly' हा शब्द या ग्रीक शब्दापासून तयार झाला.

अ) Olig ब) Oligio क) Oligi **ड) Oligos**

२५) अपूर्ण स्पर्धा ही संकल्पना ..... यांनी मांडली.

अ) प्रा. चेंबरलीन **ब) श्रीमती रॉबिन्सन** क) पिगू ड) बेनहॅम

२६) 'The Theory of Monopolistic Competition' हा ग्रंथ यांनी प्रकाशित केला.

**अ) प्रा. चेंबरलीन** ब) श्रीमती रॉबिन्सन क) पिगू ड) बेनहॅम

२७) 'The Theory of Imperfect Competition' हा ग्रंथ यांनी प्रकाशित केला.

अ) प्रा. चेंबरलीन **ब) श्रीमती जोन रॉबिन्सन** क) पिगू ड) बेनहॅम

२८) ..... बाजारपेठेत केवळ दोन विक्रेते असतात.

अ) पूर्ण स्पर्धा **ब) द्वयाधिकार** क) एकाधिकार ड) अल्पाधिकार

२९) ..... स्पर्धेनुसार या बाजारपेठेत पूर्ण स्पर्धेचा अभाव असतो.

अ) पूर्ण स्पर्धा **ब) अपूर्ण स्पर्धा** क) एकाधिकारी ड) अल्पाधिकारी

३०) ..... बाजारपेठेत उत्पादन संस्थेचे वस्तूच्या पुरवठ्यावर नियंत्रण असते.

अ) पूर्ण स्पर्धा ब) अपूर्ण स्पर्धा **क) एकाधिकारी** ड) अल्पाधिकारी

**लघुत्तरी प्रश्न**

१) पूर्णपणे स्पर्धात्मक बाजार म्हणजे तुम्हाला काय समजते? स्पष्ट करा.

१) पुर्ण स्पर्धेची कोणतेही पाच वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) पूर्ण स्पर्धा व एकाधिकार स्पर्धा यातील फरक सांगा.

३) मक्तेदारीयुक्त स्पर्धेची कोणतेही पाच वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

४) मक्तेदारीची कोणतेही पाच वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

५) अल्पाधिकाराची कोणतेही पाच वैशिष्ट्ये सांगा.

६) एकाधिकाराचे प्रकार सांगा.

७) मक्तेदारीयुक्त स्पर्धा व पूर्ण स्पर्धा यांतील भेद स्पष्ट करा.

८) अल्पाधिकाराचे प्रकार सांगा.

९) मुल्यभेदाचे प्रकार स्पष्ट करा.

१०) अल्पाधिकाराची संकल्पना स्पष्ट करा.

**दीर्घोत्तरी प्रश्न**

१) पूर्णपणे स्पर्धात्मक बाजाराची व्याख्या सांगून वैशिष्ट्यांचे वर्णन करा.

२) मक्तेदारीयुक्त स्पर्धेची व्याख्या सांगून वैशिष्ट्ये सविस्तर स्पष्ट करा.

३) मक्तेदारीची व्याख्या सांगून वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

४) मक्तेदारीयुक्त स्पर्धेची व्याख्या सांगून वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

# प्रकरण ५
# उत्पादनाचे घटक
## (Production Factors)

---

**५.१ उत्पादन घटकांची व्याख्या व वैशिष्ट्ये** (Definition and Characteristics of Production Factors)

**१. भूमी** (Land)

आर्थिक विश्लेषणात वस्तूच्या उत्पादनासाठी भूमी, श्रम, भांडवल व संयोजक हे घटक वापरले जातात. यापैकी श्रम व संयोजक हे घटक मानवाशी संबंधित आहेत. सामान्य व्यवहारात आपण भूमी या संकल्पनेचा अर्थ जमीन असा संकुचित स्वरुपात घेतला जातो. परंतु भूमी या घटकाचा अर्थ अर्थशास्त्रात व्यापक आहे. कारण निसर्गाकडून मानवाला उत्पादन कार्यासाठी ज्या काही मोफत किंवा देणगी रुपाने मिळालेल्या घटकांचा समावेश होतो. भूमीचा साठा व पुरवठा मर्यादित आहे. भूमी या सदरात जमीन, डोंगर, पर्वतरांगा, नद्या, समुद्रातील जल संपत्ती या भूपृष्ठावरील घटकांचा तर सोने, चांदी, तांबे, जस्त, लोह, अभ्रक, कोळसा, खनिज तेल व नैसर्गिक वायू अशा भूगर्भातील घटकांचा व हवा, सूर्यप्रकाश, उष्णतामान, पर्जन्यवृष्टी अशा भूपृष्ठाच्या वर असलेल्या घटकांचा किंवा साधनांचा समावेश केला जातो. उत्पादन कार्यात सहभागी झाल्याबद्दल भूमीला खंड मिळतो.

**अर्थ व व्याख्या**

'भूमी' हा उत्पादनाचा नैसर्गिक घटक असून विनामूल्य देणगी आहे. ''भूपृष्ठालगत, भूपृष्ठाच्यावर व भूपृष्ठाच्या खाली उपलब्ध असलेल्या नैसर्गिक साधनसंपत्तीस अर्थशास्त्रामध्ये 'भूमी' असे म्हणतात''. उदा. खनिजे ही भूपृष्ठाखाली मिळतात, मृदा व पाणी हे भूपृष्ठालगत मिळते तर हवा व सूर्यप्रकाश भूपृष्ठावर मिळतात. म्हणजे अर्थशास्त्रात भूमी ही व्यापक संकल्पना आहे. भूमीचा अर्थ व्यापक स्वरुपात समजून घेण्यासाठी काही महत्त्वाच्या व्याख्या पुढीलप्रमाणे देता येईल.

**१) डॉ. आल्फ्रेड मार्शल** : ''निसर्गाने मानवाच्या मदतीला विनामूल्य दिलेल्या जमिनीतील, पाण्यातील, हवेतील, प्रकाशातील व उष्णतेतील शक्ती आणि साधने म्हणजे भूमी होय.''

**२) सेलिगमन** : ''मानवाने कोणतीही प्रक्रिया करण्यापूर्वी निसर्गाने विनामूल्य दिलेल्या सर्व देणग्या म्हणजे भूमी होय.''

**भूमीची वैशिष्ट्ये** (Characteristics of Land)

| **भूमीची वैशिष्ट्ये** |
|---|
| **१) मर्यादित पुरवठा** |
| **२) निसर्गदत्त देणगी** |
| **३) अविनाशी घटक** |
| **४) स्थितिशील घटक** |
| **५) निष्क्रिय घटक** |
| **६) भूमीची गुणभिन्नता** |
| **७) भूमीचे असमान वाटप** |

**१) मर्यादित पुरवठा** : भूमी ही मानवाला विनामूल्य मिळालेली देणगी असल्यामुळे भूमी या घटकांचे एकूण क्षेत्रफळ मर्यादित आहे. मानव समुद्राला मागे हटवून जमिनीवर एखादे सरोवर तयार करेल, परंतु जमिनीचे आकारमान तेवढेच राहते. मानव भूमीच्या बाह्य स्वरुपात बदल करु शकतो परंतु भूमीचा पुरवठा वाढवू शकत नाही.

**२) निसर्गदत्त देणगी** : भूमी ही निसर्गाकडून मानवाला देणगीरुपात मोफत मिळालेली आहे. मानव या घटकांची निर्मिती करु शकत नाही. सर्व निसर्गनिर्मित घटकांचा मानव उत्पादन कार्यासाठी वापर करुन घेतो. त्या मोबदल्यात मानव निसर्गाला कोणतेही शुल्क किंवा किंमत देत नाही.

**३) अविनाशी घटक** : भूमी हा घटक अमर्त्य आहे. अविनाशी आहे. भूमी नष्ट करता येत नाही. भूकंप, आग, महापूर, युद्ध इत्यादी आपत्ती काळातही हा घटक संपूर्णतः नष्ट होत नाही. कारण शेतजमिनीत पीक निर्माण करण्याचा गुणधर्म हा अविनाशी आहे. त्यामुळे नष्ट होत नाही.

**४) स्थितिशील घटक** : उत्पादनाच्या घटकातील श्रम, भांडवल व संयोजक हे घटक गतिशील आहेत. कारण ते एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाऊ-येऊ शकतात. परंतु भूमी हा घटक स्थितिशील आहे. जमीन, खनिज संपत्ती, वनसंपत्ती सागर संपत्ती, हवामान या घटकांचे स्थलांतर करता येत नाही. ते सर्व अचल असतात.

**५) निष्क्रिय घटक** : भूमी हा घटक स्वतः कशाचीही उत्पत्ती करु शकत नाही. त्यामुळे तो निष्क्रिय घटक आहे. जोपर्यंत या घटकांचा मानवी श्रम आणि भांडवलाची संपर्क येत नाही तोपर्यंत उत्पादन होत नाही. उदा. शेतजमिनीवर मानव जोपर्यंत श्रम करत नाही, बी-बियाणांची लागवड करीत नाही, मशागत करीत नाही तोपर्यंत पिकांचे उत्पादन होत नाही. या निष्क्रिय घटकाला मानवी श्रम व भांडवल यासारखे घटक सक्रिय कार्य करतात.

**६) भूमीची गुणभिन्नता** : सर्व भूमी एकसारखी नसते. भूपृष्ठावरील सर्व जमीन, भूगर्भातील सर्व खनिज संपत्ती, भूपृष्ठाच्या वर असलेले सर्व घटक एकसारखे नसतात. त्यांच्या गुणवत्तेत फरक असतो. उदा. जमिनीची सुपीकता. सुपीक जमिनीची उत्पादकता जास्त असते तर हलक्या जमिनीची कमी असते. जसे- मुरमाळ, गाळाची, डोंगराळ तांबडी जमीन इ.

**७) भूमीचे असमान वाटप** : निसर्गाकडून जमिनीचे वाटप विषम झालेले दिसून येते. उदा. पंजाब आणि हरियाणामध्ये सुपीक जमीन तर राजस्थानमध्ये वाळवंटी जमीन. महाराष्ट्रातील नाशिक भागात द्राक्षांकरिता उपयुक्त तर जम्मू-काश्मीरमध्ये सफरचंदाकरिता आवश्यक जमीन व हवामान उपलब्ध आहे. अरेबियन राष्ट्रांमध्ये पेट्रोलियम पदार्थाच्या खाणी दिसून येतात. याचा अर्थ निसर्गाने दिलेल्या भूमीचे वाटप असमानरित्या झालेले दिसून येते.

**२. श्रम** (Labour)

उत्पादन प्रक्रियेत श्रम हा मानवी घटक आहे. श्रम हा उत्पादनाचा सजीव व क्रियाशील घटक आहे. श्रम हे शारीरिक, बौद्धिक व कौशल्यपूर्ण कार्याशी संबंधित असते. हा घटक मानवीय संपत्ती असून त्याची गतिशीलता, कुशलता व मानसिकता या बाबी महत्त्वपूर्ण आहेत. देशाच्या आर्थिक विकासाकरिता श्रम हा महत्त्वाचा घटक असतोच, पण त्याहीपेक्षा जास्त महत्त्वाची बाब असते ती त्याची शक्ती, क्षमता, काम करण्याची पद्धत व एकूण काम करणाऱ्यांची संख्या. श्रम हा घटक कमीत कमी नियंत्रणक्षम व निश्चित शास्त्रीय चौकटीत बसणारा आहे. अर्थशास्त्रामध्ये श्रम ही संकल्पना अधिक व्यापक स्वरुपाची आहे. आर्थिक किंवा मौद्रिक लाभाच्या अपेक्षेने केलेली कृती म्हणजे श्रम होय. आर्थिक मोबदला मिळविण्याच्या हेतूने मानवाने केलेले कोणतेही शारीरिक व बौद्धिक काम म्हणजे 'श्रम' होय. श्रम या उत्पादन घटकाला वेतन, मजुरी या स्वरुपात मोबदला मिळतो. उदा. सुतार, लेखनिक, अभियंता इत्यादींची कामे.

**अर्थ व व्याख्या**

सामान्यतः व्यवहारात 'श्रम' म्हणजे कोणतेही काम करण्यासाठी केले जाणारे प्रयत्न किंवा कठोर परिश्रम, मग हा प्रयत्न मनुष्याने केला असेल किंवा प्राणी, त्याला नेहमीच 'श्रम' असे म्हणतात. सामान्यत: लोक म्हणतात की एखादा वकील, डॉक्टर किंवा शेतकरी खूप मेहनत घेतो, बैल खूप मेहनत करत असतो इ. याशिवाय हा प्रयत्न आरोग्य सुधारण्याच्या दृष्टीकोनातून केला जातो किंवा पैसा कमावण्याच्या दृष्टिकोनातून केला जातो त्याला 'श्रम' असे नाव दिले जाईल. सोप्या शब्दात असे म्हणता येईल की, कोणतेही काम करताना जे काही प्रयत्न केले जातात त्याला सामान्य भाषेत श्रम असे म्हणतात. परंतु अर्थशास्त्रात 'श्रम'चा अर्थ व्यापक आहे. अर्थशास्त्रज्ञांनी श्रमाच्या विविध व्याख्या दिल्या आहेत, त्यातील काही प्रमुख व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

**१) प्रा. मार्शल** : 'श्रम म्हणजे मनुष्याच्या आर्थिक कार्याचा संदर्भ मग तो शारीरिक असो किंवा मानसिक.'

**२) प्रा. पिगू** : 'जे श्रम (किंवा सेवा) पैशात मोजले जाऊ शकतात त्याला श्रम म्हणतात.'

**श्रमाचे प्रकार** (Types of Labour)

शारीरिक, बौद्धिक आणि उत्पादक अशा तीन वर्गात श्रमांचे विभाजन होते.

**१) शारीरिक श्रम** : ज्या श्रमामध्ये शारीरिक शक्तीचा वापर जास्त प्रमाणात केला जातो त्याला शारीरिक श्रम असे म्हणतात. उदा. हमाल, मजूर, शेतकरी इ.

**२) बौद्धिक श्रम** : ज्या श्रमामध्ये बौद्धिक शक्तीचा वापर जास्त प्रमाणात केला जातो त्याला बौद्धिक श्रम असे म्हणतात. उदा. शिक्षक, डॉक्टर, इंजिनिअर इ.

**३) उत्पादक श्रम** : ज्या श्रमामधून उपयोगिता निर्माण होते त्या श्रमास उत्पादक श्रम असे म्हणतात. उदा. विणकाम, शिंपी, कुंभार इ.

**श्रमाची वैशिष्ट्ये** (Characteristics of Labour)

| श्रमाची वैशिष्ट्ये |
| --- |
| १) भावनात्मक घटक |
| २) शीघ्रविनाशी घटक |
| ३) अविभाज्य घटक |
| ४) श्रम बहुजिनसी |
| ३) सक्रीय घटक |
| ५) श्रमीक आपले श्रम विकतो स्वत:ला नाही |
| ६) गतिशील घटक |

**१) भावनात्मक घटक** : श्रम करणारे कामगार हे भावना असणारा घटक आहे. भूमी, भांडवल घटक निर्जीव असतात. मानव हा सजीव प्राणी आहे. त्याला मन व भावना आहेत. तो स्वतः मत, विचार व्यक्त करतो. म्हणून संयोजकाला त्यांच्याकडून काम करुन घेताना त्याच्या इच्छा, आकांक्षा, भावनांचा आदर करावा लागतो. त्याचा कल विचारात घेऊन त्यांच्याकडून काम करुन घेतले जाते. त्यांच्यावर सक्ती, जबरदस्ती करता येत नाही. यामुळे यांचा वापर काळजीपूर्वक करावा लागतो. प्रत्येक कामगाराला आठवड्यातून एक सुट्टी देणे बंधनकारक असते.

**२) शीघ्रविनाशी घटक** : भौतिक वस्तूंचा संचय करता येतो. म्हणजेच भांडवल यासारखे श्रमाची साठवणूक करता येत नाही. भांडवल या घटकांचा काही काळ संचय करता येतो परंतु श्रमाचा संचय करता येत नाही. श्रमीक ज्या दिवशी कामावर आलेला नसेल त्या दिवसाचे त्याचे श्रम वाया जातात. श्रम नाशवंत असतात.

**३) अविभाज्य घटक** : श्रम श्रमिकांपासून विभक्त करता येत नाही. ज्या ठिकाणी श्रम वापरुन उत्पादन केले जाते त्या ठिकाणी कामगार (श्रमिकाला) जावे लागते. जमीन जमीनदारापासून, भांडवल भांडवलदारापासून वेगळे करता येते. परंतु श्रम श्रमिकांपासून विभक्त किंवा वेगळे करता येत नाही. श्रम श्रमीकांच्या अंगभूत असतात. श्रम प्रत्ययास येण्यासाठी कामावर प्रत्यक्ष हजर राहावा लागतो. श्रम हा निसर्गनिर्मित घटक आहे.

**४) श्रम बहुजिनसी** : श्रमिकाची कार्यक्षमता वेगवेगळी असते. उदा. एखादा कामगार कमी वेळेत अधिक उत्पादन करु शकतो या तुलनेने दुसरा कामगार त्याच्या इतके उत्पादन करु शकत नाही. ही उत्पादन करण्याची क्षमता प्रत्येकाची वेगवेगळी असू शकते.

**३) सक्रीय घटक** : भूमी, भांडवल हे घटक निष्क्रिय आहेत. जोपर्यंत या घटकांशी मानवी श्रमाचा संबंध येत नाही तोपर्यंत उत्पादन क्रिया सुरु होत नाही. निष्क्रिय घटकांना सक्रीय करण्याचे काम मानवी श्रम करतात.

**५) श्रमीक आपले श्रम विकतो स्वत:ला नाही** : एखाद्या वस्तू किंवा मालमतेची विक्री केल्यानंतर त्यांच्या मालकी हक्कांचे दुसऱ्याकडे हस्तांतरण होते. श्रमीक एका ठराविक काळासाठी आपल्या सेवा विकत असतो. स्वतःला विकत नाही. शरीराचा मालक तो स्वतःच असतो.

**६) गतिशील घटक** : जमीन हा घटक स्थितीशील आहे, तर श्रम हा घटक गतिशील आहे. तो रोजगार, व्यवसाय व कामाच्या निमित्ताने एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सहज जाऊ शकतो. वाहतूक व दळणवळणाची साधने जितकी जास्त विकसित असतील तितकी श्रमीकांची गतिशीलता जास्त असते.

**३. भांडवल** (Capital)

अर्थशास्त्रातील भांडवल हा अनेक अर्थाचा शब्द आहे. भांडवल हा उत्पन्नाच्या तुलनेत 'साठा' आहे, जो एक 'प्रवाह' आहे. व्यापक अर्थाने भांडवलामध्ये मानवी लोकसंख्येचा समावेश होतो. भांडवल हे सध्या वापरल्या जाणाऱ्या वस्तू आणि भविष्यात आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या वस्तू म्हणून गणले जाते. सामान्य व्यवहारात पैसा म्हणजे भांडवल असे मानले जाते. अर्थशास्त्रात इतक्या संकुचित अर्थाने भांडवल ही संज्ञा वापरली जात नाही. श्रमनिर्मित उत्पादन म्हणजे भांडवल होय. अशी भांडवलाची व्याख्या करता येईल. त्याचा अर्थ त्या वस्तूची आणि साधनसामग्रीची निर्मिती श्रमातून झालेली आहे आणि त्याचा उपयोग भविष्यात उत्पादन वाढविण्यासाठी करता येतो अशा वस्तूंना भांडवल म्हणता येईल. नद्या, पर्वत, सूर्यप्रकाश ही नैसर्गिक साधने मानवी श्रमातून निर्माण झालेली नसतात म्हणून त्यांना भांडवल म्हणता येणार नाही; परंतु यंत्रसामग्री, इमारत, नांगर, ऑइल इंजिन, ट्रॅक्टर इत्यादी साधनसामग्री मानवी श्रमातून निर्माण झालेल्या असतात. त्याचा वापर उत्पादन वाढीसाठी करता येतो म्हणून त्यांना भांडवल म्हणता येईल.

**अर्थ व व्याख्या**

अर्थशास्त्रातील भांडवलाचा संदर्भ देताना, हा शब्द उत्पादन प्रक्रियेचा भाग नसलेल्या वस्तू तयार करण्यासाठी अवलंबलेल्या उत्पादनाचे घटक सूचित करतो. भांडवलाचा अर्थ समजून घेण्यासाठी काही महत्त्वाच्या व्याख्या पुढीलप्रमाणे.

**१) सर जॉन रिचर्ड हिक्स** : ''भांडवलामध्ये सध्या अस्तित्वात असलेल्या त्या सर्व वस्तूंचा समावेश होतो ज्याचा वापर कोणत्याही प्रकारे करता येतो, जेणेकरुन पुढील वर्षामध्ये गरजा पूर्ण करता येतील''.
**२) युजेन फॉन बोहम–बावेर्क** : ''भांडवल हे उत्पादनाचे उत्पादित साधन आहे''.
**३) प्रा. पॉल सॅम्युएलसन** : ''भांडवली वस्तू ही उत्पादित वस्तू आहेत जी पुढील उत्पादनासाठी घटक आदाने म्हणून वापरली जाऊ शकतात''.
**४) डॉ. आल्फ्रेड मार्शल** : ''निसर्गाने विनामूल्य दिलेली देणगी सोडून संपत्तीच्या ज्या भागापासून उत्पन्न मिळते त्या भागाला भांडवल म्हणतात.''

वरील व्याख्यावरुन भांडवलामध्ये सर्व प्रकारच्या वस्तूंचा समावेश होतो ज्याचा वापर मशीन्स, टूल्स, फॅक्टरी इमारती, वाहतूक उपकरणे इत्यादींच्या उत्पादनासाठी केला जातो.

**भांडवलाची वैशिष्ट्ये** (Characteristics of Capital)

भांडवलाची अनेक महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत ती खालीलप्रमाणे आहेत.

| **भांडवलाची वैशिष्ट्ये** |
|---|
| **१) निष्क्रिय घटक** |
| **२) मानवनिर्मित घटक** |
| **३) कार्यक्षमतेत वाढ** |
| **४) गतिशीलता** |
| **५) लवचिक पुरवठा** |
| **६) ऱ्हास पावणारे** |
| **७) उत्पादन साहाय्य** |
| **८) तात्पुरते व नाशवंत** |
| **९) उत्पन्नाचे साधन** |
| **१०) बचतीतून निर्मिती** |
| **११) संपत्तीचा एक भाग** |

**१) निष्क्रिय घटक** : भांडवल हा उत्पादनाचा एक निष्क्रिय घटक आहे. कारण श्रमाच्या सहकार्याशिवाय भांडवल कुचकामी आहे. व्यवसाय केवळ भांडवलावर चालत नाही. त्यांनी श्रम आणि जमिनीत समान गुंतवणूक करणे आवश्यक आहे.

**२) मानवनिर्मित घटक** : भांडवल ही मानवनिर्मित वस्तू आहे. त्याचे उत्पादन आणि पुरवठा मनुष्याच्या प्रयत्नांनी नियंत्रित केला जातो. भांडवल हे मानवाने परिश्रम करुन निर्माण केलेले असते उदा. यंत्रसामग्री, अवजारे इत्यादी यात निसर्गनिर्मित साधन संपत्तीचा समावेश होत नाही. जॉन स्टुअर्ट मिल म्हणतात, भांडवल हे 'भविष्यात संपत्तीच्या निर्मितीसाठी नियत केलेल्या भूतकाळातील श्रमाचे संचित उत्पादन आहे'. याचा अर्थ असा की जेव्हा मानवी श्रम नैसर्गिक संसाधनांवर लागू केले जातात तेव्हा भांडवल निर्माण होते.

**३) कार्यक्षमतेत वाढ** : भांडवलामुळे मानवाच्या कार्यक्षमतेत वाढ होते. कॅल्क्युलेटरच्या साहाय्याने आकडेमोड लवकर करता येते. हात मागापेक्षा यंत्रावर कापड लवकर तयार करता येते.

**४) गतिशीलता** : उत्पादनाच्या सर्व घटकांपैकी भांडवलामध्ये सर्वाधिक गतिशीलता आहे. जमीन स्थिर आहे आणि श्रमात कमीत कमी गतिशीलता आहे, तर भांडवलामध्ये अधिक गतिशीलता आणि व्यावसायिक गतिशीलता दोन्ही आहेत. भांडवल एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी किंवा एका उद्योगातून दुसऱ्या उद्योगात सहज पाठविता येते. जेथे व्याजाचा दर जास्त असेल तेथे भांडवल सहज जावू शकते.

**५) लवचिक पुरवठा** : जेव्हा आपण त्याच्या पुरवठ्याबद्दल बोलतो तेव्हा भांडवलाची लवचिकता जास्त असते. मागणीनुसार त्याचा पुरवठा जलद आणि सहज समायोजित केला जाऊ शकतो. दुसरीकडे, जमिनीचा पुरवठा निश्चित आहे आणि मजुरांचा पुरवठा लवकर वाढवता किंवा कमी करता येत नाही. भांडवलाचा पुरवठा लवचिक असतो. भांडवल निर्मितीच्या दरात बदल करुन गरजेनुसार भांडवलाच्या पुरवठ्यात वाढ किंवा घट करता येते.

**६) ऱ्हास पावणारे** : भांडवल दीर्घकाळ टिकणारे असते. परंतु सतत त्याचा वापर केल्याने त्याची झीज होते. कालांतराने भांडवलाचे अवमूल्यन होते. उदा. यंत्रसामग्री, अवजारे इत्यादी यंत्राचा सतत वापर केल्यास त्याची झीज होते व कालांतराने यंत्र निकामी होते.

**७) उत्पादन साहाय्य** : भांडवल हे उत्पादनाचे एक महत्त्वाचे साधन आहे. भांडवलामुळे वस्तूचे उत्पादन करता येते. भांडवलामुळे उत्पादन वाढण्यास मदत होते. जेव्हा श्रमाला पुरेसे भांडवल दिले जाते तेव्हा ते प्रभावीपणे उत्पादन वाढवते. अधिक भांडवलामुळे चांगली कार्यक्षमता आणि उत्पादकता वाढते.

**८) तात्पुरते व नाशवंत** : भांडवल नाशवंत आहे कारण ती नष्ट केली जाऊ शकते. भांडवल तात्पुरते असते. ते कायम टिकू शकत नाही. म्हणून भांडवल वेळोवेळी पुनरुत्पादित आणि पुन्हा भरले जाणे आवश्यक आहे. यामुळे भांडवल ही अल्पकालीन मालमत्ता बनते.

**९) उत्पन्नाचे साधन** : भांडवल हे भविष्यातील उत्पन्नाचे साधन असते. आपले भांडवल, पैसा बँकेत ठेवून किंवा कर्जाऊ देऊन व्याजाच्या रुपाने उत्पन्न मिळवता येते. भांडवल जमा करण्यामध्ये आपण जितकी जास्त गुंतवणूक करतो, तितकी गरज असेल तेव्हा व्यवसायाला मदत मिळण्याची शक्यता जास्त असते.

**१०) बचतीतून निर्मिती** : भांडवलाची निर्मिती बचतीतून होते. म्हणून भांडवल निर्मिती करण्यासाठी बचत करणे आवश्यक असते. जेव्हा उत्पादन उपभोगापेक्षा जास्त होते तेव्हा भांडवली वस्तूंची बचत होते. उदा. जेव्हा एखादा शेतकरी त्याच्या पीक उत्पादनाचा काही भाग वापरत नाही किंवा विकत नाही, तेव्हा त्याचा भविष्यात बियाणे म्हणून वापर केला जाऊ शकतो.

**११) संपत्तीचा एक भाग** : भांडवल हा उत्पादन कार्यासाठी वापरला जाणारा संपत्तीचाच एक भाग आहे. याचा अर्थ भांडवल हे मुळात संपत्ती असते.

**भांडवलाचे प्रकार** (Types of Capital)

| **भांडवलाचे प्रकार** |
|---|
| **१) स्वरुपावरुन** |
| **अ) स्थिर भांडवल** |
| **ब) फिरते/खेळते भांडवल** |
| **२) उपयोगावरुन** |
| **अ) विशिष्टेपयोगी/उपयोजित भांडवल** |
| **ब) मुक्त/तरते भांडवल** |
| **३) भौतिक भांडवल** |
| **४) मानवी भांडवल** |
| **५) आर्थिक/वित्तीय/मत्ता भांडवल** |
| **६) नैसर्गिक भांडवल** |
| **७) सामाजिक भांडवल** |
| **८) मालकी हक्कावरुन** |
| **अ) खाजगी अथवा वैयक्तिक भांडवल** |
| **ब) सार्वजनिक किंवा राष्ट्रीय भांडवल** |

**१) स्वरुपावरुन**

**अ) स्थिर भांडवल** (Fixed Capital) : ज्या भांडवलाचा उत्पादनात पुन्हा: पुन्हा:, सतत, कित्येक वर्षे उपयोग केला जातो, अशा भांडवलास स्थिर भांडवल किंवा (स्थिर भांडवलाची वस्तू) म्हटले जाते. व्यवसाय-संस्थेची इमारत, यंत्रसामग्री, फर्निचर, प्रयोगशाळा वगैरे याची उदाहरणे आहेत. स्थिर भांडवलाचे स्वरुप उत्पादन कार्य चालू असताना बदलत नाही.

**ब) फिरते/खेळते भांडवल** (Working Capital) : एकाच उपयोगात नष्ट होणाऱ्या भांडवलास खेळते भांडवल असे संबोधले जाते. उदा. कच्चा माल, इंधन, वाहतूक सेवा, पैसा, कापूस, अर्धसिद्ध वस्तू (intermediate goods) यांचा खेळत्या भांडवलात समावेश होतो.

**२) उपयोगावरुन**

**अ) विशिष्टेपयोगी/उपयोजित भांडवल** (Sunk or Specific Capital) : काही भांडवलाचा उपयोग हा विशिष्ट कामासाठीच होऊ शकतो. उदा. पूल, बोगदा, उसाचा रस काढण्याचा चरखा. करवतीचा उपयोग हा लाकूड कापण्यासाठीच होतो. शिलाई यंत्रावर शिवणकामाखेरीज दुसरे काहीच करता येत नाही. नलिकाकूपाचा वापर भूगर्भातून पाणी वर खेचण्यासाठीच होऊ शकतो. अशा प्रकारच्या भांडवलास विशिष्टेपयोगी भांडवल असे म्हणतात.

**ब) मुक्त/तरते भांडवल** (Free or Floating Capital) : ज्या भांडवलाचा विविध उपयोगासाठी वापर होतो त्याला मुक्त किंवा तरते भांडवल म्हणतात. उदा. विज, लोखंड, पैसा, गॅस, डिझेल, पेट्रोल, कोळसा. उसाचा वापर साखर, गूळ, काकवी अशा वस्तू तयार करण्यासाठी करतो येतो. लोखंड व पोलाद यातूनही अनेक वस्तू तयार करता येतात. शेतीत सिंचनाच्या सोयी, खते याचा अनेक पिकांसाठी उपयोग होऊ शकतो.

**३) भौतिक भांडवल** (Physical Capital) : भौतिक भांडवल म्हणजे इमारती, यंत्रसामग्री, साधने आणि उपकरणे यासारख्या उत्पादनात वापरल्या जाणाऱ्या मूर्त मालमत्तेचा संदर्भ. व्यवसायांसाठी वस्तू आणि सेवा कार्यक्षमतेने निर्माण करण्यासाठी भौतिक भांडवल आवश्यक आहे.

**४) मानवी भांडवल** (Human Capital) : मानवी भांडवल म्हणजे लोकांकडे असलेले ज्ञान, कौशल्ये आणि क्षमता, ज्याचा उपयोग वस्तू आणि सेवांच्या निर्मितीसाठी केला जाऊ शकतो. त्यामध्ये शिक्षण, प्रशिक्षण आणि अनुभव यांचा समावेश होतो आणि बहुतेक वेळा औपचारिक शिक्षण आणि नोकरीच्या प्रशिक्षणाद्वारे विकसित केले जाते. मानवाची बुद्धीमत्ता, कौशल्य, कर्तुत्व, कुवत आणि अन्य गुणविशेष यांचा समावेश होतो.

**५) आर्थिक/वित्तीय/मत्ता भांडवल** (Economic/Financial/Assets Capital) : आर्थिक भांडवल म्हणजे बचत, गुंतवणूक आणि कर्ज यासारख्या गुंतवणूक किंवा कर्ज देण्यासाठी उपलब्ध असलेल्या निधीचा संदर्भ. व्यवसाय आणि व्यक्तींना भौतिक किंवा मानवी भांडवलामध्ये गुंतवणूक करण्यासाठी निधी मिळवण्यासाठी आर्थिक

भांडवल महत्त्वाचे आहे. मर्यादित अर्थाने व्यावसायिक संस्थांचे समभाग, विविध प्रकारचे रोखे यांना वित्तीय भांडवल असे म्हटले जाते. कारण भांडवल बाजारात त्यांची खरेदी किंवा विक्री होऊ शकते. व्यापक अर्थाने उत्पादनकार्यात वापरला गेलेला पैसा (मग तो समभाग, रोख्यांच्या विक्रीद्वारे उभारलेला असो की बँकांच्या, वित्तसंस्थांच्या कर्जाद्वारे मिळविलेला असो) संस्थेने स्वीकारलेल्या ठेवी, अनामत रकमांतून अथवा राखीव निधीतून उभा केलेला पैसा असा प्रत्येक पैसा हा वित्तीय भांडवल मानला जातो.

**६) नैसर्गिक भांडवल** (Natural Capital) : नैसर्गिक भांडवल म्हणजे निसर्गाद्वारे प्रदान केलेल्या संसाधनांचा संदर्भ आहे ज्याचा वापर उत्पादनात केला जाऊ शकतो. जसे की जमीन, पाणी, खनिजे आणि जंगले, शेती, वनीकरण आणि खाणकाम यासारख्या अनेक उद्योगांसाठी नैसर्गिक भांडवल आवश्यक आहे.

**७) सामाजिक भांडवल** (Social Capital) : सरकारी मालकीचे कारखाने, धरणे, खाणी, विद्युतनिर्मिती गृहे, रस्ते, पाणी पुरवठ्याची विशिष्ट साधने वगैरे बाबींना सामाजिक भांडवल म्हटले जाते. कारण त्यांची मालकी ही सरकारची पर्यायाने समाजाची असते.

**८) मालकी हक्कावरुन**

**अ) खाजगी अथवा वैयक्तिक भांडवल** – उदा. व्यक्तीच्या मालकीचे घर, कारखाने, चेअर्स, रोखे, बँकेतील ठेव.

**ब) सार्वजनिक किंवा राष्ट्रीय भांडवल** – उदा. रेल्वे, टेलिफोन, सार्वजनिक क्षेत्रातील कारखाने.

**भांडवलाचे महत्व**

१) उत्पादनात वाढ करणे

२) श्रमिकांची उत्पादन क्षमता वाढविणे

३) आर्थिक विकास घडवून आणणे

४) श्रमिकांना रोजगार उपलब्ध करुन देणे

**४. संयोजक/उद्योजक/साहसी** (Entrepreneurship)

उद्योजक ही संज्ञा मुळ फ्रेंच शब्द Antreprendre या शब्दापासुन तयार झालेली आहे. या शब्दाचा अर्थ जबाबदारी घेणे असा होतो. ऑक्सफर्ड शब्दकोशात या संज्ञाचा अर्थ धारिष्ट्याचे प्रकल्प असा दिला होता. तर वेल्स्टर शब्दकोशाप्रमाणे धारिष्ट्याचे प्रकल्प हाती घेण्याची तयारी असा अर्थ दिलेला आहे. यावरुन उद्योजकता या संज्ञेत धीटपणा, निर्भयता, गतिक्षमता व धोका पत्करण्याची तयारी हे सर्व गुणविशेष एकत्रित दिलेले आहेत. यावरुन उद्योजकता या शब्दाचा अर्थ बोध होतो. प्रत्येक देशाला उद्योजकता विकासाला महत्व द्यावे लागते कारण उद्योजकतेच्या विकासावर त्या देशाची प्रगती अवलंबून असते.

**अर्थ व व्याख्या** (Meaning and Definition)

'उद्योगाचा प्रमुख व्यवस्थापक व कप्तान म्हणजेच संयोजक होय'. उत्पादन प्रक्रियेतील संयोजन कौशल्याबद्दल त्याला नफ्याच्या स्वरुपात मोबदला मिळतो. उद्योजक हा नवीन्य निर्माण करण्यासाठी सतत प्रयत्नशील असतो. आपण इतरांपेक्षा कसे वेगवेगळे वस्तू वा सेवा निर्माण करु यासाठी कार्य करीत असतो. त्याच्या मनातील नवीन–नवीन कल्पना साकार करण्याच्या प्रयत्नात असतो. त्या कार्यात यश मिळवून देते त्यावेळी त्याचे समाधान झालेले असते. परंतू तो तेवढ्यावर न थांबता पुन्हा पुढे नवीन शोधण्याचा प्रयत्न करीत असतो. उदा. टाटा उद्योग समुह हा फार पुर्वी पासून प्रचलीत आहे.

**१) जे. बी. से** : ''उत्पादनासाठी लागणारी साधनसामुग्री एकत्रित करणे व धोका पत्करणे या सर्वांची जबाबदरी उद्योजकावर असते''. असा मध्यस्थ जी उत्पादन साधने संघटित करतो, गुंतवणूक केलेल्या भांडवलाचे व्याज, मजुरी व भाड्याने पुनर्स्थापना तयार वस्तूंच्या मुल्याद्वारे करीत असतो व स्वतःसाठी नफा मिळवितो आणि त्याच्या जवळ निर्णय शक्ती व व्यवसायाचे व जगाचे ज्ञान हे गुण असले पाहीजेत. देखरेख व प्रशासन करण्याची कला त्याला अवगत असावी.

**२) शूम्पीटर** : ''उद्योजक म्हणजे नाविन्य आणणारा जो नवीन गोष्टी घडवून आणतो किंवा अगोदर केलेल्या गोष्टी नव्या ढंगात पेश करीत असतो.'' उद्योजकतेची संकल्पना आर्थिक विकासाच्या मुळाशी मानवी घटक असतो.

**३) ए. एच. कोल** : ''नफा मिळविणे नफ्याचे प्रमाण टिकवून ठेवणे किंवा नफ्यात वाढ करण्याच्या हेतूने आर्थिक वस्तू व सेवांचे उत्पादन किंवा वितरण करण्याकरीता एखादी व्यक्ती किंवा परस्परांशी संबंधित असलेल्या व्यक्तींच्या एखाद्या समूहाने केलेले सहेतूक कार्य म्हणजे उद्योजकता होय''.

**४) जेफरी टिमन्स** : ''उद्योजकता म्हणजे प्रत्यक्षात कोणतीही अनुकूलता नसतांना काहीतरी नव्याने उत्पन्न करण्याची व निर्माण करण्याची क्षमता होय''.

**५) डॉ. जे. ई. स्टेपनेक** : ''जोखीम पत्कारण्याची क्षमता, संघटनाची कुवत आणि उद्योगसंस्थेत विविधता आणण्याची व नवनिर्मिती करण्याची तीव्र इच्छा म्हणजे उद्योजकता होय''.

६) 'जोखीम स्विकरण्याची क्षमता, संघटन व कुवत आणि उद्योग संस्थेत विविधता आणण्याची व नवनिर्मिती करण्याची तीव्र इच्छा म्हणजे उद्योजकता होय'.

थोडक्यात, वरील विवेचनावरुन उद्योजकता म्हणजे संधीचा फायदा घेणे, व्यवसायाचे संघटन करणे, योग्य पध्दतीची निवड करणे व व्यवसायसंस्था विकासावर राहील असे कार्य करणे म्हणजे उद्योजता होय. उद्योजकता म्हणजे नव्या गोष्टी करणे किंवा अगोदर माहीत असलेल्या गोष्टी नवीन पध्दतीने करणे होय.

**उद्योजकतेची वैशिष्ट्ये** (Characteristics of Entrepreneurship)

उद्योजकतेच्या वरील व्याख्यावरुन उद्योजतेची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे.

| उद्योजकतेची वैशिष्ट्ये |
|---|
| १) धोका स्वीकारणे |
| २) नवनिर्मिती करणे |
| ३) वैयक्तीक जबाबदारी |
| ४) परिणामांचे ज्ञान |
| ५) भविष्यकालीन अदांज |
| ६) संघटन कौशल्य |
| ७) व्यावसायिक पर्यावरणाचे ज्ञान |

**१) धोका स्वीकारणे** : उद्योजक हा संधी शोधत असतो व संधी मिळाल्यास तिचा पुरेपूर फायदा घेत असतो. तसेच भविष्यकालीन नियोजन करुन निर्णय घेत असतो. हे सर्व कार्य धोका स्वीकारुन केले जात असते. धोका स्विकारणे हा उद्योजकाचा मुलभुत गुणधर्म आहे. त्याला जी प्रेरणा मिळते त्यातून हे कार्य करीत असतो.

**२) नवनिर्मिती करणे** : उद्योजक आपल्या व्यवसायात नवनिर्मिती करुन विपणनाची संधी शोधत असतो. उत्पादन पध्दतीत बदल करुन नवीन वस्तू बाजारपेठेत आणण्याचा प्रयत्न करीत असतो. नव्या मार्गानी कच्चा माल उपलब्ध करता येईल काय या बाबत शोध घेत असतो.

**३) वैयक्तीक जबाबदारी** : उद्योजक व्यावसायात जे काही निर्णय घेत असतो त्याला तो पुर्ण जबाबदार असतो. व्यवसायाच्या फायद्या-तोट्यास उद्योजक स्वतः जबादार राहतो. कारण तो जे निर्णय घेत असतो त्यात त्याने धाडस केलेले असते.

**४) परिणामांचे ज्ञान** : उद्योजक व्यवसायात जे काही निर्णय घेत असतो त्याचे परिणाम काय होतील त्याची त्यास जाणीव असते. तसेच व्यवसाय चालू ठेवण्यासाठी आपण कोणत्या दिशेने जात आहोत त्याचे मुल्यमापन करणे अपेक्षित असते. त्या प्रमाणे तो अपेक्षित कार्य हाती घेत असतो.

**५) भविष्यकालीन अदांज** : उद्योजक व्यवसायात वाढ करण्यासाठी प्रयत्न करीत असतो. त्याने भविष्यकाळासाठी आखलेल्या योजना कार्यान्वित करण्यासाठी अनुमान करीत असतो. त्याने केलेले भविष्यकालीन अंदाज अचूक झाल्यास त्याला मानसिक समाधान लाभत असते. उद्योजक व्यवसायात भविष्याचे वेध योजनांची आखणी करीत असतो.

**६) संघटन कौशल्य** : कोणत्याही उद्योजकास संघटन कौशल्य अवगत असते. त्यात साधनसंपत्ती, मनुष्यबळ यांचे संघटन करीत असतो व कोणती कृती किवा कार्य करावीत हे ठरवित असतो. विविध कार्यामध्ये समन्वय साधण्याचे कार्य केले जाते. उद्योजकला उद्योगातील साधनसंपत्तीचा पुरेपूर वापर करण्यासाठी जुळवाजुळव करणे आणि उपलब्ध साधनसामग्रीचा पर्याप्त वापर करणे ह्याबाबत धोरणे ठरविण्यात येतात व उद्योगातील विविध कार्यामध्ये एकत्रीकरण केले जाते.

**७) व्यावसायिक पर्यावरणाचे ज्ञान** : उद्योजकाला व्यावसायिक कार्य करीत असतांना व्यवसायाच्या पर्यावरणाचा अभ्यास करावा लागतो. कारण कोणत्या वातावरणाचा व्यवसायावर काय परीणाम होतो याची जाणीव असते. बदलत्या वातावरणात व्यावसायिकाने काय केले पाहीजे हे ठरवावे लागते म्हणून उद्योजकाला व्यवसायाच्या पर्यावरणाचे ज्ञान असते. त्या आधारावर व्यावसायिक निर्णय घेत असतो उद्योजक हा नव-नवीन

बाजापेठांचा शोध घेत असतो व त्या बाजारपेठेची स्थिती समजून घेवून त्या बाजारपेठेत उतरावे किंवा नाही याबाबत निर्णय घेत असतो.

**उद्योजकतेची कार्ये** (Functions of Entrepreneurship)

साहसी किंवा उद्योजकांस पुढील प्रमुख कार्ये करावी लागतात.

| उद्योजकतेची कार्ये |
|---|
| १) निर्णयासंबंधीचे कार्य |
| २) विभाजन विषयक निर्णय |
| ३) धोका आणि अनिश्चितता पत्करण्याचे कार्य |
| ४) नव आयोजनाचे कार्य |
| ५) दीर्घकालीन धोरण आखण्याचे कार्य |

**१) निर्णयासंबंधीचे कार्य** : कोणत्या वस्तूंचे उत्पादन करायचे, किती प्रमाणात करायचे, उद्योग संस्था कोठे स्थापन करायची, कोणत्या पद्धतीने उत्पादन करायचे, उत्पादनांसाठी वेगवेगळ्या घटकांचा संयोग कसा करायचा इत्यादी निर्णय साहसी व्यक्तीस घ्यावे लागतात. या निर्णयांच्या अचूकतेवरच यशापयश अवलंबून असते.

**२) विभाजन विषयक निर्णय** : भूमी, श्रम,भांडवल, पगारदार व्यवस्थापक उत्पादन कार्यात सहभागी झाल्याने त्यांना त्यांच्या कार्याचा मोबदला खंड, वेतन आणि व्याज रुपाने कसा द्यायचा याचाही निर्णय साहसी व्यक्तीस घ्यावा लागतो.

**३) धोका आणि अनिश्चितता पत्करण्याचे कार्य** : आपण उत्पादित करीत असलेल्या वस्तू बाजारात विकल्या जातील किंवा नाही, उपभोक्त्यांची मागणी कायम राहिल की वाढेल की त्यांच्या आवडीनिवडीत बदल होऊन घटेल, बाजारात पर्यायी वस्तू व स्पर्धकांची संख्या वाढेल की घटेल, स्पर्धक धोरण काय असेल, सरकारचे धोरण काय असेल, कच्चा माल पुरेसा उपलब्ध होईल किंवा नाही. असे अनेक धोके किंवा जोखीम साहसी स्विकारतो ही सर्व जोखीम अनिश्चित असते. ती अनिश्चितता तो स्विकारतो. त्याचे निर्णय अचूक ठरले तर नफ्याच्या रुपाने त्याला बक्षिस मिळते. निर्णय चुकले तर तोटा रुपाने शिक्षा होते.

**४) नव आयोजनाचे कार्य** : साहसी किंवा उद्योजकांचे नवोपक्रम (Innovation) करत राहणे हे एक प्रमुख कार्य आहे. नवीन वस्तू पद्धती, नवीन बाजारपेठ, नवीन विक्री व जाहिरात विषयक धोरण इत्यादी नव-आयोजन किंवा नवोन्मेषाचे प्रयोग उद्योजकाने सातत्य पूर्ण करत राहिला पाहिजे. ग्राहकांच्या आवडी-निवडी विचारात घेऊन वस्तूंच्या अंर्त-बाह्यरुपात बदल करत राहणे हे यशस्वी उद्योजकांचे लक्षण मानले जाते.

**५) दीर्घकालीन धोरण आखण्याचे कार्य** : उद्योजक दैनंदिन विषयक निर्णयाबरोबरच दीर्घकालीन विकास योजना आखण्याचेही कार्य करतो. उद्योगाचा विस्तार, आधुनिकीकरण, विविधीकरण, नवीन स्पर्धक धोरण, नवीन कामगार विषयक धोरण, संशोधन आणि विकास यासारख्या दीर्घकालीन योजना आखणे आणि त्यांची अंमलबजावणी करण्याचे कार्य उद्योजकाला करावे लागते.

उद्योजकाला जे कार्य करावे लागते व उद्योजकाच्या ज्या व्याख्या करण्यात आलेल्या आहेत त्यावरुन उद्योजकाची वैशिष्ट्ये स्पष्ट करता येतात.

**५.२ खंडाची संकल्पना** (Concept of Rent)

दैनंदिन व्यवहारात भाटक/खंड या शब्दाचा अर्थ भाडे या अर्थाने वापरता जातो. अर्थशास्त्रात भाटक हा शब्द फक्त भूमीच्या संदर्भातच वापरला जातो. म्हणजे जमीन, घर इत्यादींच्या उपयोगाबद्दल त्यांच्या मालकांना दिला जाणारा मोबदला म्हणजे भाटक होय. अर्थशास्त्रात भाटक म्हणजे भूमीच्या वापराबद्दल भू-स्वामीला दिला जाणारा मोबदला होय. खंड म्हणजे कुळाने जमिनीच्या मालकास जमिनीचा वापर करु दिल्याबद्दल दिला जाणारा मोबदला होय. भाडेकरुने घरमालकास दिलेले घरभाडे म्हणजे भाटक किंवा खंड होय. उदा. घराचे भाडे, खाणीचे भाडे व जागेचे भाडे. अर्थशास्त्रात मात्र खंड ही संकल्पना वेगवेगळ्या अर्थाने वापरली जाते. उत्पादन कार्यात मदत केल्याबद्दल फक्त भूमीला मिळणारा मोबदला म्हणजे खंड होय. भूमी याचा अर्थ निसर्गदत्त संपत्ती होय. निसर्गाने मोफत दिलेल्या देणग्याची मालकी ज्यांच्याकडे आहे त्यांना खंड हा मोबदला मिळतो. कारण त्या देणग्या उत्पादन कार्यात सहभागी होऊन उत्पादन घटक म्हणून कार्य करतात.

**खंडाच्या व्याख्या**

**१) डेव्हिड रिकार्डो** : ''जमिनीच्या अंगी असलेल्या मुलभूत आणि अविनाशी गुणधर्माचा वापर करु दिल्याबद्दल जमीन मालकाला दिला जाणारा कृषी उत्पादनातील वाटा म्हणजे खंड होय''. "Rent is that portion of the produce of the earth which is paid to the landlord for use of the original and idestructible power of the soil." - Ricardo.

**२) डॉ. मार्शल** : ''भूमी व अन्य निसर्गदत्त देणगीच्या मालकीपासून मिळणारे उत्पन्न म्हणजे भाटक होय''. "The income derived from the ownership of land and other free gift of nature is called rent." - Marshall

**३) प्रा. सीनीयर** : ''कोणत्याही निसर्गदत्त साधनाच्या उपयोगापासून मिळणाऱ्या अतिरिक्त उत्पन्नाला भाटक असे म्हणतात''. "Rent is surplus arising from the use of an appropriated natural agent."

**४) कार्व्हर** : ''भूमीच्या उपयोगाबद्दल भूमी मालकाला दिली जाणारी किंमत म्हणजे भाटक होय''. "Rent is the price paid to the landlord for use of land" - Carver

**भाटकाचे प्रकार** (Types of Rent)

| भाटकाचे प्रकार |
| --- |
| **१) मिश्र किंवा सकल भाटक** |
| **२) शुध्द किंवा आर्थिक भाटक** |
| **३) प्रसंविदा किंवा करारी भाटक** |

**१) मिश्र किंवा सकल भाटक**

भूमीतून मिळणाऱ्या उत्पादनाच्या किमतीतून प्रत्यक्ष करण्यात आलेला लागवडीचा खर्च वजा केल्यानंतर शिल्लक राहणारी रक्कम म्हणजे मिश्र भाटक (खंड) होय.

**सकल भाटक = एकूण उत्पादन – एकूण व्यय**

**२) शुध्द किंवा आर्थिक भाटक**

भूमीच्या मूलभूत व अविनाशी गुणांच्या वापराबद्दल भू-स्वामीला जे उत्पन्न मिळते ते आर्थिक व शुध्द भाटक होय. आर्थिक भाटक हे सकल भाटकात समाविष्ट असते.

**३) प्रसंविदा किंवा करारी भाटक**

'जमिनीचा मालक व त्याची जमीन वाहणारा कास्तकार (कूळ) यांच्यात करार होऊन जो खंड ठरतो त्याला प्रसंविदा भाटक म्हणतात.' हा भाटक जमीन मालक व कूळ यांच्यातील परस्पर करारातून निश्चित होतो. प्रसंविदा भाटक हा मिश्र खंड असतो. प्रसंविदा भाटकाची रक्कम ही जमीनदार व कूळ यांच्या सौदाशक्तीवर अवलंबून असते.

**रिकार्डोचा खंड सिद्धांत** (Ricardian Theory of Rent)

इंग्लंड येथील सुविख्यात अर्थशास्त्रज्ञ डेव्हीड रिकार्डो यांनी 'Principles of Political Economy' या सुप्रसिध्द ग्रंथातून १९ व्या शतकात सर्वप्रथम विस्तृतपणे खंड विषयक सिद्धांत मांडला. रिकार्डोच्या खंड विषयक सिद्धांताला परंपरागत सनातनवादी सिद्धांत असेही म्हटले जाते. १८ व्या शतकात इंग्लंडमध्ये अन्नधान्याच्या किंमती सतत वाढत होत्या. खंड वाढला म्हणून अन्नधान्याच्या किंमती वाढत आहे असे स्पष्टीकरण त्यावेळी देण्यात आले. रिकार्डोला हे स्पष्टीकरण मान्य नव्हते. रिकार्डोच्या मते, खंड वाढला म्हणून अन्नधान्याच्या किंमती वाढल्या नाहीत तर अन्नधान्य महाग झाल्याने खंड निर्माण झाला. उच्च प्रतीच्या जमिनीला जास्त खंड आणि मध्यमप्रतीच्या जमिनीला कमी खंड का मिळतो याची संगती लावण्याच्या प्रयत्नातून रिकार्डोचा खंड सिद्धांत उदयाला आला. रिकार्डोने आपल्या सिद्धांतातून खंडाची निर्मिती कशी होते. खंड व किंमत यांचा परस्परसंबंध काय आहे हे सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे.

रिकार्डोच्या मते, 'भूमी ही नैसर्गिक देणगी असल्यामुळे भूमीला उत्पादन व्यय नाही म्हणूनच खंड उत्पादन व्ययात समाविष्ट करता येत नाही. भूमीतील गुणभिन्नतेमुळे जास्त सुपीक जमिनीला कमी सुपीक जमिनीपेक्षा मिळणारे आधिक्य म्हणजे खंड होय'. रिकार्डोच्या मते, सर्व जमीन सारखीच सुपीक नसते. त्यामुळे समान उत्पादन खर्च उच्च प्रतीच्या व मध्यम प्रतीच्या जमिनीत केल्यास मध्यम प्रतीच्या जमिनीच्या तुलनेत उच्च प्रतीच्या जमिनीतून जास्त उत्पादन होते. त्यामुळे मध्यम प्रतीच्या जमीनमालकाला उच्च प्रतीची जमीन कसण्यासाठी पाहिजे असल्यास खंड द्यावा लागेल. हा खंड जमिनीच्या सुपीकतेतील फरकामुळे द्यावा लागतो. म्हणून या खंडास 'गुणभेदजन्य वाढावा' असे म्हणतात.

**खंडाचा नियम किंवा विधान**

रिकार्डोच्या मते, ''जमिनीच्या उत्पादनातून जमिनीच्या मालकाला जमिनीच्या उपजत, मूलभुत आणि अविनाशी गुणधर्माचा वापर करु दिल्याबद्दल दिला जाणारा मोबदला म्हणजे खंड होय''. "Rent is that portion of produce of the earth which is paid to the landlord for the use of the original and indestructible

power of the soil." – Recordo. वरील व्याख्येवरुन खंड फक्त भूमीलाच मिळतो. खंड हा आधिक्य या स्वरुपाचा असतो. भूमीतील अविनाशी व मूलभुत द्रव्यामुळे खंडाची निर्मिती होते हे स्पष्ट होते.

**रिकार्डोच्या खंड विषयक सिद्धांताची गृहीते**

१) भूमीचा पुरवठा मर्यादित आहे.
२) जमीन ही निसर्गनिर्मित देणगी आहे. त्यामुळे खंड फक्त भूमीलाच मिळतो.
३) जमिनीत मूलभुत व अविनाशी गुणधर्म आहेत.
४) जमिनीच्या सुपीकतेत फरक असतो.
५) सुपीकतेतील फरकानुसार क्रमाक्रमाने जमीन लागवडीखाली येते.
६) जमिनीचा वापर फक्त अन्नधान्यांच्या पिकासाठी केला जातो.
७) सीमांत जमिनीला खंड मिळत नाही.
८) पूर्णस्पर्धेचे अस्तित्व आहे.
९) पूर्ण रोजगाराची परिस्थिती आहे.
१०) उत्पादन तंत्र स्थिर आहे.
११) हा सिद्धांत दीर्घकाळावर आधारलेला आहे.
१२) जमिनीत घटत्या उत्पादन फलाचा नियम कार्यवाहीत असतो.

**सिद्धांताचे स्पष्टीकरण**

रिकार्डोच्या मते शेती दोन पध्दतीने केली जाते. विस्तृत आणि प्रकर्षित (सखोल) अशा दोन्ही लागवड पध्दतीत खंडाची निर्मिती होते.

**अ) विस्तृत लागवडीत खंडाची निर्मिती** (Rent Creation in Extensive Cultivation)

रिकार्डोच्या मते, मानवाने सर्वात प्रथम विस्तृत लागवड पध्दतीने शेती केली. विस्तृत लागवड पध्दतीत श्रम व भांडवलाचे प्रमाण कायम ठेवून जमिनीच्या मात्रेत सारख्या प्रमाणात वाढ केली जाते. भूमी ही गुणदृष्ट्या भिन्न असते. या भूमीच्या वैशिष्ट्यावर विस्तृत लागवडीत खंड आधारीत आहे. समजा, एखाद्या प्रदेशात सुपीक, मध्यम व कनिष्ट अशा तीनही प्रकारच्या जमीनी आहेत. सर्वप्रथम सुपीक जमीन लागवडीखाली आणली जाते. परंतु जसजशी लोकसंख्या वाढत गेली त्यावेळी सुपीक जमीनीला धान्य कमी पडू लागले. त्यामुळे मध्यम प्रतीची जमीन लागवडीखाली आणल्यामुळे सुपीक जमीनवर जे तंत्र वापरले होते तेच तंत्र व तेवढाच खर्च मध्यम प्रतीच्या जमीनीवर केला. परंतु मध्यम प्रतीच्या जमीनीपासून येणारे उत्पादन कमी राहील.

१८ व्या शतकात लोकसंख्या विरळ होती. जमिनीचे प्रमाण मुबलक होते. अन्नधान्याची गरज भागविण्याकरिता मानवाने प्रथम नदीकाठची सुपीक जमीन कसायला सुरुवात केली. सुरुवातीला जमीन मुबलक उपलब्ध असल्याने खंड देण्याचा प्रश्न नव्हता. लोकसंख्या वाढल्याने ही जमीन पूर्णपणे लागवडीखाली आली. अन्नधान्याची मागणी वाढल्याने मध्यम प्रतीची जमीन लागवडीखाली आणण्यात आली. लोकसंख्येत सातत्याने वाढ होत गेल्यामुळे वाढत्या लोकसंख्येची अन्नधान्याची मागणी वाढेल व ही वाढती अन्नधान्याची मागणी पूर्ण करण्यासाठी कनिष्ट प्रतीची जमीन लागवडीखाली आणली जाईल. कनिष्ट प्रतीच्या जमीनीवर देखील सारखेच तंत्र व सारखाच खर्च केला तरी कनिष्ट प्रतीच्या जमीनीपासून येणारे उत्पादन सुपीक व मध्यम प्रतीच्या जमीनीपेक्षा कमी राहील त्यामुळे सरासरी व्ययात वाढ होईल.

अन्नधान्याची किंमत = सरासरी व्यय होईल. हीच किंमत सुपीक व मध्यम प्रतीच्या जमिनीतून मिळणाऱ्या उत्पादनाला सुध्दा मिळेल. परंतु सुपीक व मध्यम प्रतीच्या जमीनीपासून मिळालेले उत्पादन हे जास्त असल्यामुळे या जमीनीपासून मिळालेले उत्पन्न हे खर्चापेक्षा जास्त असल्यामुळे हे जास्त उत्पन्न म्हणजेच आधिक्य होय व हे आधिक्य म्हणजेच खंड होय.

**उदाहरणाच्या सहाय्याने स्पष्टीकरण**

| जमिनीचा प्रकार | एकूण लागवड खर्च (रुपये) | एकूण उत्पादन (क्विंटल) | प्रती क्विंटल किंमत | एकूण उत्पन्न | खंड (रुपयात) |
|---|---|---|---|---|---|
| सुपीक/उच्च प्रत | ६००० | ६० | ३०० | १८००० (३०० x ६०) | १२००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| मध्यम प्रत | ६००० | ४० | ३०० | १२०००<br>(३०० x ४०) | ६००० |
| कनिष्ट प्रत | ६००० | २० | ३०० | ६०००<br>(३०० x २०) | ०० |

वरील कोष्टकावरुन विस्तृत लागवड पध्दतीत खंड कसा मिळतो हे दर्शविले आहे. उदाहरणाच्या साहाय्याने विस्तृत लागवडीत भाटकाची निर्मिती स्पष्ट करता येते. उदाहरणात कनिष्ट प्रतीच्या जमिनीचे उत्पन्न व खर्च समान आहे. लागवड खर्चावरील अधिक्य म्हणजे खंड असल्याने कनिष्ट प्रतीच्या जमिनीला खंड मिळत नाही. ती सीमांत भूमी होय. या सीमांत भूमीपासून खंड मिळत नाही. म्हणून या जमिनीला बिनखंडी भूमी असे म्हणतात. सुपीक जमिनीपासून १२,००० रु. व मध्यम जमिनीपासून ६००० रु. खंड मिळतो. जमिनीच्या गुणभिन्नतेमुळे आणि स्थितीदृष्ट्या भिन्नतेमुळे खंड निर्माण होतो. वरील उदाहरणात उच्च प्रतीची व मध्यम प्रतीच्या जमिनी सीमांत पूर्व आहेत. सीमांत जमीन अस्तित्वात आल्याने सीमांतपूर्व जमिनीला खंड मिळतो. हेच उदाहरण पुढील आकृतीद्वारे स्पष्ट करता येते.

**आलेखाच्या सहाय्याने स्पष्टीकरण**




वरील आकृतीत 'अक्ष' आसावर जमिनीचा प्रकार व 'अय' आसावर उत्पादन व लागवडीचा खर्च दर्शविला आहे. उच्च प्रतीच्या जमिनीपासून १२,००० रु. खंड मिळतो. मध्यम जमिनीपासून ६,००० रु. खंड मिळतो. रेखांकित केलेले भाग खंड दर्शवितात. कनिष्ट प्रतीच्या जमिनीला कोणताही खंड मिळत नाही. त्यामुळे कनिष्ट प्रतीची जमीन सीमांत जमीन किंवा खंडविरहीत जमीन आहे.

**ब) सखोल लागवडीत भाटक निर्मिती** (Rent Creatio in Intensive Cultivation)

भूमीचा पुरवठा मर्यादित असल्यामुळे शेतकरी सखोल लागवडीच्या पध्दतीचा उपयोग करतो. कारण लोकसंख्या सतत वाढत असेल तर या वाढत्या लोकसंख्येची अन्नधान्याची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी

जमिनीच्या एकाच तुकड्यावर श्रम भांडवलाच्या जास्तीत जास्त मात्रा उपयोगात आणून उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न करतो यालाच सखोल लागवड असे म्हणतात. या पध्दतीचा वापर जेव्हा देशातील सर्व जमीन लागवडीखाली आणल्यानंतर वाढती अन्नधान्याची मागणी पूर्ण करण्यासाठी केला जातो. विशिष्ट परिस्थितीत जमिनीच्या विशिष्ट क्षेत्रफळात एकापेक्षा जास्त श्रम-भांडवलाच्या समान मात्रा उपयोगात आणून उत्पादन घेतल्यास सीमांतपूर्व मात्रेपासून सीमांत मात्रेपेक्षा होणाऱ्या जास्तीच्या उत्पादनाला 'भाटक' असे म्हणतात.

शेतीमध्ये ऱ्हासी उत्पत्ती नियम लागू होत असल्यामुळे श्रम-भांडवलाच्या नंतरच्या मात्रेची सीमात उत्पत्ती ऱ्हास पावते. श्रम-भांडवलाच्या शेवटच्या मात्रेपासून खंड मिळत नाही. कारण या मात्रेपासून मिळणारे उत्पादन व खर्च समान असतो. सीमांतपूर्व मात्रेपासून खंड मिळतो. 'एकाच प्रकारच्या जमिनीवर श्रम व भांडवलाच्या मात्रेत सारख्या प्रमाणात वाढ केल्यास सीमांत मात्रेपेक्षा सीमांतपूर्व मात्रेपासून मिळणारे आधिक्य स्वरुपाचे उत्पन्न म्हणजे खंड होय'.

**उदाहरणाच्या सहाय्याने स्पष्टीकरण**

| जमिनीचा प्रकार | एकूण लागवड खर्च (रुपये) | एकूण उत्पादन (क्विंटल) | प्रती क्विंटल किंमत | एकूण उत्पन्न | खंड (रुपयात) |
|---|---|---|---|---|---|
| १ ली मात्रा | ६००० | ६० | ३०० | १८००० (३०० x ६०) | १२००० |
| २ री मात्रा | ६००० | ४० | ३०० | १२००० (३०० x ४०) | ६००० |
| ३ री मात्रा | ६००० | २० | ३०० | ६००० (३०० x २०) | ०० |

वरील उदाहरणात ऱ्हासी उत्पत्ती नियमानुसार पुढील प्रत्येक मात्रेपासून मिळणारे उत्पादन कमी कमी होत जाते. पहिल्या मात्रेपसून १२,००० रु., दुसऱ्या मात्रेपसून ६,००० रु. खंड मिळतो. तिसऱ्या मात्रेपासून खंड मिळत नाही ही सीमांत मात्रा होय.

**आलेखाच्या सहाय्याने स्पष्टीकरण**




वरील आकृतीत 'अक्ष' आसावर श्रम भांडवलाच्या मात्रा व 'अय' आसावर उत्पादन व खर्च घेतला आहे. पहिल्या श्रम-भांडवलाच्या मात्रेपासून १८,००० रुपयाचे एकूण उत्पादन होते. त्यातून ६,००० रुपये उत्पादन खर्च वजा करता १२,००० रु. खंड मिळतो. दुसऱ्या मात्रेपासून १२,००० रु. चे उत्पादन होते. त्यातून ६,०००

रु. उत्पादन खर्च वजा करता ६,००० रु. खंड मिळतो. तिसऱ्या मात्रेचे ६,००० रु. चे उत्पादन व ६,००० रुपये उत्पादन खर्च, दोन्ही समान असल्यामुळे तिसऱ्या मात्रेपासून खंड मिळत नाही.

**रिकार्डोच्या खंड सिद्धांताची मुलभूत वैशिष्ट्ये**

**१) खंड फक्त भूमीलाच मिळतो.**

**२) सुपीकतेतील भिन्नतेमुळे खंड प्राप्त होतो** : रिकार्डोच्या मते, भूमी ही सुपीकतेच्या दृष्टीने भिन्न असते म्हणून भूमीला मिळणारा खंड हा गुणभेदजन्य वाढावा असतो.

**३) उत्पन्नाचे उत्पादन खर्चावरील अधिक्य म्हणजे खंड** : रिकार्डोच्या मते उत्पन्नाचे उत्पादन खर्चावरील अधिक्य म्हणजे खंड होय.

**४) खंड हे अनर्जित आधिक्य आहे** : भूमी ही निसर्गनिर्मित देणगी आहे. भूमीमध्ये गुणभिन्नता आढळून येते. रिकार्डोच्या मते, जमिनीचा मालक आपला मालकी हक्क दाखवून कोणतेही कष्ट न करता खंडरुपी उत्पन्न मिळवितो. म्हणून खंड हे अनर्जित उत्पन्न आहे.

**५) खंडाच्या किंमतीत समावेश होत नाही** : रिकार्डोच्या मते, भूमी ही निसर्गाने मानवाला दिलेली मोफत देणगी आहे. त्यामुळे भूमीचा उत्पादनखर्च शून्य असतो. म्हणूनच भूमीत मिळणारा खंड उत्पादन खर्चात समाविष्ट होत नाही. त्यामुळे खंड वाढला म्हणून अन्नधान्यांच्या किंमती कधीच वाढत नसतात, तर अन्नधान्य महाग झाल्याने खंड दिला जातो. खंड किंमतीवरुन ठरतो. किंमत खंडावरुन ठरत नाही. त्यामुळे खंडाचा किंमतीत समावेश होत नाही.

**भूमीला खंड का मिळतो?**

भूमीच्या पुढील तीन वैशिष्ट्यांमुळे भाटक निर्माण होते.

१) भूमीतील गुण भिन्नता व स्थिती भिन्नता.

२) भूमीच्या मर्यादित पुरवठ्यामुळे भाटकाची निर्मिती होते.

३) भूमीला आऱ्हासी उत्पत्ती नियम लागू होत असल्यामुळे भाटकाची निर्मिती होते.

**रिकार्डोच्या खंड सिध्दांवरील टीका**

आधुनिक अर्थशास्त्रज्ञांनी रिकार्डोच्या खंड सिद्धांतावर पुढीलप्रमाणे टीका केलेली आहे.

**१) जमिनीची मुलभूत व अविनाशी शक्ती** : जमिनीत असलेल्या मुलभूत आणि अविनाशी गुणधर्मामुळे खंड निर्माण होतो. या रिकार्डोच्या मतावर टीकाकारांनी टीका केलेली आहे. जमिनीच्या अंगी असणाऱ्या सर्व शक्ती मुलभूत स्वरुपाच्या नसतात. कारण कोणतीही भूमी नैसर्गिक अवस्थेत वापरणे शक्य नसते. त्यासाठी मानवी प्रयत्नाने अनेक प्रक्रिया कराव्या लागतात. त्यामुळे कोणती शक्ती नैसर्गिक व कोणती मानवनिर्मित निश्चितपणे ओळखता येत नाही. तसेच जमिनीची शक्ती ही अविनाशी असते. हे म्हणणे बरोबर नाही. कारण जमीन सतत लागवडीखाली आणल्यामुळे जमिनीची उत्पादकता दिवसेंदिवस कमी होते. ऊन, वारा, पाऊस यांचाही जमिनीच्या सुपीकतेवर परिणाम होतो ही बाब या सिद्धांताने विचारात घेतलेली नाही.

**२) सुपीकतेचा मर्यादित अर्थ** : रिकार्डोच्या मते, सुपीकता म्हणजे नैसर्गिक शक्ती होय. प्रत्यक्षात मात्र जमिनीची सुपीकता ही लागवड पध्दती, पिकांचा प्रकार, कृषीतंत्र, रासायनिक खते, किटकनाशके इत्यादी घटकावर अवलंबून असते. या बाबींचा विचार सिद्धांतात करण्यात आलेला नाही.

**३) लागवडीचा क्रम** : रिकार्डोने ऐतिहासिकदृष्ट्या जमिनीचा जो क्रम लावला तो चुकीचा आहे. रिकार्डोच्या मते, प्रथम सुपीक किंवा उच्च प्रतीची नंतर मध्यम प्रतीची व शेवटी कनिष्ट प्रतीची जमीन लागवडीखाली येते. परंतु अमेरिकेत सुरुवातीला जी वसाहत झाली तेव्हा प्रथम खडकाळ व डोंगराळ म्हणजे कनिष्ट प्रतीची जमीन लागवडीखाली आणली गेली व नंतर सर्वात चांगली जमीन लागवडीखाली आणली गेली.

**४) शेत जमिनीचा वापर** : रिकार्डोच्या मते, शेतजमिनीचा वापर फक्त अन्नधान्याच्या पिकांसाठी केला जातो. औद्योगिक क्रांतीनंतर मात्र जमिनीचा वापर कारखानदार, घरबांधणी, खेळाची मैदाने, रस्ते, विमानतळे इत्यादी अनेक कारणासाठी केला गेला.

**५) सीमांत जमीन किंवा खंड विरहित जमीन** : रिकार्डोच्या मते, सीमांत जमिनीस खंड मिळत नाही. परंतु आज सर्वच प्रकारच्या जमिनींना खंड मिळत असल्याने सीमांत जमिनीला खंड मिळत नाही हे रिकार्डोचे म्हणणे चुकीचे ठरले.

**६) खंड गुणभेदजन्य वाढावा** : रिकार्डोच्या मते, जमिनीला सुपीकतेतील अंतरामुळे म्हणजेच गुणभेदजन्यतेमुळे खंड मिळतो. परंतु टीकाकारांच्या मते, सुपीकतीत असल्यामुळे खंड मिळत नाही तर खंड मिळण्याचे खरे कारण दुर्मिळता हे आहे.

**७) घटत्या उत्पादन फलाचा नियम** : रिकार्डोच्या मते, शेती क्षेत्रात घटत्या उत्पादन फलाचा नियम कार्यवाहीत असतो. जमिनीत श्रम व भांडवलाच्या प्रमाणात वाढ केल्यास शेती उत्पादन घटत्या दराने वाढते. भारतामध्ये १९६० च्या दशकात जी हरितक्रांती झाली त्यामध्ये उत्पादनवर्धक बियाण्यांच्या वापरांमुळे शेतीक्षेत्रात वाढत्या उत्पादन फलाचा नियम दीर्घकाळापर्यंत टिकविता येतो हे सिध्द झाले. त्यामुळे घटत्या उत्पादन फलाचे गृहीत चुकीचे ठरते.

**८) खंड फक्त भूमीलाच मिळतो** : रिकार्डोच्या मते, खंड फक्त भूमीलाच मिळतो. टीकाकारांच्या मते, जमिनीला जसे तिच्या दुर्मिळतेमुळे खंड मिळतो तसाच श्रम, भांडवल, संयोजक या उत्पादनाच्या इतर घटकांना सुध्दा जमिनीप्रमाणेच त्यांच्या दुर्मिळतेमुळे खंड स्वरुपात उत्पन्न प्राप्त होते. त्यामुळे खंड ही एकट्या भूमीची मिरासदारी नाही.

**९) अल्पकाल आणि खंड** : रिकार्डोच्या मते, खंड केवळ दीर्घकाळच प्राप्त होतो. डॉ. मार्शल यांच्या मते, अल्पकाळात मागणीच्या तुलनेत कोणत्याही उत्पादन घटकाचा पुरवठा कमी पडल्यास त्या घटकाची किंमत वाढून त्या घटक मालकाला जास्तीचे उत्पन्न मिळते. या उत्पन्नालाच आभास खंड असे म्हणतात. दीर्घकाळात हा खंड नाहीसा होतो.

**१०) खंड हे अनर्जित उत्पन्न** : रिकार्डोच्या मते, जमीन या नैसर्गिक देणगीचा वापर करु दिल्याबद्दल जमीन मालकाला कुठलेही कष्ट न करता उत्पन्न किंवा खंड प्राप्त होतो. परंतु जमीन मालकाने जमिनीवर विहीर खोदणे, जमीन समतळ करणे, कुंपण लावणे इत्यादी सुधारणा केल्यामुळे खंडरुपी उत्पन्न मिळत असते. म्हणूनच खंड हे अनर्जित उत्पन्न नसून अर्जित उत्पन्न आहे.

**११) खंड आणि किंमत** : रिकार्डोच्या मते, खंडाचा किंमतीवर प्रभाव पडत नाही. परंतु टीकाकारांच्या मते, भूमी एक उत्पादन घटक आहे. खंड हा भूमी या उत्पादन घटकाचा मोबदला आहे. त्यामुळे खंड उत्पादन खर्चाचा एक भाग आहे. त्यामुळे खंडाचा अन्नधान्याच्या किंमतीवर प्रभाव पडतो.

**१२) पूर्ण स्पर्धा अस्तित्वात नसते** : रिकार्डोचा सिद्धांत हा पूर्ण स्पर्धेच्या गृहीतावर आधारलेली आहे. परंतु प्रत्यक्षात शेतीक्षेत्रात पूर्ण स्पर्धा अस्तित्वात नसते. प्रत्यक्षात मात्र अपूर्ण स्पर्धा दिसून येते. अपूर्ण स्पर्धेच्या परिस्थितीत खंडाची निर्मिती कशी होते याचे स्पष्टीकरण करण्यास हा सिद्धांत असमर्थ आहे.

वरील टीका रिकार्डोच्या खंड सिद्धांतावर केल्या जात असल्या तरी हा सिद्धांत आज ही पूर्णपणे नाकारला जात नाही. कारण या सिद्धांताने खंडाची निर्मिती का व कशी होते याचे स्पष्टीकरण द्यायचा पहिला प्रयत्न केलेला आहे. पुरवठ्याच्या मर्यादतेमुळे खंडाची निर्मिती होते. असे रिकार्डोचे मत आधुनिक अर्थशास्त्रज्ञ सुध्दा मान्य करतात. त्यामुळे या सिद्धांताचे अर्थशास्त्राच्या अभ्यासात महत्त्वपूर्ण स्थान आहे.

**५.३ मजुरी, व्याज आणि नफ्याची संकल्पना** (Concept of Wages, Interest and Profit)

**मजुरी** (Wages)

उत्पादनासाठी केलेल्या शारीरिक अथवा बौद्धिक श्रमाबद्दल श्रमिकाला जो मोबदला दिला जातो त्याला मजुरी अथवा वेतन असे म्हणतात. मजुरी या शब्दाचा अर्थ व्यापक आहे. शेतमजूर, कारखान्यातील कामगार, शिक्षक, सरकारी कर्मचारी, वकील, डॉक्टर, इंजिनिअर इत्यादीच्या कामाबद्दल जो मोबदला मिळतो त्याला मजुरी असे म्हणतात. असा मोबदला रोख रकमेत या वस्तूच्या स्वरुपात दिला जातो. श्रम या उत्पादक घटकाला मिळणारा मोबदला म्हणजे मजुरी होय.

**व्याख्या**

**प्रा. बेनहॅम** : ''करारानुसार श्रमिकाला त्याने केलेल्या कार्याबद्दल किंवा सेवेबद्दल मालकाने दिलेल्या पैशातील मोबदला म्हणजे वेतन होय.''

**प्रा. मॅकोनल** : ''श्रमाच्या उपयोगासाठी शोधन करण्यात आलेल्या किमतीला मजुरी किंवा मजुरी दर असे म्हणतात.''

**डॉ. 'मार्शल** : ''श्रमाचा उपयोग करुन घेतल्याबद्दल दिली गेलेली किंमत म्हणजे मजुरी होय.''

थोडक्यात, श्रमिकाला शारीरिक, बौद्धिक व मानसिक कार्याबद्दल दिला जाणारा मोबदला म्हणजे मजुरी होय. यामध्ये लेखापाल यांना प्राप्त होणारे शुल्क, कर्मचाऱ्यांना दिले जाणारे बोनस, रॉयल्टी, कमिशन, अधिकार शुल्क इत्यादीचा मजुरीमध्ये समावेश केला जातो.

**मजुरीचे प्रकार** (Types of Wages)

| मजुरीचे प्रकार |
|---|
| १) कालानुसार मजुरी |
| २) कार्यानुसार मजुरी |
| ३) पैशातील/मौद्रिक/रोख वेतन |
| ४) वास्तव वेतन |

**१) कालानुसार मजुरी** : 'करारानुसार श्रमिकाला विशिष्ट केलेल्या कार्याबद्दल व ठराविक वेळ काम केल्याबद्दल मजुरीला कालानुसार मजुरी असे म्हणतात.' कामगाराला ठराविक वेळ काम करण्याबद्दल निश्चित असलेले वेतन ठरवून दिलेले असते त्याला कालानुसार वेतन असे म्हणतात. या पद्धतीत कामगाराला दर तासाला, दर दिवसाला, दर आठवड्याला, प्रत्येक महिन्याच्या कामाला ठराविक असे निश्चित वेतन दिले जाते. या कालावधीत मजुराकडून उत्पादन कमी-जास्त झाले तरी मजुरीत काहीही फरक केल्या जात नाही. उदा. साखरेचे उत्पादन करताना साखर कारखान्यातील अनेक कामगारांचा सहभाग असतो. तेव्हा प्रत्येक कामगाराची उत्पादकता स्वतंत्रपणे मोजता येत नाही, म्हणून अशा उद्योगातील कामगारांना दर महिन्याला ठराविक वेतन दिले जाते.

**२) कार्यानुसार मजुरी** : 'कामगारांनी केलेल्या कामाच्या प्रमाणात वेतन दिले जात असेल तर त्याला कार्यानुसार वेतन असे म्हणतात.' कामगारांनी केलेल्या कार्याबद्दल किती प्रमाणात काम केले त्यानुसार त्याला कार्यानुसार मजुरी असे म्हणतात. ज्या प्रमाणात कामगाराने उत्पादन केलेले असते त्या प्रमाणात वेतन दिले जात असल्याने त्यास उत्पादनानुसार खंड, वेतन असेही समजले जाते. या पद्धतीत कामगाराच्या कामाची उत्पादकता, कार्यक्षमता इत्यादीचा विचार करुन वेतन दिल्या जाते.

**३) पैशातील/मौद्रिक/रोख वेतन** (Money or Cash Wages) : ठराविक काळात कामगारांनी केलेल्या कामाबद्दल त्याला पैशाच्या स्वरुपात मिळणाऱ्या वेतनाला रोख अथवा मौद्रिक वेतन असे म्हणतात. म्हणजे कामगाराला कामाचा मोबदला रोख पैशात मिळतो तेव्हा त्यास पैशातील मजुरी असे म्हणतात. उदा. एखाद्या कर्मचाऱ्याला महिन्याला ३०,००० रुपये पगार मिळतो हे त्याचे पैशातील वेतन होय.

**४) वास्तव वेतन** (Real Wages) : कामगाराला मिळणाऱ्या पैशातील वेतनाच्या साहाय्याने जो त्या वस्तू व सेवा विकत घेऊ शकतो आणि ते काम करताना त्याला जे प्रत्यक्ष व प्रत्यक्ष स्वरुपाचे फायदे-तोटे मिळतात त्याला वास्तव वेतन असे म्हणतात. विशिष्ट केलेल्या कामाबद्दल व पैशाच्या स्वरुपात वेतन मिळूनही इतर सुखसोयी उपलब्ध असतात त्यांना वास्तव वेतन असे म्हणतात. प्रो. सेलिगमन यांच्या मते, 'पैशाच्या स्वरुपातील मजुरीच्या साह्याने वस्तू व सेवांचा जो संच खरेदी करता येतो, त्याला वास्तव मजुरी असे म्हणतात.' पैशातील वेतनाशिवाय कामगाराला इतर सोयीसुविधा, सवलती मिळत असतील उदा. पोलीस क्वार्टर, मोफत घर, वाहन बस, मुलांच्या शिक्षणाची मोफत सोय, औषधोपचाराची सोय, गणवेश, कामाच्या ठिकाणी कमी किमतीत किंवा मोफत भोजन व इतर बाबींचाही समावेश वास्तव वेतनात होतो. वास्तव वेतनाची संकल्पना अधिक व्यापक आहे. वास्तव वेतन हे पैशातील वेतनापेक्षा जास्त असते. वास्तव मजुरी खालीलप्रमाणे काढली जाते.

**वास्तव मजुरी = रोख मजुरी × मुद्रेची क्रयशक्ती + मिळणाऱ्या सुखसोयी – गैरसोयी**

**वास्तव मजुरी ठरविणारे घटक, प्रभाव टाकणारे, निर्धारक घटक किंवा वास्तव मजुरी कोणत्या घटकांवर अवलंबून असते?**

| वास्तव मजुरीचे निर्धारक घटक |
|---|
| १) पैशाची खरेदी शक्ती |

**१) पैशाची खरेदी शक्ती** : वास्तव वेतन पैशाच्या खरेदी शक्तीवर अवलंबून असते. पैशाच्या मोबदल्यात किती वस्तू व सेवा मिळतात हे महत्त्वाचे

असते. महागाई जास्त असेल तर पैशाची किंमत म्हणजे खरेदीशक्ती कमी असते. याउलट किंमत पातळी जेवढी कमी तेवढी वास्तव उत्पन्न अधिक असे म्हणता येईल.

२) अनुषंगिक लाभ
३) कामाचे स्वरुप
४) कामाच्या ठिकाणची परिस्थिती
५) बढतीची शक्यता
६) ज्यादा मिळकतीची शक्यता

**२) अनुषंगिक लाभ** : श्रमिकाच्या वास्तव उत्पन्नाचा विचार करताना अन्य अनुषंगिक श्रमाचा विचार करावा लागतो उदा. घर, वैद्यकीय सेवा, वाहतूक सेवा, कारखान्यात स्वस्त जेवण मिळणे इत्यादी.

**३) कामाचे स्वरुप** : श्रमिकाचे वास्तव वेतन विचारात घेताना कामाचे स्वरुप पाहावे लागते. नोकरी एकांगी आहे की कायमची आहे. काही श्रमिकांची नोकरी धोकादायक असते. खाण कामगारांना खोल जागेत काम करावे लागते. रेल्वे इंजिन ड्रायव्हरचे किंवा विमानाच्या पायलटचे काम धोक्याचे असते.

**४) कामाच्या ठिकाणची परिस्थिती** : कामाचे ठिकाण किती दूर आहे. भोवतालचा परिसर प्रसन्न आहे की घाणेरडा आहे. रोज किती तास काम करावे लागते. सुट्ट्या किती मिळतात. या गोष्टीही वास्तव वेतनाचा विचार करताना लक्षात घ्याव्या लागतात.

**५) बढतीची शक्यता** : एखादा श्रमिक सध्या जे काम करत असतो त्यात बढतीची शक्यता कितपत आहे ते पाहावे लागते. भावी काळात झपाट्याने भरमसाठ वाढ होण्याची शक्यता असेल तर आज पैशाच्या स्वरुपातील वेतन कमी असले तरी दूरगामी विचार करता ते फायद्याचे ठरते.

**६) ज्यादा मिळकतीची शक्यता** : श्रमिकाला जादा उत्पन्न मिळण्याची शक्यता कितपत आहे. हे विचारात घ्यावे लागतात. शिक्षकांना शिकवण्यावरुन उत्पन्नात भर घालता येते. काही श्रमिकांना दरवर्षी भरपूर बोनस मिळतो, तसेच अनेक प्रकारचे भत्ते मिळतात.

**व्याज** (Interest)

व्याज हा शब्द दोन अर्थाने वापरला जातो. पहिले सावकाराला कर्जदाराने दिलेली किंमत दुसरे भांडवलदाराला भांडवल या उपयोगाबद्दल दिला जाणारा मोबदला होय. औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेत भांडवलाला महत्त्वाचे स्थान आहे. भांडवल हे उत्पादक असते. भांडवलाशिवाय उत्पादन घेणे अशक्य आहे. भांडवलाच्या गुंतवणुकीपासून मिळणारा मोबदला म्हणजे व्याज होय. परंपरागत अर्थशास्त्रज्ञांच्या मते, ज्याप्रमाणे भूमीला खंड मिळतो त्याचप्रमाणे भांडवलाला व्याज मिळते. आधुनिक अर्थशास्त्रज्ञांच्या मते, कर्जाऊ घेतलेल्या रकमांची किंमत म्हणजे व्याज होय. व्याजाची संकल्पना विस्तृतपणे समजून घेण्यासाठी खालील काही व्याख्या महत्त्वाच्या आहेत.

**व्याख्या**

**१) प्रा. केन्स** : 'रोखता पसंती जिंकण्यासाठी दिलेला मोबदला म्हणजे व्याज होय.'

**२) प्रा. कॉर्नर** : 'भांडवलाला मिळणारे उत्पन्न म्हणजे व्याज होय.'

**३) डॉ. मार्शल** : 'ऋणकोद्वारे कर्जाऊ रकमेच्या वापराबद्दल दिली जाणारी किंमत म्हणजे व्याज होईल.'

**४) प्रा. सेलिगमन** : 'व्याज जे भांडवलाच्या निधीपासून मिळणारे उत्पन्न होय.'

**५) प्रा. नट विकसेल** : 'व्याज हे धनकोला ऋणकोने भांडवलाच्या अंगी उत्पादकता हा गुण असल्यामुळे दिलेला मोबदला आहे जो धनकोच्या संयमाबद्दल दिला जातो.'

वरील व्याख्येवरुन असे लक्षात येते की, व्याजाचा संबंध हा पैसा व भांडवलाशी आहे.

**व्याजाचे प्रकार** (Types of Interest)

व्याजाचे प्रामुख्याने सकल मिश्र किंवा एकूण व्याज आणि शुद्ध व्याज असे दोन प्रकार पडतात.

| व्याजाचे प्रकार |
|---|
| अ) सकल/मिश्र/एकूण व्याज |
| १) शुद्ध व्याज |
| २) गैरसोयीचा मोबदला |
| ३) जोखमीचा मोबदला |
| ४) व्यवस्थापनाचा मोबदला |

**अ) सकल/मिश्र/एकूण व्याज**

सकल व्याज ही संकल्पना व्यापक आहे. सकल व्याजात शुद्ध व्याजाचा समावेश होतो. सकल व्याज म्हणजे कर्जदाराने भांडवलाला दिलेली किंमत होय. सकल व्याजात पुढील घटकांचा समावेश होतो.

**१) शुद्ध व्याज** : भांडवलाच्या उपयोगाबद्दल भांडवलदारांना दिला जाणारा मोबदला म्हणजे शुद्ध व्याज होय. शुद्ध व्याजाचा दर हा कमी असतो.

त्याचप्रमाणे शुद्ध व्याजदर सर्वत्र समान दिसून येतो. सर्व बाजारात विशिष्ट कालावधीत व्याजाचा दर साधारणपणे समान असतो.

**ब) शुद्ध किंवा निव्वळ व्याज**

**२) गैरसोयीचा मोबदला** : भांडवलदार जेव्हा विशिष्ट कालावधीसाठी रक्कम कर्जाऊ देतो तेव्हा त्याला गैरसोय करावी लागते. त्या कालावधीत तो आपल्या पैशाचा उपभोग घेऊ शकत नाही. ती रक्कम त्याला विशिष्ट काळापर्यंत अधिक फायदेशीर गुंतवणुकीसाठी उपयोगात आणता येत नाही. त्याला त्याचा गैरसोयीचा मोबदला म्हणून व्याज दिला जातो.

**३) जोखमीचा मोबदला** : भांडवलदार जेव्हा रक्कम कर्जाऊ देतो तेव्हा त्याला जोखीम स्वीकारावी लागते. या जोखीम दोन प्रकारच्या असतात. एक वैयक्तिक जोखीम आणि दुसरी व्यावसायिक जोखीम. जोखीम जास्त असेल तर सकल व्याजाचा दर जास्त राहील आणि जोखीम कमी असेल तर सकल व्याजाचा दर कमी राहील.

**४) व्यवस्थापनाचा मोबदला** : सावकाराला कर्जदाराच्या कर्जाचा हिशोब ठेवावा लागतो. हिशोबासाठी हिशोब पुस्तके विकत घ्यावी लागते. रकमेच्या पावत्या तयार कराव्या लागतात. काही कर्मचाऱ्यांना कामावर ठेवावे लागते. अशावेळी ऋणकोने विहित मुदतीमध्ये कर्जाची परतफेड न केल्यास त्याविरुद्ध न्यायालयात जावे लागते. सावकाराला कर्जापासून जे उत्पन्न मिळते त्याचा व्यवस्थापन कर्जात सुद्धा समावेश होतो. त्याचप्रमाणे धनकोच्या मेहनतीचे वेतन म्हणजेच व्यवस्थापन वेतन होय. हे मिश्र व्याजात समाविष्ट केले जाते.

**ब) शुद्ध किंवा निव्वळ व्याज** (Net Interest)

शुद्ध व्याज म्हणजे काय याचे विवेचन सकल व्याजाच्या घटकांवरुन लक्षात येते. शुद्ध व्याज म्हणजे भांडवलदाराच्या उपयोगाबद्दल दिला जाणारा मोबदला होय. शुद्ध व्याज हा भांडवलाच्या उत्पादकतेचा मोबदला आहे. उत्पादन प्रक्रियेत भांडवलाच्या उत्पादनासाठी उपयोग केला जातो, तेव्हा त्याला उपयोगाबद्दल भांडवलदाराला जो मोबदला मिळतो त्याला शुद्ध व्याज म्हणतात. व्याज इतर कोणत्याही कारणासाठी आकारला जात नाही. जो ऋणकोला केवळ भांडवलाच्या उपभोगाच्या मोबदल्यात दिला जातो. शुद्ध व्याज केवळ भांडवलाच्या उपयोगाचा मोबदला असतो. डॉ. मार्शलच्या मते, 'अर्थशास्त्रात आपण ज्या व्याजाचा अभ्यास करतो अथवा जेव्हा आपण असे म्हणतो की, व्याज केवळ भांडवलाचे उत्पन्न किंवा प्रतिक्षेचे प्रतिफल आहे तेव्हा ते शुद्ध व्याज समजले जाते.'

**नफा किंवा लाभ** (Profit)

उत्पादन घटकाचा शेवटचा आणि महत्त्वाचा घटकाचा मोबदला म्हणजे नफा किवा लाभ होय. राष्ट्रीय उत्पन्नाचा जो भाग वितरणाच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होऊन संयोजकाला प्राप्त होतो त्याला लाभ किंवा नफा असे म्हणतात. नफ्याचे स्वरुप अवशेषाच्या स्वरुपाचे असते. म्हणजेच उत्पादनाच्या सर्व घटकांचा मोबदला दिल्या गेल्यानंतर संयोजकाजवळ जे उत्पन्न शिल्लक राहते ते उत्पन्न म्हणजे नफा होय. काही महत्त्वाच्या व्याख्या पुढीलप्रमाणे.

**व्याख्या**

**१) प्रा. हॉलेज** : 'धोका पत्करल्याबद्दल संयोजकाला दिला जाणारा मोबदला म्हणजे नफा होय.'

**२) प्रा. शुंपीटर** : 'नवप्रवर्तनाबद्दल व जोखीम स्वीकारण्याबद्दल संघटकाला मिळणारा मोबदला म्हणजे नफा होय.'

**३) प्रा. नाईट** : 'उत्पादनातील जोखीम आणि अनिश्चितता पत्करण्याबद्दलचा मोबदला म्हणजे नफा होय.'

**४) प्रा. क्लार्क** : 'वस्तूच्या उत्पादन खर्चावरील किमतीचे आधिक्य म्हणजे नफा होय.'

**५) डॉ. मार्शल** : 'नफा हे व्यवस्थापकाचे उत्पन्न आहे.'

वरील व्याख्येवरुन असे स्पष्ट होते की, संघटकाने उत्पादन कार्यात जोखीम व अनिश्चितता स्वीकारण्याबद्दल आणि नवप्रवर्तन केल्यामुळे मिळणारा मोबदला म्हणजे नफा होय. या ठिकाणी नफा म्हणजे आर्थिक नफा किंवा शुद्ध नफा होय.

**लाभ/नफ्याचे प्रकार**

**१) शुद्ध नफा किवा निव्वळ नफा** (Net Profit)

| लाभाचे प्रकार |
|---|
| १) शुद्ध नफा किवा निव्वळ नफा |

व्यावहारिक भाषेत नफा हा शब्द एकूण नफा या अर्थानेच वापरला

जातो. एकूण नफ्यातून (उत्पन्नातून) एकूण अप्रगत खर्च किंवा अव्यक्त खर्च वजा केल्यानंतर शिल्लक राहिलेले उत्पन्न म्हणजे स्थूल नफा होय. निव्वळ नफा आर्थिक नफा किंवा शुद्ध नफा म्हणजे संयोजकाला वरील सर्व अव्यक्त खर्च वजा करता शिल्लक राहिलेले उत्पन्न होय. निव्वळ नफ्यात खालील घटक समाविष्ट असतात.

**अ) अनिश्चिततेचा मोबदला**
**ब) समन्वयाचा मोबदला**
**क) नवप्रवर्तनाचा मोबदला**
**ड) योग्यता खंड**
**इ) आकस्मिक मोबदला**
**फ) एकाधिकारी लाभ**
**२) स्थूल नफा किंवा मिश्र नफा**

**अ) अनिश्चिततेचा मोबदला** : संयोजक जोखीम व अनिश्चितता स्वीकारतो त्यामुळे त्याला योग्य मोबदला मिळतो.

**ब) समन्वयाचा मोबदला** : संयोजक उत्पादन कार्यासाठी उत्पादन घटकाच्या समन्वयाचे कार्य करतो. तो हे कार्य अशा रीतीने करतो की जेणेकरुन कमीत कमी खर्चात त्याला जास्तीत जास्त नफा मिळू शकेल.

**क) नवप्रवर्तनाचा मोबदला** : संयोजक अनेक मार्गाने नवप्रवर्तन करीत असतो. त्यामुळे उत्पादन खर्चात घट होते व त्याला अधिक नफा मिळतो.

**ड) योग्यता खंड** : काही संयोजक इतरांपेक्षा जास्त गुणसंपन्न असतात. त्यामुळे त्याला त्याच्या योग्यतेचा मोबदला म्हणून जे अतिरिक्त उत्पन्न मिळते त्यालाच योग्यता खंड म्हणतात.

**इ) आकस्मिक मोबदला** : उत्पादन करीत असताना संयोजक बऱ्याचदा या नफ्याची त्याला पूर्वकल्पना नसते. आकस्मितपणे त्याला नफा प्राप्त होतो.

**फ) एकाधिकारी लाभ** : अपूर्ण स्पर्धेत बऱ्याचदा संयोजक आपले उत्पादन अधिक श्रेष्ठ दाखवून वस्तूची जास्त विक्री करतात व किंमत वाढवितात. त्यामुळे ते एकाधिकारी लाभ प्राप्त करु शकतात.

**२) स्थूल नफा किंवा एकूण/मिश्र नफा** (Gross Profit)

मिश्र नफा म्हणजे संयोजकाला त्याच्या एकूण उत्पादन खर्चापेक्षा प्राप्त होणारे अतिरिक्त उत्पन्न होय. एकूण उत्पादन खर्च म्हणजे संयोजकाने खरेदी केलेल्या तसेच कामास लावलेल्या उत्पादनाच्या घटकांचा म्हणजेच भूमी, श्रम, भांडवल आणि व्यवस्थापन यांचा मोबदला व स्थिर भांडवलाचा घसारा खर्च होय. मिश्र नफा हा पुढीलप्रमाणे काढला जातो.

**मिश्र नफा = एकूण प्राप्ती – एकूण व्यक्त खर्च**

**मिश्र नफ्याचे घटक** (Factors of Gross Profit)

स्थूल नफ्याचे किंवा एकूण नफ्याचे घटक खालील प्रमाणे आहेत.

**मिश्र नफ्याचे घटक**
**१) अव्यक्त खर्च**
**अ) भूमीचे खंड**
**ब) भांडवलाचे व्याज**
**क) व्यवस्थापनाचे वेतन**
**ड) घसारा खर्च**
**२) शुद्ध नफा**

**१) अव्यक्त खर्च**

अव्यक्त खर्चाचे घटक खालीलप्रमाणे आहेत.

**अ) भूमीचे खंड** : संयोजकांनी जर उद्योगासाठी स्वतःची जागा वापरली असेल तर एकूण नफ्यात खंडाचा समावेश होतो. जर त्याने ती जागा दुसऱ्याला भाड्याने दिली तर त्याला खंड किंवा भाडे प्राप्त होते. म्हणून शुद्ध नफा काढण्यासाठी एकूण नफ्यातून खंडाची रक्कम वजा केली जाते.

**शुद्ध नफा = एकूण नफा – खंड**

**ब) भांडवलाचे व्याज** : संयोजकाने स्वतःचे भांडवल उद्योगात गुंतविले असेल तर एकूण नफ्यात व्याजाचा समावेश होतो. जर त्याने भांडवलदाराकडून कर्ज घेतले असेल तर त्याला व्याज द्यावे लागते. शुद्ध नफा काढण्यासाठी व्याजाची रक्कम एकूण नफ्यातून वजा करावी लागते.

**क) व्यवस्थापनाचे वेतन** : जर संयोजकांनी स्वतः संघटक, समन्वय व व्यवस्थापनाची कार्य केले तर एकूण नफ्यात व्यवस्थापनाच्या वेतनाचा समावेश होतो. जर त्याने व्यवस्थापनाकडून ही कामे केली असती तर त्याला वेतन द्यावे लागले असते. शुद्ध नफा काढण्यासाठी व्यवस्थापनाच्या वेतनाची रक्कम एकूण नफ्यातून वजा करावी लागते.

**ड) घसारा खर्च** : उत्पादन करीत असताना यंत्राची झीज होते. ही यंत्रे काही काळाने निकामी होतात व यंत्राची दुरुस्ती व जुन्या ऐवजी नवीन यंत्राची उभारणी केली जाते. म्हणून घसाऱ्यावरील खर्च शुद्ध नफा काढताना एकूण खर्चातून वजा करावा लागतो.

**२) शुद्ध नफा :** शुद्ध नफा म्हणजे उत्पादन कार्यातील जोखीम किंवा अनिश्चितता स्वीकारण्याबद्दलचा मोबदला होय. ही रक्कम मिश्र नफ्यामध्ये समाविष्ट असते.

## प्रश्नसंग्रह

**वस्तुनिष्ठ प्रश्न**

१) ..... हा उत्पादनाचा सजीव घटक आहे.
अ) भांडवल **ब) श्रमिक** क) तंत्रज्ञान ड) वीज

२) नोकरीची मागणी भागविणारी जागा म्हणजे ..... होय.
अ) बाजार **ब) श्रम बाजार** क) श्रम संघटना ड) श्रमिक

३) उत्पादन घटकांची मागणी असते.
अ) प्रत्यक्ष **ब) अप्रत्यक्ष** क) संयुक्त ड) अल्प

४) भूमीचा पुरवठा .... असतो.
**अ) मर्यादित** ब) अमर्यादित क) अल्प ड) लवचिक

५) 'खंड फक्त भूमिलाच मिळतो' असे सांगणारा अर्थतज्ञ .... आहे.
**अ) रिकार्डो** ब) जॉन रॉबिन्सन क) मार्शल ड) केन्स

६) 'सीमांत जमिनीला खंड मिळत नाही' असे कोणी म्हटले.
अ) मार्शल **ब) रिकार्डो** क) किन्स ड) रॉबिन्सन

७) केन्सच्या मते, 'रोख रकमेचा त्याग करण्याबद्दल देण्यात येणारा मोबदला म्हणजे .... होय.'
अ) मजुरी **ब) व्याज** क) खंड ड) नफा

८) मुद्रेच्या स्वरुपात मिळणाऱ्या मजुरीस म्हणतात.
अ) वास्तविक मजुरी ब) वैकल्पिक मजुरी **क) रोख मजुरी** ड) नफा

९) श्रम .... असतात.
अ) टिकाऊ (भंडारणीय) ब) अदृश क) परिवर्तनीय **ड) नाशवंत (शीघ्रनाशी)**

१०) उत्पादनाचे एकूण घटक असतात .
अ) एक ब) दोन क) तीन **ड) चार**

११) वस्तूकरिता असणारी मागणी असते.
**अ) प्रत्यक्ष** ब) अप्रत्यक्ष क) संयुक्त ड) नाशवंत

१२) भूमी हे उत्पादनाचे साधन आहे.
अ) **सक्रीय** ब) निष्क्रिय क) अदृश्य ड) नाशवंत

१३) उत्पादन कार्यात जोखीम स्वीकारण्याबाबत संघटकाला मिळणारा हिस्सा म्हणजे .... होय
अ) खंड ब) वेतन क) व्याज **ड) नफा**

१४) जे उत्पन्न भांडवलाच्या मालकाकडे जाते त्याला म्हणतात.
अ) खंड ब) मजुरी **क) व्याज** ड) नफा

१५) उत्पादनातील ---- हा घटक मानवनिर्मित आहे.
अ) भूमी **ब) संयोजक** क) भांडवल ड) भाटक

१६) हॉलेजच्या मते, नफा हे .... बक्षीस आहे.
अ) अनिश्चितेचे ब) नवप्रवर्तनाचे **क) जोखीमीचे** ड) गतिमानतेचे

१७) रिकार्डोच्या खंड सिद्धातानुसार, खंड हा भूमीला प्राप्त होतो
**अ) सीमांत पूर्व** ब) सीमांत क) प्रत्येक जमिनीस ड) मजुरी

१८) सीमांत जमिनीस खंड मिळत नाही असे यांनी म्हटले.
**अ) रिकार्डो** ब) मार्शल क) किन्स ड) रॉबीन्स

१९) हॉलेजच्या मते, संयोजकांच्या मते नफा हा त्याने पत्करलेल्याचा मोबदला असतो.

अ) अनिश्चितता ब) नवप्रवर्तन **क) जोखीम** ड) गतिमानता

२०) रिकार्डोच्या खंड सिद्धातानुसार, सर्वात अगोदर जमीन उपयोगात आणली जाते.

अ) मध्यम ब) हलकी **क) सुपीक** ड) कनिष्ट

२१) श्रमिकांपेक्षा संयोजकांची सौदाशक्ती .... असते.

**अ) जास्त** ब) कमी क) समान ड) व्यस्त

२२) प्रा. नाईट च्या मते, नफा म्हणजेच .... चा मोबदला होय.

**अ) अनिश्चितता** ब) नवप्रवर्तन क) जोखीम ड) गतिमानता

२३) उत्पादक घटकाकरिता असणारी मागणी असते.

अ) प्रत्यक्ष **ब) अप्रत्यक्ष** क) संयुक्त ड) मध्यम

२४) भांडवलाच्या वापराबद्दल ऋणकोने धनकोला दिलेला मोबदला किंवा प्रत्ययाच्या वापराबद्दल दिलेली किमत म्हणजे व्याज होय असे .... यांनी म्हटले.

अ) नट विकसेल **ब) केन्स** क) नाईट ड) मार्शल

२५) 'ऋणकोद्वारा धनकोला कर्जाच्या वापराबद्दल दिला जाणारा मोबदला म्हणजे व्याज होय.' कोणी म्हटले.

अ) नट विकसेल ब) केन्स क) नाईट **ड) मार्शल**

२६) व्याज हे 'धनकोला ऋणकोने भांडवलाच्या अंगी उत्पादकता हा गुण असल्यामुळे दिलेला मोबदला आहे, हा मोबदला त्यांच्या भांडवलाच्या संयमाबद्दल दिला जातो.' असे कोणी म्हटले.

**अ) नट विकसेल** ब) केन्स क) नाईट ड) मार्शल

२७) सकल व्याज म्हणजे .... होय.

अ) नवप्रवर्तनाचा **ब) जोखीम विमा** क) योग्यता खर्च ड) समन्वयाचा

२८) खंड हा फक्त दुर्मिळतेमुळे प्राप्त होतो असे यांनी म्हटले.

अ) डेव्हिड रिकार्डो ब) केन्स क) नाईट **ड) मार्शल**

**लघुत्तरी प्रश्न**

१) खंडाची संकल्पना स्पष्ट करा.

२) खंडाचे प्रकार सांगा.

३) रिकार्डोच्या खंड सिद्धांताची गृहिते सांगा.

४) रिकार्डोच्या खंड सिद्धांतावरील टीका सांगा.

५) भूमीची संकल्पना स्पष्ट करा.

६) भूमीची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

७) श्रमाचा अर्थ सांगून श्रमाची वैशिष्ट्ये सांगा.

८) भांडवलाची व्याख्या सांगून भांडवलाची वैशिष्ट्ये लिहा.

९) संयोजकाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

१०) संयोजकाची कार्ये स्पष्ट करा.

११) विस्तृत लागवडीत खंडाची संकल्पना स्पष्ट करा.

१२) सखोल लागवडीत खंड संकल्पना स्पष्ट करा.

१३) मजुरीचा अर्थ स्पष्ट करा.

१४) रोख मजुरी व वास्तविक मजुरी या संकल्पना स्पष्ट करा.

१५) व्याजाचा अर्थ स्पष्ट करा.

१६) मिश्र व्याज व शुद्ध व्याज या संकल्पना स्पष्ट करा.

१७) मिश्र व्याजाचे घटक स्पष्ट करा.

१८) वास्तविक मजुरीचे निर्धारक घटक सांगा.

१९) नफा म्हणजे काय ही संकल्पना स्पष्ट करा.

२०) मिश्र नफा व शुद्ध नफा या संकल्पना स्पष्ट करा.

२१) मिश्र नफ्याचे घटक स्पष्ट करा.
२२) संयोजकाची कार्ये स्पष्ट करा.
२३) शुद्ध नफ्याचे घटक स्पष्ट करा.

**दीर्घोत्तरी प्रश्न**

१) रिकार्डोच्या खंड सिद्धांताचे टीकात्मक परिक्षण करा.
२) उत्पादनाचे घटक सांगून उत्पादन घटकाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.
३) भूमीची संकल्पना स्पष्ट करुन भूमीची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.
४) श्रमाची व्याख्या स्पष्ट करुन श्रमाची वैशिष्ट्ये सांगा.
५) संयोजकाची वैशिष्ट्ये व कार्ये स्पष्ट करा.
६) भांडवलाचा अर्थ स्पष्ट करुन भांडवलाची वैशिष्ट्ये सांगा.
७) खंड म्हणजे काय? खंडाच्या विस्तृत लागवडीत खंड उदाहरण व आकृतीद्वारे स्पष्ट करा.
८) खंड म्हणजे काय? खंडाच्या सखोल लागवडीत खंड उदाहरण व आकृतीद्वारे स्पष्ट करा.
९) मजुरीची संकल्पना स्पष्ट करुन वास्तविक मजुरीचे निर्धारक घटक स्पष्ट करा.
१०) व्याजाची संकल्पना स्पष्ट करुन व्याजाचे प्रकार सांगा.
११) नफ्याची संकल्पना स्पष्ट करुन नफ्याचे प्रकार लिहा.

## कौशल्य संवर्धन मॉड्युल
## प्रकरण १
## बाजार व्यवस्थेची यंत्रणा
(Mechanism of Market System)

भारताच्या आर्थिक विकासात बाजारपेठेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. बाजार म्हणजे आर्थिक खरेदी-विक्रीचे व्यवहार ज्या ठिकाणी केले जातात असे ठिकाण होय. 'खरेदी' व 'विक्री' या संज्ञा अर्थशास्त्रीय परिभाषेत व्यापक अर्थाने वापरल्या जातात. त्यांत भाडेखरेदीच्या तसेच उधारीच्या व वायदेबाजारातील व्यवहारांचाही अंतर्भाव होतो. अर्थशास्त्रात श्रमिकांची बाजारपेठ, चलन-बाजारपेठ, नवनिर्मित वस्तूंची बाजारपेठ, त्याचप्रमाणे जुन्यापुराण्या मोटारींची बाजारपेठ ह्या संज्ञा प्रचलित आहेत. या अर्थाने बाजारपेठेसाठी विवक्षित स्थळाची आवश्यकता नसते. या बाजारपेठेतील ग्राहक-विक्रेते प्रत्यक्ष संपर्कात येतीलच असेही नाही किंबहुना पुष्कळदा विक्रेता वा ग्राहक कोणीही विक्रेय वस्तू प्रत्यक्षात पाहिलेलीही नसते, तरीही त्यांच्यात त्या वस्तूचा व्यापार होतो. भारतात असणारी विक्री पद्धत किंवा बाजार यंत्रणा ही हळूहळू विकसित झालेली आहे. विशेषत: शेतमालाच्या बाबतीत असणारी बाजार व्यवस्था अजूनही काही प्रमाणात दोषपूर्ण आहे, तरीही असणारी प्रचलित बाजार व्यवस्था पारंपारिक पद्धतीची तर स्वातंत्र प्राप्तीनंतर थोडीशी विकसित झालेले दिसून येते. त्यामध्ये प्रामुख्याने आठवड्याचे बाजार, मंडई, नियंत्रित बाजारपेठा, सहकारी कृषी विपणन व्यवस्था यांचा समावेश दिसून येतो.

भारतातील सर्वसाधारण किंमत पातळीवर सातत्याने चढ उतार झालेले दिसून येतात आणि किंमत प्रवृत्ती वाढती असते. देशाच्या आर्थिक विकासामध्ये किंमत स्थैर्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे आणि त्या दृष्टीने सरकार किंमत पातळीवर सातत्याने नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करीत असतो. शेतमालाचे महत्त्वाचे वैशिष्ठ्य असे की, शेतमालाचा पुरवठा हा हंगामी आहे, आणि त्यासाठी असणारी मागणी ही पूर्ण वर्षभरात असते. अशावेळी जिवणाश्यक वस्तूंचा पुरवठा हा पूर्ण वर्षभर होणे गरजेचे असते आणि त्यासाठी देशात अशी एखादी यंत्रणा पाहिजे की वस्तूंचा पुरवठा वर्षभर होऊन किंमत पातळीत सर्वसाधारणपणे वर्षभर स्थैर्य आणले असले पाहिजे म्हणजे. एकूण देशाच्या आर्थिक विकासात बाजार यंत्रणा विकासाला गती देण्याचे कार्य करीत असते.

तुलनात्मकदृष्ट्या ग्रामीण भागाचा विकास होण्याच्या दृष्टीने शेती क्षेत्राला महत्त्वाचे स्थान आहे. शेती क्षेत्राचा विकास होण्यासाठी प्रामुख्याने शेतकऱ्यांच्या मालाला योग्य किंमत मिळणे गरजेचे आहे आणि अशी योग्य किंमत, जर बाजार यंत्रणा सुधारित असेल तरच मिळेल. म्हणजेच देशाच्या आर्थिक विकासात शेतमालाला योग्य किंमत मिळणे गरजेचे आहे.

भारतातील शेतकरी वर्ग अन्य वर्गाच्या तुलनेत गरीब दिसून येतो. अशा बाजारव्यवस्थेमध्ये व्यापारी, दलाल, अडते संख्येने कमी असल्यामुळे त्यांची सौदाशक्ती जास्त असते आणि नफा मिळवण्यासाठी असे लोक शेतकऱ्यांची किमतीच्या बाबतीत फसवणूक करतात. सध्याच्या अनियंत्रित बाजार व्यवस्थेत अनेक दोष/ वा अडचणी/अडथळे खालीलप्रमाणे दिसून येतात.

**कृषी विपणन व्यवस्थेतील प्रमुख अडथळे**

- बाजार अत्यंत विखंडित
- बाजारपेठांची अपुरी संख्या
- अपुऱ्या पायाभूत सुविधा
- उच्च बाजार शुल्क
- उच्च कापणीच्या नंतरची नासाडी/अपव्यय
- परवानामध्ये निर्बंध
- शेतकऱ्यांना कमी मोबदला आणि उच्च मध्यस्थी खर्च
- बाजार माहितीची विषमता
- अपुऱ्या पत-पुरवठ्याच्या सुविधा
- इतर

## प्रकरण २

## कृषी उत्पन्न बाजार समिती

(Agricultural Produce Market Committee-APMC)

कृषी हे भारतीय अर्थव्यवस्थेतील सर्वात गंभीर क्षेत्रांपैकी एक आहे. कृषी आणि संलग्न क्षेत्राची वाढ आणि विकास मोठ्या प्रमाणावर लोकांच्या कल्याणावर, ग्रामीण समृद्धीवर आणि रोजगारावर थेट परिणाम करतो; आणि अनेक कृषी-आधारित उद्योग आणि कृषी-सेवांसाठी हा एक महत्त्वाचा संसाधन आधार बनतो. एकूण उत्पादन आणि उत्पादकता सतत वाढवली जात असताना, शेतकरी समुदायाला त्यांच्या उत्पादनासाठी योग्य किंमत मिळवून देण्यासाठी त्यांना योग्य पायाभूत सुविधांसह उत्तम विपणन सुविधा प्रदान करणे आवश्यक आहे. बहुसंख्य लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी कृषी क्षेत्रातील मूल्यवर्धनामध्ये मोठी क्षमता आहे.

**कृषी विपणन नियमनचा संक्षिप्त इतिहास**

भारतातील कृषी उत्पादन बाजार नियमन कार्यक्रमाचा इतिहास ब्रिटीश काळापासूनचा आहे. मँचेस्टर (यूके) च्या कापड गिरण्यांना शुद्ध कापसाचा पुरवठा वाजवी किमतीत उपलब्ध करुन देण्याच्या ब्रिटिश राज्यकर्त्याच्या चिंतेमुळे सरकारचे लक्ष वेधून घेणारा कच्चा कापूस हा पहिला शेतमाल होता. परिणामी, हैदराबाद रेसिडेन्सी ऑर्डर अंतर्गत प्रथम विनियमित बाजारपेठ (कारंजा लाड जि. वाशिम) १८८६ मध्ये देशात स्थापन करण्यात आली. आणि १८८७ चा बेरार कॉटन अँड ग्रेन मार्केट हा पहिला कायदा होता. ज्याने ब्रिटीश रहिवाशांना नियुक्त जिल्ह्यातील कोणतेही ठिकाण विक्रीसाठी बाजार घोषित करण्याचा अधिकार दिला. शेतमालाची खरेदी आणि नियमन केलेल्या बाजारांच्या देखरेखीसाठी एक समिती स्थापन करणे. हा कायदा देशाच्या इतर भागात लागू करण्याचा आदर्श बनला. देशातील कृषी विपणन दृश्यातील एक महत्त्वाची खूण म्हणजे रॉयल कमिशन ऑन ॲग्रिकल्चर, १९२८ ची विपणन पद्धतींचे नियमन आणि विनियमित बाजारपेठेची स्थापना करण्याची शिफारस. परिस्थिती सुधारण्यासाठी केलेल्या उपाययोजनांपैकी व्यापार पद्धतींचे नियमन करणे आणि ग्रामीण भागात मार्केट यार्ड स्थापन करणे हे होते. या अनुषंगाने, भारत सरकारने १९३८ मध्ये एक मॉडेल बिल तयार केले आणि सर्व राज्यांना वितरित केले परंतु स्वातंत्र्यापर्यंत फारशी प्रगती झाली नाही. नंतर, बहुतेक राज्यांनी साठ आणि सत्तरच्या दशकात कृषी उत्पादन बाजार विनियमन (Agricultural Produce Markets Regulation (APMR) Acts) अधिनियम लागू करुन ते कार्यान्वित केले. सर्व प्राथमिक घाऊक बाजार या कायद्यांच्या कक्षेत आणण्यात आले. सुव्यवस्थित मार्केट यार्ड आणि उप-यार्ड बांधले गेले आणि प्रत्येक बाजार क्षेत्रासाठी, नियम तयार करण्यासाठी आणि त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी एक कृषी उत्पन्न बाजार समिती (APMC) स्थापन करण्यात आली. अशा प्रकारे, संघटित कृषी विपणन विनियमित बाजारपेठेद्वारे अस्तित्वात आले.

**बाजार समितीचा कारभार**

बाजार समितीचा कारभार निवडून आलेले संचालक मंडळ, त्यांच्यामधील सभापती, उपसभापती, सदस्य व बाजार समितीचे सचिव अशा संचालक मंडळाकडून केला जातो. कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालकाची निवड ही मतदानाद्वारे केली जाते त्यामध्ये शेतकरी प्रतिनिधी, व्यापारी प्रतिनिधी, हमाल मापाडी प्रतिनिधी यासारखे प्रतिनिधी असतात. यामध्ये सेवा सहकारी सोसायटीचे सदस्य व ग्रामपंचायत सदस्य यांनाही मतदानाचा अधिकार असतो.

**कृषी उत्पन्न बाजार समितीचे कार्य**

१) बाजाराच्या आवारात शेतीमाल खरेदी-विक्री व्यवसायासाठी आवश्यक त्या सर्व सुविधा पुरवणे.
२) शेतकऱ्यांच्या शेतीमालाविषयी हिताचे संरक्षण करणे.
३) शेतीमालाची उघड लिलाव पद्धतीने विक्री करणे.
४) बाजाराच्या आवारात विक्रीस आलेल्या शेतीमालाचे चोख वजनमाप करणे.
५) शेतकऱ्यांना शेतीमाल विक्रीचे २४ तासांत पैसे मिळवून देणे. विवादाची विनामुल्य तडजोड करणे.
६) शासनाने निश्चित केलेल्या शेतीमालाच्या आधारभूत किंमतीपेक्षा कमी भावात शेती मालाची खरेदी-विक्री व्यवहार होणार नाहीत याची दक्षता घेणे.

७) शेतीमालाची प्रत व दर्जा वाढविण्यासाठी शेतकऱ्यांना उत्तेजित करणे.
८) अडते, व्यापारी, हमाल, तोलणार, मदतनीस, प्रक्रियाकार यांना परवाने देणे, परवान्यांचे नुतनीकरण करणे, रद्द करणे इ.
९) बाजार समिती कायदा व नियमातील तरतुदीनुसार परवानाधारक यांच्या हिशोबाच्या नोंदवह्या व अनुषंगिक कागदपत्रांची तपासणी करणे व हिशोब/बिलपट्ट्या प्रमाणित करणे.

**किमान आधारभूत किंमत (MSP) म्हणजे काय?**

MSP म्हणजे किमान आधारभूत किंमत (Minimum Support Price) ही एक हमीभावाची प्रणाली आहे. (MSP) हमीभाव प्रत्येक पिकांवर वेगवेगळ्या पध्दतीने लागू होतो. जर शेतकऱ्याच्या पिकाला बाजारात भाव कमी असेल, किंवा घसरण झाली असेल तर केंद्र सरकारने ठरवलेल्या हमीभावाने शेतकऱ्यांकडून शेतमाल खरेदी करते. केंद्र सरकार ज्या किंमतीत शेतमाल खरेदी करतं, त्यालाच MSP म्हणतात. यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळतो. शेतकऱ्यांचे नुकसान होत नाही. तर व्यापारी आणि कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये जे मनमाने दर ठरवले जातात त्यावरही अंकुश येणार आहे. यामुळेच नविन कृषी कायद्यातील बदलाला काही राज्यांमधून विरोध होत आहे.

भारत सरकारचे कृषी मंत्रालय MSP ठरवते. MSP प्रत्येक पिकांवर वेगवेळी लागू होते. तर एखाद्या शेतमालाचा संपूर्ण देशातला (MSP) हमीभाव एकसमान असते. म्हणजे एक क्विंटल गहू महाराष्ट्रात ज्या दराने सरकार खरेदी करते त्याच दरात इतर राज्यातही खरेदी केली जाते. अशापध्दतीने सरकार २३ शेतमालांची खरेदी करते यामध्ये गहू, ज्वारी, बाजरी, मका, मूग, शेंगदाणा, सोयाबीन, तीळ आणि कापूस या पिकांचा समावेश आहे.

## प्रकरण ३

## ई–नाम (e- NAM)

भारतीय अर्थव्यवस्था कृषिप्रधान अर्थव्यवस्था असल्यामुळे रोजगारासाठी शेतीवर अवलंबून असणाऱ्यांचे प्रमाण देखील खूप जास्त आहे. भारतातील जवळपास ५८% लोकसंख्येसाठी शेती हे आज देखील उपजीविकेचे प्रमुख साधन आहे आणि देशाच्या एकंदरीत सकल दरडोई उत्पादनामध्ये शेतीचे योगदान जवळपास १८% आहे. सहाजिकच शेतीतील कोणत्याही प्रकारचा विकास आणि सुधारणा यांचा थेट प्रभाव भारतातील बहुतांश लोकसंख्येच्या विकासावर होत असतो. भारत सरकारने शेती क्षेत्रामध्ये हाती घेतलेल्या प्रमुख उपक्रमांमध्ये ई–नाम किंवा इलेक्ट्रॉनिक नॅशनल ॲग्रिकल्चर मार्केटचा (Electronic National Agriculture Market) समावेश आहे. हे संपूर्ण भारताचे कृषी उत्पादनांसाठी चालवण्यात येणारे इलेक्ट्रॉनिक व्यापार पोर्टल आहे. आधीपासून अस्तित्वात असलेल्या कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या (एपीएमसी) नेटवर्कमार्फत कृषी मालांसाठी एकीकृत राष्ट्रीय बाजारपेठ निर्माण करण्यासाठी १४ एप्रिल २०१६ रोजी पोर्टल सुरु करण्यात आले.

कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या मूळ संरचनेमध्ये स्वतःची काही आव्हाने आहेत. प्रत्येक राज्यामध्ये स्वतंत्र कृषी उत्पन्न खरेदी–विक्री कायदा लागू करण्यात आलेले आहेत. त्यांच्या तरतुदी वेगवेगळ्या आहेत आणि एकसंघपणा किंवा सुसंगतपणाच्या अभावामुळे कृषी बाजारपेठांचे विखंडन झाले असून प्रत्येक राज्य एक स्वतंत्र बाजारपेठ बनले आहे. कृषी उत्पन्न बाजार समित्या स्थापन करण्यामागचा मूळ उद्देश सर्व व्यापार नियंत्रित बाजारपेठांमध्ये आणून शेतकऱ्यांच्या व्यापाऱ्यांकडून होणाऱ्या छळाला प्रतिबंध घालणे हा होता पण अशा विखंडित बाजारपेठा तयार करण्यात आल्याने प्रतिबंधात्मक पद्धती आणि व्यापाऱ्यांमध्ये आपापसात संगनमताचे प्रकार सुरु झाले ज्यामुळे शेतकऱ्यांचे मध्यस्थांवर अवलंबून राहण्याचे प्रमाण खूप वाढले. परिणामी, या संपूर्ण व्यवस्थेमध्ये आंतरराज्यीय व्यापार अधिकच कठीण बनला.

**उद्देश व फायदे**

- खरेदी–विक्रीतील आव्हाने दूर करण्यासाठी ई–नामची (e-NAM) स्थापना करण्यात आली. खरेदीदार आणि विक्रेते एकाच जागी नसताना देखील व्यवहार करु शकतात अशी अखंडित राष्ट्रीय बाजारपेठ निर्माण करणे हे यामागचे लक्ष्य होते.
- देशात विविध ठिकाणांहून ऑनलाईन खरेदीदारांकडून अनामिकपणे बोली लावली जात असल्यामुळे व्यापाऱ्यांना आपापसात संगनमत करण्याच्या संधी कमी होतात. हा ई–नामचा सर्वात मोठा फायदा आहे.
- ई–नाममध्ये (e-NAM) एका व्यापाऱ्याला जारी करण्यात आलेला एक परवाना राज्यातील सर्व बाजारपेठांमध्ये वैध असतो. तसेच शेतकऱ्याकडून करण्यात येणाऱ्या पहिल्या घाऊक खरेदीवर बाजारपेठ शुल्काचा कर एकाच ठिकाणी आकारला जातो. मंडीतील स्थानिक व्यापाऱ्यांसाठी ई–नाममध्ये दुय्यम व्यापारासाठी अधिक मोठ्या राष्ट्रीय बाजारपेठेचा लाभ घेण्याची संधी मिळते.
- ई–नाम प्लॅटफॉर्ममार्फत स्थानिक मंडी स्तरावर व्यापारांमध्ये थेट सहभागी होण्याचे लाभ शेतकऱ्यांना मिळतात त्यामुळे मध्यस्थांवर होणारा त्यांचा खर्च वाचतो.
- ई–नाममुळे (e-NAM) आता शेतकऱ्यांना मालाच्या किमतींबाबतची माहिती त्यांच्या मोबाईलमध्ये ई–नाम ॲपवर (e-NAM App) 24X7 मिळत राहते. आपल्या मालासाठी लावल्या गेलेल्या बोली तसेच गुणवत्ता मूल्यांकन निकष हे सर्व शेतकऱ्यांना त्यांच्या मोबाईलवर पाहता येते. त्याचप्रमाणे व्यापारी देखील एकाच परवान्यावर एकापेक्षा जास्त बाजारपेठांमधून खरेदी करु शकतात व ऑनलाईन बोली लावू शकतात.

**ई–नाम ची नोंदणी व व्यवहार**

- enam.gov.in या संकेतस्थळावर (वेबसाईटवर) जाऊन तेथील सर्चबारमध्ये नोंदणी (Registration) या पर्यायाला क्लिक करा.
- नंतर शेतकरी (Farmer) हे पर्याय निवडल्यावर लॉग इन (Log in) करा.
- त्यानंतर ई–मेलवर तात्पुरते लॉगिन आयडी आणि पासवर्ड मिळेल. ई–मेलच्या आधारे लॉगिन करु शकता. APMC कडून मान्यता मिळाली की व्यवहार करण्यास सुरुवात करु शकता.

**संदर्भ**

१) प्रा. (डॉ.) स. श्री. मु. देसाई व जोशी (१९८५) : 'आर्थिक विश्लेषण', निराली प्रकाशन, बुधवार पेठ, पुणे.
२) माहोरे (डॉ.) रा. य. (१९९०) : 'अर्थशास्त्राचे सिद्धांत', अंशुल पब्लिकेशन, नागपूर (प्रथमावृत्ती).
३) डॉ. एस. एन. कुलकर्णी (२०००) : 'सूक्ष्म अर्थशास्त्र', विद्या प्रकाशन, रुईकर रोड, नागपूर देसाई व जोशी– प्रथम आवृत्ती.
४) डॉ. एम. एन. शिंदे (२००३) : 'सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्र', अजित पब्लिकेशन्स्, सांगली प्रथमावृत्ती.
५) प्रा. राम देशमुख (२००३) : 'सूक्ष्म अर्थशास्त्र', विद्या प्रकाशन, नागपूर.
६) प्रा. भोसले व काटे (२००५) : 'अंशलक्षी अर्थशास्त्र', फडके प्रकाशन, कोल्हापूर.
७) प्रा. के. एच. ठक्कर (२००५) : 'सूक्ष्म अर्थशास्त्र', फडके प्रकाशन, कोल्हापूर.
८) प्रा. के. एम्. भोसले, प्रा. के. बी. काटे व प्रा. डॉ. एस. एल. भोसले (२००५) : 'सूक्ष्म अर्थशास्त्र', फडके प्रकाशन, कोल्हापूर.
९) प्रा. कृष्णराव पाटील (२०११) : 'उच्चतर आर्थिक सिद्धांत', श्री मंगेश प्रकाशन, नागपूर–द्वितीय आवृत्ती.
१०) डॉ. डी. व्ही. मुळे (२०१३) : सूक्ष्मलक्षी आर्थिक विश्लेषण, प्रकाशक– कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
१) डॉ. एम. एल. झिंगन (२००४) : 'व्यष्टि अर्थशास्त्र', वृंदा पब्लिकेशन्स प्रा.लि. दिल्ली. प्रथम संस्करण हिंदी आवृत्ती.
1) Dr. D. Bose (2000) : 'Introduction to Micro Economics', Himalaya Publishing House.
2) M. L. Jhingan (2010) : 'Micro Economics', Vrinda Publications (P) Ltd. Delhi.
3) Mithani D. M; : 'Principles of Economics', Himalaya Publishing House, Bombay, (3rd edition) (1985).

## लेखक परिचय



**डॉ. एम. के. नन्नावरे**

**एम. ए., सेट, एम. फिल, पीएच. डी. (अर्थशास्त्र)**

- सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख, पदवी व पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग, श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आकोट जि. अकोला.
- बी. ए. पदवी वर्ग– १४ वर्ष व एम. ए. पदव्युत्तर – ०८ वर्ष अध्यापन कार्याचा अनुभव.
- संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अंतर्गत अर्थशास्त्र पीएच. डी. संशोधन मार्गदर्शक व सदस्य, अर्थशास्त्र विषय परीक्षा समिती (पदव्युत्तर पदवी).
- संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अंतर्गत एम. ए. (अर्थशास्त्र) भाग १ सेमी. II (NEP) च्या अभ्यासक्रमात २; तर एम. ए. (अर्थशास्त्र) भाग २ सेमी. IV (CBCS) च्या अभ्यासक्रमात १ संदर्भ पुस्तक म्हणून मान्यता.
- आजीवन सदस्य : इंडियन इकॉनॉमिक असोसिएशन, मराठी अर्थशास्त्र परिषद, विदर्भ विद्यापीठ अर्थशास्त्र शिक्षक परिषद.
- विविध राज्यस्तरीय परिषदांमध्ये सहभाग व शोधनिबंध प्रकाशित.
- यू.जी.सी. मान्यताप्राप्त एक मायनर रिसर्च प्रोजेक्ट पूर्ण.

**प्रकाशित ग्रंथसंपदा**

- लोकसंख्याशास्त्र (जानेवारी, २०२१)
- मानवी विकास (फेब्रुवारी, २०२२)
- लोकसंख्याशास्त्र : सिद्धान्त व विकास (जानेवारी, २०२३)
- महाराष्ट्राची अर्थव्यवस्था (एप्रिल, २०२३).
- मानवी विकासाचे अर्थशास्त्र (जून, २०२३)